मंगळवार
२८
ऑक्टोबर २०२५

अकोला
पाने : ८ + ४
वर्ष : १९
अंक : २३२
स्वागत मूल्य ३ रुपये
www.ajinkyabharat.com

# अजिंक्य भारत
बातम्यांचा गतिमान पाठलाग


डिव्हाइनचा वनडे क्रिकेटला अलविदा!
(पान ७ वर)

## महत्त्वाचे

### न्या. सूर्यकांत होणार देशाचे सरन्यायाधीश



**नवी दिल्ली:** सरन्यायाधीश बी.आर. गवई यांनी भावी सरन्यायाधीश म्हणून न्यायमूर्ती सूर्यकांत यांचे नाव सुचवण्यासाठी केंद्रीय कायदा मंत्रालयाला प्रस्ताव पाठवला आहे. गवई २३ नोव्हेंबर रोजी त्यांच्या पदावरून निवृत्त होत आहेत. न्यायमूर्ती सूर्यकांत २४ नोव्हेंबर रोजी सरन्यायाधीशपदी नियुक्त होतील. ९ फेब्रुवारी २०२७ पर्यंत ते या पदावर कार्यरत असतील. सूर्यकांत यांनी रोहतक येथील महर्षी दयानंद विद्यापीठातून कायद्याची पदवी (एलएलबी) पूर्ण केली. त्याचवर्षी त्यांनी हिसार येथील जिल्हा न्यायालयात वकिली सुरू केली. १९८५ मध्ये त्यांनी चंदीगड येथील पंजाब आणि हरियाणा उच्च न्यायालयात वकिली सुरू केली. संवैधानिक, सेवा आणि दिवाणी बाबींमध्ये त्यांच्या सखोल समज यामुळे त्यांनी आपली वेगळी ओळख निर्माण केली.

### ठाण्यात चित्रा वाघ ॲक्शन मोडवर



**कळवा:** आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका जसजशा जवळ येत आहेत, तसतसे राज्यातील राजकीय घडामोडींना वेग आला आहे. सर्वच पक्षांचे नेते विविध भागांचा दौरा करत असून, याच पार्श्वभूमीवर भाजपच्या विधान परिषदेच्या आमदार चित्रा वाघ यांनी ठाण्यातील कळवा येथील रुग्णालयाला भेट दिली. आमदार चित्रा वाघ यांनी यावेळी रुग्णालयातील प्रशासनाकडून विशेषतः प्रसूती कक्ष आणि महिलांशी संबंधित आकडेवारीबद्दल सविस्तर माहिती घेतली. ठाणे पालिका मुख्य वैद्यकीय अधिकारी आणि वैद्यकीय अधीक्षक यावेळी उपस्थित होते. या भेटीदरम्यान त्यांनी महिलांना होणाऱ्या त्रासावर प्रशासनाशी विचारपूस केली. चित्रा वाघ यांच्या अचानक भेटीमुळे रुग्णालयातील कर्मचाऱ्यांची धावपळ उडाली होती. महत्त्वाचे म्हणजे, प्रसूती कक्षासमोरील बेड उपलब्ध नाही असा बोर्ड तातडीने काढून टाकून त्याची साफसफाई करण्यात आली आणि नवीन बोर्ड लावण्यात आला.

### कार्तिकी यात्रेनिमित्त जादा बसेस सोडण्यात येणार



**मुंबई :** यंदा पंढरपूर येथे २ नोव्हेंबर रोजी संपन्न होणाऱ्या कार्तिकी एकादशी यात्रेसाठी भाविक-प्रवाशांच्या सोयीकरता राज्यभरातुन एसटी महामंडळ तब्बल ११५० जादा बसेस सोडण्याचे नियोजन आहे, अशी माहिती परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी दिली. पंढरपूर येथील एसटी महामंडळाच्या 'चंद्रभागा' या यात्रा बसस्थानकावरून दिनांक २८ ऑक्टोबर ते ३ नोव्हेंबर दरम्यान कार्तिकी एकादशी यात्रेनिमित्त जादा बस वाहतूक केली जाणार आहे. या बसस्थानकावर १७ फलाट असून सुमारे १००० बसेस लावण्याची सुसज्ज पार्किंग व्यवस्था या ठिकाणी आहे. तसेच सर्व एसटी कर्मचारी व अधिकाऱ्यांच्या राहण्याची सोय देखील या बसस्थानकामध्ये करण्यात आली आहे.

# देशाची प्रतिमा मलीन होतेय!

## भटक्या कुत्र्यांच्या वाढत्या हल्ल्यावरून सर्वोच्च न्यायालयाने सर्व राज्यांचे कान उपटले

**नवी दिल्ली: दि. २७ वृत्तसंस्था**



सर्वोच्च न्यायालयाने आज (दि. २७ ऑक्टोबर) राज्य सरकार आणि केंद्रशासित प्रदेशांचे चांगलेच कान पिळले. सर्वोच्च न्यायालयाने भटक्या कुत्र्यांवर नियंत्रण आणण्यासाठी काही निर्देश शासनाला दिले होते. मात्र राज्य सरकारने या निर्देशांचे पालन करता आलं नाही. यामुळे सर्वोच्च न्यायालयाने देशातील राज्य सरकार आणि केंद्रशासित प्रदेशांना चांगलेच फटकारले. त्याचबरोबर ३ नोव्हेंबर रोजी होणाऱ्या सुनावणीवेळी त्यांच्या मुख्य सचिवांना व्यक्तीशः हजर राहण्याचे आदेश देखील दिले. सर्वोच्च न्यायालयाने भटक्या कुत्र्याच्या प्रश्नामुळं देशाच्या प्रतिमेला तडे जात असल्याचे देखील सांगितलं.

सर्वोच्च न्यायालयाने भटक्या कुत्र्यांच्या प्रश्नाबाबत दाखल झालेल्या याचिकेवर आजच्या सुनावणीवेळी आतापर्यंत फक्त दिल्ली महानगरपालिका आणि पश्चिम बंगाल, तेलंगणा या राज्यांनी शपथपत्र सादर केल्याचं सांगितलं. त्यानंतर न्यायालयाने या तिघांव्यतिरिक्त इतर सर्व राज्य आणि केंद्र शासित प्रदेशांच्या मुख्य सचिवांना पुढच्या सोमवारी होणाऱ्या सुनावणीवेळी सकाळी १०.३० वाजता सर्वोच्च न्यायालयात हजर राहण्याचे आदेश दिले. त्यांनी येताना अजूनपर्यंत कम्पायन्स रिपोर्ट सादर का केला नाही याचं लेखी स्पष्टीकरण (पान २ वर)

### स्टेटस रिपोर्ट सादर करण्याचे आदेश

भटक्या कुत्र्यांच्या वाढलेल्या संख्येवर आणि नागरिकांवर होणाऱ्या हल्ल्यांवर नियंत्रण मिळवण्यासाठी प्रशासन काय उपाययोजना राबत आहे यावर सर्वोच्च न्यायालयाचं लक्ष आहे. सर्वोच्च न्यायालयानं यापूर्वीच्या सुनावणीत सर्व राज्य सरकार आणि केंद्र शासित प्रदेशांना कुत्र्यांच्या निर्जंतुकीकरण, लसीकरण आणि पुनर्वसन करण्याच्या मोहीमेचा स्टेटस रिपोर्ट सादर करण्याचे आदेश दिले होते.

# बिहार निवडणुकीनंतर १२ राज्यांमध्ये एसआयआर!

## मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांची घोषणा



**नवी दिल्ली: दि. २७ वृत्तसंस्था**

**मतदार याद्यांची विशेष सखोल फेरतपासणी (एसआयआर)चा दुसरा टप्पा लवकरच १२ राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांमध्ये राबविला जाईल, अशी घोषणा मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांनी आज (दि. २७) केली.**

### अशी राबवली जाणार प्रक्रिया

- **यावेळी मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांनी १२ राज्ये/केंद्रशासित प्रदेशांमध्ये होणाऱ्या मतदार यादी विशेष सखोल फेरतपासणीच्या दुसऱ्या टप्प्याचे वेळापत्रक जाहीर केले. छपाई/प्रशिक्षण - २८ ऑक्टोबर ते ३ नोव्हेंबर २०२५**
- **घरोघरी जाऊन गणनेचा टप्पा** - ४ नोव्हेंबर ते ४ डिसेंबर २०२५
- **मतदार याद्यांचे मसुदा प्रकाशन** - ९ डिसेंबर २०२५
- **दावे आणि हरकतींचा कालावधी** - ९ डिसेंबर २०२५ ते ८ जानेवारी २०२६
- **सूचना टप्पा (सुनावणी आणि पडताळणी)** - ९ डिसेंबर २०२५ ते ३१ जानेवारी २०२६
- **अंतिम मतदार याद्यांचे प्रकाशन** - ७ फेब्रुवारी २०२६

मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांनी जाहीर केले की, अंमतदार याद्यांची विशेष सखोल फेरतपासणी (एसआयआर)चा दुसरा टप्पा उद्या, २८ ऑक्टोबर रोजी सुरू होईल. गोवा, अंदमान आणि निकोबार, छत्तीसगड, गुजरात, केरळ, लक्षद्वीप, मध्य प्रदेश, पुद्दुचेरी, राजस्थान, तामिळनाडू, उत्तर प्रदेश, पश्चिम बंगाल या राज्यात एसआयआरचा दुसरा टप्पा राबवला जाईल. या प्रक्रियेत मतदार याद्या अद्ययावत करणे, नवीन मतदार जोडणे आणि मतदार याद्यांमधील चुका दुरुस्त करणे समाविष्ट असेल. १२ राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांमधील मतदार याद्या आज (दि. २७) रात्रीपासून गोठवल्या जातील. (पान २ वर)

### विधानसभा निवडणुका केव्हा ?

**२०२६:** पश्चिम बंगाल, केरळ, तामिळनाडू, पुद्दुचेरी
**२०२७:** गोवा, गुजरात, उत्तर प्रदेश
**२०२८:** छत्तीसगड, मध्य प्रदेश, राजस्थान; अंदमान निकोबार आणि लक्षद्वीपमध्ये विधानसभा नाही.

## शाळांच्या दिवाळीच्या सुट्टयामध्ये वाढ

**नागपूर : दि. २७ वृत्तसंस्था**

यावर्षी दिवाळीच्या सुट्ट्या फार कमी देण्यात आल्याचा आरोप करण्यात आला होता. त्यानंतर शिक्षण उपसंचालकांनी महत्त्वाच्या निर्णय घेतलेला आहे. यावरून आता दिवाळीच्या सुट्ट्यांमध्ये अचानक वाढ करण्यात आलेली आहे. सीबीएसई शाळांनी १ नोव्हेंबरपर्यंत दिवाळीच्या सुट्ट्या द्याव्यात अन्यथा कारवाई केली जाईल, असा इशारा विभागीय शिक्षण उपसंचालक माधुरी सावरकर यांनी दिला आहे. त्यानुसार शाळांनीही आता ३ नोव्हेंबरपासून शाळा सुरू होणार असल्याचे संदेश पालकांना पाठविणे सुरू केले आहे. सीबीएसई स्कूल स्टाफ वेल्फेअर असोसिएशनच्या (सिस्वा)अध्यक्षा दिपाली डबली यांनी यासंदर्भात शिक्षण विभागाला पत्र पाठवून मागणी केली होती. सीबीएसई शाळांना दिवाळी, ख्रिसमस तसेच उन्हाळी सुट्या देणे अनिवार्य आहे. दिवाळी सुट्यांचा कालावधी १८ ऑक्टोबर ते ३ नोव्हेंबर, ख्रिसमस २२ ते २५ डिसेंबर, (पान २ वर)

## हैदराबाद गॅझेट: सरकारच्या जीआरला स्थगिती देण्यास सुप्रीम कोर्टाचा नकार

**नवी दिल्ली: दि. २७ वृत्तसंस्था**



हैदराबाद गॅझेटबाबत राज्य सरकारने काढलेल्या जीआरला (शासकीय निर्णय) स्थगिती देण्याची मागणी सर्वोच्च न्यायालयाने फेटाळून लावली आहे.


मंगेश ससाणे यांच्यासह राज्यातील ओबीसी संघटनांनी या संदर्भात याचिका दाखल केली होती. मात्र, याचिकेवर तात्काळ सुनावणी घेण्यास नकार देत सुप्रीम कोर्टाने याचिकाकर्त्यांना मुंबई उच्च न्यायालयात जाण्याचा सल्ला दिला आहे. न्यायमूर्ती विक्रमनाथ आणि न्यायमूर्ती संदीप मेहता यांच्या पीठासमोर ही सुनावणी झाली. आता या प्रकरणाची नियमित सुनावणी मुंबई उच्च न्यायालयात होणार आहे. सुप्रीम कोर्टाच्या सल्ल्यानुसार, याचिकाकर्ते आता पुढील कार्यवाहीसाठी मुंबई हायकोर्टात जाणार आहेत आणि १८ नोव्हेंबर रोजी तिथे युक्तिवाद होण्याची शक्यता आहे. या निर्णयामुळे ओबीसी आरक्षणाच्या संदर्भातील या महत्त्वाच्या विषयावर आता मुंबई उच्च न्यायालयात काय निर्णय होतो, याकडे सगळ्यांचे लक्ष लागून राहिले आहे.

### नेमके काय घडले?

- **राज्य सरकारने २ सप्टेंबर २०२५ रोजी हैदराबाद गॅझेट काढले होते.**
- **या गॅझेटला स्थगिती देण्याच्या मागणीसाठी ओबीसी संघटनांनी सुप्रीम कोर्टात धाव घेतली होती.**
- **आज ज्येष्ठ वकील इंदिरा जयसिंग यांनी याचिकाकर्त्यांच्या वतीने बाजू मांडली.**
- **न्यायालयाने याचिकाकर्त्यांना मुंबई उच्च न्यायालयात सविस्तर याचिका दाखल करण्यास सांगितले, जिथे १८ नोव्हेंबरला या संदर्भात सुनावणी होणार आहे.**
- **सर्वोच्च न्यायालयाच्या परवानगीने ही याचिका मागे घेण्यात आली आहे, ज्यामुळे ती एक प्रकारे फेटाळल्यासारखी झाली आहे.**

## महिला डॉक्टर प्रकरण: हॉटेल रूममधल्या शेवटच्या क्षणांचे सीसीटीव्ही फुटेज हाती!

**फलटण : दि. २७ वृत्तसंस्था**



फलटण येथील एका रुग्णालयात कार्यरत असलेल्या एका तरुण महिला डॉक्टरने आपले जीवन संपवले. मृत्यूपूर्वी या डॉक्टर तरुणीने आपल्या तळहातावर एक सुसाईड नोट लिहिली होती. तरुणीने सुसाईड नोटमध्ये गोपाळ बदने (निलंबित पोलीस उपनिरीक्षक) याने आपल्यावर अत्याचार (बलात्कार) केल्याचा गंभीर आरोप केला आहे. दुसऱ्या आरोपीचे नाव प्रशांत बनकर असे असून, त्याने आपला शारीरिक आणि मानसिक छळ केल्याचा आरोपही डॉक्टरने केला आहे. या घटनेमुळे पोलीस दलातील एका अधिकाऱ्यावर झालेले गंभीर आरोप आणि एका तरुणी डॉक्टरच्या आत्महत्येमुळे प्रशासकीय यंत्रणेवर प्रश्नचिन्ह उभे राहिले आहे. या प्रकरणातील दोन्ही मुख्य आरोपी, निलंबित पोलीस उपनिरीक्षक गोपाळ बदने आणि प्रशांत बनकर आता पोलिसांच्या ताब्यात आहेत. या प्रकरणातील दुसरा आरोपी प्रशांत बनकर याला पोलिसांनी यापूर्वीच अटक केली होती. दरम्यान, मुख्य आरोपी गोपाळ बदने अखेर पोलिसांना शरण आला. त्याला अटक केल्यानंतर, फलटण पोलिसांनी त्याला न्यायालयात हजर केले. न्यायालयाने आरोपी बदने याला पाच दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे, ज्यामुळे पोलिसांना या गुन्ह्याच्या सखोल तपासासाठी अधिक वेळ मिळाला आहे. या प्रकरणाच्या तपासात आता पोलिसांना एक महत्त्वाचा आणि निर्णायक पुरावा मिळाला आहे. ज्या हॉटेलच्या खोलीत ही दुर्दैवी घटना घडली, तेथील सीसीटीव्ही फुटेज पोलिसांनी जप्त केले आहे. याबाबत माहिती देताना पोलीस अधिकारी तुषार दोषी यांनी सांगितले की, हे फुटेज तपासासाठी अत्यंत महत्त्वपूर्ण ठरणार असून, घटनेच्या वेळी काय घडले याचे अनेक धागेदोरे उलगडण्यास मदत करेल. फलटण येथील डॉक्टर आत्महत्या प्रकरणाच्या तपासाबाबत पोलीस अधिकारी तुषार दोषी यांनी महत्त्वाची माहिती दिली आहे. आत्महत्या झालेल्या हॉटेलमधील सीसीटीव्ही फुटेज पोलिसांनी (पान २ वर)

## सरन्यायाधीशांवर बूटफेक करणाऱ्यावर सध्या कारवाई नाही

**नवी दिल्ली: दि. २७ वृत्तसंस्था**



सरन्यायाधीश बी.आर. गवई यांच्यावर बूट फेकण्याचा प्रयत्न करणारा वकील राकेश किशोर याला नोटीस बजावण्यास आज (दि. २७) सर्वोच्च न्यायालयाने नकार दिला. न्यायाधीश सूर्यकांत आणि जयमाल्या बागची यांच्या खंडपीठाला या प्रकरणात नोटीस बजावण्याचे आवाहन केले असले तरी, खंडपीठाने स्पष्ट केले की, आम्ही कोणत्याही गोष्टीवर निर्बंध आणत नाही. प्रतिबंधात्मक उपाययोजना सुचवा. आम्ही एका आठवड्यानंतर यावर निर्णय घेऊ.

आजच्या सुनावणीवेळी वरिष्ठ वकील आणि सर्वोच्च न्यायालय बार असोसिएशन (एससीबीए) चे अध्यक्ष विकास सिंह म्हणाले की, जेव्हा ही घटना घडली तेव्हा राकेश किशोर यांना काही काळासाठी ताब्यात घेण्यात आले. त्यानंतर त्यांना मुक्त केले गेले;... पण त्यांना आपल्या कृत्याचा पश्चाताप झालाच नाही. उलट देवाने मला ते करण्यास सांगितले आहे... मी ते पुन्हा करेन, हे त्यांचे विधान गौरवले जात आहे! अशा प्रकारचे राकेश किशोरच्या कृत्याचे उदात्तीकरण होता कामा नये. यावर न्यायमूर्ती सूर्य कांत म्हणाले की, हे कृत्य गंभीर अवमानना आहे. मात्र या प्रकरणी स्वतः सरन्यायाधीशांनी स्वतः माफी दिली आहे. यावर विकास सिंह म्हणाले की, सरन्यायाधीश गवई यांनी घेतलेला निर्णय हा त्यांच्या वैयक्तिक क्षमतेनुसार आहे. मात्र संस्थेचा (सर्वोच्च न्यायालय) विचार करता . आम्ही ही घटना सोडून देऊ शकत नाही. काही लोक या घटनेवर विनोद करत आहेत. अशा प्रकारामुळे सर्वोच्च न्यायालयाचा खूप अनादर होईल. संबंधिताला कृपया नोटीस बजावा. त्याला पश्चात्ताप व्यक्त करू द्या. जर तो तसे करत नसेल तर त्याला तुरुंगात पाठवावे. त्या व्यक्तीला महत्त्व का द्यायचे?, असा सवाल न्यायमूर्ती सूर्य कांत यांनी विचारला. तर न्यायमूर्ती बागची म्हणाले, की, न्यायालयाचा अवमान कायदा हा न्यायालयाचा अवमान असल्याचे दिसून येते तेव्हा तो एक महत्त्वाचा बदल ठरतो. कलम १४ अंतर्गत ते अवमानकारक आहेत. अशा प्रकरणांमध्ये ते संबंधित न्यायाधीशांवर सोपवले जाते. या प्रकरणात, सरन्यायाधीशांनी त्यांच्या गौरवशाली उदारतेने त्याकडे दुर्लक्ष करण्याचा निर्णय घेतला.

## सागरी क्षेत्रात ५६,००० कोटींच्या गुंतवणुकीची वचनबद्धता- फडणवीस

**मुंबई : दि. २७ वृत्तसंस्था**



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी घोषणा केली की, महाराष्ट्राने सागरी प्रकल्पांमध्ये ५६,००० कोटी रुपयांच्या गुंतवणुकीचे १५ करार केले आहेत. इंडिया मेरीटाईम वीकच्या निमित्ताने स्वाक्षरी करण्यात आलेल्या सामंजस्य करारांमध्ये बंदर आणि सहाय्यक क्रियाकलापांचा विस्तार, शिपयार्ड विकसित करणे, तंत्रज्ञान यासारख्या विविध पैलूंचा समावेश आहे, असे त्यांनी सांगितले, परंतु गुंतवणूक किती कालावधीत होईल याची वेळ निश्चित केली नाही. केंद्र सरकार आठवड्यातील १० लाख कोटी रुपयांच्या गुंतवणूक करारांवर स्वाक्षरी करण्याचे उद्दिष्ट ठेवत आहे, ज्याचे उद्घाटन झाले.आपण महाराष्ट्राला भारताची सागरी महासत्ता बनवण्याचे आपले ध्येय साध्य करण्यासाठी पुढे जाऊ, अशी आशा त्यांनी व्यक्त केली आणि प्रमुख करारांची ठळक वैशिष्ट्ये सांगितली. सोमवारी स्वाक्षरी झालेल्या करारांमध्ये दिघी बंदराचा विस्तार करण्यासाठी आणि केंद्र सरकारसोबत बंदराभोवती एक खूप मोठे औद्योगिक क्षेत्र विकसित करण्यासाठी अदानी समूहाच्या कंपनीसोबत करार समाविष्ट आहेत. जेएसडब्ल्यू समूहाने जयगड बंदरातील आपल्या सुविधांचा विस्तार करण्यास वचनबद्धता दर्शविली आहे. ७०० किमीच्या किनारपट्टीवरील बंदरांवर विस्तार उपक्रम जागतिक पुरवठा साखळींशी एकत्रित होण्याच्या व्यापक कारणासाठी मदत करतील असे स्पष्ट केले. याशिवाय, महाराष्ट्र सरकारने नुकत्याच (पान २ वर)

## फॉरेन्सिक शिकणाऱ्या विद्यार्थिनीने प्रियकराचा काढला फिल्मी स्टाईल काटा

**नवी दिल्ली: दि. २७ वृत्तसंस्था**



गुन्हेगारी आणि शिक्षण याचा थेट संबंध नसतो. मात्र मागील काही वर्षांमध्ये उच्चशिक्षितांकडून घडत असलेल्या भयंकर गुन्ह्यांमुळे हा समजच खोटा ठरत आहे. दिल्लीतील पुन्हा एकदा उच्चशिक्षण घेणाऱ्या विद्यार्थिनीने केलेल्या भयंकर कृत्याचा पर्दाफाश झाला आहे. न्यायवैज्ञानिक शास्त्र (फॉरेन्सिक सायन्स) शिकणाऱ्या एका विद्यार्थिनीनेच असे भयंकर कृत्य केले की पोलिसही अवाक झाले. प्रियकराच्या मृत्यूच्या तपासादरम्यान समोर आलेल्या माहितीने प्रकरणाला नवे वळण मिळाले असून, पोलिसांनी हा मृत्यू अपघात नसून खून असल्याचा पर्दाफाश केला आहे.

इंडिया टूडेने दिलेल्या वृत्तानुसार, दिल्लीतील गांधी विहार परिसरातील एका अपार्टमेंटमध्ये यूपीएससी परीक्षेची तयारी करणाऱ्या विद्यार्थी रामकेश मीणा ( वय ३२) हा २१ वर्षीय लिव्ह-इन पार्टनर अमृता चौहानसोबत राहत होता. त्याचा जळालेला अवस्थेतील मृतदेह पोलिसांना आढळला. सुरुवातीला रामकेश याचा मृत्यू शॉर्ट सर्किट किंवा एअर कंडिशनरच्या स्फोटामुळे झाला असावा, असा अंदाज पोलिसांनी व्यक्त केला होता. सुरुवातीला रामकेश याचा मृत्यू शॉर्ट (पान २ वर)

### आगीची दुर्घटना भासविण्याचा प्रयत्न

अमृताने फॉरेन्सिक सायन्समधील पार्श्वभूमीमुळे तिने अपघात वाटावा असा खूनाचा कट रचला. आगीची दुर्घटना भासवण्याचा तिने प्रयत्न केला. पोलिसांनी आरोपींकडून एक हार्ड डिस्क, एक ट्रॉली बॅग, मीनाचा शर्ट आणि दोन मोबाईल फोन जप्त केले आहेत. आरोपींविरोधात खून, कट रचणे आणि पुरावे नष्ट करणे या कलमांखाली गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तिन्ही आरोपी सध्या पोलिस कोठडीत आहेत.

## राजकारण

### वादात आता सारंगी महाजन यांचीही उडी

## पंकजा, गोपीनाथ मुंडे यांच्या वारसदार होऊ शकत नाहीत

**बीड : दि. २७ वृत्तसंस्था**



जिल्ह्यात काही दिवसांपूर्वी ओबीसी नेत्यांची महाएल्गार सभा पार पडली. ज्यामध्ये राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) चे नेते आणि राज्याचे कॅबिनेट मंत्री छगन भुजबळ यांनी एक मोठे वक्तव्य केले. त्यांनी स्व. गोपीनाथ मुंडे यांचे राजकीय वारस म्हणून धनंजय मुंडे यांचा उल्लेख केला. या वक्तव्यानंतर राज्यभरात जोरदार चर्चा सुरू झाली असून, गोपीनाथ मुंडे यांचा खरा राजकीय वारस कोण, यावरून राजकीय आणि सामाजिक वर्तुळात वादविवाद रंगले आहेत. या मुद्द्यावरून अनेक नेत्यांनी परस्परविरोधी प्रतिक्रिया दिल्या असून, बीडच्या राजकारणात नव्या चर्चांना जन्म मिळाला आहे. छगन भुजबळ यांच्या वक्तव्याला प्रत्युत्तर देताना ओबीसी नेते प्रकाश महाजन यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली. भुजबळ चुकीचे बोलत असून, धनंजय मुंडे नव्हे, तर पंकजा मुंडे ह्याच गोपीनाथ मुंडे यांच्या खऱ्या राजकीय वारस असल्याचे त्यांनी ठामपणे सांगितले. दुसरीकडे, करुणा मुंडे यांनी धनंजय मुंडे यांचेच गोपीनाथ मुंडे यांचे खरे राजकीय वारस असल्याचा दावा केला. त्या म्हणाल्या, राजकारणात वारसा हा जन्माने नाही, तर विचार आणि कृतीने मिळतो. मी २००९ पासून धनंजय मुंडे यांचा संघर्ष जवळून पाहिला आहे. त्यांनी गोपीनाथ मुंडे यांचे विचार आणि कार्य पुढे नेले आहे. या वादात आता सारंगी महाजन यांनीही उडी घेतली असून, त्यांनी पंकजा मुंडे यांच्यावर थेट टीका केली आहे. त्या म्हणाल्या, प्रकाश महाजन यांनी जे सांगितले, ते पूर्णपणे चुकीचे आहे. पंकजा मुंडे गोपीनाथ मुंडे यांच्या वारसदार होऊ शकत नाहीत. बीडची जनता खरी वारसदार आहे. फक्त 'मुंडे' आडनाव आहे म्हणून कोणी वारसदार होत नाही. गोपीनाथ मुंडे यांच्या नखाची सरही यांच्यात नाही. जे निष्ठावंत कार्यकर्ते प्रामाणिकपणे काम करतात, तेच खरे वारसदार आहेत. पुढे बोलताना सारंगी महाजन यांनी पंकजा मुंडे यांच्याबद्दल वैयक्तिक टिप्पणीही केली. त्या म्हणाल्या, पंकजा मुंडे लहान असताना माझ्या संपर्कात होत्या. तेव्हा त्या खूप चांगल्या होत्या, मला त्यांचा स्वभाव आवडायचा. आजही त्या चांगल्या आहेत, पण त्यांचा स्वभाव आता कसा बदलला, हे मला समजत नाही. या वक्तव्यातून त्यांनी पंकजा मुंडे यांच्या नेतृत्वशैलीवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे.

## पान 1 वरून...

### देशाची प्रतिमा मलीन होतेय!

देखील घेऊन येण्यास सांगितलं आहे. सर्वोच्च न्यायालयाने दिल्ली सरकारनं स्वतःहून हे शपथपत्र सादर केलं नसल्याचं निरीक्षण नोंदवलं. त्यामुळं दिल्लीच्या मुख्य सचिवांना देखील ३ नोव्हेंबरच्या सुनावणीवेळी हजर राहण्याचे आदेश देण्यात आले आहेत. दरम्यान, बार अँड बेंच वेबसाईटनं दिलेल्या वृत्तानुसार, भटक्या कुत्र्यांमुळं लोकांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. सतत भटक्या कुत्र्यांचा हल्ला होण्याचा घटना घडत आहेत. दुसऱ्या देशांच्या नजरेत देशाची प्रतिमा ही मलीन होत आहे. अशी टिप्पणी जस्टिस नाथ यांनी केली. यावेळी कुत्र्यांविरूद्धच्या क्रुरतेचा मुद्दा पुढे करताच न्यायालयाने माणसांविरूद्धच्या क्रुरतेचं काय असा प्रश्न देखील उपस्थित केला. याचबरोबर तीन सदस्यीय बेंचनं सर्वोच्च न्यायालयानं सतत निर्देश देऊनही देशात भटक्या कुत्र्यांचे माणसांवर होणाऱ्या हल्ल्याच्या घटना कमी होत नाहीयेत हे स्विकारार्ह नाही असं सुनावलं.

### शाळांच्या दिवाळीच्या ...

तसेच उन्हाळी सुट्या नियमानुसार देणे अनिवार्य आहे. यासंदर्भात शिक्षण विभागाने १५ सप्टेंबरला परिपत्रक निर्गमित करण्यात आले होते. यानंतरही अनेक शाळांनी धनत्रयोदशी व नंतरही नियमित शाळा सुरू ठेवत केवळ २८ ऑक्टोबरपर्यंतच दिवाळी सुट्या जाहीर केल्या होत्या. या प्रकाराची गंभीर दखल घेत सिस्वाच्या वतीने शिक्षण विभागाला पत्र देण्यात आले होते. यानंतर शिक्षण उपसंचालक माधुरी सावरकर यांनी १५ सप्टेंबरच्या परिपत्रकाचे काटेकोर पालन करावे, अन्यथा संबंधित शाळांविरुद्ध कारवाई केली जाईल, असा इशारा दिला आहे. २ नोव्हेंबरला रविवार आल्याने आता सर्वच सीबीएसई शाळा ३ नोव्हेंबरपासून सुरू होतील. परिपत्रकाची अवहेलना झाल्यास संबंधित शाळांवर कठोर कारवाई केली जाणार आहे.

### बिहार निवडणुकीनंतर ...

दिल्लीत पत्रकार परिषदेत बोलताना कुमार म्हणाले, मतदार याद्यांची विशेष सखोल फेरतपासणी (एसआयआर) दुसऱ्या टप्प्याच्या अंमलबजावणीचा निर्णय घेण्यात आला आहे. मी एसआयआरच्या पहिल्या टप्प्यात भाग घेतलेल्या बिहारच्या ७.५ कोटी मतदारांसमोर नतमस्तक होतो. आयोगाने सर्व ३६ राज्यांमधील निवडणूक अधिकाऱ्यांनाही भेट घेतली आणि प्रक्रियेवर सविस्तर चर्चा केली. बिहारमधील पहिल्या टप्प्यात ९०,००० हून अधिक मतदान केंद्रांवर यशस्वी मतदार पडताळणी झाली. कोणतेही अपील झाले नाही. बिहारमधील मतदारांच्या सहभागाने देशाच्या उर्वरित भागासाठी एक उत्तम उदाहरण ठेवले आहे.

### सागरी क्षेत्रात ५६,००० ...

उद्घाटन झालेल्या नवी मुंबई विमानतळापासून वॉटर टॅक्सी सेवा सुरू करण्याची योजना देखील आखली आहे. अदानी समूह संचालित विमानतळ दक्षिण मुंबईतील गेटवे ऑफ इंडियामध्ये प्रवासी प्रवास करू शकतील अशी सेवा देणारे राष्ट्रीय स्तरावरील पहिले विमानतळ असेल. पाणी वाहतूक आणि जल क्रीडा परिसंस्थेसाठी सरकार मुंबईत एक अत्याधुनिक मरीना देखील तयार करत आहे. यासोबतच, तंत्रज्ञान, मानव संसाधने विकसित करण्यासाठी, सागरी क्षेत्रात उत्कृष्टता केंद्रे निर्माण करण्यासाठी समर्पित सामंजस्य करार महाराष्ट्राने केले आहेत. मी खात्री देऊ इच्छितो की आम्ही केंद्र सरकारसोबत जवळून काम करू आणि संपूर्ण सागरी व्यवसायात सर्वोत्तम परिसंस्था निर्माण करू. तुमचा प्रवास सुरळीत होईल. तुम्ही यशस्वी झालात तरच आम्ही यशस्वी होऊ हे आम्हाला समजते, असे मुख्यमंत्री म्हणाले.

### महिला डॉक्टर प्रकरण: हॉटेल...

ताब्यात घेतले आहे. या फुटेजमधून घटनेच्या वेळेचे अनेक महत्त्वाचे धागेदोरे मिळण्याची शक्यता आहे. या घटनेचा पोस्टमॉर्टम अहवाल पोलिसांना मिळणार आहे. सध्या प्राथमिक तपासानुसार, हे आत्महत्येचे प्रकरण असल्याचा अंदाज आहे. मुख्य आरोपीच्या (संभवतः गोपाळ बदने) घराची झाडाझडती घेण्यात आली आहे. तसेच, तपासासाठी महत्त्वाच्या ठरणाऱ्या काही डिजिटल वस्तू देखील पोलिसांनी ताब्यात घेतल्या आहेत. आरोपी आणि मृत डॉक्टर दोघेही एकमेकांच्या संपर्कात होते, हे तपासात स्पष्ट झाले आहे. डॉक्टर तरुणीने सुसाईड नोटमध्ये तिच्यावर चार वेळा अत्याचार झाल्याचा जो गंभीर आरोप केला आहे, त्यासंबंधीचा तपास सध्या सुरू आहे. आत्महत्या करण्यापूर्वी डॉक्टरचे आरोपी प्रशांत बनकर याच्याशी बोलणे झाले होते, अशी माहितीही समोर आली आहे. केवळ आरोप केलेले कारण नसून, या आत्महत्येमागे आणखी काही कारणे आहेत का, याचा शोध पोलीस घेत आहेत, असे तुषार दोषी यांनी स्पष्ट केले.

### फॉरेन्सिक शिकणाऱ्या विद्यार्थिनीने...

सर्किट किंवा एसीमध्ये झालेल्या स्फोटामुळे झाला असावा, असा अंदाज पोलिसांनी व्यक्त केला होता. मात्र पोलिसांचा अर्धवट जळालेल्या मृतदेहावरुन संशय बळावला. यानंतर घातपाताचा संशयावरुन तपास सुरु झाला. पोलीस तपासात स्पष्ट झाले की, बी.एससी. फॉरेन्सिक सायन्सची विद्यार्थिनी असलेली अमृता मे २०२५ पासून रामकेशबरोबर राहत होती. रामकेशने तिचे गुप्तपणे तिचे खाजगी व्हिडिओ रेकॉर्ड केले होते. तिने वारंवार विनंती करूनही ते डिलीट करण्यास नकार दिला. दोघांमधील मतभेद तीव्र झाले. संतापलेल्या अमृताने माजी प्रियकर सुमित याला याची माहिती दिली. फॉरेन्सिक ज्ञानाचा वापर अमृता चौहान हिने प्रियकर रामकेशचा काटा काढण्याचा कट रचला. ती मूळची उत्तर प्रदेशातील मुरादाबाद येथील रहिवासी आहे. रामकेशला संपविण्यासाठी तिने मुरादाबाद येथील माजी प्रियकर सुमित कश्यप (२७) आणि त्यांचा मित्र एलपीजी वितरक संदीप कुमार (२९) या दोघांची मदत घेतली. अमृता चौहान तिच्या माजी प्रियकरासह अपार्टमेंटमध्ये पोहोचली.

## अक्षय नागलकर खून प्रकरणात आठ आरोपी १ नोव्हेंबरपर्यंत पोलीस कोठडीत

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**अकोला, दि. २७ :**शहरातील डाबकी रोड पोलिस ठाण्यात दाखल असलेल्या अक्षय नागलकर खून प्रकरणाच्या तपासात पोलिसांना मोठे यश मिळाले आहे. गुन्ह्याशी संबंधित आणखी चार आरोपींना अटक करण्यात आली असून, यापूर्वी अटक झालेल्या चार आरोपींसह आता एकूण आठ आरोपींना न्यायालयाने १ नोव्हेंबर २०२५ पर्यंत पोलीस कोठडी रिमांड मंजूर केली आहे.

सदर प्रकरणात दिनांक २५ ऑक्टोबर २०२५ रोजी डाबकी रोड पोलीस ठाण्यात गुन्हा क्रमांक ३३७/२०२५ कलम १०३(१), २३८, ६१(२), ३(५) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता. गुन्ह्याचा तपास शहर विभागाचे उपविभागीय पोलीस अधिकारी सुदर्शन प्रकाश पाटील हे पोलीस अधीक्षक, अकोला व अपर पोलीस अधीक्षक, अकोला यांच्या मार्गदर्शनाखाली करीत आहेत. पहिल्या टप्प्यात पोलिसांनी २५ ऑक्टोबर रोजी चार आरोपी नामे चंद्रकांत महादेव बोरकर, आशिष उर्फ आशु शिवकुमार वानखडे, क्रिष्णा वासुदेव भाकरे व अशोक उर्फ ब्रम्हा पांडुरंग भाकरे यांना अटक केली होती. या चारही आरोपींना न्यायालयाने तपासासाठी १ नोव्हेंबरपर्यंत पोलीस कोठडी रिमांड मंजूर केली होती. यानंतर तपास अधिक गतीने राबवित पोलिसांनी २६ ऑक्टोबर रोजी आणखी चार आरोपी नामे रोहीत गजानन पराते (२८), रा. गायत्री नगर, जुने शहर, अकोला), अमोल अजाबराव उन्हाळे (४४) रा. हरीहरपेठ, अकोला, आकाश बाबुराव शिंदे (२५) रा. भौरद, ता. अकोला व नारायण गणेश मेसरे (२८) रा. लोटणापुर, ता. बाळापूर, जि. अकोला यांना अटक केली. या चार आरोपींनाही न्यायालयासमोर हजर करून पोलिसांनी कोठडीची मागणी केली असता, न्यायालयाने त्यांनाही १ नोव्हेंबर २०२५ पर्यंत पोलीस कस्टडी रिमांड मंजूर केला आहे. या खुनाच्या घटनेमुळे अकोला शहरात एकच खळबळ उडाली असून, गुन्ह्याचे मूळ कारण, वापरलेली शस्त्रे व इतर गुन्ह्यातील आरोपींचा सहभाग याबाबतचा तपास सुरू असल्याचे पोलीस सूत्रांकडून समजते.

# अमित शहांनी त्या जमिनीखाली दडलेल्या रहस्यांचा अभ्यास करावा : राऊतांचे आवाहन

मुंबई, दि. २७ वृत्तसंस्था

''भाजपकडे आज अमर्याद सत्ता आहे. मुंबईतील भाजपच्या नवीन कार्यालयाचे भूमिपूजन करण्यासाठी देशाचे केंद्रीय गृहमंत्री अमित शहा येत आहेत. ते पंचतांकित कार्यालय उद्घाटन करत आहे. नवीन कार्यालय आमचा टीकेचा विषय नाही. भाजप अनेक कार्यालय उघडत आहे. प्रश्न इतकाच आहे मरीन लाईन्स येथे मराठी भाषा भवन अडकून पडले आहे. आता पालिकेचा निवासी उद्दिष्टासाठी राखीव असलेला भूखंड अवध्या ११ दिवसांत भाजपाने पदरात पाडून घेतला आहे. एकनाथ रिअॅल्टर्स या बिल्डरने भाजपाला हे डील करून दिले आहे. अमित शहा यांनी भाजपचे नतून कार्यालय उभारले आहे त्या जमिनी खाली कोणते रहस्य आहेत, याचा अभ्यास करावा, असे आवाहन ठाकरे गटाचे खासदार संजय राऊतांनी माध्यमांशी बोलताना केले.



पुणे जैन बोर्डिंग प्रश्नी जैन बांधव रस्त्यावर उतरले. आंदोलन केले. अखेर सरकारला नमते घ्यावे लागले. जनता काय करु शकते. हे सवांनी पाहिले. हे श्रेय सर्वांचेआहे. रवींद्र धांगेकर प्रमुख नेते आहे. त्यांचा रिसर्च महत्वाचा आहे, असेही राऊत म्हणाले.महिला डॉक्टर मृत्यू प्रकरणी मुख्यमंत्री फडणवीस खोटे बोलत आहेत. त्यांनी संवेदनशील असले पाहिजे. महिला डॉक्टरची आत्महत्या हा गंभीर विषय आहे. हा विषय तुम्ही गांभीर्याने घेत नसाल. तुम्ही याला जबाबदार आहे, असा आरोपही त्यांनी केला.

### एक्सच्या माध्यमातून भाजप कार्यालयाच्या उभारणीवर सवाल

**आज एक्स पोस्टच्या माध्यमातून राऊतांनी केंद्रीय गृहमंत्री अमित शहांना पत्र लिहित काही सवालउपसथित केले आहेत. यामध्ये म्हटलं आहे की, मरीन लाईन्स येथील निर्मला निकेतनजवळ भाजपाचे नवे टोलेजंग प्रदेश मुख्यालय उभे राहणार आहे. केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या हस्ते या कार्यालयाचे उद्या भूमिपूजन होणार असून या भूखंडाबाबत महत्त्वाचा दस्तावेज समोर आला आहे. पालिकेचा निवासी उद्दिष्टासाठी राखीव असलेला भूखंड अवध्या ११ दिवसांत भाजपाने पदरात पाडून घेतला आहे. एकनाथ रिअॅल्टर्स या बिल्डरने भाजपाला हे डील करून दिले आहे.**

## हडपसरमध्ये पीएमपी चालक-वाहकांकडून प्रवाशाला मारहाण

**पुणे :** पीएमपी बस प्रवासादरम्यान प्रवाशाला चालक-वाहकांनी बेदम मारहाण केली.

या मारहाणीत प्रवाशाचा चष्माही तुटल्याचे समोर आले असून, त्या मारहाणीचा व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल होत आहे. ही घटना हडपसर गाडीतळावरील असल्याची प्राथमिक माहिती पीएमपी प्रशासनाने दिली. मात्र, नेटकऱ्यांसह प्रवाशांकडून या घटनेवरून प्रशासनाला धारेवर धरले जात आहे.

# १ नोव्हेंबरच्या मोर्चासाठी मनसे ऍक्शन मोडवर

मुंबई , दि. २७ वृत्तसंस्था

आगामी १ नोव्हेंबर रोजी होणाऱ्या महत्त्वाच्या मोर्चाच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे हे आता **ऍक्शन मोड**मध्ये आले आहेत. पक्षाने राज्याच्या निवडणूक आयोगाला धारेवर धरण्यासाठी आणि मतदार यादीतील त्रुटी (घोळ) समोर आणण्यासाठी जोरदार तयारी सुरू केली आहे.



मोर्चाच्या तयारीचा एक भाग म्हणून, राज ठाकरे यांनी थेट मुंबईतील प्रत्येक शाखाध्यक्षांकडून अहवाल मागवला आहे. मुंबईतील प्रत्येक शाखाध्यक्षांना आपापल्या भागातील मतदार यादीचा सखोल अभ्यास करून, त्यातील दुबार नावे, चुकीचे पत्ते किंवा बोगस मतदारांसारखे सर्व घोळ शोधून काढण्याचे स्पष्ट आदेश देण्यात आले आहेत.

मनसेने १ नोव्हेंबरच्या विराट मोर्चाआधी मतदार याद्यांची तपासणी करण्याची महत्त्वपूर्ण मोहीम सुरू केली आहे. महापालिका आणि आगामी निवडणुकांच्या तोंडावर, बोगस मतदारांचा मुद्दा राज ठाकरेंनी वारंवार उपस्थित केला आहे. हा घोळ पुराव्यासह सिद्ध करण्यासाठी त्यांनी आता कार्यकर्त्यांना कामाला लावले आहे.

### ३ दिवसांत अहवाल सादर करण्याचे कार्यकर्त्यांना निर्देश

राज ठाकरेंच्या आदेशानुसार, शाखाध्यक्षांना येत्या तीन दिवसांत ही मतदार याद्यांची तपासणी पूर्ण करावी लागणार आहे. तपासणीनंतर मतदार यादीतील घोळाची संपूर्ण माहिती विभागध्यक्षांमार्फत थेट राज ठाकरेंना सादर केली जाणार आहे. या अहवालाच्या आधारे मनसे निवडणूक आयोगाकडे आपली तक्रार अधिक मजबूत करेल आणि १ नोव्हेंबरच्या मोर्चात हा मुद्दा प्रभावीपणे उचलून धरेल. राज ठाकरेंच्या या थेट आणि सूक्ष्म नियोजनामुळे मनसेच्या कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले असून, आगामी राजकीय लढाईसाठी पक्षाची तयारी अगदी पायाभूत स्तरावर सुरू झाल्याचे स्पष्ट झाले आहे.

# मंत्री पंकजा मुंडे यांचा जरांगेंना मैत्रीचा प्रस्ताव

परळी वैजनाथ , दि. २७ वृत्तसंस्था

, पुढारी वृत्तसेवा मनोज जरांगे यांच्या विरोधात आपण कधीही वक्तव्य केलेले नाही. कधी कधी आपल्या बोलण्याचे चुकीचे अर्थ काढले जातात आणि तेच समोरच्या व्यक्तीला चुकीच्या पद्धतीने दाखवून - गैरसमज व तेढ निर्माण करण्याचा प्रयत्न केला जातो. मात्र आता सर्वांना सोबत घेऊन सामाजिक सौहार्दासाठी आपण पुढाकार घेणार आहोत, असे पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे यांनी म्हटले असून, जरांगे यांनी दीपावली च्या शुभेच्छा देत मैत्रीचा हात पुढे केला आहे.



पंकजा मुंडे यांच्या उपस्थितीत परळी वैजनाथ येथे दीपावली स्नेहमिलन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी उपस्थितांशी मनमोकळा संवाद - साधताना मुंडे यांनी गेल्या अनेक दिवसांपासूनच्या अनेक मुद्द्यांवर भाष्य ।। केले. यामध्ये त्यांनी मराठा आरक्षण, मनोज जरांगे यां च्यावर भाष्य केले. आपण सगळे मिळून समाजात सौहार्द निर्माण करू, पण चुकीचे होत असेल तर समर्थन करणार नाही. एखाद्या समाजाला न्याय मिळवून देण्याच्या भूमिकेत असणाऱ्या व्यक्तीबद्दल बोलण्याचा प्रश्नच येत नाही. परंतु त्यांना काही लोक चुकीचे अर्थ दाख वून आपली प्रतिमा हनन करण्याचा प्रयत्न करतात. गुलामीचं गॅझेट, गुलामाची औलाद असे आपण कधीच पर म्हटलेले नाही, असे पंकजा मुंडे यांनी सांगितले.

मराठा आरक्षणाला आपण सातत्याने पाठिंबाच दिलेला असल्याचे सांगत दिवंगत लोकनेते गोपीनाथ मुंडे यांनी मराठा आरक्षणाबाबत जी भूमिका घेतली होती तीच भूमिका आपण सातत्याने मांडली व त्या भूमिकेवर आपण कायम राहिलो. मराठा समाजाला निश्चितपणाने आरक्षण द्या मात्र ओबीसीला धक्का न लागता हे आरक्षण दिले जावे अशी आपली जाहीर भूमिका राहिलेली आहे. दरम्यानच्या काळात अनेक वेळा टीका टिप्पण्या झाल्या मात्र आपण कधीही, कोणाबद्दलही वाईट बोललेलो नाही. मनोज जरांगे यांच्या बाबतीतही आपण कधीही वाईट वक्तव्य केलेले नाही.

# वंदे भारतमुळे चाकरमान्यांना लेट मार्क



ठाणे , दि. २७ वृत्तसंस्था

पुणे मार्गावरून धावणाऱ्या जालना आणि सोलापूर वंदे भारत एक्स्प्रेसमुळे कर्जत लोकलला मोठा थांबा मिळत असल्याने चाकरमान्यांना लेट मार्क लागत आहे. वंदे भारत या गाड्या नॉन स्टॉप धावत असल्याने बाकीच्या गाड्या थांबविल्या जातात. यामुळे या गाड्यांना १५ ते २० मिनिटांचा लेट मार्क लागत आहे. कर्जत-खोपोली रेल्वे मार्गावर ऑक्टोबर महिन्याच्या सुरुवातीच्या काही दिवसांपासून कर्जत-पनवेल कोस्टल रेल्वे लाईनचे काम सुरू आहे. यात रेल्वेरूळांच्या दुरुस्तीचे कामाला गती मिळालेली आहे. परंतु रेल्वे मार्गाच्या कामामुळे कर्जत रेल्वे स्थानकातून अप मार्गावर नियमित प्रवास करणाऱ्या प्रवाशांचे मात्र हाल झाल्याचे दिसून येतात. प्रामुख्याने हे काम सुरू असल्याने वंदे भारतसारख्या एक्स्प्रेस गाड्या लोकल ट्रॅकवरून धावत असल्याने लोकल गाड्यांना २० ते ३० मिनिटांचा सिग्नल मिळू लागला आहे.

रेल्वे रुळाच्या कामामुळे रेल्वे प्रशासनाकडून कर्जत ३ आणि ४ रेल्वे लाईन बंद करून त्या मार्गावरच्या लोकल सेवांना १,२,५ आणि ६ रेल्वे मार्गावर वळवण्यात आले असून ५ आणि ६ रेल्वेमार्ग लांब पल्ल्याच्या एक्सप्रेस रेल्वेसाठी निश्चित केले होते.

मात्र अलीकडे ५ आणि ६ रेल्वे मार्गावर देखील लोकल रवाना करण्यात येत आहेत. परिणामी लोकलच्या नियमित होणाऱ्या रहदारीला रेल्वे प्रशासनाकडून मोठा थांबा देण्यात येतो. यामुळे या मार्गावरून प्रवास करणाऱ्या चाकरमान्यांना लेट मार्क बसत आहे.

२४ ऑक्टोबर, रोजी रेल्वे प्रशासनातर्फे वंदे भारत एक्स्प्रेस रेल्वेच्या फेऱ्या वाढीचे निर्णय घेण्यात आला. त्यामुळे लोकल रेल्वेवर त्याचा आणखी परिणाम झाला आहे. यापूर्वी वंदे भारत एक्सप्रेस फक्त आठवड्यातील सोमवारी, बुधवारी आणि शुक्रवारी धावत होती. मात्र त्यावेळी तीनच दिवस लेट मार्क बसायचा आता एक्स्प्रेस गाड्या वाढल्याने लोकलचा प्रवास आणखी धीमा झाला आहे.

# न्यायाधीशाच्या घरात चोरट्याने मारला डल्ला!

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**अकोला, दि. २७ :**अकोला शहरातील वखरे लेआउट परिसरात अज्ञात चोरट्याने चक्क न्यायाधीशाच्या घरातच डल्ला मारल्याची धक्कादायक घटना उजेडात आली आहे सोन्या-चांदीचे दागिने आणि रोख रक्कम असा एकूण ३७ हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल चोरल्याची घटना रविवारी उघडकीस आली.

सदर घटनेबाबत सिव्हिल लाईन पोलीस ठाण्यात गुन्हा क्र. ३६३/२०२५, कलम ३३(४), ३०५ भा.दं.सं. नुसार दाखल करण्यात आला. अकोल्यात जिल्हा व सत्र न्यायाधीश म्हणून कार्यरत असलेले मात्र दिवाळीच्या सुट्टीमुळे त्यांच्या मूळ गावी परतवाडा येथे गेले होते. दरम्यान, २६ ऑक्टोबर रोजी सकाळी सहा वाजताच्या सुमारास शेजारी रुपेश झाडे यांनी फोन करून घराचा दरवाजा उघडा असल्याची माहिती दिली. न्यायाधीश महोदयांनी घरी येऊन पाहणी केली असता, बेडरूममधील दोन्ही कपाटे उघडी पडलेली दिसली आणि घरातील कपडे तसेच इतर साहित्य अस्ताव्यस्त पडलेले आढळले. कपाटातील सोन्या-चांदीचे दागिने व रोख रक्कम गायब असल्याचे त्यांनी लक्षात घेतले. चोरी गेलेल्या मुद्देमालात ३.५ ग्रॅम सोन्याची अंगठी (किंमत ५,००० रुपये), १.५ ग्रॅम सोन्याची लहान अंगठी (किंमत ३,००० रुपये), चांदीचे २० ग्रॅमचे लॉकेट (किंमत २,००० रुपये), ३० ग्रॅमची चांदीची चैन (किंमत ५,००० रुपये) आणि प्लास्टिकच्या बॅगमध्ये ठेवलेले रोख २२ हजार ५०० रुपये असा एकूण ३७ हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल चोरट्याने चोरून नेल्याचे फिर्यादीने तक्रारीत नमूद केले आहे. सदर घटना रात्री एक वाजल्यापासून चार वाजेपर्यंतच्या वेळेत घडल्याचा अंदाज पोलिसांनी व्यक्त केला आहे. घटनास्थळी सिव्हिल लाईन पोलीस ठाण्याचे अधिकारी दाखल होऊन पंचनामा केला असून, अज्ञात आरोपीचा शोध सुरू आहे.

# सेंट जोसेफ स्कूल अँड ज्युनियर कॉलेज, हातोला येथे दिवाळी मोठ्या उत्साहात साजरी

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**अकोला, दि. २७ :**सेंट जोसेफ स्कूल अँड ज्युनियर कॉलेज, हातोला, ता. बार्शीटाकळी येथे दिवाळी सण मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी शाळेतील सर्व शिक्षक आणि कर्मचारी उपस्थित होते. दिवाळी सणानिमित्त, मुख्याध्यापकांनी मुलांना सांगितले की, फटाक्यांबाबत जागरूक राहणे महत्त्वाचे आहे. त्यांनी या विषयावर भाष्य केले आणि सर्व शिक्षकांसह, त्यांनी मुलांना फटाके फोडताना काळजी कशी घ्यावी हे व्यावहारिकपणे दाखविले. यासोबतच त्यांनी मुलांना आणि



त्यांच्या कुटुंबियांना दिवाळीच्या शुभेच्छा दिल्या आणि मुलांना चॉकलेट वाटले. यावेळी शिक्षक आणि कर्मचाऱ्यांनी मुख्याध्यापक यांना दिवाळीच्या शुभेच्छांसह देवी लक्ष्मीची मूर्ती भेट दिली. या शुभप्रसंगी मुख्याध्यापकांच्या वतीने शाळा व्यवस्थापनाने सर्व कर्मचाऱ्यांना मिठाईचे बॉक्स आणि कपडे आणि महिला शिक्षिका आणि कर्मचाऱ्यांना साड्या वाटल्या. पुरुष शिक्षक आणि कर्मचाऱ्यांना दिवाळी भेट म्हणून कपडे दिले आणि शुभेच्छाही दिल्या. ही गावातील पहिली शाळा आहे जिथे सर्व सण मोठ्या उत्साहाने आणि सर्व रीतीरिवाजांसह साजरे केले जातात. आमच्या सेंट जोसेफ शाळेतील मुख्याध्यापिका रचना गोडदवार आणि शिक्षक आम्हाला असा अनुभव देतात की जणू काही आम्ही घरीच सण साजरा करत आहोत, असे यावेळी शिक्षकांनी सांगितले.

शिक्षकांमध्येही आनंद, प्रतिष्ठा, आदर आणि शिकण्याची उत्सुकता वाढत आहे, असे येथील शिक्षक सांगतात. मुख्याध्यापकांनी त्यांना सांगितले की, जेव्हा आपण सर्वजण एकत्र काम करतो तेव्हा जबाबदारीसोबतच प्रेम आणि आदर देखील तितकाच महत्त्वाचा असतो. ही शाळा आमच्या मुलांसाठी आणि आमच्या गावासाठी एक आदर्श शाळा ठरणार आहे, असे पालकवर्गही बोलून दाखवीत आहे.

**पर्यटन** | गणपतीपुळे समुद्रकिनारी मोठी गर्दी

# दिवाळी पर्यटन हंगामात पर्यटकांची कोकणाला पसंती

गणपतीपुळे , दि. २७ वृत्तसंस्था

दिवाळी पर्यटन हंगामात पर्यठकांची कोकणाला पसंती मिळत आहे. कोकणातील सुंदर समुद्र किनाऱ्यांवर पर्यटक मोठी गर्दी करत आहेत. गणपतीपुळे येथे गेल्या चार दिवसांत विविध ठिकाणांहून आलेले लाखो पर्यटक-भाविकांनी गणपतीपुळे येथील स्वयंभू श्रींचे दर्शन घेऊन पर्यटनाचा आनंद घेतला. सध्या शाळा-महाविद्यालयांना दिवाळी सुट्टी असल्याने पर्यटकांची पावले पर्यटनाचा आनंद घेण्यासाठी कोकणाकडे वळू लागली आहेत.



कोकणातील निसर्गरम्य ठिकाणे पर्यटकांना विशेष आकर्षित करत आहे. त्यामध्ये गणपतीपुळे हे जागतिक दर्जाचे पर्यटन असल्याने या ठिकाणी पर्यटकांची मोठी गर्दी होत असून, गणपतीपुळे परिसरातील सर्व रस्त्यांवर वाहनांच्या मोठ्या रांगा लागलेल्या पाहायला मिळत आहेत. गर्दीमुळे पर्यटन व्यवसायाला चालना मिळत आहे.

गणपतीपुळे भेटीवर आलेल्या पर्यटकांना येथील समुद्रकिनाऱ्याची भुरळ पडत असून, त्यांना विलोभनीय समुद्रकिनारा व समुद्राच्या पाण्याचा मोह आवरता येत नाही. अशातच सध्या येथील येथील समुद्रकिनाऱ्यावर जेलीफिशचे मोठ्या प्रमाणात साम्राज्य पसरले आहे. यामुळे पर्यटकांमध्ये भीतीचे वातावरण आहे. जेलीफिशचे अस्तित्व आढळल्याने पर्यटक तसेच भाविकांनी समुद्रात जेलीफिश ज्या ठिकाणी असतील तेथे पाण्यात उतरू नये, असे आवाहन स्थानिक प्रशासनातर्फे करण्यात आले आहे.

# अकोला मार्केटमध्ये सोयाबीन, तूर व तीळ भावात सुधारणा

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी


**अकोला, दि. २७ :**कृषी उत्पन्न बाजार समिती, अकोला येथे सोमवारी झालेल्या धान्य बाजारात प्रमुख कृषी उत्पादनांच्या दरात मध्यम स्वरूपातील चढ-उतार दिसून आली बाजार समितीच्या अहवालानुसार दुपारी दोन वाजेपर्यंत प्राप्त भावांनुसार तूर, सोयाबीन व तीळ यांच्या दरात किंचित वाढ नोंदवली गेली असून गहू, ज्वारी, मुग आणि उडीद यांचे दर तुलनेने स्थिर राहिले आहेत.

गव्हाचे भाव प्रति क्विंटल २००० ते २८०० रुपये इतके तर ज्वारीचे भाव १६०० ते १९७० रुपये नोंदवले गेले. मुगाचा दर ४७०५ रुपये इतकाच कायम राहिला, तर उडीदचा भाव ३५०० रुपये वर स्थिर होता. चण्याचे भाव ५००० ते ५५५० रुपये इतके असून, पांढऱ्या चण्याचा दर ४४०० रुपये नोंदवला गेला.तूरीच्या दरात सुधारणा दिसून आली असून तिचा भाव ६३०० ते ७२०० रुपये प्रति क्विंटल असा होता. सोयाबीनमध्येही तेजी दिसली असून त्याचा दर ३६०० ते ४४२० रुपये दरम्यान राहिला. तिळाच्या बाजारात वाढती कल पाहायला मिळाली असून त्याचा भाव ८२९५ ते ९१०० रुपये दरम्यान नोंदवला गेला.सध्याच्या बाजारस्थितीनुसार तूर, सोयाबीन व तिळाच्या दरांमध्ये स्थिरतेसोबत सुधारणा दिसत असल्याने शेतकरी वर्गात समाधानाचे वातावरण आहे. मात्र, गहू व ज्वारी दरात मोठी हालचाल दिसली नाही.

बाजार समितीचे धान्य विभाग प्रमुख सुनील जा. ठोकळ यांनी दिलेल्या माहितीनुसार, वरील सर्व भाव दि. २७ ऑक्टोबर २०२५ रोजी दुपारी २ वाजेपर्यंतचे आहेत.

# बँकेचा हप्ता न भरल्यास थेट एआय कॉल करणार

नवी दिल्ली, दि.२७ वृत्तसंस्था




भारतीय बँकिंगच्या इतिहासात पहिल्यांदाच थकीत कर्जाचे प्रमाण ०.५ टक्के किंवा त्याहूनही खाली जाण्याच्या मार्गावर आहे. ज्या सरकारी बँकांनी सप्टेंबर २०२५ चे तिमाही निकाल जाहीर केले आहेत, त्यापैकी बहुतांश बँकांचा निव्वळ एनपीए ०.५ टक्क्यांपेक्षा कमी आहे. तथापि, काही एजन्सींनी असा इशारा दिला आहे की, बँका मोठ्या प्रमाणात कर्जवाटप करत असल्यामुळे एनपीएची समस्या पुन्हा डोके वर काढू शकते.

देशातील दोन प्रमुख सरकारी बँका, पंजाब नॅशनल बँक आणि इंडियन बँक या दोन्ही बँका थकीत कर्जाचे सत्र पुन्हा परत येऊ नये यासाठी विशेषतः आर्टिफिशियल इंटेलिजन्सचा वापर करत आहेत. पीएनबीचे एमडी आणि सीईओ अशोक चंद्र यांनी दावा केला आहे की, त्यांची बँक ज्या तिमाहीत चालेल, त्या तिमाहीत आपला निव्वळ एनपीए शून्य करू शकते.

वर्ष २०१७-१८ मध्ये भारतीय बँकांमधील एकूण थकीत कर्ज म्हणजेच एकूण एनपीएची पातळी ११.७८ टक्क्यांपर्यंत वाढली होती. एनपीएची ही पातळी अत्यंत वाईट मानली जाते; परंतु गेल्या सात वर्षांत परिस्थिती पूर्णपणे बदलली आहे. आरबीआयच्या आकडेवारीनुसार, जून २०२५ रोजी संपलेल्या तिमाहीत सरकारी बँकांचा एकूण एनपीए (एकूण मालमत्तेच्या तुलनेत एकूण एनपीएचे प्रमाण) घटून २.५ टक्क्यांवर आणि निव्वळ एनपीए (थकीत कर्जासाठी समायोजित केलेली रक्कम वगळल्यानंतरचे प्रमाण) केवळ ०.६ टक्क्यांवर आला आहे. अनेक जागतिक अहवालानुसार,

### वरिष्ठ अधिकाऱ्यांपर्यंत एआयकडून अलर्ट

**वसुलीबाबत बँकेच्या स्तरावरची तत्परता पूर्वीपेक्षा खूप जास्त आहे. यासाठी एआयची मदत घेतली जात आहे. बँकेच्या जोखीम व्यवस्थापन विभागातील प्रत्येक अधिकाऱ्याची स्वतः ची जबाबदारी निश्चित केली आहे, ज्यामध्ये कोणतीही तडजोड केली जात नाही. एआयच्या मदतीने प्रत्येक कर्ज खात्यावर काटेकोरपणे नजर ठेवली जाते.**

भारतीय बँकिंग क्षेत्रातील एनपीएची पातळी आता अमेरिका, युरोपियन युनियन, ब्रिटनच्या बँकिंग क्षेत्राच्या जवळपास आहे.

## महत्त्वाचे

### दिल्ली विद्यापीठाच्या विद्यार्थिनीवर भर दिवसा ॲसिड हल्ला

**नवी दिल्ली :** वायव्य दिल्लीत लक्ष्मीबाई महाविद्यालयाजवळ रविवारी (२६ ऑक्टोबर) एक खळबळजनक घटना घडली. दिल्ली विद्यापीठाच्या एका विद्यार्थिनीवर महाविद्यालयाच्या बाहेर ॲसिड हल्ला झाला आहे. पोलिसांनी घटनेची माहिती देताना सांगितलं की पीडिता महाविद्यालयात जात असताना तिच्यावर हा हल्ला झाला. पीडितेने तिचा चेहरा वाचवला असला तरी तिचे हात भाजले आहेत. पीडितेच्या तक्रारीनंतर पोलिसांनी गुन्हा दाखल केला असून कारवाई सुरू केली आहे.

ही घटना सकाळी १० वाजता घडली. विद्यार्थिनी महाविद्यालयाच्या दिशेने जात असताना एक ज्वलनशील पदार्थ तिच्या अंगावर फेकण्यात आला. विद्यार्थिनीने चेहरा वाचवला असला तरी तिचे हात भाजले. त्यानंतर आसपासच्या लोकांनी जखमी विद्यार्थिनीला तातडीने रुग्णालयात नेले.

### क्रॉफर्ड मार्केटमधील बाटा शो-रूमला आग

**मुंबई :** रविवारी रात्री दक्षिण मुंबईतील क्रॉफर्ड मार्केट परिसरातील बाटा शो-रूममध्ये आग लागल्याची घटना घडली. ही घटना रात्री सुमारे साडे दहा वाजता घडली. मध्यरात्री आग विझवण्यात अग्निशमन दलाला यश आलेले असले तरी या आगीत चपला, बूट जळून खाक झाले. खरेदीसाठी प्रसिद्ध असलेल्या क्रॉफर्ड मार्केट येथील 'बाटा' या चपला व बूटच्या दुकानाला रविवारी रात्री आग लागली. द्वारकादास या चार मजली इमारतीत बाटाचे दुमजली शोरूम आहे. त्यात ही आग लागली होती. अग्निशमन दलाने घटनास्थळी पोहोचून आग विझवण्याचे काम हाती घेतले होते.सुरुवातीला अग्निशमन दलाने क्रमांक १ ची वर्दी दिली होती. परंतु थोड्याच वेळात आगीची तिव्रता वाढल्यामुळे २ क्रमांकाची वर्दी देण्यात आली. घटनास्थळी ८ फायर इंजिन, ६ जंबो टँकर, १ अँब्युलन्स, पाण्याचे टँकर, १ ब्रीदिंग ॲपरेटस व्हॅन, १ रेस्क्यू व्हॅन,१०८ रुग्णवाहिका, तसेच वरिष्ठ स्टेशन अधिकारी, स्टेशन अधिकारी आणि वॉर्ड कर्मचारी उपस्थित राहून आग विझविण्याचे काम करत होते.

### हरियाणाचे ५० युवक अमेरिकेतून डिपोर्ट

**नवी दिल्ली:** अमेरिकेत अवैध वास्तव्य करणाऱ्या हरियाणाच्या ५० युवकांना डिपोर्ट करत भारतात पाठविण्यात आले आहे. या सर्वांच्या हातात बेड्या आणि पायांमध्ये साखळदंड होते. या भारतीयांना आणणारे विमान दिल्ली विमानतळावर पोहोचले, तेथून हरियाणाच्या विविध जिल्ह्यांचे पोलीस या युवकांना स्वतःसोबत घेऊन गेले. हे सर्व युवक डंकी मार्गाने अमेरिकेत पोहोचले होते. यातील सर्वाधिक १४ युवक हे कैथल जिल्ह्यातील आहेत. याचबरोबर ३ नोव्हेंबर रोजी आणखी एक विमान डिपोर्ट करणाऱ्या भारतीयांसह अमेरिकेतून दाखल होणार आहे.

### कल्लडक प्रभाकर भट यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल

**बेंगळूर :** पुत्तूर तालुक्मयातील एका रहिवाशाने दाखल केलेल्या तक्रारीवरून आरएसएस नेते कल्लडक प्रभाकर भट आणि उप्पळीगे येथे आयोजित दीपोत्सव कार्यक्रमाच्या आयोजकांविऊद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे, असे पोलिसांनी सांगितले. रविवारी पुत्तूर ग्रामीण पोलिसांनी जारी केलेल्या पत्रकानुसार, एका युट्यूब न्यूज चॅनेलवर प्रसारित झालेले भट यांचे भाषण 'धार्मिक द्वेष भडकवते, महिलांच्या प्रतिष्ठेचा अपमान करते आणि सार्वजनिक शांतता भंग करते' असा आरोप तक्रारीत करण्यात आला आहे. हा कार्यक्रम २० ऑक्टोबर रोजी आयोजित करण्यात आला होता. भट यांनी हिंदू आणि मुस्लिम समुदायांबद्दल अपमानास्पद टिप्पणी करत मतदारांची संख्या नमूद केली.

## इंग्लंडमध्ये भारतीय तरुणीवर अत्याचार

वालसॉल, दि.२७ वृत्तसंस्था

युनायटेड किंगडमच्या वेस्ट मिडलँड्समध्ये भारतीय वंशाच्या एका २० वर्षीय तरुणीवर बलात्कार झाल्याची अत्यंत धक्कादायक घटना समोर आली आहे. वेस्ट मिडलँड्स पोलिसांनी या हल्ल्याला वांशिक प्रेरित म्हटले असून, आरोपीने हा गुन्हा मुलीची जात किंवा वंश पाहून केला असल्याचे स्पष्ट केले आहे.

शनिवारी रात्री उशिरा वालसॉल येथील पार्क हॉल परिसरात ही घटना उघडकीस आली. तरूणी लैंगिक अत्याचारानंतर रस्त्याच्या मधोमध घाबरलेल्या अवस्थेत बसली होती. याबाबत माहिती मिळताच पोलीस तातडीने घटनास्थळी दाखल झाले. या प्रकरणाचा तपास करत असलेले वरिष्ठ पोलीस अधिकारी रोनन टायरेर यांनी या घटनेवर तीव्र संताप व्यक्त केला आहे. ''एका तरुणीवर झालेला हा अत्यंत भयानक हल्ला आहे.

## चीनमधील भारतीय दूतावासाच्या आवारात रवींद्रनाथ टागोर यांच्या अर्धपुतळ्याचे अनावरण

बीजिंग, दि.२७ वृत्तसंस्था



चीनमधील भारतीय दूतावासाच्या आवारात नोबेल पुरस्कार विजेते रवींद्रनाथ टागोर यांच्या अर्धपुतळ्याचे नुकतेच अनावरण करण्यात आले. प्रसिद्ध चिनी शिल्पकार युआन झिकुन यांनी हा पुतळा घडवला आहे. शनिवारी दूतावासाने आयोजित केलेल्या संगमम अ कन्फ्लुअन्स ऑफ इंडियन फिलॉसॉफिकल ट्रेडिशन्स या परिसंवादाच्या निमित्ताने या शिल्पाचे अनावरण करण्यात आले. शतकापूर्वी टागोरांची चीन भेट ही आपल्या संस्कृतीच्या संवादातील एक मैलाचा दगड होती, असे या पुतळ्याचे अनावरण करताना, चीनमधील भारतीय राजदूत प्रदीप रावत म्हणाले. टागोरांचा वैश्विक मानवतावादाचा संदेश आणि झू झिमो आणि लियांग किचाओ सारख्या चिनी विद्वानांशी त्यांची मैत्री दोन्ही राष्ट्रांना प्रेरणा देत आहे, असे रावत म्हणाले.

एक प्रसिद्ध शिल्पकार युआन यांनी गांधीजींचा एक पुतळा देखील घडवला आहे. त्यामध्ये महात्मा गांधी हातात पुस्तक घेऊन एका अनोख्या बसलेल्या स्थितीत बसले असल्याचे दिसते आहे. भारतीय दूतावास दरवर्षी गांधी जयंती साजरी केली जाते. नयनरम्य चाओयांग पार्कमध्ये २००५ मध्ये हा पुतळा स्थापित करण्यात आला होता. रविंद्रनाथ टागोर यांनी त्यांच्या आयुष्यात तीनदा चीनला भेट दिली होती.

चीनमध्ये त्यांचे चाहते आहेत आणि त्यांच्या साहित्याचे भाषांतर करण्यासाठी अनेकांनी बंगाली आणि इंग्रजी शिकण्यासाठी आपले जीवन समर्पित केले आहे.

## पाकिस्तानसोबत मैत्री करताना भारताच्या संबंधांना धक्का नाही : परराष्ट्रमंत्री रुबिओ

क्वॉलालंपूर, दि.२७ वृत्तसंस्था

अमेरिकेच्या दृष्टिकोनातून राजनैतिक संतुलन साधण्याचा प्रयत्न करताना, अमेरिकेचे परराष्ट्र मंत्री मार्को रुबिओ यांनी म्हटले आहे की, त्यांचा देश पाकिस्तानसोबत सामरिक संबंध वाढवण्याचा प्रयत्न करत असला तरी, हे संबंध भारतासोबतच्या संबंधांना धक्का लावून प्रस्थापित केले जाणार नाहीत.

याला परिपक्व आणि व्यावहारिक परराष्ट्र धोरण म्हणत रुबिओ यांनी अधोरेखित केले की, भारताचेही अशा देशांशी संबंध आहेत ज्यांच्याशी अमेरिकेचे संबंध चांगले नाहीत. 'हेच दुसऱ्या बाजूलाही लागू होते,' असे डोनाल्ड ट्रम्प प्रशासनातील सर्वोच्च अधिकाऱ्यांपैकी एक असलेल्या रुबिओ यांनी शनिवारी दोहाला जाणाऱ्या विमानात पत्रकारांना सांगितले. ट्रम्प यांच्या पूर्वेकडील देशांच्या दौऱ्याचा हा एक भाग आहे. 'मला वाटत नाही की आम्ही पाकिस्तानसोबत जे काही करत आहोत, त्याचा परिणाम भारतासोबतच्या आमच्या मैत्रीवर किंवा संबंधांवर होईल. भारतासोबतचे आमचे संबंध खूप खोल, ऐतिहासिक आणि महत्त्वाचे आहेत,' असे त्यांनी सांगितले.



### भारतासोबतच्या आव्हानांची जाणीव

**रुबिओ यांनी दावा केला की, भारतासोबत कोणताही संघर्ष सुरू होण्यापूर्वीच त्यांनी इस्लामाबादशी संपर्क साधला होता. ते म्हणाले की, ट्रम्प प्रशासन 'एक युती, एक सामरिक भागीदारी पुन्हा तयार करण्यास इच्छुक आहे.' आम्हाला भारतासोबतच्या आव्हानांची आणि इतर सर्व गोष्टींची पूर्ण जाणीव आहे; परंतु शक्य असेल तिथे देशांसोबत भागीदारीच्या संधी निर्माण करणे हे आमचे काम आहे.**

रुबिओ सोमवारी आसियान शिखर परिषदेच्या पार्श्वभूमीवर भारताचे परराष्ट्र मंत्री एस. जयशंकर यांची भेट घेणार आहेत. या भेटीत सुरू असलेल्या व्यापार कराराच्या वाटाघाटी आणि रशियन तेलाच्या मुद्द्यावर चर्चा होण्याची शक्यता आहे.

## साप चावलेल्या मुलाला जिवंत करण्यासाठी अघोरी प्रकार; ३ दिवस कडुलिंबाची पाने- शेणात ठेवला मृतदेह

आग्रा, दि.२७ वृत्तसंस्था

सापाने दंश केल्यानंतर मृत्यू झालेल्या आपल्या मुलाला पुन्हा जिवंत करण्यासाठी आई-वडिलांनी त्याचा मृतदेह तीन दिवस कडुलिंबाची पाने आणि शेणाच्या गोवऱ्यांमध्ये ठेवला. मुलगा जिवंत होईल या अंधश्रद्धा आणि भाबड्या आशेने मानवी मनाला हेलावून टाकणारी आणि तितकीच धक्कादायक घटना उत्तर प्रदेशातील हातूरस जिल्ह्यातील हसायन भागात उघडकीस आली आहे. तांत्रिक-मांत्रिकांच्या भूलथापांना बळी पडलेल्या या शोकाकुल कुटुंबाकडून अखेर पोलिसांनी हस्तक्षेप करून मृतदेह ताब्यात घेतला आणि शवविच्छेदनासाठी पाठवला. हसायनमधील इतारणी गावात कपिल जाटव (वय १०) या मुलाचा दिवाळीच्या रात्री (२० ऑक्टोबर) घरी साप चावल्याने मृत्यू झाला होता. त्याला तातडीने स्थानिक सरकारी रुग्णालयात नेण्यात



आले, पण डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले. कपिल हा गावातल्या सरकारी शाळेत इयत्ता चौथीमध्ये शिकत होता. मुलाचा मृतदेह घरी आणल्यानंतर शोकाकुल कुटुंबाला काही शेजाऱ्यांनी मथुरेतील मांत्रिकामार्फत मुलाला जिवंत करण्याचा सल्ला दिला. त्याच्यावर विश्वास ठेवून कुटुंब मृतदेह घेऊन मथुरेला गेले. मात्र, मांत्रिकाचे विधी निष्फळ ठरले.शेवटचा अघोरी प्रयत्न अपयशी ठरल्यानंतर कुटुंबीयांनी मृतदेह परत गावात आणला. निराशेच्या भरात त्यांनी शेवटचा प्रयत्न म्हणून मृतदेह कडुलिंबाची पाने आणि शेणाने पूर्णपणे झाकून गावाबाहेर ठेवला. तिथे मांत्रिकांनी त्याला पुन्हा जीवंत करण्यासाठी विधी केले. कदाचित तो जिवंत होईल या आशेने तीन दिवस कुटुंबातील सदस्य आणि गावकऱ्यांनी त्या मृत मुलाच्या पायांना फांदीने टोचून पाहिले, पण कोणतीही हालचाल न दिसल्याने अखेर गुरुवारी रात्री पोलिसांना याची माहिती देण्यात आली. हसायनचे पोलिस ठाणे प्रभारी गिरीशचंद्र गौतम यांनी दिलेल्या माहितीनुसार, पोलिस गावात पोहोचले आणि त्यांनी मृतदेह ताब्यात घेऊन शवविच्छेदनासाठी पाठवला.मुलाचा वडील नरेंद्र जाटव हे रोजंदारी मजूर आहेत. त्यांनी सांगितले, ''शुक्रवारी शवविच्छेदन झाले आणि नंतर मुलाचे अंत्यसंस्कार करण्यात आले.'' सध्या या प्रकरणी कोणतीही तक्रार दाखल करण्यात आलेली नाही, परंतु अंधश्रद्धेतून झालेल्या या घटनेचा पोलिसांकडून तपास सुरू आहे.

## बेलारुसमधून आलेल्या बलूनमुळे लिथुआनियातील विमान सेवा स्थगित

विलनियस, (लिथुआनिया), दि.२७ वृत्तसंस्था

बेलारूसमधून आलेल्या शेकडो बलूनमुळे लिथुआनियाच्या मुख्य विमानतळावरील उड्डाणे सलग दोन रात्री विस्कळीत झाली. अधिकाऱ्यांनी सोमवारी संभाव्य परिणामांवर चर्चा करण्याची योजना आखली आहे. सिगारेटची तस्करी करण्यासाठी बेलारुसमधून हे बलून सोडण्यात आल्याचा संशय आहे. शनिवारी रात्री ९:३५ वाजता हवाई वाहतूक बंद करण्यात आली आणि रविवारी पहाटे ३:३० वाजता विमानतळावरील हवाई क्षेत्र पुन्हा उघडण्यात आले. हवाई वाहतूक स्थगित केल्यामुळे चार विमानांची उड्डाणे रद्द करण्यात आली आणि सात विमानांना दुसरीकडे वळवण्यात आले, असे विलनियस विमानतळाने सांगितले.शुक्रवारी रात्री देखील विलनिअस विमानतळ आणि कौनास येथील विमानतळावर अशाच प्रकारे विमान वाहतूक स्थगित करावी लागली होती. त्यामुळे एकूण १० विमानांची उड्डाणे रद्द करण्यात आली आणि चार विमाने अन्य विमानतळांकडे वळवण्यात आली. बुधवारी सकाळी देखील बलूनमुळे हवाई वाहतुकीत अडथळा निर्माण झाला होता.

## आयर्लंडच्या अध्यक्षपदी कॅथरीन कॉनोली यांची निवड

लंडन, दि.२७ वृत्तसंस्था



आयर्लंडच्या दहाव्या अध्यक्षा म्हणून कॅथरीन कॉनोली यांची निवड झाली आहे. त्यांनी आपले प्रतिस्पर्धी हीदर हम्फ्रे यांच्या विरोधात प्रचंड मतांनी विजय मिळवला. डाव्या विचारांचा प्रभाव असलेल्या कॉनोली या अपक्ष नेत्या आहेत. त्यांना डाव्या विचारांच्या सिन फिन या पक्षाचा पाठिंबा मिळाला आहे. त्यांच्याविरोधात असलेल्या हम्फ्रे या मध्यवर्ती-उजव्या विचारांच्या फाईन गायेल पक्षाच्या उमेदवार होत्या. हम्फ्रे यांनी आपला पराभव मान्य केला असून कॉनोली यांचे अभिनंदन केले आहे. कॅथरीन आपल्या सर्वांसाठी अध्यक्ष असतील आणि त्या माझ्यासाठीही अध्यक्षा असतील. मी त्यांना खूप खूप शुभेच्छा देऊ इच्छिते, असे हम्फ्रे यांनी पत्रकारांना सांगितले. एक अनुभवी राजकारणी असलेल्या कॉनोली या २०१६ साला पासून संसदेत गॅलवे वेस्ट मतदारसंघाचे प्रतिनिधित्व करत आहेत.

आयर्लंड संसदेच्या उपसभापती म्हणूनही त्यांनी काम केले आहे. पूर्वाश्रमीच्या बॅरिस्टर असलेल्या कॅथरीन या गाझामधील युद्धावरून इस्रायलवर नेहमी टीका करत असतात. रशियाने युक्रेनवर केलेल्या आक्रमणानंतर त्यांनी युरोपीय संघाच्या वाढत्या लष्करीकरणाविरुद्ध इशारा देखील दिला आहे.

## काँग्रेसच्या स्टार प्रचारकांमध्ये अपक्ष खासदार पप्पू यादव यांचा समावेश

नवी दिल्ली, दि.२७ वृत्तसंस्था

बिहार विधानसभा निवडणुकीच्या पहिल्या टप्प्यासाठी काँग्रेसने ४० स्टार प्रचारकांची यादी जारी केली. त्या यादीत बिहारमधील अपक्ष खासदार पप्पू यादव यांनाही स्थान मिळाले आहे. बिहारमध्ये २ टप्प्यांत विधानसभा निवडणूक होईल. त्या राज्यात ६ आणि ११ नोव्हेंबरला मतदान होणार आहे. निवडणूक ज्वर वाढीस लागला असताना काँग्रेसने पहिल्या टप्प्यासाठी स्टार प्रचारक निश्चित केले. त्यामध्ये पप्पू यादव यांचा समावेश लक्षवेधी ठरला.



अपक्ष खासदार असले तरी ते काही काळापासून काँग्रेसशी जवळीक साधून आहेत. प्रभावी वक्ते अशी ओळख निर्माण केलेले तरूण नेते कन्हैय्या कुमार हेही स्टार प्रचारक म्हणून प्रचाराचा धुरळा उडवून देतील. काँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे, माजी अध्यक्ष राहुल गांधी, पक्षाच्या सरचिटणीस प्रियंका गांधी हे अर्थातच पक्षाचे प्रमुख स्टार प्रचारक आहेत. पक्षाच्या माजी अध्यक्षा सोनिया गांधी यांचाही स्टार प्रचारकांमध्ये समावेश आहे. मात्र, त्या प्रत्यक्ष प्रचारात सहभागी होणार का याविषयी उत्सुकता असेल. छठ पूजेनंतर प्रमुख नेत्यांच्या सहभागामुळे काँग्रेसची प्रचार मोहीम खऱ्याअर्थी जोर पकडेल. राहुल २९ आणि ३० ऑक्टोबरला प्रचारसभा घेतील.

## धक्कादायक | एआय मंत्री डिएला झाली गर्भवती

# एकाचवेळी ८३ मुलांना देणार जन्म!

नवी दिल्ली, दि.२७ वृत्तसंस्था

**अल्बानिया हा जगातील असा पहिला देश आहे, ज्याने अधिकृतपणे आपल्या मंत्रिमंडळात एका नॉन-ह्यूमन मंत्र्याचा समावेश केला आहे. ही मंत्री पूर्णपणे कृत्रिम बुद्धिमत्ता () वापरून बनवली आहे आणि तिचे नाव डिएला ठेवले आहे. डिएला यांच्या नियुक्तीमुळे आधीच खूप चर्चा झाली होती, पण आता एआयने बनलेली ही मंत्री गर्भवती झाली आहे.**

---

एआय डिएला ८३ मुलांना जन्म देणार आहे, असे बोलले जात आहे. अल्बानियाचे पंतप्रधान एडी रामा यांनी या संदर्भात माहिती दिली आहे. एआयने बनलेली मंत्री गर्भवती



कशी झाली आणि ती एकाच वेळी ८३ बाळांना जन्म कशी देऊ शकते हे ऐकून तुम्हाला नक्कीच आश्चर्य वाटले असेल. डिएला ही अल्बानियाच्या मंत्रिमंडळातील जगातील पहिली नॉन-ह्यूमन मंत्री आहे. अल्बानियाच्या सार्वजनिक खरेदी प्रणालीला १००% पारदर्शक आणि

### एआय असिस्टंट बनवण्यावर सरकारचा विचार

आता अल्बानियाचे सरकार प्रत्येक खासदारासाठी एआय असिस्टंट बनवण्याचा विचार करत आहे. यालाच त्यांनी डिएला गर्भवती असणे आणि ८३ मुलांना जन्म देणे, याच्याशी जोडून सांगितले आहे. बर्लिनमधील ग्लोबल डायलॉग (बीजीडी) मध्ये अल्बानियाचे पंतप्रधान म्हणाले, आम्ही डिएलासोबत एक मोठा धोका पत्करला आणि त्यात यशस्वी झालो. डिएला गर्भवती आहे आणि तिच्या पोटात ८३ मुले आहेत.

भ्रष्टाचारमुक्त बनवण्यासाठी डिएलाची नियुक्ती सप्टेंबरमध्ये करण्यात आली होती. ही मंत्री पारंपरिक अल्बानियाई वेशभूषेत एका महिलेच्या रूपात दर्शविली जाते. ती पूर्णपणे कोड आणि पिक्सेलने बनलेली एक आभासी संस्था आहे. सार्वजनिक निविदा प्रक्रियेशी संबंधित सर्व निर्णय घेण्याची जबाबदारी तिच्यावर सोपवण्यात आली आहे.

त्यांच्या मते, ''ही मुले म्हणजेच असिस्टंट्स संसदेतील प्रत्येक कार्यक्रम रेकॉर्ड करतील आणि खासदारांना चुकलेल्या कार्यक्रमांची आणि चर्चेची माहिती देतील. प्रत्येक मूल खासदारांचे सहाय्यक म्हणून काम करेल. ते खासदारांना सूचना देखील देतील. त्यांना त्यांच्या आई म्हणजेच डिएलाबद्दलही माहिती असेल.''

अल्बेनिया २०२६ पर्यंत ही प्रणाली पूर्णपणे अंमलात आणण्याच्या दिशेने काम करत आहे. अल्बानियाचे पंतप्रधान एडी रामा म्हणाले, जर तुम्ही कॉफी प्यायला गेलात आणि कामावर यायला विसरलात, तर ही मुलं सभागृहात त्यावेळेस काय बोलले गेले, हेच सांगतील. खासदारांनी कशावर काउंटर अटॅक करायचा हे ते सांगतील. जेव्हा मी पुढच्या वेळी येईन, तेव्हा डिएलाच्या मुलांसाठी ८३ स्क्रीनही असतील.

## सत्तेवर आल्यास वक्फ कायदा कचरापेटीत फेकून देऊ

### तेजस्वी यादव यांचे प्रतिपादन



नवी दिल्ली, दि.२७ वृत्तसंस्था

बिहारमध्ये 'इंडिया' आघाडी सत्तेत आल्यास वक्फ दुरुस्ती कायदा कचरापेटीत फेकून देऊ, असे आश्वासन राष्ट्रीय जनता दलाचे नेते व विरोधकांचे मुख्यमंत्रिपदाचे उमेदवार तेजस्वी यादव यांनी रविवारी दिले.

राजद पक्षप्रमुख लालूप्रसाद यादव यांनी धार्मिक शक्तींशी कधीच तडजोड केली नाही, नितीश कुमार यांनी मात्र नेहमीच अशा शक्तींना पाठिंबा दिला, असा आरोप तेजस्वी यांनी केला. 'नितीश कुमारांमुळेच राज्यात राष्ट्रीय स्वयंसेवक संघ आणि त्यांच्या संलग्न संघटना धार्मिक द्वेष पसरवत आहे. त्यामुळे भाजपचे 'भारत जलाओ पार्टी' असे नामकरण करायला हवे', असे तेजस्वी यादव म्हणाले. 'ही निवडणूक म्हणजे राज्यघटना, लोकशाही आणि बंधुभावाचे संरक्षण करण्यासाठीची लढाई आहे. काही जण उमेदवार उभे करून मतविभागणीचा प्रयत्न करीत आहत. मात्र, अशा उमेदवारांकडे जनतेने दुर्लक्ष करावे', असे सांगत तेजस्वी यांनी जनसुराज्य पक्षाचे संस्थापक प्रशांत किशोर यांना अप्रत्यक्षपणे लक्ष्य केले. 'राज्यात २० वर्षे सरकार चालवणाऱ्या नितीश कुमार यांना जनता कंटाळली आहे. नितीश कुमार हे २० वर्षे राज्यात सत्तेवर आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदी हे ११ वर्षांपासून केंद्रात सत्तेवर आहेत. मात्र, त्यांना बिहारचा मागासलेपणा दूर करता आलेला नाही. सरकारच्या प्रत्येक विभागात भ्रष्टाचार माजला आहे . राज्यातील कायदा-सुव्यवस्था पूर्णपणे कोलमडली आहे', असा आरोप तेजस्वी यांनी केला.

हे पत्र मालक,मुद्रक,प्रकाशक आणि **मुख्य संपादक तिक्ष्णगत सुगत वाघमारे** यांनी भास्कर प्रिंटिंग प्रेस एन.एच.६ बोरगाव मंजू येथे मुद्रित करून दै.अजिंक्य भारत, सुगत भवन,बारा ज्योतिर्लिंग मंदिराजवळ, रणपिसेनगर, अकोला येथे प्रकाशित केले.✻ **कार्यकारी संपादक-रूबेन डी.वाळके (✻पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची)** आरएनआय-MAHMAR/2009/35271

आपले पत्र या मेलवर पाठवावे, आम्ही त्याला प्रसिद्धी देऊ
ajinkyabharat23@gmail.com

# संपादकीय...

## बिहारची घसरण सुरूच!

बिहारची ग्रामीण लोकसंख्या ८३.८० टक्के आहे, तर शहरी भागात केवळ १६.२० टक्केच लोक राहतात. महाराष्ट्रातील हेच प्रमाण अनुक्रमे ५१ आणि ४९ टक्के आहे. अर्थशास्त्रीय निकषांनुसार तपासून पाहिले, तर बिहार कोणत्याही निकषांत पुढारलेला नाही. याउलट सर्वच पातळ्यांवर बिहारची घसरण सुरूच आहे. देशातील सर्वात गरीब राज्य किंवा दारिद्र्यातील राज्य कुठले असेल, तर ते बिहार! लोकसंख्येच्या दृष्टीने देशातील दुसऱ्या क्रमांकाचे राज्य. क्षेत्रफळाच्या दृष्टीने बाराव्या स्थानी आणि राष्ट्रीय उत्पन्नाच्या दृष्टीने चौदाव्या. लोकसंख्येच्या घनतेच्या दृष्टीने राज्याचा देशात पहिला क्रमांक लागतो आणि दरडोई उत्पन्नामध्ये शेवटून पहिला. अशा बिहारच्या राजकारणाची चर्चा देशपातळीवर कायमच सुरू असते. गेल्या पस्तीस वर्षांत राज्य काँग्रेसमुक्त झाले असले, तरी बिगर काँग्रेस राजकीय पक्षांना बिहारचा विकास साधता आलेला नाही. या पस्तीस वर्षांपैकी वीस वर्षे विद्यमान मुख्यमंत्री नितीश कुमार यांच्या नेतृत्वाखालील संयुक्त जनता दलाचे सरकार आहे आणि तत्पूर्वी पंधरा वर्षे लालूप्रसाद यादव यांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रीय जनता दलाचे सरकार होते. ते 'जंगलयुक्त' आणि हे 'जंगलमुक्त' इतकाच काय तो फरक आहे. रोजगारासाठी बिहारी माणूस देशभर भटकतो आहे. देशातील कोणत्याही प्रकारच्या आकडेवारीनुसार बिहारची तुलना राष्ट्रीय पातळीवर किंवा इतर राज्यांशी केली, तर सर्वात शेवटचा क्रमांक बिहारचा लागतो. बिहारचे चालू वर्षाचे दरडोई उत्पन्न केवळ ६६ हजार ८२८ रुपये आहे. (संदर्भ - बिहारचा आर्थिक पाहणी अहवाल २०२५) देशाचे सरासरी दरडोई उत्पन्न दोन लाख ४८ हजार १६० रुपये आहे. महाराष्ट्राचे दरडोई उत्पन्न २ लाख ५२ हजार ३५८ रुपये आहे. दरडोई उत्पन्नामध्ये आणि दारिद्र्यरेषेखालील लोकसंख्येमध्ये बिहारचा क्रमांक सर्व राज्यांच्या तुलनेत खालून पहिला लागतो. २०११ च्या जनगणनेनुसार बिहारची लोकसंख्या १० कोटी ४० लाख असली, तरी ती आता १३ कोटींवर पोहोचली आहे. दोनच वर्षांपूर्वी बिहार सरकारने जातनिहाय जनगणना केली तेव्हा राज्याची लोकसंख्या १३ कोटींवर पोहोचली असल्याचे स्पष्ट झाले आहे. यापैकी एक तृतीयांश म्हणजेच ३३ टक्के लोकसंख्या दारिद्र्यरेषेखाली जगते. अर्थशास्त्रीय निकषांनुसार तपासून पाहिले, तर बिहार कोणत्याही निकषांत पुढारलेला नाही. १९९९ मध्ये लोकसभा निवडणुकीवेळी मी बिहारचा दौरा केला होता. त्यावेळी ९४ टक्के लोक ग्रामीण भागात राहत होते आणि दरडोई उत्पन्न केवळ ३८ हजार रुपये होते. देशाचे दरडोई सरासरी उत्पन्न २ लाख ४८ हजार १६० रुपये असताना बिहार आता केवळ ६८ हजार रुपये दरडोई उत्पन्न नोंदवीत आहे. यासाठी राज्य सरकारकडून राज्याला विशेष दर्जा द्यावा आणि मदत करावी, अशी मागणी केंद्राकडे वारंवार केली जाते. ती करण्याची गरजही आहे. बिहारचे राजकारण अत्यंत अटीतटीचे होते. संघर्ष जोरात होतो. बिहार आणि देशाच्या विकासाच्या मोठ्या मोठ्या गोष्टी बोलल्या जातात. प्रत्यक्षात तसे काही होताना दिसत नाही. बिहारने अनेक मोठे समाजवादी नेते देशाला दिले. त्यांनी देशाचे नेतृत्व केले; पण बिहारचा विकास मात्र केला नाही. अलीकडच्या काळात या संघर्षाचे रूपांतर हिंसेत होत नाही, एवढीच जमेची बाजू असली, तरी त्याचे सर्व श्रेय निवडणूक आयोगाला जाते. अन्यथा बिहारमध्ये निवडणुकीतील हिंसाचार हा एक मोठा राष्ट्रीय प्रश्न म्हणून चर्चेत असे. आता होत असलेली विधानसभेची निवडणूक ही प्रथमच दोनच टप्प्यांत होत आहे. राज्यात कायदा सुव्यवस्था आणि शांतता असल्याने ही सुधारणा झाल्याचे मानले जाते. बिहारच्या जनतेने अनेक प्रकारची स्थित्यंतरे पाहिलेली आहेत. धार्मिक उन्माद, जातीय दंगे, दलितांवरील अत्याचार, जमीनदार आणि शेतमजूर यांचे रक्तरंजित संघर्ष, सामुदायिक हत्याकांड अशा घटना रोखण्यात सरकारला यश आले आहे. झारखंडमध्ये मोठ्या प्रमाणात खनिज संपत्ती आहे; पण त्या खनिज संपत्तीचा वापर केंद्रीय धोरणामुळे इतर राज्यांमध्येच करून घेण्यात आला. खनिज संपत्तीच्या वाहतुकीसाठी केंद्र सरकार अनुदान देत राहिले. हे धोरण १९५२ ते १९९३ दरम्यान चालू होते. परिणामी, बिहारऐवजी (झारखंड) इतर राज्यांत उद्योग वाढले आणि झारखंडची खनिज संपत्ती लुटून नेली गेली.बिहारचा चालू आर्थिक वर्षाचा अर्थसंकल्प ३ मार्च २०२५ रोजी उपमुख्यमंत्री तथा अर्थमंत्री सम्राट चौधरी यांनी मांडला. त्यानुसार ३ लाख १७ हजार कोटींचा हा अर्थसंकल्प आहे. गेल्या वर्षीच्या तुलनेमध्ये त्यात ३८ हजार कोटी रुपयांची वाढ झाली आहे. आर्थिक पाहणी अहवालानुसार बिहारच्या उत्पन्नामध्ये वाढ झाली असली, तर ती फारच किरकोळ आहे. होऊ घातलेल्या निवडणुकींसाठी ज्या काही घोषणा बिहार सरकार आणि राज्य सरकारने केल्या आहेत, त्यांची पूर्तता करण्याचे आव्हान आहे. अशा या मागास राज्याचे सर्वच राजकीय नेते भाषा मात्र मोठी तात्विक करतात. गेली ३५ वर्षे 'या' किंवा 'त्या' जनता दलाचे सरकार सत्तेवर आहे. लोकनायक जयप्रकाश नारायण यांच्या संपूर्ण क्रांती आंदोलनातून पुढे आलेले नेतृत्व म्हणून लालूप्रसाद यादव, रामविलास पासवान, नितीश कुमार यांचा उल्लेख केला जातो; पण या नेतृत्वाने बिहारची घडी बसवण्यात पुरेसे योगदान दिले नाही. नितीश कुमार राज्यात किंवा केंद्रात नेहमी सत्तेवर होते. काँग्रेसची जेव्हा राज्यात किंवा केंद्रात सत्ता होती, त्यावेळी बिहारच्या विकासाचे स्पष्ट धोरण कधीच घेतले गेले नाही. १९९० पर्यंत काँग्रेस सत्तेत होती. (जनता राजवटीची तीन वर्षे वगळता) तेव्हा उच्चवर्णीय असलेले नेते सत्तेवर होते. मधल्या काळामध्ये यादव-दलित आणि मुस्लीम अशी युती झाली आणि लालूप्रसाद यांनी सत्ता भोगली; पण त्यांनी बिहार काही दुरुस्त केला नाही. यादव यांच्या कडील सत्तेचा लंबक अतिमागास, ओबीसी आणि मुस्लीम यांच्याकडे वळला. पर्यायाने नितीश कुमार यांना वीस वर्षे मिळाली. त्यांना मोठी संधी मिळाली; पण राज्य गरीबच राहिले. केंद्रीय सत्तेमुळे भारतीय जनता पक्षाकडे जनता आशेने पाहते. लालूप्रसाद आणि तेजस्वी यादव नवे काय करणार, याचीही उत्सुकता दिसते. विधानसभा निवडणुकीतून मोठा राजकीय बदल होईल, असे काही दिसत नाही.



## लक्ष्यभेद

जयदीप सोनखासकर
9890508017

### भक्षक



ज्यांच्या हाती सुरक्षा
तेच भक्षक बनतात
आता कोण करेल रक्षा
सोकारी राक्षस बनतात

महिला डॉक्टरचे शोषण
केले सत्तेतील हैवानाने
बघा तिने पत्करले मरण
पाहिले आहे साऱ्या जगाने

ही आत्महत्या नसून आहे
हत्या राजकीय व्यवस्थेची
दररोज गिधाडे फिरत आहे
भक्ष्य गिळण्यास विकृतीची

## ॥ अभंगवाणी ॥

- प्रवीण हटकर
८०५५२१३२८१

नाते जोडायला
नको बँक खाते ।
हवे मन खाते
माझ्याकडे ॥

हृदयाचे नाते
अतूट असते ।
मोजून नसते
ठेवायला ॥

मन ताळेबंद
सदा जुळलेले ।
ना उसवलेले
असे कधी ॥

हृदयाची व्याप्ती
अमर्याद आहे ।
मर्यादित आहे
सरहदी ॥



सप्तरंग


डॉ. विनय व. दांदळे
मो. ९८२२२ ३१७६९

# ' अपूर्णतेतली परिपूर्ण ती '....

**ती... एखाद्या संध्याकाळीसारखी**
**न संपणारी, आणि न सुरू होणारी...**
**कधी धूसर, कधी उजळ पण नेहमीच मोहक.**
**शब्द तिच्याभोवती फिरतात, पण तिच्या शांततेला स्पर्शही करू शकत नाहीत.**
**ती म्हणजे अस्तित्वाचा श्वास अनाम, अनोळखी, पण अविस्मरणीय...**

माझ्यासाठी ती अजूनही एक कोडंच आहे... न उलगडलेलं, न उलगडावं असं....

ती आहे एक शांत लय शब्दांपलीकडचं संगीत. ती दिसते, पण तिचं अस्तित्व फक्त डोळ्यांनी नाही, मनाने जाणवतं. ती चालते, पण चालण्यामध्येही एक न बोलता येणारा ताल आहे जणू निसर्गाने तिच्या पावलांना वाऱ्याच्या झुळकीचं वंदन अर्पिलंय. ती चंद्रासारखी आहे... पण नाही, ती चंद्र नाही. कारण चंद्राला दर पंधरवड्याला पूर्ण होण्याची, उजळण्याची मनिषा असते; तिच्या अस्तित्वाला मात्र कोणत्याही पूर्णतेची गरज नाही. ती स्वतःमध्येच एक परिपूर्ण वर्तुळ आहे, एक अवघडलेली पण तरीही संतुलित अपूर्णता आहे. ती त्या अंधाराची सखी आहे, ज्याच्याशिवाय चंद्राच्या तेजालाही अर्थ नसतो. तिच्या डोळ्यांत काजळ नाही, पण तरीही तिच्या नजरेत संपूर्ण विश्वाचं प्रतिबिंब उमटलंय. त्या नजरेत थांबलेली एक नीरव गूढता आहे, जणू काळाने स्वतः क्षणभर विश्रांती घेतलीयं. तिचं कपाळ रिकामं असतं, पण त्यात ब्रह्मांडाची शांती आहे. तिच्या ओठांवर कुठलाही रंग नाही, पण तिचं हसू फुलांच्या सुगंधासारखं पसरतं, नजरेला थांबवतं, मनाला गोंजारतं. ती आरशासमोर उभी राहत नाही. कारण आरशालाही तिच्या प्रतिमेत स्वतःला हरवायची भीती वाटते. ती स्वतः ला सजवत नाही, कारण ती आधीच सजलेली आहे तिच्या साधेपणाच्या शालीनतेनं. तिच्या केसांमध्ये गुंतलेले वारं जणू तिच्या मोकळेपणाचं प्रतीक आहे. तिच्या चालण्यातला झोका म्हणजे निसर्गाच्या लयीत वाहणारं जीवन. ती समाजाने ठरवून दिलेल्या सौंदर्याच्या चौकटीत बसत नाही, कारण ती चौकटच तिच्या अस्तित्वासाठी खूप अरुंद आहे. तिचं सौंदर्य हे सजावटीत नाही, तर प्रामाणिकपणात आहे. ती स्वतःशी जशी आहे, तशीच दिसते. तिच्या चेहऱ्यावर भावभावनांची फुले उमटतात, आणि त्या फुलांना कोणत्याही रंगाची गरज भासत नाही. तिचं सौंदर्य त्या क्षणांच्या प्रकाशात आहे, जिथे ती स्वतःला विसरते आणि दुसऱ्याला जाणते. जर तिने कधी केशसंभार सावरला, जर तिने डोळ्यांवर काजळाचा अर्धचंद्र उतरविला, तर हे जग नक्कीच थबकेल. वेडं होईल . तिच्या एका हसण्यात हजारो नात्यांची



कोमलता दडलेली आहे, आणि तिच्या एका नजरेत काळही स्थिरावतो. तिच्या उपस्थितीतच ऋतूंचं चक्र विसरून जातं जणू पावसाचं पाणी तिच्या पावलांच्या ठशात साठून राहतं, आणि वारा तिच्या सुगंधाचा दूत बनतो. ती म्हणजे शांततेचा अर्थ आहे. ती म्हणजे स्वातंत्र्याचं रूप आहे. ती म्हणजे निसर्गाच्या असंख्य रंगांत मिसळलेली एक निष्पाप ओढ आहे. तिचं अस्तित्व शब्दांनी व्यक्त होत नाही ते अनुभवावं लागतं. तिच्यात काहीतरी असं आहे, जे नजरेच्या पलीकडे, पण मनाच्या अगदी जवळ आहे. ती म्हणजे 'असणं' या शब्दाचा अर्थ आहे काही सिद्ध करायचं नाही, काही दाखवायचं नाही. ती आहे म्हणूनच जग थोडं अधिक सुंदर वाटतं. तिच्या साधेपणात लपलेलं गूढ हेच तिचे अलंकार आहेत. ती जेव्हा शांत उभी असते, तेव्हा तिच्या सभोवतीचा सारा गोंगाट थांबतो. जणू वेळेचं चक्र क्षणभर तिच्या पायाशी विसावलंय. ती म्हणजे अपूर्णतेतून उमललेली परिपूर्णता. ती म्हणजे गंधाशिवाय सुगंध, स्पर्शाशिवाय ऊब, आणि शब्दांशिवाय कविता. तिच्यातील शांतता ही नुसती नीरव नाही, ती ऐकणाऱ्याच्या अंतःकरणाशी संवाद साधते. म्हणूनच ती कोडं आहे आणि ते कोडं उलगडू नये, अशीच माझी इच्छा आहे. कारण काही गोष्टी उलगडल्या की त्यांची जादू हरवते... आणि ती तर जादूच आहे नजरेतून न ओळखता, पण मनात कायम राहणारी... ती आहे तशीच पूर्ण....

ती आहे जशी वाऱ्याची चाहूल, पावसाचा पहिला थेंब, जशी अपूर्ण कवितेतील संपूर्ण अर्थछटा. ती उलगडली तर गूढ हरवेल, म्हणून ती कोडंच राहू दे कारण काही सौंदर्य उलगडण्यात नाही, तर अनुभवण्यात असतं...



वास्तव

प्रा.पंढरी पाठे
यवतमाळ ९२३६३६७१९

# 'हा लढा माझा नाही तो शेतकऱ्यांच्या अस्तित्वाचा आहे!'




दिनांक २६ ऑक्टोबर महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री आणि शिवसेना शिंदे गटाचे प्रमुख मा.एकनाथ भाई शिंदे यांचा यवतमाळ दौरा होता.पक्षबांधणी आणि आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर जिल्ह्याचे पालकमंत्री ना.संजय राठोड यांच्या नेतृत्वात प्रशिक्षण शिबिर आयोजित करण्यात आले होते. पण अशा वेळी,जेव्हा सत्ताधारी पक्षाचा एखादा मोठा नेता जिल्ह्यात येतो,तेव्हा शेतकरी चळवळीत कार्यरत कार्यकर्त्यांना पोलिसांकडून "डिटेन" करण्याचा प्रकार घडतो हे काही नवीन नाही. २०१४ ते २०२५ या काळात हा प्रकार "कॉमन" झाला आहे. शेतकऱ्यांचा आवाज दाबण्यासाठी सत्तेचा दबाव पोलीस यंत्रणेकडे नेहमीच टाकला जातो हे वास्तव आहे. प्रा.पंढरी पाठे,कॉ.सचिन मनवर,कृष्णा पुसनाके आणि अनेक शेतकरी चळवळीतील कार्यकर्त्यांनी याचा अनुभव घेतलाच आहे.पण २६ ऑक्टोबरचा प्रसंग वेगळा ठरला."माझा आवाज हा शेतकऱ्यांच्या न्यायासाठी आहे"एकनाथ शिंदे यांच्या दौऱ्याच्या पूर्वसंध्येला मी सोशल मीडियावर स्पष्ट सांगितलं होतं "जर माझा आवाज दाबण्याचा प्रयत्न झाला, तर मी हा आवाज अधिक तीव्र करेन." सकाळ उगवली.मी काही सहकाऱ्यांशी बोललो सचिन मनवर,सदा पाटील,कृष्णा पुसनाके.दहा-अकराच्या सुमारास मी अँग्लो हिंदी चौकात चहा घेत होतो. तेव्हाच अवधूतवाडी पोलिस स्टेशनचे सचिन घुगे यांचा फोन आला.मी त्यांना हलक्याफुलक्या शब्दात उत्तर दिलं,आणि तिथून उमरसऱ्याच्या दिशेने निघालो. तीन फोटोंच्या चौकात डॉ. बाबासाहेब आंबेडकर,महात्मा ज्योतिबा फुले आणि छत्रपती शाहू महाराज यांच्या प्रतिमांजवळ थोडा वेळ थांबलो,काही स्थानिक नागरिकांशी शेतीविषयक चर्चा केली.मग स्मशानभूमी परिसरात निवांत बसलो आणि सरकारच्या धोरणांविरोधात एक भावनिक,तीव्र व्हिडिओ संदेश रेकॉर्ड केला. दरम्यान,स्थानिक गुन्हे शाखा संपूर्ण शहरभर माझ्या शोधात होती.पण मी कुठेच सापडत नव्हतो.दुपारी तीनच्या सुमारास मी माझ्या निवासस्थानी टिळकवाडी,बापट चौक परतलो. मनात एकच विचार "एकनाथ शिंदे यांना भेटलं पाहिजे,शेतकऱ्यांच्या समस्या सांगितल्या पाहिजेत."पण पोलिसांचा ताफा आधीच अलर्ट होता.

"हा लढा माझा नाही"सायंकाळी चारच्या सुमारास कृष्णा पुसनाके यांचा फोन आला.मी म्हणालो, "भाऊ, मला संविधान चौकात सोडा,मी रस्त्यावर बसून आंदोलन करतो." त्यांनी मान्य केलं.मी खाली उतरलो,बसस्टँडकडे निघालो. पण मला कल्पना नव्हती पोलिस आधीच मागावर होते.मी जसा त्यांच्या स्कुटीवर बसलो,तसा बोलेरो गाड्यांचा ताफा माझ्या मागे धावला.नरेश मेडिकलजवळ शिवनेरी हॉटेलसमोर त्यांनी मला पकडलं. सहा ते आठ मिनिटांचा तो काळ पोलिसांशी तीव्र वाद,शब्दांची टक्कर,आणि माझ्या अंतःकरणात शेतकऱ्यांच्या वेदनेचा स्फोट. मी म्हणत होतो "हा लढा माझा नाही.हा उद्याच्या अन्नसुरक्षेचा लढा आहे,शेतकरी,मच्छीमार, मेंढपाळ,दिव्यांग यांच्या न्यायाचा लढा आहे!" पण त्यांना आदेश होते "त्याला हेडक्वार्टरला आणा." मी म्हणालो, "मला एकनाथ शिंदे यांना भेटायचं आहे.'ते म्हणाले, "ते शक्य नाही, प्रोटोकॉल आहे." वाद वाढत गेला.शेवटी त्यांनी बळजबरीने बोलेरोमध्ये बसवलं. पोलिस मुख्यालयात नेलं. "हा प्रामाणिकपणाचा लढा आहे" तेथे मी शांतपणे बोललो "आज तुम्हाला त्रास झाला असेल,पण उद्याच्या काळात हाच प्रामाणिकपणाचा लढा समाजाला जागवेल." त्यावर एक पोलिस अधिकारी म्हणाला,"आजकाल एवढी इमानदारी कुणाकडे उरली नाही. तुम्ही ती जपता,हे मोठं आहे." त्यांच्या शब्दांनी मन भारावून गेलं. दरम्यान,एका पोलिसाने शिवसेनेच्या कार्यकर्त्याला फोन केला "अपडेट काय?" उत्तर आलं "एकनाथ शिंदे येणार नाहीत." हे ऐकताच मी म्हणालो "हीच शेतकरी चळवळीची ताकद आहे. म्हणून दौरा रद्द झाला."पोलिसांना विश्वास बसला नाही.पण जेव्हा मी थोडं राजकीय विश्लेषण सांगितलं,तेव्हा तेही मान्य करत होते "खरंय हे." त्या २२ ते २४ मिनिटांच्या तणावात,वादात,निर्धारात आणि संवादात मी एक गोष्ट शिकून घेतली "शेतकऱ्यांचा लढा हा कधीच वैयक्तिक नसतो. तो सत्य,प्रामाणिकपणा आणि लोकशाहीच्या श्वासाशी जोडलेला असतो." त्या दिवसाने मला एक गोष्ट शिकवली सरकारची सत्ता मोठी असते,पण शेतकऱ्यांच्या आत्म्याची ताकद त्याहून मोठी असते.



दिन विशेष

डॉ. राजेंद्र बगाटे
९९६०१०३५८२

# ॲनिमेशन : कल्पनाशक्ती, तंत्रज्ञान आणि समाजाचा बदलता चेहरा

२८ ऑक्टोबर हा दिवस जगभरात 'आंतरराष्ट्रीय ॲनिमेशन दिन' म्हणून साजरा केला जातो. या दिवसाचे मूळ १८९२ सालच्या फ्रान्समध्ये दडलेले आहे, जेव्हा एमिल रेनॉ यांनी पॅरिसमधील 'म्युझियम ग्रेव्हिन' येथे ' ' हा जगातील पहिला ॲनिमेटेड फिल्म शो सादर केला. त्या घटनेने मानवाच्या कल्पनाशक्तीला आणि दृश्य तंत्रज्ञानाला एक नवीन दिशा दिली. त्या स्मरणार्थ युनेस्कोच्या आंतरराष्ट्रीय ॲनिमेशन संघटनेने २८ ऑक्टोबर हा दिवस ॲनिमेशनचा जागतिक उत्सव म्हणून मान्यता दिली. आज हा दिवस केवळ कलाविष्काराचा सन्मान नाही, तर मानवी सर्जनशीलता, सामाजिक परिवर्तन, आणि सांस्कृतिक संवादाचे प्रतीक बनला आहे. ॲनिमेशन म्हणजे केवळ बालकांचे मनोरंजन नव्हे; ते एक सांस्कृतिक, शैक्षणिक आणि समाजशास्त्रीय माध्यम आहे. चलतचित्रांच्या माध्यमातून कल्पनांना जीवन देणारे हे कला-साहित्य मानवी मनोविज्ञान, सामाजिक मूल्ये आणि सांस्कृतिक अभिव्यक्ती यांचे एकत्रित रूप आहे. समाजशास्त्रीय दृष्टीने पाहता, ॲनिमेशन हे केवळ दृश्य कलारूप नसून, समाजातील विचारप्रवाह, सत्तासंबंध, लिंगभेद, वर्गभेद आणि सांस्कृतिक ओळख यांचे प्रतिबिंब आहे. ॲनिमेशनचा इतिहास हा मानवाच्या कल्पनाशक्तीच्या प्रगतीचा इतिहास आहे.

गुहेतील चित्रांपासून ते डिजिटल ३ आणि कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित दृश्यांपर्यंतची ही उत्क्रांती म्हणजे सर्जनशीलतेचा प्रवास आहे. समाजशास्त्रज्ञ मॉरिस हाल्बवाच्स यांनी मांडलेल्या 'सामूहिक स्मृती' या संकल्पनेनुसार, प्रत्येक समाज आपल्या इतिहास आणि संस्कृतीचे संरक्षण आठवणींमधून करतो. ॲनिमेशन ही त्या स्मृती जिवंत ठेवण्याची आधुनिक पद्धत आहे. पौराणिक कथा, लोककथा, ऐतिहासिक व्यक्तिमत्त्वे आणि सामाजिक विचार हे सर्व आज ॲनिमेशनच्या माध्यमातून नव्या पिढीकडे पोहोचत आहेत. भारतातील ॲनिमेशनचा प्रवास स्वतंत्र आणि बहुआयामी आहे. १९५६ साली माहिती व प्रसारण मंत्रालयाच्या फिल्म विभागाने ' ' हा पहिला भारतीय ॲनिमेशन चित्रपट प्रदर्शित केला. त्यानंतर राम मोहन, भिमसेन, जी.के. गोखले, कैलाश रेखी यांनी भारतीय ॲनिमेशनला जागतिक ओळख दिली. 'रामायण', 'हनुमान', 'पंचतंत्र कथा', 'छोटा भीम', 'मोटू पतलू', 'शक्तिमान', 'आर्यन' यांसारख्या ॲनिमेशन मालिका भारतीय संस्कृती, नैतिकता आणि सामाजिक विचारांना दृश्यरूप देतात. या कलाकृतींनी ग्रामीण आणि नागरी समाजातील



मुलांपर्यंत सांस्कृतिक वारसा पोहोचवण्याचे कार्य केले आहे. समाजशास्त्रीयदृष्ट्या ॲनिमेशन ही सामाजिकरणाची प्रक्रिया घडविणारे माध्यम आहे. एमिल दुर्खीम यांच्या मते, समाजातील प्रत्येक संस्था सामाजिक ऐक्य वाढवते. ॲनिमेशनमधून मुलां मध्ये नैतिक मूल्ये, सहानुभूती, प्रामाणिकपणा, सहकार्य आणि पर्यावरणाबद्दलची जाणीव विकसित होते. उदा. 'पंचतंत्र कथा' अथवा 'जातक कथा' यांवर आधारित ॲनिमेशनमधून जीवनमूल्ये अत्यंत सोप्या व रंजक पद्धतीने सांगितली जातात. ॲनिमेशनमधील दृश्य आणि भावनिक सादरीकरणामुळे बालकांच्या मनावर त्या मूल्यांचा दीर्घकालीन प्रभाव पडतो. परंतु ॲनिमेशन केवळ मूल्यसंस्कारच रुजवत नाही; ते समाजातील असमानता, सत्तासंबंध आणि विचारसरणी देखील प्रतिबिंबित करते. अनेक लोकप्रिय ॲनिमेशन चित्रपटांमध्ये पाश्चात्त्य विचारसरणी, पुरुषप्रधानता आणि उपभोगतावादी जीवनशैलीचे दर्शन घडते. पियरे बोर्द्यू यांच्या 'सांस्कृतिक भांडवल' या संकल्पनेनुसार, समाजातील कलामाध्यमे ही सत्ता आणि वर्गसंघर्षाशी निगडित असतात. ॲनिमेशनही त्याला अपवाद नाही. डिस्ने, पिक्सार, ड्रीमवर्क्स यांसारख्या कंपन्यांनी जगभरात सांस्कृतिक कल्पना पसरवल्या पण त्या प्रामुख्याने पाश्चात्त्य मूल्यांवर आधारित आहेत. परिणामी, स्थानिक संस्कृती आणि परंपरा हळूहळू बाजूला पडतात. तथापि, भारतीय ॲनिमेशनने या प्रवाहाला वेगळी दिशा दिली आहे. भारतीय निर्मात्यांनी लोककथांवर, आणि भारतीय नैतिक तत्त्वांवर आधारित कथा मांडल्या. 'छोटा भीम' सारख्या कथांमध्ये भारतीय सामाजिक मूल्ये, कुटुंबव्यवस्था आणि नैतिकतेचे दर्शन घडते. अशा प्रकारे ॲनिमेशन समाजातील संस्कृतीचा प्रसार आणि सांस्कृतिक ओळख जपण्याचे कार्य करते. समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून पाहता, ॲनिमेशन हे एक सांस्कृतिक संवादाचे साधन आहे. समाजातील वेगवेगळ्या गटांना एकत्र आणणारे, त्यांच्या कथा आणि भावना मांडणारे हे माध्यम विविधता टिकवून ठेवते. उदा. आदिवासी जीवन, पर्यावरणीय प्रश्न, महिला सक्षमीकरण, आणि सामाजिक न्याय या विषयांवरील ॲनिमेशन चित्रपटांद्वारे सामाजिक जाणीवा अधिक प्रभावीपणे पोहोचतात. ॲडोर्नो आणि हॉर्कहायमर यांनी ' ' ही संकल्पना मांडताना दाखवले की, आधुनिक माध्यमे उपभोगवादी संस्कृती वाढवतात. ॲनिमेशन उद्योग याच प्रवृत्तीचे आधुनिक रूप आहे. लोकप्रिय पात्रांवर आधारित खेळणी, कपडे, खाद्यपदार्थ, आणि मोबाइल गेम्स यांच्या विक्रीमुळे ॲनिमेशन हे भांडवलशाही संस्कृतीचे प्रमुख साधन बनले आहे. या प्रक्रियेत बालकांचे मन उपभोगाच्या संस्कृतीकडे आकर्षित होते. परंतु त्याचबरोबर शिक्षण, आरोग्य आणि सामाजिक संदेशांसाठी ॲनिमेशनचा उपयोग केल्यास ते परिवर्तनाचे सामर्थ्यवान माध्यम ठरते. सध्या शैक्षणिक ॲनिमेशन ही संकल्पना अत्यंत लोकप्रिय झाली आहे. 'एडूटेनमेंट' या पद्धतीद्वारे विज्ञान, इतिहास, गणित आणि सामाजिक शास्त्रे यांची समज विद्यार्थ्यांना सोप्या, दृश्यप्रधान आणि रंजक स्वरूपात करून देण्यात येते. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी हे विशेषतः उपयुक्त ठरते. समाजातील ज्ञानाचे लोकशाहीकरण घडविण्याचे कार्य ॲनिमेशन प्रभावीपणे करत आहे. डिजिटल युगात ॲनिमेशनचे रूप अत्यंत व्यापक झाले आहे. ३, आणि यांसारख्या तंत्रज्ञानामुळे ॲनिमेशन आता कल्पनेच्या मर्यादा ओलांडून वास्तवाशी मिसळत आहे. , , , सारख्या प्लॅटफॉर्म्सनी या कलारूपाला जागतिक बाजारपेठ उपलब्ध करून दिली आहे. भारतीय निर्माते जागतिक दर्जाचे ॲनिमेशन तयार करत आहेत आणि ' ' अंतर्गत ॲनिमेशन, व्हिज्युअल इफेक्ट्स, गेमिंग आणि कॉमिक्स क्षेत्रात मोठ्या रोजगारनिर्मितीच्या संधी निर्माण होत आहेत. च्या अहवालानुसार, २०३० पर्यंत या क्षेत्रात सुमारे २० लाख नोकऱ्या निर्माण होऊ शकतात. तथापि, ॲनिमेशनचा समाजावर होणारा परिणाम सकारात्मक आणि नकारात्मक अशा दोन्ही बाजूंनी पाहिला पाहिजे. हिंसा, लिंगभेद, अति-उपभोग आणि अवास्तव कल्पना दाखवणाऱ्या ॲनिमेशनमुळे बालकांच्या मनावर नकारात्मक परिणाम होऊ शकतात. त्यामुळे माध्यम साक्षरता वाढवणे अत्यंत आवश्यक आहे, ज्यायोगे प्रेक्षक ॲनिमेशनमधील संदेशांची चिकित्सक दृष्टीने व्याख्या करू शकतील. समाजशास्त्राच्या परिप्रेक्ष्यात ॲनिमेशन हे 'आरसा' आहे, जो समाजातील वास्तव दाखवतो, आणि कधी कधी ते वास्तव बदलण्याची प्रेरणाही देतो. सामाजिक असमानता, लिंगभेद, पर्यावरणीय संकट, युद्ध, शांती, आणि मानवतेचे प्रश्न हे सर्व ॲनिमेशनच्या माध्यमातून संवेदनशील आणि प्रभावीपणे मांडता येतात. त्यामुळे ॲनिमेशन ही केवळ कलात्मक अभिव्यक्ती नव्हे, तर सामाजिक परिवर्तनाची शक्ती आहे. २८ ऑक्टोबरचा 'आंतरराष्ट्रीय ॲनिमेशन दिन' आपल्याला आठवण करून देतो की मानवी कल्पनाशक्ती अमर्याद आहे. ती समाजातील बंधने मोडून नवीन विचार, नवीन संस्कृती आणि नवीन दृष्टिकोन निर्माण करू शकते. ॲनिमेशन ही केवळ कला नाही, ती कल्पनाशक्तीच्या समाजशास्त्राचे दृश्य रूप आहे, जिथे तंत्रज्ञान आणि मानवी भावना एकत्र येतात, आणि जिथे प्रत्येक रंग, प्रत्येक चळवळ, प्रत्येक पात्र समाजाच्या आरशात नवीन प्रतिबिंब निर्माण करते. आजच्या डिजिटल जगात, जिथे माहिती आणि प्रतिमा सर्वत्र उपलब्ध आहेत, तिथे ॲनिमेशन समाजाला विचार करण्यास, संवेदनशील होण्यास आणि बदल घडविण्यास प्रवृत्त करते. म्हणूनच ॲनिमेशनकडे केवळ मनोरंजन म्हणून न पाहता, ते मानवी कल्पनाशक्तीचे सामाजिक माध्यम म्हणून ओळखले पाहिजे. हाच या दिवसाचा खरा संदेश की ॲनिमेशन म्हणजे मानवी विचारांचा, संस्कृतीचा आणि समाजाचा अखंड प्रवास आहे.

# 'बिग बॉस'च्या घरात झाले डबल एलिमिनेशन



प्रेक्षक 'बिग बॉस १९' च्या 'वीकेंड का वार' ची आतुरतेने वाट पाहत असतात. यावेळी प्रेक्षकांना मोठा धक्का बसला आहे. कारण या आठवड्यात 'बिग बॉस'च्या घरातून दोन स्पर्धक एकत्र बाहेर पडले आहेत. बसीर अली आणि नेहल चुडासमा यांना अचानक डबल एव्हिक्शनमध्ये बाहेर काढण्यात आले. या डबल एव्हिक्शनने सर्वांनाच धक्का दिला. चाहते बसीरला बाहेर पडलेले पाहून चकीत झाले आहेत.

बिग बॉस १९ च्या वीकेंड का वारच्या नुकत्याच पार पडलेल्या भागात एक नाही तर दोन स्पर्धकांना बाहेर काढण्यात आले आहे. सर्वात कमी मते मिळालेल्या दोन स्पर्धकांना बाहेर काढले गेले आहे, जे या आठवड्यातील दुसरे डबल एलिमिनेशन होते. नेहलला बाहेर काढण्याची अपेक्षा असताना, घरात त्याची मजबूत उपस्थिती पाहता बसीरच्या बाहेर पडल्याने अनेक प्रेक्षकांना आश्चर्य वाटले. गौरव, बसीर, प्रणीत आणि नेहल हे चार स्पर्धक नॉमिनेटेड होते. शेवटी, गौरव आणि प्रणीत बचावले, तर इतर दोघे निघून गेले.


नेहलचा घरातील प्रवास चढ-उतारांनी भरलेला आहे, अनेकदा सहकारी स्पर्धकांकडून आणि स्वतः सलमान खानकडूनही तिच्यावर टीका झाली आहे. एका भागात, सूत्रसंचालकाने अमाल मलिकला सांगितले की नेहलने गेममध्ये त्याच्याशी छेडछाड केली आहे, या कमेंटमुळे चाहत्यांमध्ये चर्चा सुरू झाली. पूर्वी अशा अफवा होत्या की बाहेर काढलेला स्पर्धक सिक्रेट रूममध्ये जाऊ शकतो, परंतु हा ट्विस्ट अखेर रद्द करण्यात आला. नंतर, निर्मात्यांनी पुष्टी केली की बसीर आणि नेहल दोघेही स्पर्धेतून कायमचे बाहेर पडले आहेत. मिका सिंग आणि सोनाक्षी सिन्हा वीकेंड का वार एपिसोडमध्ये पाहुणे म्हणून दिसले. याच्या उपस्थितीमुले प्रेक्षकांचं आणखी मनोरंजन झालं.

## अभिनेत्री तेजस्विनी लोणारीने गुपचूप उरकला साखरपुडा



'बिग बॉस' मराठी सीझन चार गाजवणारी प्रसिद्ध मराठी अभिनेत्री तेजस्विनी लोणारी हिने नुकतीच चाहत्यांना आनंदाची बातमी दिली आहे. अभिनेत्रीने गुपचूप साखरपुडा करून चाहत्यांना चकीत केले आहे. तेजस्विनी प्रसिद्ध शिवसेना नेत्याची सून होणार आहे. तसेच अभिनेत्री नक्की कोणाची सून होणार आहे हे आपण जाणून घेणार आहोत.दरम्यान अभिनेत्री तेजस्विनीच्या साखरपुड्याचे फोटो आणि व्हिडीओ आता सोशल मीडियावर व्हायरल होत आहेत. तेजस्विनीने दिलेल्या या आनंदाच्या बातमीने चाहते तिचे अभिनंदन करत आहेत. अभिनेत्री तेजस्विनी लोणारीबद्दल बोलायचं झालं तर, अभिनेत्रीने मराठी बिग बॉसचा चौथा सीझन गाजवला होता. त्या सीझनमध्ये तिला हाताला झालेल्या दुखापतीमुळे नाईलाजास्तव एक्झिट घ्यावी लागली होती. त्यानंतर ती 'तुझेच मी गीत गात आहे' या स्टार प्रवाहच्या मालिकेत ती दिसली होती. अभिनेत्री प्रिया मराठेला तिने रिप्लेस केलं होतं. मालिकेतील खलनायिकेचं पात्र तिनं उत्तमरित्या साकारले होते. अभिनेत्रीने अनेक मराठी चित्रपटांमध्येही काम केलं आहे. तसेच ते चित्रपट हिट झाले आहेत.तसेच, तेजस्विनी लग्न कधी करणार याकडे चाहत्यांचं लक्ष होताच. अनेकदा तिला लग्नाविषयी प्रश्न देखील विचारण्यात येत होते मात्र अभिनेत्रीने कधीच तिच्या लग्नाविषयी भाष्य केले नाही आणि ते गुपित ठेवले. अखेर तिने आता साखरपुडा करून चाहत्यांना आनंदाची बातमी दिली आहे.

## हिरव्यागार मिरच्यांपासून बनवा चटपटीत झणझणीत लोणचे




जेवणाच्या ताटात जर लोणचं असेल तर चार घास जास्त जातात. आंबट गोड तिखट चवीचे लोणचं खायला सगळ्यांचं खूप जास्त आवडत. लोणचं पाहिल्यानंतर अनेकांच्या तोंडाला पाणी सुटते. आंब्याचे लोणचं, गोड लोणचं, लिंबाचं लोणचं इत्यादी अनेक वेगवेगळ्या प्रकारची लोणची बनवली जातात. पण कायमच आंबट लोणचं खाऊन कंटाळा आल्यानंतर काहींना काही झणझणीत खाण्याची इच्छा होते. अशावेळी तुम्ही हिरव्यागार मिरच्यांपासून ५ मिनिटांमध्ये लोणचं बनवू शकता. जेवणाच्या ताटात मिरचीचं लोणचं असेल तर वरण भात अतिशय सुंदर लागतो. मिरचीच्या लोणच्यामुळे तोंडाची चव वाढते. कायमच बाजारात विकत मिळणारी लोणचं आणण्यापेक्षा घरी बनवलेले लोणचं चवीला अतिशय सुंदर लागते. विकतच्या लोणच्यात आंबटपणा वाढवण्यासाठी व्हिनेगरचा वापर केला जातो. पण आज आम्ही तुम्हाला कोणत्याही विकतच्या पदार्थांचा वापर न करता झणझणीत मिरचीचे लोणचं बनवण्याची सोपी रेसिपी सांगणार आहोत.

**साहित्य:** हिरव्या मिरच्या, जिरं, मोहरी, मेथी दाणे, मोहरीचे तेल, हिंग, काळे मीठ, लाल मिरची,

**कृती:** हिरव्या मिरचीचे झणझणीत लोणचं बनवण्यासाठी सर्वप्रथम, हिरव्या मिरच्या स्वच्छ धुवून घ्या. त्यानंतर मिरच्या पुसून घ्या.कढईमध्ये तेल गरम करून त्यात जिरे, मोहरी आणि मेथी दाणे घालून भाजा. त्यानंतर त्यात चिरून घेतलेल्या हिरव्या मिरच्या घाला. मिरच्यांचा रंग बदलल्यानंतर त्यात मीठ, हिंग, काळे मीठ, लाल मिरची पावडर, हळद, धने पावडर, जिरे पावडर घालून व्यवस्थित मिक्स करून घ्या. त्यानंतर त्यात गुळाची पावडर घाला. एक वाफ आल्यानंतर थोडस पाणी घालून शिजवून घ्या. त्यानंतर गॅस बंद करून घ्या.

तयार आहे सोप्या पद्धतीमध्ये बनवलेले झणझणीत हिरव्या मिरचीचे लोणचं.

## आपणचं तयार करा हे महाशब्दकोडे 200



**संकेत शब्द:–**

**दोन अक्षरी**
कर
कर्म
कला
काग
कारा
कैरी
कोल
गात्र
गाथा
गोत्र
जर
डेरा
धन
धाम
नीर
पंख
पग
बक
बेत
भार
मना
मम
मल
मोद
यम
रग
विना
वेळ
सन
सर
हत
हरा

**तीन अक्षरी**
ओनामा
कातर
कामसू
घागर
गंगोत्री
चबर
चेतक
डमरू
तगर
दमन
धोतरा
नौकरी
पंगत
पारद
प्रकार
भारत
मंदिर
मलम
मसाला
रजक
रदन
लालसा
वरात
वत्सल
विमाता
विवर
वेतन
शहर
सरण
सवड
सहन
सांप्रत

**चार अक्षरी**
अपमान
असंमत
उपवन
कतवार
चारुगात्री
तमोहर
दहिसर
बेलाशक
मनोदय
रखरख
रवरव
ललकार
वखवख
विशारद
सकारण
सडेतोड
सदनिका
सरदार
हकनाक
हरसाल
हलधर
हलाहल

**पाच अक्षरी**
नगरपाल
पहिलवान
रामनवमी
सततधार
सरनौबत
सरमिसळ
साखरभात

**सहा अक्षरी**
ओबडधोबड
कानउघाडणी
गंगावतरण
चरकसंहिता

**आठ अक्षरी**
चार दिवस सासूचे

(उत्तर पुढील अंकी)

### मागील महाशब्दकोडेचे उत्तर



Uday Munde - 8446302691

## 'छावा'चा लवकरच तुटणार रेकॉर्ड, 'कांतारा'चा धुमाकूळ



२०२२ मध्ये प्रदर्शित झालेला ''कांतारा'' ब्लॉकबस्टर ठरला. आता, त्याचा प्रीक्वल, ''कांतारा: अ लेजेंड: चॅप्टर १'', रिलीजच्या पहिल्या दिवसापासूनच बॉक्स ऑफिसवर तुफान गाजवत आहे. प्रेक्षकांनी चित्रपटाला प्रचंड प्रेम दिले आहे. ''थामा'' आणि ''एक दीवाने की दिवानियत'' सारख्या नवीन रिलीजच्या पार्श्वभूमीवरही, ''कांतारा: अ लेजेंड: चॅप्टर १'' ची क्रेझ जबरदस्त पाहायला मिळाली आहे. रिलीजच्या पहिल्या तीन आठवड्यात जोरदार कलेक्शन केल्यानंतर, चित्रपटाने चौथ्या आठवड्यातही मोठा नफा कमावला आहे.

चित्रपटाच्या कलेक्शनबद्दल बोलायचे झाले तर, चित्रपटाने पहिल्या दिवशी ₹६१.८५ कोटी (अंदाजे १.८५ अब्ज) कमाई केली. कर्नाटक, हिंदी भाषिक प्रदेश आणि तेलुगू राज्यांमध्येक चित्रपट पाहण्यासाठी गर्दी झाली होती आणि पहिल्या आठवड्यात त्याने ₹३३७.४ कोटी (अंदाजे ३.३७ अब्ज) कमाई केली. दुसऱ्या आठवड्यात ₹१४७.८५ कोटी (अंदाजे १.४७ अब्ज) आणि तिसऱ्या आठवड्यात ₹७८.८५ कोटी (अंदाजे ७.८५ अब्ज) कमाई केली. कर्नाटक चित्रपटासाठी सर्वात मोठी लोकसंख्या दिसून आली, तिथे ₹१८१ कोटी (अंदाजे १.८१ अब्ज) कलेक्शन झाले. चित्रपटाने हिंदी आवृत्तीने आणखी योगदान दिले, ₹१९२ कोटी (अंदाजे १.९२ अब्ज) कमाई केली. चित्रपटाने त्याच्या तेलुगू, तमिळ आणि मल्याळम आवृत्त्यांमध्येही चांगले प्रदर्शन केले आहे.

चित्रपटाबद्दल बोलायचे झाले तर, हा २०२२ च्या कांतारा चित्रपटाचा प्रीक्वल आहे. कांतारा हा जगभरात ४०० कोटी कमाई करणारा ऑलटाइम ब्लॉकबस्टर हिट चित्रपट होता. हा चित्रपट फक्त १५ कोटींच्या बजेटमध्ये बनवण्यात आला होता. हा चित्रपट ऋषभ शेट्टी यांनी दिग्दर्शित केला आहे. कांतारा चित्रपटाच्या यशानंतर, कांतारा चॅप्टर १ प्रदर्शित झाला. या चित्रपटाला चांगला प्रतिसाद मिळाला आहे. या चित्रपटात ऋषभ शेट्टी मुख्य भूमिकेत आहेत. या चित्रपटात रुक्मिणी वसंत, जयराम आणि गुलशन देवैया यांच्याही भूमिका आहेत.

## राशी–भविष्य

**मेष :** मेष राशीच्या व्यक्तींसाठी आजचा दिवस लाभदायक असेल. हा दिवस व्यवसायाच्या दृष्टीने अधिक फलदायी ठरेल.

**वृषभ:** वृषभ राशीच्या व्यक्तींसाठी आजचा दिवस आर्थिक बाबतीत लाभदायक ठरणार आहे. आज व्यवसायात कोणतीही मोठी डील मिळू शकते.

**मिथुन :** मिथुन राशीसाठी आजचा दिवस लाभदायक राहील. आर्थिक आणि करिअरशी संबंधित बाबतीत लाभ मिळेल.

**कर्क :** कर्क राशीच्या व्यक्तींना कुटुंबाच्या सहकार्याने धन-संपत्तीचा लाभ मिळू शकतो. वडिलोपार्जित मालमत्तेबाबत कोणताही वाद सुरू असेल तर आज तो मिटू शकतो.

**सिंह :** सिंह राशीच्या व्यक्तींसाठी आज समाजात नवीन ओळख निर्माण होईल. प्रतिष्ठित आणि वरिष्ठ लोकांशी तुमचा संपर्क वाढेल.

**कन्या :** कन्या राशीसाठी आजचा दिवस लाभदायक आहे. तुमची एखादी इच्छा आज पूर्ण झाल्याने तुम्हाला आनंद होईल.

**तुळ :** तूळ राशीच्या व्यक्तींसाठी आजचा दिवस दुपारनंतर विशेषतः लाभदायक राहील. आज तुम्हाला व्यवसायात लाभ मिळेल.

**वृश्चिक :** वृश्चिक राशीच्या ज्या लोकांना आज कामामध्ये बदल करायचा आहे, त्यांना आज यश मिळेल. सासरच्या मंडळींकडून आज तुम्हाला धनलाभ होईल.

**धनु :** धनु राशीच्या व्यक्तींसाठी आज कौटुंबिक जीवन अनुकूल राहील. आज कुटुंबातील सदस्यांसोबत मनोरंजक क्षण घालवण्याची संधी मिळेल.


**मकर :** मकर राशीच्या व्यक्तींना आज तुम्हाला शिक्षण आणि करिअरमध्ये केलेल्या मेहनतीचा पूर्ण फायदा मिळेल. कौटुंबिक जीवनात आज प्रेम आणि आपुलकी राहील.

**कुंभ :** कुंभ राशीच्या व्यक्तींना आज कोणत्याही समस्या किंवा चिंतेचे समाधान होईल.व्यवसायात येत असलेल्या अडचणी सोडवण्यासाठी आज तुम्ही एखाद्या प्रभावशाली व्यक्तीचा सल्ला घेऊ शकता.

**मीन :** मीन राशीचे व्यक्तीचा आजचा जवळच्या नातेवाईकांच्या मदतीने फायदा होऊ शकतो. आज तुम्हाला भेटवस्तूही मिळू शकते.

आचार्य पं. श्रीकांत पटेरिया: मो. ७८७९३७२९१३

## महाशब्दकोडे 581



### आडवे संकेत

१) एखाद्या गोष्टीचे महत्त्व मूर्ख माणसाला काय कळणार? या अर्थाचा एक वाक्प्रचार
८) केवळ पावसाच्या पाण्यावर अवलंबून असलेली जमीन
११) एखाद्याला मृत्यूपासून वाचविणे, प्राण न घेणे
१२) भ्रमराचा गुणगुण नाद
१४) अक्षरशत्रु, अशिक्षित
१६) किडा, कृमी
१७) प्रवासाचा एक टप्पा
१९) कोरड्या अन्नाचे छत्र, शिधा वाटणारी धर्मसंस्था
२१) पत्रात लिहिलेला मजकूर
२३) मनुष्य, पुरुष
२५) लहान मुले आजोबांना प्रेमाने या नावाने हाक मारतात
२६) ग्राफ, रेखाचित्र, कल्पनालेख
२७) धमकी देणे, जरब देणे
२८) जिभेला सुटणारी खाज किंवा चुरचुर, खाण्याची अनावर इच्छा
२९) धरणी, पृथ्वी, धरती
३१) करार, शर्त, पण
३२) दयाशील, कृपाळू
३४) वेगवान धावणारा एक पक्षी
३७) कळ, तिडीक
३८) इंग्रजीत सारखे
४०) व्यसन, वाईट सवय
४१) तक्त किंवा सिंहासनावर आरूढ झालेला
४३) लहान मुलींनी स्वत: स्वयंपाक करून एकत्र भोजन करण्याचा खेळ
४४) माजलेल्या हत्तीच्या गंडस्थळातून स्त्रवणारा द्रव
४६) घरात भिंतीवर, अडगळीच्या ठिकाणी आढळणारा एक लहान चतुष्पाद जीव
४७) हिंदू वर्षाचा एक महिना
४८) लहान ओढा, नाला
४९) विक्षिप्त, वेडा
५२) स्थिती, अवस्था
५४) खोकला, एक प्रकारचे गवत
५६) शिक्षक, गुरु
५७) सोबत, बरोबर
५९) पृथ्वी
६०) इंद्राचे आयुध
६१) बारा राशींपैकी एक
६३) विजय, कीर्ती
६४) शाश्वत, चिरकाल
६५) कापड मोजण्याचे एक परिमाण, आठवड्यातील प्रत्येक दिवस
६६) कावा, लबाडी, खोटेपणा
६७) लहान ध्वज, निशाण
६९) आब, प्रतिष्ठा, समाजात मिळणारा मान
७२) वेल, वल्ली
७३) घ्राणेंद्रिय
७४) भांडणाचे मूळ
७५) भांडणात मध्यस्थी करणारे, दोन पक्षांत तडजोड करणारे
७६) वाचन करणारा

### उभे संकेत

१) प्रस्थान करण्याच्या उद्देशाने आवरासावर करणे
२) सूर्य, दिवसाचा राजा
३) आनंद प्रदर्शनार्थ घरावर उभारलेले निशाण
४) हत्तीचे ओरडणे
५) प्रधान, बुद्धिबळ खेळातील एक महत्वाची सोंगटी
६) त्रास, कंटाळा, कावळ्याचे ओरडणे
७) .................. ग्लानिर्भवति भारत..... महाभारतातील एक प्रसिद्ध वचन
९) ढेकर
१०) खोडकर, द्वाड, आडदांड
१३) रीत, प्रकार
१५) लढाऊ जातीचा मनुष्य
१६) हरिकथा कथन करणारा, धार्मिक प्रवचन करणारा
१८) ऐकलेले भाषण चिन्हांच्या सहाय्याने जलद गतिने लिहिणे
२०) खोटा, लुच्चा, धूर्त, कावेबाज
२२) नावाचा उल्लेख
२४) आवाज, नाद
२६) येणे, प्राप्ती
२८) कच्चे रेशीम धुतांना निघून जाणारा गाळसाळ
२९) एक पालेभाजी प्रकार
३०) पंच्याहत्तराव्या वाढदिवसानिमित्त साजरा करावयाचा उत्सव
३१) प्रास्ताविक, सूचना, प्रस्ताव
३३) मार्ग, रस्ता
३५) दुर्दशा, वाईट अवस्था
३६) ज्यात सांधे धरतात असा एक शरीर रोग
३७) खोल, खोलगट
३८) पूल, धरण
३९) पुष्परस, मध
४२) तीर्थक्षेत्राचे ठिकाणी यात्रेकरूंकडून सर्व विधी यथासांग करवून घेणारा उपाध्याय
४३) बोलणे, व्याख्यान
४५) अर्धा भाग, सैन्य
४६) एक पालेभाजी प्रकार, पालनकर्ता
५०) गप्पा, इकडच्या तिकडच्या गोष्टी (हिं)
५१) तीव्र इच्छा
५३) पोवाडा रचून ते म्हणून दाखविणारा
५५) जवळीक, निकटता
५८) दुर्बल, गलितगात्र
६२) अभिनेता, नाटक, सिनेमात भूमिका करणारा
६४) पहाट, प्रभात
६५) शरीरातील एक धातू, तज्जन्य विकार
६६) ओढा, प्रवृत्ती
६८) पाणी घालून पातळ केलेले दही
६९) पाऊल, पाय
७०) बांसरी, वेणू
७१) वचन, आश्वासन, भाषण

(उत्तर पुढील अंकी)

### मागील महाशब्दकोड्याचे उत्तर



Uday Munde - 8446302691

# गडचिरोलीत काँग्रेसला बळ; राष्ट्रवादी-शिवसेनेला खिंडार

## स्थानिक स्वराज्य निवडणुकीपूर्वी राजकीय भूकंप; दिग्गज नेते काँग्रेसमध्ये, पोरेड्डीवार, नागोटी, नैताम यांचा पक्षप्रवेश

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी



**गडचिरोली, दि.२७ :** आगामी स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर गडचिरोलीत काँग्रेसने मोठे राजकीय बळ प्राप्त केले आहे. सोमवारी (दि. २७) राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते सुरेश सावकार पोरेड्डीवार, माजी जिल्हा परिषद सदस्य लालसुजी नागोटी, शिवसेनेचे गजानन नैताम यांच्यासह शेकडो कार्यकर्त्यांनी काँग्रेसमध्ये प्रवेश केला. प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ व नेते विजय वडेट्टीवार यांच्या उपस्थितीत हा सोहळा पार पडला.

गडचिरोली जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष महेंद्र ब्राम्हणवाडे यांनी हा पक्षप्रवेश सोहळा आयोजित केला होता. यावेळी राष्ट्रवादीचे (शरद पवार गट) गडचिरोली नगरपरिषदेचे प्रथम नगराध्यक्ष सुरेश सावकार पोरेड्डीवार, कविता पोरेड्डीवार, विजय गोरडवार, माजी जिल्हा परिषद सदस्य लालसुजी नागोटी, शिवसेनेचे गजानन नैताम व त्यांच्या शेकडो सहकाऱ्यांनी काँग्रेस पक्षात प्रवेश केला. यावेळी विजय वडेट्टीवार यांनी सत्ताधाऱ्यांवर सडकून टीका केली. 'आजचा पक्षप्रवेश जिल्हा राजकारणाला कलाटणी देईल. सत्ताधारी पक्ष देशात जात-धर्माच्या आधारे माणसांमध्ये दरी निर्माण करून राजकीय पोळी शेकत आहे. राहुलजी गांधी याच विध्वंसक शक्तींविरूद्ध लढत आहेत,' असे ते म्हणाले. शेतकरी अतिवृष्टीने व्यथित असताना सरकार कर्जमाफीऐवजी त्यांच्या दुःखावर मीठ चोळते. एलआयसीमधील सर्वसामान्यांचा पैसा पंतप्रधान मोदी त्यांच्या उद्योगपती मित्रांना वाटत आहेत, असा आरोपही त्यांनी केला. 'ओबीसींच्या हक्कांसाठी काढलेल्या मोर्चाचे खच्चीकरण करण्यासाठी मला आयकराची नोटीस बजावण्यात आली,' असा गौप्यस्फोटही केला.

प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ म्हणाले, 'शेतकरी आत्महत्या करत असताना सरकार सत्तेच्या मस्तीत व्यस्त आहे. गडचिरोलीतील आदिवासींच्या जमिनी उद्योगपतींच्या घशात घालण्यासाठी नियम बदलले जात आहेत. खनिज संपत्तीच्या मलईसाठीच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पालकमंत्रीपद घेतल्याचा आरोप त्यांनी केला. 'फलटण घटनेचा उल्लेख करत त्यांनी राज्यातील कायदा-सुव्यवस्थेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले. लालसुजी पोगटी व सुरेश पोरेड्डीवार यांच्या रूपाने आगामी निवडणुकीत काँग्रेस संपूर्ण जिल्ह्यावर विजयी ध्वज फडकवेल, असा विश्वास सपकाळ यांनी व्यक्त केला. याप्रसंगी पदवीधर शिक्षक आमदार अभिजीत वंजारी, आरमोरी विधानसभा क्षेत्राचे आमदार रामदास मसराम, संतोषसिंह रावत, महिला काँग्रेस जिल्हाध्यक्ष डॉ. कविता मोहोकर, डॉ. राम मेश्राम, सतीश विधाते, माजी जिल्हा परिषद अध्यक्ष अजय कंकडवार, हर्षलता येलमुले, वासेकर, युवक काँग्रेसचे पंकज गुड्डेवार, मनोहर पाटील पोरेट्टी, शमशेर खान पठाण, प्रतीक बारसिंगे यांच्यासह अनेक नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

---

महत्त्वाचे

### रब्बी हंगामासाठी कृषी विभागाचे नियोजन: शेतकऱ्यांनी तयारीला लागावे

**बुलडाणा:** रब्बी हंगाम सन २०२५-२६ साठी कृषि विभाग सज्ज झाले असून लागवडीचे नियोजन करण्यात आले आहे. शेतकऱ्यांनी हवामान, पाण्याची उपलब्धता आणि जमिनीचा पोत लक्षात घेऊन योग्य पीक नियोजनावर भर द्यावा, असे आवाहन जिल्हा अधीक्षक कृषी तंत्र अधिकारी(विस्तार) अजय वाढे यांनी केले आहे.

जिल्हा कृषी विभागाने रब्बी हंगामासाठी ३ लाख ८७ हजार ३५९ हेक्टर क्षेत्रावर पेरणीचे महत्त्वाकांक्षी उद्दिष्ट ठेवले आहे, जे सरासरी ३ लाख २९ हजार ८०३ हेक्टर क्षेत्रापेक्षा अधिक आहे. हंगामात हरभरा २ लाख ६० हजार १०० हेक्टर, गहू ७८ हजार हेक्टर, मका ३२ हजार हेक्टर आणि ज्वारी १६ हजार हेक्टर ही प्रमुख पिके राहणार असून, शेतकऱ्यांनी वेळेवर पेरणी करून नियोजित उद्दिष्ट साध्य करण्यास सहकार्य करावे.

राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियानांतर्गत कृषी विभागाने शेतकऱ्यांसाठी प्रमुख पिकांचे प्रमाणित बियाणे अनुदानित दरात उपलब्ध करून देण्याचे नियोजन केले आहे. यामध्ये हरभरा बियाणे (१० वर्षांच्या आतील वाण) : २०७३.४०क्विंटल बियाणे वितरणाचे नियोजन असून, ५० रुपये प्रति किलो अनुदान. हरभरा बियाणे (१० वर्षांवरील वाण) : २०७० क्विंटल बियाणे वितरणाचे नियोजन असून २५ रुपये प्रति किलो अनुदान. ज्वारी बियाणे (१० वर्षांच्या आतील वाण) : ४० क्विंटल बियाणे वितरण, ३० रुपये प्रति किलो अनुदान. ज्वारी बियाणे (१० वर्षांवरील वाण) : १७० क्विंटल बियाणे वितरण, १५ रुपये प्रति किलो अनुदान. शेतकऱ्यांनी या योजनेचा लाभ घेण्यासाठी आपल्या तालुका कृषी अधिकारी कार्यालय किंवा सहाय्यक कृषी अधिकारी यांच्याशी संपर्क साधावा, असेही आवाहन करण्यात आले आहे.

---

# रतन इंडिया प्रकल्पातील निःशुल्क राख प्रकरणी प्रशासन मौन; व्यावसायिकांमध्ये संतापाची लाट

## लवकरात लवकर निर्णय न झाल्यास आंदोलन छेडण्याचा वाहतूकदारांचा इशारा

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**नांदगावपेठ, दि. २७ :** एमआयडीसीतील रतन इंडिया औष्णिक वीज प्रकल्पातून दररोज हजारो टन कोळशाची राख निर्माण होत असून, या राखेच्या निशुल्क वितरणाबाबत प्रशासनाने अद्याप कोणताही ठोस निर्णय घेतलेला नाही. या संदर्भात स्थानिक व्यावसायिक, वीटभट्टीधारक आणि वाहतूकदारांनी अनेकदा जिल्हा प्रशासनाचे लक्ष वेधले, निवेदने दिली, पत्रव्यवहार केला, पण तरीसुद्धा जिल्हाधिकाऱ्यांच्या कार्यालयाकडून केवळ आश्वासने मिळत असून प्रत्यक्ष कारवाईचा अभाव कायम आहे. परिणामी, स्थानिक उद्योजक, बांधकाम व्यावसायिक आणि वाहतूक क्षेत्राशी संबंधित घटकांमध्ये तीव्र नाराजी आणि संतापाची लाट उसळली आहे.

रतन इंडिया प्रकल्पातून निघणारी राख सध्या खासगी ठेकेदारांमार्फत विकली जाते. मात्र ही प्रक्रिया पारदर्शक नसल्याचा गंभीर आरोप करण्यात येत आहे. स्थानिक व्यावसायिकांच्या मते, राख विक्रीत मोजक्या व्यावसायिकांना प्राधान्य दिले जात असून, स्थानिकांना राख मिळवण्यासाठी प्रचंड अडथळे निर्माण केले जातात. परिणामी, वीटभट्टी व्यवसायासह बांधकाम आणि सिमेंट उत्पादनाशी निगडित उद्योगांना मोठा आर्थिक फटका बसत आहे. दरम्यान, कोराडी आणि मौदा औष्णिक प्रकल्पांमध्ये जिल्हा प्रशासनाने थेट हस्तक्षेप करून स्थानिक व्यावसायिकांना राखेचा निशुल्क लाभ मिळवून दिला आहे. केवळ एवढेच नव्हे, तर शासकीय आणि निमशासकीय प्रकल्पांमध्ये राख वापरण्यासाठी प्रति टन १२५ रुपयांचे अनुदान देखील देण्यात आले आहे. त्यामुळे, "एकाच राज्यातील दोन प्रकल्पांनी जर स्थानिकांना राखेचा मोफत लाभ देऊ शकतात, तर अमरावतीतील रतन इंडिया प्रकल्पात मात्र असा निर्णय का घेतला जात नाही?" असा प्रश्न आता सर्व स्तरातून विचारला जात आहे.रतन इंडिया परिसरातील वीटभट्टीधारक, ट्रान्सपोर्ट असोसिएशन आणि स्थानिक औद्योगिक संघटनांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे यासंबंधी वारंवार निवेदने दिली आहेत. मात्र, प्रशासनाने या प्रकरणाकडे दुर्लक्ष केल्याचा आरोप त्यांनी केला आहे. "राख वितरणाची प्रक्रिया पारदर्शक करून स्थानिकांना निशुल्क राख देण्यात यावी, अन्यथा आम्हाला तीव्र आंदोलनाचा मार्ग पत्करावा लागेल,असा इशारा वाहतूकदार संघटनेने दिला आहे. परिसरातील सामाजिक संघटनांनी देखील या प्रश्नावर प्रशासनाने तातडीने भूमिका स्पष्ट करावी, अशी मागणी केली आहे. त्यांनी म्हटले आहे की, "राखेचा प्रश्न केवळ आर्थिक नसून पर्यावरणाशी निगडित आहे.

### पर्यावरण व स्थानिक अर्थव्यवस्थेला दिलासा देणारा निर्णय अपेक्षित

राखेचा वापर वीटभट्ट्या, सिमेंट, बांधकाम साहित्य आणि रस्ते बांधणीसाठी मोठ्या प्रमाणावर होऊ शकतो. जर प्रशासनाने स्थानिकांना निशुल्क राख देण्याचा निर्णय घेतला, तर स्थानिक उद्योगांचे उत्पादन खर्च कमी होतील, रोजगाराच्या नव्या संधी निर्माण होतील आणि पर्यावरणीय हानीही टळेल.

---

# विक्रेत्यांना अल्टिमेटम, अन्यथा कारवाई होणार

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी



**अकोला, दि. २७ :** शहरातील भाटे क्लब मैदानावरील हॉकर्स झोनवर बसविण्यात आलेल्या पथविक्रेत्यांना दिवाळीच्या काळात काही दिवसांसाठी गांधी रोडवर बसण्याची तात्पुरती मुभा देण्यात आली होती. मात्र, दिवाळी संपूनही हे विक्रेते आता या जागेवरून हटण्यास तयार नसल्याने महानगरपालिकेच्या अतिक्रमण विभागाने आक्रमक पवित्रा घेतला आहे. या अतिक्रमणावर उद्या, मंगळवारी पोलीस प्रशासनाच्या मदतीने कारवाई करण्यात येणार आहे.

शहरातील मुख्य बाजारातील अतिक्रमणाची समस्या सोडवण्यासाठी महापालिकेने दिवाळीपूर्वी पथविक्रेत्यांना भाटे क्लब मैदानावर तयार केलेल्या हॉकर्स झोनमध्ये स्थलांतरित केले होते. मात्र, दिवाळी सणासाठी आम्हाला काही दिवसांची मुभा द्यावी, अशी विनंती या विक्रेत्यांनी केली होती. ती मान्य करत त्यांना तात्पुरत्या स्वरूपात गांधी रोडवर व्यवसाय करण्याची परवानगी देण्यात आली.

परंतु, दिवाळी संपल्यानंतरही हे विक्रेते गांधी रोड सोडण्यास तयार नाहीत. यामुळे रस्त्यावर पुन्हा अतिक्रमणाची समस्या निर्माण झाली आहे. सोमवारी महापालिकेच्या अतिक्रमण निर्मूलन पथकाने या विक्रेत्यांना जागा खाली करण्यासाठी अल्टिमेटम दिला आहे. विक्रेत्यांनी प्रतिसाद न दिल्यास, उद्या, मंगळवारी पोलीस प्रशासनाची मदत घेऊन गांधी रोडवर बसलेल्या या अतिक्रमित पथविक्रेत्यांवर कठोर कारवाई करण्याची तयारी अतिक्रमण विभागाने केली आहे.

---

# संतनगरी खून प्रकरणी चार आरोपी अटकेत

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**शेगाव, दि. २७ :** संत गजानन महाराजांच्या पवित्र नगरीत शनिवारी सायंकाळी घडलेला थरारक खूनाचा प्रकार शेगावच्या इतिहासात काळा दिवस ठरला आहे. दिवसाढवळ्या आठवडी बाजारात, मटन मार्केटमध्ये धारदार चाकूने केलेल्या निर्दयी हल्ल्यात नितीन उर्फ गोलू नामदेव गायकवाड वय ३३, रा. मिलिंद नगर, शेगाव याचा खून झाल्याने शहरात भीती, संताप आणि दहशतीचे वातावरण निर्माण झाले होते.

सदरचा खुनाची पार्श्वभूमी वैयक्तिक वैर, मत्सर आणि गुंडशाहीच्या वर्चस्वाशी जोडली गेल्याने ही केवळ एक हत्या नसून संतनगरीच्या शांततेवरचा गंभीर प्रहार ठरली आहे.

घटनेचा थरारात "गोलूला मटन मार्केटमध्ये चाकू मारलाय!" ह्या वार्तानि शहरात खळबळ माजली. शनिवारी सायंकाळी ५.३० च्या सुमारास आठवडी बाजारात नेहमीप्रमाणे बाजार गजबजला होता. त्याचवेळी अचानक किंकाळ्यांचा आवाज, धावपळ आणि रक्ताच्या थारोळ्यात पडलेला गोलू गायकवाड ! "गोलूला मटन मार्केटमध्ये चाकू मारलाय!"

अशी धक्कादायक माहिती त्याची बहिण ज्योती गव्हांदे हिने दिल्याने, त्याचा भाऊ अशोक गायकवाड तातडीने घटनास्थळी धावत पोहोचला. तोपर्यंत गोलू संपला होता. गोलू जमिनीवर बेशुद्धावस्थेत, मानेवर आणि पोटावर खोल जखमा, डोळ्यांतून भीतीचा भाव होता. हे पाहुन पाहणाऱ्यांच्या अंगावर काटा आला होता. फिर्यादींच्या तक्रारीनुसार आरोपी मोहम्मद शाहिद उर्फ बबल्या, बॉद खान उर्फ तुर्रम, आणि मोहम्मद जावेद उर्फ मोदी (अँटी बालक) आणि एक आरोपी यांनी मिळून पूर्वनियोजित कट रचून ही हत्या केली. मृतक गोलू काही दिवसांपासून इतर मित्रांसोबत राहात असल्याचा राग आरोपींना होता. शगोलू तू दुसऱ्या मुलांसोबत राहू नकोस! ₹ या एका वाक्याच्या वैरातून आरोपींनी चक्क दिवसाढवळ्या खुनाचा खेळ रचला.

घटनेनंतर मटन मार्केट परिसरात एकच गोंधळ उडाला. धावपळ, किंकाळ्या, आणि रक्ताने माखलेली बाजारपेठ घटनेची माहिती मिळताच शेगाव शहर पोलीस ठाण्याचे प्रभारी ठाणेदार रामकृष्ण पवार, सहाय्यक निरीक्षक सोनटक्के, उपनिरीक्षक तडले, आणि त्यांचे सहकारी घटनास्थळी दाखल झाले.

---


### जाहीर सुचना

या जाहीर सुचनेव्दारे सुचित करतो की, माझे पक्षकार नौशीन सबा सिब्तैन रजा, रा. गंगा नगर, अकोला, जि. अकोला यांनी केलेल्या ईसारचिठ्ठी नुसार मौज-तापलाबाद, ता.जि. अकोला येथील सर्व्हे नं. ३/१अ मधील प्लॉट नं. ८ क्षेत्रफळ २८७.०० चौ.मि. यावर बाधंलेले डुप्लेक्स न. २ ज्याचे बांधकाम क्षेत्रफळ ६०.४९ चौ.मि. आणि प्लॉट क्षेत्रफळ ७०.७६ चौ.मि. चा मोहम्मद रजा मोहम्मद गौस आणि अकील अहमद युसुफ खान यांचे कडून विकत घेण्याचा सौदा केलेला आहे आणि सदर डुप्लेक्स न. २ हा मोहम्मद रजा मोहम्मद गौस आणि अकील अहमद युसुफ खान यांच्या मालकीत व ताब्यात दि. ०१/१२/२०२२ रोजीचे खरेदी दस्त क्र. ५७९२ नुसार आहे.

मोहम्मद रजा मोहम्मद गौस आणि अकील अहमद युसुफ खान यांचे जवळ दि. ०१ / १२ / २०२२ रोजीचे रजि. खरेदी दस्त क्र. ५७९२, दि. १४/०३/२००७ रोजी रजि . चुक - दुरुस्ती दस्त अ.क्र. ७९०, दि. २८/०३/२००६ रोजीचे रजि. खरेदी दस्त क्र. ९८६ आणि दि. २३/०३/२००५ रोजीचे रजि. ईसारचिठ्ठी दस्त क्र. ९११ या सर्व मुळ खरेदी दस्तांपैकी, **दि. २३/०३/२००५ रोजीचे रजि. ईसारचिठ्ठी दस्त क्र. ९१९ चे मुळ रजि. ईसारचिठ्ठी दस्त** माझे पक्षकाराचे वरील नामे विक्रेते यांचे कडून गहाळ झालेले आहेत व इतर मुळ दस्त यांच्याकडे आहे.

तरी याबाबत कोणाचेही, कोणत्याही प्रकारचे कर्ज, गहाण, बोजा, हक्क, हितसंबंध व इतर कोणतीही भानगड, कायदेशीर वाद, लवाद, दावा असल्यास किंवा त्याबाबत कोणतीही हरकत असल्यास जाहीर सुचनेपासून १५ दिवसांचे आंत खालील पत्त्यावर लेखी स्वरुपात संपर्क साधावा, त्यानंतर आक्षेप आल्यास याची नोंद घेतली जाणार नाही.

अमरावती.

दिनांक: २५/१०/२०२५

ॲडव्होकेट
**राहूल व्ही. मोहोड**
प्रेरणा कॉलनी, राधा नगर,
अमरावती-४४४६०३.
मो.९०९६४६०६७०.


---

### दुर्गोत्सव २०२५ उपक्रमात सहभागी होण्याचे आवाहन

**बुलडाणा:** अमृत संस्था यांच्या माध्यमातून यंदाच्या दिवाळीच्या कालावधीत 'दुर्गोत्सव २०२५' हे विशेष अभियान राबविण्यात येत आहे. या दुर्गोत्सवामध्ये नुकतेच १२ किल्ल्यांना वर्ल्ड हेरिटेजचे नामांकन प्राप्त झाले आहे. या पार्श्वभूमीवर दिवाळीमध्ये घराघरात किल्ले बनविण्याच्या परंपरेला एक नवे रूप देत, नागरिकांनी या १२ किल्ल्यांपैकी कोणत्याही एका किल्ल्याची प्रतिकृती बनवून तयार झालेल्या किल्ल्याचा स्वत:सह फोटो http://www.durgotsav.com या संकेतस्थळावर १० नोव्हेंबर २०२५ पर्यंत अपलोड करावा, असे आवाहन अमृतचे जिल्हा व्यवस्थापक जिग्नेश कमाणी यांनी केले आहे. रायगड, राजगड, प्रतापगड, सिंधुदुर्ग, साल्हेर दुर्ग, खांदेरीचा दुर्ग, पन्हाळगड, शिवनेरी, विजयदुर्ग, लोहगड, पद्मदुर्ग आणि जिंजी असे १२ किल्ल्यांना वर्ल्ड हेरिटेजचे नामांकन प्राप्त झाले आहे.

---

# पारस येथील श्याम सुंदर गौरक्षण संस्था गोसेवेचा दीपस्तंभ!

## गायींचे रक्षण म्हणजे संस्कृतीचे रक्षण

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**अकोला, दि. २७ :** जिल्ह्यातील पारस गावातील श्याम सुंदर गौरक्षण संस्था ही सन १९९४ मध्ये स्थापन झालेली एक अग्रगण्य संस्था असून, गेल्या तीन दशकांपासून हिंदू राष्ट्र, हिंदू संस्कृती आणि गोमातेचे संवर्धनसंरक्षण या पवित्र उद्दिष्टाने कार्यरत आहे. संस्थेचे अध्यक्ष श्री. आनंद गोयनका यांच्या मार्गदर्शनाखाली सध्या संस्थेत तब्बल ११५ गायींचे पालनपोषण करण्यात येते.

गायींसाठी चारा, पाणी आणि स्वच्छतेची व्यवस्था संस्थेमार्फत नियमितपणे केली जाते. स्थानिक ग्रामस्थ आणि स्वयंसेवक यांचे सतत सहकार्य मिळत असल्याने हे केंद्र गोसेवेचे प्रेरणास्थान ठरले आहे. संस्थेने अलीकडेच वसुबारस निमित्त गौवत्स पूजन व मिरवणुकीचे आयोजन करून गोमातेचे महत्व समाजापर्यंत पोहोचवले. तथापि, संस्थेस जागेची आणि वैद्यकीय सुविधांची आवश्यकता भासत आहे. गोशाळेतील गायींच्या आरोग्य तपासणीसाठी




पशुवैद्यकीय सेवा नियमित मिळाव्यात तसेच परिसर विस्तारासाठी शासन आणि समाजाने सहकार्य करावे, अशी मागणी संस्थेकडून करण्यात आली आहे. अध्यक्ष आनंद गोयनका म्हणाले, गायींचे रक्षण म्हणजे संस्कृतीचे रक्षण. समाजातील प्रत्येक व्यक्तीने या सेवाकार्यात आपले योगदान द्यावे, असे आवाहन त्यांनी केले. हिंदू संस्कृतीचे जतन आणि गोमातेच्या रक्षणासाठी श्याम सुंदर गौरक्षण संस्था आजही एक दीपस्तंभ ठरत असून, तिचे कार्य पारस तसेच संपूर्ण अकोला जिल्ह्यासाठी प्रेरणादायी ठरले आहे.

### गौसेवेच्या संदेशासह वसुबारस साजरी

पारस येथील श्याम सुंदर गौरक्षण संस्थेत वसुबारस निमित्ताने गौवत्स पूजनाचा धार्मिक कार्यक्रम नुकताच संपन्न झाला. सकाळी ८.३० वाजता गौवत्स पूजनानंतर श्रीराम मंदिर ते श्याम सुंदर गौरक्षण संस्था पर्यंत रॅली काढण्यात आली. या माध्यमातून गौमातेचे महत्व आणि हिंदू संस्कृतीचे जतन व संवर्धन याचा संदेश देण्यात आला. कार्यक्रमाला अध्यक्ष आनंद गोयनका, भगवान मेटांगे, सदाशिव लांडे, ह.भ.प. अरुण महाराज, ह.भ.प. इस्थापे महाराज तसेच ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

---

# एलएलबी परीक्षेत गोंधळ; चुकीच्या प्रश्नपत्रिकेमुळे विद्यार्थ्यांमध्ये संभ्रम

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**अकोला, दि. २७ :** संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठांतर्गत एलएलबी (३ वर्षीय) अभ्यासक्रमाच्या सेमिस्टर२ च्या 'कॉन्ट्रॅक्ट' या विषयाची परीक्षा (२७ ऑक्टोबर) सकाळी ९ ते १२ या वेळेत घेण्यात आली. मात्र या ठिकाणी चुकीची प्रश्नपत्रिका वितरित झाल्याने विद्यार्थ्यांमध्ये एकच गोंधळ उडाला. या चुकीमुळे विद्यार्थ्यांचा मौल्यवान वेळ वाया गेला असून, त्यांना नाहक त्रास सहन करावा लागला.

या संदर्भात रिपब्लिकन बहुजन विद्यार्थी परिषदेचे जिल्हाध्यक्ष तथा विदर्भ सरचिटणीस ॲड. आकाश हिवराळे यांनी परीक्षा नियंत्रक डॉ. नितीन कोळी यांना निवेदन दिले. चुकीमुळे विद्यार्थ्यांना झालेल्या मानसिक त्रासाबद्दल न्याय देण्यासाठी आणि विशेष सूट देऊन पुन्हा परीक्षा घेण्यासाठी त्यांनी मागणी केली.

निवेदनाची प्रत विद्यापीठाला ई-मेलद्वारे देखील पाठविण्यात आली आहे. या प्रकारामुळे विद्यार्थ्यांमध्ये संभ्रमाचे वातावरण असून, भविष्यात अशा घटना टाळण्यासाठी परीक्षा विभागाने अधिक दक्षता घेण्याची मागणीही करण्यात येत आहे.

### रिपब्लिकन बहुजन विद्यार्थी परिषदेचे परीक्षा नियंत्रकांना निवेदन

---

# अमरावती: २९ हॉकर्स झोनची महापालिकेकडून घोषणा

## हॉकर्सची संख्या ३५०० आणि व्यवस्था केवळ ११०० हॉकर्सची

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**अमरावती, दि. २७ :** महापालिकेने शहरातील वाहतूक व्यवस्था सुधारावी म्हणून २९ हॉकर्स झोन निश्चित केले आहे. मात्र या हॉकर्स झोनला फेरिवाला समितीची मान्यता नसल्याचे सांगितले जात आहे. विशेष म्हणजे महापालिका क्षेत्रात अधिकृत ३५०० हॉकर्स असतांना फक्त ११०० हॉकर्सकरिताच ही व्यवस्था करण्यात आल्याने अन्य हॉकर्सला त्यांचा व्यवसाय बंद करावा लागणार की काय, असा ही प्रश्न उपस्थित केला जात आहे. गेल्या अनेक वर्षापासून शहरात हॉकर्स झोनची समस्या जैसे थे आहे. फेरिवाला समिती अस्तित्वात नसल्याने आतापर्यत सापर्यंत हॉकर्स झोन घोषित होऊ शकले नाही, असे प्रशासनाकडून सांगण्यात येत होते. निवडणुक घेऊन फेरिवाला समिती घोषित झाली. अनेकदा प्रशासनाच्या या समितीसोबत बैठका झाल्या. हॉकर्सना ज्या ठिकाणी ग्राहक सहजासहजी येऊ शकतात, ते क्षेत्र हॉकर्स झोन म्हणून हवे आहेत तर प्रशासन वाहतूकीला अडथळा होतो म्हणून शहरातील महत्वपूर्ण फुटपाथ सोडून अन्य क्षेत्र हॉकर्स झोन प्रस्तावित करण्याचे प्रशासनाचे नियोजन आहे. पोलिस प्रशासनासोबत झालेल्या बैठकीनंतर महापालिकेने पथविक्रेता (उपजिविका संरक्षण व पथविक्री विनियमन) योजने अंतर्गत हॉकर्स झोन

**१५ दिवसात हरकती व सूचना सादर करा**

महापालिकेने २९ फेरिवाला क्षेत्र प्रस्तावित केली आहे. या प्रस्तावित क्षेत्रांची सविस्तर माहिती देण्यात आली असून या क्षेत्रांबाबत हरकती अथवा सूचना असल्यास त्या लेखी स्वरुपात सहाय्यक आयुक्त बाजार व परवाना विभाग या ठिकाणी जमा कराव्यात, असे आवाहन मनपा प्रशसानाकडून करण्यात आलेले आहे.

**आज हॉकर्सचे निवेदन**

महापालिकेने प्रस्तावित केलेल्या हॉकर्स झोनविरुध्द शहीद भगतसिंग हॉकर्स युनियनकडून मनपा आयुक्तांना निवेदन देण्यात येणार आहे. १५ दिवसात आक्षेप व सूचना मागवून प्रशासनाने कायद्याचे उल्लंघन केल्याचा आरोप हॉकर्सकडून केला जात आहे. या हॉकर्स झोनला विरोध करण्यासाठी मोर्चाचे आयोजन करण्यात आल्याची माहिती अध्यक्ष गणेश मारोडकर यांनी दिली. घोषित केले. मनपा आयुक्त सौम्या शर्मा यांनी या उपक्रमाद्वारे शहरातील पथविक्रेत्यांना नियोजित आणि सुरक्षित विक्री जागा उपलब्ध करुन देण्याचा उद्देश्य असल्याचे सांगितले. मात्र शहरात अधिकृत ३५०० पेक्षा अधिक हॉकर्स असतांना फक्त ११०० हॉकर्ससाठी जागा कशा, हा प्रश्न उपस्थित केला जात आहे.

---


**महाराष्ट्र शासन**

**कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग, खामगांव यांचे कार्यालय ,वामन नगर ,खामगांव 444303**

**ई-मेल - khamgaon.ee@mahapwd.gov.in दुरध्वनी क्रं- 07263-254897 फॅक्स क्र. 07263-255248**

**ई-निविदा सुचना क्र. 31 सन 2025-26 (ऑनलाईन)**

कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, खामगांव जिल्हा बुलढाणा हे खालील कामांकरीता "ब-१" नमुन्यातील निविदा ई-निविदा प्रणालीव्दारे (ऑनलाईन) निविदा मागवित आहेत. निविदा कागदपत्र शासनाच्या संकेतस्थळावर https://mahatenders.gov.in येथून डाऊनलोड करण्यात यावी .तसेच निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार सक्षम अधिकारी यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

| अ.क्रं. | कामाचे नाव | कामाची अदांजित किमत (रु. लक्ष ) | कामाची अदांजित किमत (रु. अक्षरात ) |
|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 |
| 1 | नाबार्ड अंतर्गत बुलडाणा जिल्हयातील संग्रामपुर तालुक्यातील ग्रा.मा.27 वर निवाणा ते चांगेफळ बु. कि.मी.०/६०० मध्ये लहान पुलाचे पोचमार्गासह बांधकाम करणे. | 99.50 | रु. नव्यांनउ लक्ष पन्नांस हजार फक्त |
| 2 | भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक विकास योजने अंतर्गत मौजे गारडगांव ता.खामगांव येथे बौध्द विहार येथे भक्त निवास व इतर विकास कामे करणे. ता.खामगांव | 85.00 | रु. पंच्याअंशी लक्ष फक्त |
| 3 | जिनिस अंतर्गत खामगांव जिल्हा बुलडाणा येथील विश्रामगृह (ब्रिटीश कालीन) येथे अंतर्गत रस्ते व इतर अनुषंगीक कामे करणे. | 28.00 | रु. अठठावीस लक्ष फक्त |
| 4 | जिनिस अंतर्गत शासकीय तंत्र निकेतन खामगांव येथे रस्ता व पिण्याच्या पाण्याच्या सुवीधासह पाणीपुरवठा व्यवस्था करणे. | 20.50 | रु. वीस लक्ष पन्नांस हजार फक्त |
| 5 | जिनिस अंतर्गत औद्योगीक प्रशिक्षण संस्था खामगांव येथील संस्थेतील मुलांच्या वसतीगृहाची दुरुस्ती करणे. | 11.50 | रु. अकरा लक्ष पन्नांस फक्त |
| 6 | तहसिल कार्यालय संग्रामपूर ता.संग्रामपूर येथे मीटींग हॉल चे बांधकाम करणे. | 41.00 | रु. एक्केचाळीस लक्ष फक्त |

**ई-निविदा उपलब्ध कालावधी :- दिनांक.28.10.2025 ते दिनांक 04.11.2025 (ऑनलाईन वेळापत्रक लागु व अंतीम राहील.)**

**ई-निविदा उघडणे:- ऑनलाईन शेडयुल प्रमाणे**

**खालील संकेतस्थळावर ई-निविदाची सर्व माहिती उपलब्ध आहे.**

(1) http://mahapwd.com (2) https://mahatenders.gov.in (3) कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, खामगांव कार्यालयातील सूचना फलक

**कोणतेही कारण न दर्शविता अंशत: किंवा सर्वच निविदा रद्द करण्याचे अधिकार सक्षम अधिकारी यांनी स्वत:कडे राखून ठेवला आहे.**

**(सदर निविदेसूचनेमध्ये काही बदल होत असल्यास वृत्तपत्रीय शुध्दीपत्रक न देता वरिल वेबसाईटवरती कळविण्यात येईल.)**

**For any technical related queries please call at 24 x 7 Help Desk Number 0120-4001 002 , 0120-4001 005 , 0120-6277 787**

जा. क्र. 5289 /निविदा/2025/ई-निसुक्र.31/ दिं.17/10/2025
कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय
सार्वजनिक बांधकाम विभाग ,खामगांव

**कार्यकारी अभियंता**
**सा.बा.विभाग खामगाव**

**महत्त्वाचे**

### भारताचा माजी प्रशिक्षक आता दिसणार नव्या भूमिकेत!

**नवी दिल्ली :** रोहित शर्माने कसोटी क्रिकेटमधून निवृत्ती घेतल्यानंतर त्याने त्याचे ११ किलो वजन कमी केले. यावेळी रोहित शर्माकडून ही मेहनत घेण्याचे कारण म्हणजेच अभिषेक नायर. जेव्हा गौतम गंभीर याला भारतीय हेड कोच म्हणून निवडण्यात आले होते तेव्हा फलंदाजीसाठी कोच म्हणून अभिषेक नायर याला निवडण्यात आले होते. जे आधी आयपीएल त्याचबरोबर अनेक नव्या खेळाडूंना आणि दमदार खेळाडूंना घडवण्यामागचं कारण आहेत. रोहित शर्माच्या जवळच्या मित्राला कोलकाता नाईट रायडर्स मध्ये मोठे पद मिळण्याची शक्यता आहे. हा मित्र दुसरा तिसरा कोणी नसून दिग्गज प्रशिक्षक अभिषेक नायर आहे, जो रोहितसोबत खेळला आहे आणि त्याला प्रशिक्षणही दिले आहे. काही महिन्यांपूर्वीपर्यंत अभिषेक नायर टीम इंडियाचा सहाय्यक प्रशिक्षक होता, परंतु बीसीसीआयने त्याच्याकडून ही जबाबदारी काढून घेतली. त्याला बीसीसीआयने का काढले यामागचे कारण समोर आले नाही आता त्याच्या जागेवर नव्या प्रशिक्षकाची निवड करण्यात आली आहे.

### सलामीवीर प्रतीका रावल विश्वचषक स्पर्धेतून बाहेर

**मुंबई :** भारतीय महिला क्रिकेट संघाला आयसीसी महिला क्रिकेट विश्वचषक स्पर्धेच्या उपांत्य सामन्यापूर्वी मोठा धक्का बसला आहे. जबरदस्त फॉर्ममध्ये असलेली सलामीवीर फलंदाज प्रतीका रावल दुखापतीमुळे विश्वचषकातून बाहेर झाली आहे. क्रिकबझने याबाबत वृत्त दिले आहे.बांगलादेशविरुद्ध रविवारी २६ ऑक्टोबर रोजी झालेल्या सामन्यात क्षेत्ररक्षण करत असताना प्रतीका रावलला गुडघ्याला आणि घोट्याला दुखापत झाली. पहिल्या डावादरम्यान चेंडू अडवण्याचा प्रयत्न करत असताना ही घटना घडली. नंतर हा सामना पावसामुळे रद्द करण्यात आला होता. प्रतीका रावलने न्यूझीलंडविरुद्धच्या महत्त्वाच्या सामन्यात भारतीय संघाच्या विजयात निर्णायक भूमिका बजावली होती. त्या सामन्यात तिने उत्कृष्ट १२२ धावांची धमाकेदार खेळी केली होती.

### सोन्या-चांदीचे भाव कोसळले

**मुंबई :** भारतात २७ ऑक्टोबर रोजी २४ कॅरेट सोन्याच्या प्रति ग्रॅमचा दर १२,५६१ रुपये, २२ कॅरेट सोन्याच्या प्रति ग्रॅमचा दर ११,५१४ रुपये आणि १८ कॅरेट सोन्याच्या प्रति ग्रॅमचा दर ९,४२१ रुपये आहे. भारतात २७ ऑक्टोबर रोजी २२ कॅरेट सोन्याच्या प्रति १० ग्रॅमचा दर १,१५,१४० रुपये, २४ कॅरेट सोन्याच्या प्रति १० ग्रॅमचा दर १,२५,६१० रुपये आणि १८ कॅरेट सोन्याच्या प्रति १० ग्रॅमचा दर ९४,२१० रुपये आहे.

भारतात २७ ऑक्टोबर रोजी चांदीचा भाव प्रति ग्रॅम १५४.९० रुपये आणि प्रति किलोग्रॅम १,५४,९०० रुपये आहे. दिल्ली शहरात आज २२ कॅरेट सोन्याच्या प्रति १० ग्रॅमचा दर १,१५,२९० रुपये, २४ कॅरेट सोन्याच्या प्रति १० ग्रॅमचा दर १,२५,७६० रुपये आणि १८ कॅरेट सोन्याच्या प्रति १० ग्रॅमचा दर ९४,३६० रुपये आहे.भारतात २६ ऑक्टोबर रोजी २४ कॅरेट सोन्याच्या प्रति ग्रॅमचा दर १२,५६२ रुपये, २२ कॅरेट सोन्याच्या प्रति ग्रॅमचा दर ११,५१५ रुपये आणि १८ कॅरेट सोन्याच्या प्रति ग्रॅमचा दर ९,४२२ रुपये होता. भारतात २६ ऑक्टोबर रोजी २२ कॅरेट सोन्याच्या प्रति १० ग्रॅमचा दर १,१५,१५० रुपये, २४ कॅरेट सोन्याच्या प्रति १० ग्रॅमचा दर १,२५,६२० रुपये आणि १८ कॅरेट सोन्याच्या प्रति १० ग्रॅमचा दर ९४,२२० रुपये होता. भारतात २६ ऑक्टोबर रोजी चांदीचा भाव प्रति ग्रॅम १५५ रुपये आणि प्रति किलोग्रॅम १,५५,००० रुपये होता. भारतात २५ ऑक्टोबर रोजी २४ कॅरेट सोन्याच्या प्रति ग्रॅमचा दर १२,४३६ रुपये, २२ कॅरेट सोन्याच्या प्रति ग्रॅमचा दर ११,३९९ रुपये आणि १८ कॅरेट सोन्याच्या प्रति ग्रॅमचा दर ९,३२७ रुपये होता.

# श्रेयस अय्यरला गंभीर दुखापत

## अंतर्गत रक्तस्त्राव झाल्याने आयसीयूमध्ये दाखल

**नवी दिल्ली : दि.२७** प्रतिनिधी



भारतीय वनडे क्रिकेट संघाचा उपकर्णधार श्रेयस अय्यरबद्दल एक महत्त्वाची बातमी समोर आली आहे. त्याला तिसऱ्या वनडेत झालेल्या दुखापतीमुळे सिडनी येथील रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. त्याला कॅच घेताना झालेल्या दुखापतीमुळे अंतर्गत रक्तस्त्राव झाल्याने खबरदारी म्हणून अतिदक्षता विभागात आयसीयू ठेवण्यात आले आहे. श्रेयसला किमान पाच ते सात दिवस रुग्णालयात राहावे लागण्याची शक्यता आहे.ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या वनडे मालिकेतील तिसऱ्या आणि अंतिम सामन्यादरम्यान ही घटना घडली. ऑस्ट्रेलियन डावाच्या ३४व्या षटकात हर्षित राणाच्या गोलंदाजीवर ॲलेक्स कॅरीचा झेल पकडताना श्रेयसच्या बरगड्यांना दुखापत झाली. बॅकवर्ड पॉइंटवर क्षेत्ररक्षण करताना मागे धावत जाऊन त्याने हा झेल घेतला, परंतु यामुळे त्याला गंभीर दुखापत झाली. दुखापतीमुळे तो वेदनेने विव्हळत मैदानावरच पोट आणि छाती धरून बसला होता. त्यानंतर वैद्यकीय पथकाने त्याला तातडीने मैदानाबाहेर नेले आणि सिडनीच्या रुग्णालयात दाखल केले. भारतीय संघ आता ऑस्ट्रेलियाविरुद्ध टी-२० मालिका खेळणार आहे, परंतु श्रेयस या मालिकेचा भाग नाही. तरीही, दुखापतीच्या गंभीरतेमुळे संघ व्यवस्थापनाने त्याला उपचारासाठी सिडनीमध्येच थांबवले आहे.श्रेयसला सुमारे एक आठवडा रुग्णालयात राहावे लागू शकते. क्रिकेटप्रेमींकडून श्रेयस अय्यर मैदानावर कधी परतणार, असा प्रश्न विचारला जात आहे. सूत्रांनुसार, तो ३० नोव्हेंबर रोजी रांची येथे दक्षिण आफ्रिकेविरुद्ध होणाऱ्या पहिल्या वनडे सामन्यात खेळू शकतो. मात्र, याबाबत अद्याप कोणतीही अधिकृत माहिती समोर आलेली नाही. श्रेयसच्या प्रकृतीबाबत संघ व्यवस्थापन आणि चाहते चिंतेत असून, त्याच्या लवकर बरे होण्यासाठी शुभेच्छा देत आहेत.

## रणजी ट्रॉफीमध्ये पृथ्वी शॉने नावावर केला नवा रेकॉर्ड!

**अवघ्या १४१ चेंडूत ठोकले द्विशतक**



**नवी दिल्ली : दि.२७** प्रतिनिधी

महाराष्ट्राकडून रणजी ट्रॉफीमध्ये पदार्पण करताना पृथ्वी शॉ पहिल्या डावात एकही धाव घेऊ शकला नाही, परंतु दुसऱ्या डावात त्याने ७५ धावा केल्या. पुढच्या सामन्यात त्याच्या बॅटने गर्जना केली आणि त्याने फक्त ७२ चेंडूत शतक झळकावले. यासह त्याने रणजी ट्रॉफीचा विक्रम प्रस्थापित केला. पृथ्वी शॉ रणजी ट्रॉफीच्या इतिहासात सर्वात कमी चेंडूत शतक झळकावणारा सहावा फलंदाज ठरला.

त्याने त्याचे शतक ठोकल्यानंतर द्विशतक देखील पुर्ण केले आहे. पृथ्वी शॉ याने त्याचे द्विशतक हे १४१ चेंडुमध्ये पुर्ण केले आहे.

## भारतीय महिला खेळाडूने उचलले टोकाचे पाऊल

**नवी दिल्ली : दि.२७** प्रतिनिधी




आंतरराष्ट्रीय स्तरावर भारताचे प्रतिनिधित्व करणाऱ्या जुजित्सू खेळाडू आणि मार्शल आर्ट्स प्रशिक्षक रोहिणी कलम (वय ३५) यांनी आत्महत्या केल्याची घटना समोर आली आहे. मध्य प्रदेशातील देवासमध्ये ही घटना घडली आहे. अर्जुन नगर राधागंज येथील राहत्या घरी रोहिणी यांचा मृतदेह गळफास घेतलेल्या अवस्थेत आढळून आला.

आष्टा येथील एका खासगी शाळेत क्रीडा प्रशिक्षक असलेल्या रोहिणी यांनी रविवारी सकाळी १० वाजता आपल्या वडिलांसोबत आणि बहिणींसोबत चहा-नाश्ता केला. त्यानंतर फोनवर बोलत त्या आपल्या खोलीत गेल्या आणि आणि पंख्याला दोरी लावून घेत त्यांनी टोकाचे पाऊल उचलले. तर रोहिणीची आई आणि भाऊ खाटू श्यामच्या दर्शनासाठी गेले होते आणि रविवारी संध्याकाळी परतणार होते. घटनेच्या एक दिवस आधी सकाळी रोहिणीने आपल्या आईशी फोनवर संवाद साधला होता. मात्र बराच वेळ रोहिणी बाहेर न आल्याने त्यांची बहीण रोशनी आणि कुटुंबातील इतरांनी दरवाजा तोडून त्यांना बाहेर काढले आणि जिल्हा रुग्णालयात नेले. मात्र डॉक्टरांनी तिला मृत घोषित केले. या घटनेमुळे त्यांच्या कुटुंबाला देखील धक्का बसला आहे. दरम्यान, रोहिणीचे वडील महेश कलम यांनी सांगितले की, ती शाळेतील आपल्या नोकरीमुळे त्रस्त होती आणि अलीकडेच झालेल्या शस्त्रक्रियेनंतरही तणावात होती.

## शतक झळकावल्यानंतर करुण नायरने निवडकर्त्यांवर साधला निशाणा!

**नवी दिल्ली : दि.२७** प्रतिनिधी




करुण नायरची गेल्या दोन-तीन वर्षांत देशांतर्गत क्रिकेटमध्ये कामगिरी चांगली राहिली आहे. त्यामुळे त्याला इंग्लंडविरुद्धच्या कसोटी मालिकेसाठी टीम इंडियामध्ये स्थान मिळाले. तो ७ वर्षांनी पुन्हा भारताकडून खेळताना दिसला. तथापि, नायर या मालिकेत केवळ २०५ धावा करू शकला. त्याला वेस्ट इंडिजविरुद्धच्या पुढील मालिकेतून वगळण्यात आले. दरम्यान, बीसीसीआयचे मुख्य निवडकर्ता अजित आगरकर म्हणाले होते की त्यांना करुण नायरकडून खूप चांगल्या कामगिरीची अपेक्षा आहे. आता, रणजीमध्ये शतक ठोकल्यानंतर, नायरने निवडकर्त्यांवर जोरदार हल्लाबोल केला आहे. गोव्याविरुद्ध करुण नायरने १७४ धावांची नाबाद खेळी केली. सामन्यानंतर त्याने टीम इंडियामधून वगळल्याबद्दल बोलले आणि निवडकर्त्यांवर निशाणा साधला. त्याला वाटले की तो अधिक संधींना पात्र आहे परंतु त्यांना ते नाकारण्यात आले. तो म्हणाला, "मी स्वतः साठी काही ध्येये ठेवली आहेत, ज्यांची मी चर्चा करणार नाही, परंतु माझे मुख्य ध्येय सामने जिंकणे आहे. हे (टीम इंडियामधून वगळले जाणे) खूप निराशाजनक आहे. नायर पुढे म्हणाला, "गेल्या दोन वर्षांचा अनुभव पाहता, मी तिथे असण्यास पात्र होतो हे मला माहिती आहे. लोकांचे स्वतःचे मत असेल, पण मला वाटते की मी त्यापेक्षाही चांगल्या कामगिरीला पात्र होतो. फक्त एका म[illegible] जास्त. मी संघातील काही लोकांशी [illegible] आहे.

## सोफी डिव्हाइनचा वनडे क्रिकेटला अलविदा!

### शेवटच्या सामन्यानंतर झाली भावूक

**नवी दिल्ली : दि.२७** प्रतिनिधी





आयसीसी महिला वनडे विश्वचषक २०२५ मध्ये न्यूझीलंड महिला संघाला अपेक्षित यश मिळाले नाही. लीग टप्प्यात खेळलेल्या सात सामन्यांपैकी केवळ एकाच सामन्यात विजय मिळवता आला, ज्यामुळे संघ गुणतालिकेत सहाव्या स्थानावर राहिला. त्यांना लीग टप्प्यातील शेवटच्या सामन्यात इंग्लंडविरुद्ध ८ गडी राखून एकतर्फी पराभव स्वीकारावा लागला. हा सामना न्यूझीलंडची कर्णधार आणि दिग्गज खेळाडू सोफी डिव्हाइनचा वनडेमधील अखेरचा सामना होता.

या पराभवासह तिला आपल्या कारकिर्दीला निरोप द्यावा लागला, आणि मैदान सोडताना ती भावूक झाल्याचे दिसून आले. सामना संपल्यानंतर सोफी डिव्हाइनने आपल्या भावना व्यक्त केल्या. ती म्हणाली, "मी विजयासह निरोप घ्यायला इच्छुक होते, पण दुर्दैवाने ते शक्य झाले नाही. भावूक होण्याबाबत मी जितके विचार केले होते, तितके मी रडले नाही. निवृत्तीची घोषणा आधी केल्याचा फायदा असा झाला की, मी माझ्या भावनांना समजू शकले. आजचा दिवस मला आनंदाने जगता आला आणि १९ वर्षांपूर्वीच्या सुरुवातीच्या आठवणींना उजाळा देता आला."विशेष म्हणजे, सोफी डिव्हाइन न्यूझीलंडसाठी वनडेमध्ये सर्वाधिक काळ खेळणारी दुसरी महिला खेळाडू आहे. याबाबत तिच्यापुढे फक्त सुझी बेट्स आहे.न्यूझीलंड महिला संघाने या सामन्यात प्रथम फलंदाजी करताना केवळ १६८ धावांपर्यंत मजल मारली.

इंग्लंडने हे लक्ष्य २९.२ षटकांत सहज गाठले. सामना संपल्यानंतर इंग्लंडच्या खेळाडूंनी सोफी डिव्हाइनला तिच्या शानदार वनडे कारकिर्दीच्या सन्मानार्थ गार्ड ऑफ ऑनर दिले आणि शुभेच्छा दिल्या.

# परदेशी गुंतवणुकदारांची भारतीय बाजारातून माघार

**नवी दिल्ली : दि.२७** प्रतिनिधी






या वर्षी भारतीय बाजारपेठेतून परदेशी गुंतवणूकदारांनी अंदाजे १७ अब्ज डॉलर्स (अंदाजे ₹१.५० लाख कोटी) काढून घेतले आहेत. मोठ्या प्रमाणात पैसा बाहेर जाण्याच्या भीतीने, भारत आपल्या वित्तीय क्षेत्रात मोठ्या सुधारणा राबवण्याचा प्रयत्न करत आहे. अधिक पैसे आकर्षित करणे आणि गुंतवणूक वाढवणे हे यामागील उद्दिष्ट आहे, विशेषतः अमेरिकेच्या शुल्काच्या भारताच्या अर्थव्यवस्थेवर होणाऱ्या परिणामांबद्दल चिंता वाढत असताना हे मोठे पाऊल मानले जाते आहे. अलिकडच्या काही महिन्यांत, भारतीय रिझर्व्ह बँक आणि बाजार नियामक सेबीने परदेशी गुंतवणूकदारांना आकर्षित करण्यासाठी आणि कर्ज वाढवण्यासाठी अनेक पावले उचलली आहेत. यामध्ये कंपन्यांना शेअर बाजारात सूचीबद्ध करण्याची प्रक्रिया सोपी करणे, परदेशी निधी आणि परदेशी बँकांना भारतात प्रवेश करण्याचा मार्ग मोकळा करणे आणि कंपन्यांना कर्जे मिळण्यास सुलभ करणारे आणि बँकांना विलीनीकरणासाठी वित्तपुरवठा करण्यास सक्षम करणारे नियम तयार करणे समाविष्ट आहे. रॉयटर्सने सूत्रांचा हवाला देत वृत्त दिले की पुढील सहा ते बारा महिन्यांत भारताच्या २६० अब्ज डॉलर्सच्या वित्तीय क्षेत्रात आणखी अनेक सुलभ नियमांचा विचार केला जात आहे. या संभाव्य बदलांमध्ये लहान शहरांमधील अधिक सामान्य गुंतवणूकदारांना शेअर बाजारात सहभागी होण्यासाठी प्रोत्साहित करणे आणि बँकिंग नियम आणखी शिथिल करणे समाविष्ट आहे. पंतप्रधान नरेंद्र




मोदी देशाला आर्थिकदृष्ट्या अधिक स्वावलंबी बनवण्यावर भर देत असताना दशकांपूर्वीचे नियम रद्द करण्याचा हा निर्णय घेण्यात आला आहे. अमेरिकेच्या शुल्काचा भारताच्या आर्थिक विकासावर होणाऱ्या परिणामांबद्दलच्या चिंतेने परदेशी गुंतवणूकदारांना अस्वस्थ केले आहे.परदेशी गुंतवणूकदारांनी या वर्षी भारतीय इक्विटीमध्ये अंदाजे १७ अब्ज विकले आहेत. २०२४ मध्ये हे १२४ दशलक्ष आणि २०२३ मध्ये २० अब्ज इतके होते. या विक्रीमुळे परकीय पोर्टफोलिओ बाहेर जाण्याच्या बाबतीत भारत आशियातील सर्वात प्रभावित बाजारपेठ बनला आहे. यामुळे भारताची चिंता सध्या वाढली आहे असं म्हटलं तर वावगं ठरणार नाही. दरम्यान भारत आता आपली पुढील पावलं नक्कीच योग्य पद्धतीने टाकेल अशी अपेक्षा आहे. भारतात नियम हळूहळू शिथिल करण्याचे हे पाऊल अलिकडच्या काही महिन्यांत चीनने उचललेल्या पावलांशी जुळते.

**तंत्रज्ञान** | **८५५ कोटींची नवी कंपनी स्थापन!**

# रिलायन्सने मेटा सोबत मिळविला हात

**नवी दिल्ली :दि.२७** प्रतिनिधी




भारतातील सर्वात मोठ्या व्यावसायिक समूहांपैकी एक असलेल्या रिलायन्स इंडस्ट्रीज लिमिटेड ने मेटा प्लॅटफॉर्म्स च्या फेसबुक ओव्हरसीज कंपनीसोबत भागीदारी करत एका नवीन आर्टिफिशियल इंटेलिजन्स संयुक्त उपक्रमाची घोषणा केली आहे. या नवीन कंपनीचे नाव रिलायन्स एंटरप्राइज इंटेलिजेंस लिमिटेड असेल आणि ती भारतात एंटरप्राइज एआय सेवांचा विकास आणि व्यवसाय करेल.

दोन्ही कंपन्या मिळून सुमारे ८५५ कोटी रुपयांची प्रारंभिक गुंतवणूक करतील. या नवीन कंपनीत रिलायन्स इंटेलिजन्सची ७० टक्के आणि फेसबुकची (मेटा) ३० टक्के हिस्सेदारी असेल. सुरुवातीला रिलायन्स इंटेलिजन्सने २ कोटी रुपयांच्या भांडवलासह रिलायन्स इंडस्ट्रीज लिमिटेडची १००% उपकंपनी म्हणून स्थापना केली होती, जी आता करारानुसार संयुक्त उपक्रम म्हणून काम करेल. रिलायन्स इंडस्ट्रीज लिमिटेडच्या स्थापनेसाठी कोणत्याही सरकारी किंवा नियामक मंजुरीची आवश्यकता नव्हती, असे कंपनीने स्पष्ट केले आहे.

रिलायन्सची ही नवीन एआय कंपनी भारतात मोठ्या उद्योगांसाठी अद्ययावत एआय तंत्रज्ञान आणि सोल्यूशन्स उपलब्ध करून देण्यावर लक्ष केंद्रित करेल.

ही कंपनी मेटाच्या ओपन-सोर्स लार्ज लँग्वेज मॉडेल वर आधारित 'एजेंटिक एंटरप्राइझ प्लॅटफॉर्म' आणि टूल्स विकसित करण्यावर भर देईल. ऑगस्टमध्ये झालेल्या च्या ४८ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेत मेटाचे संस्थापक मार्क झुकरबर्ग यांनी व्हर्च्युअल माध्यमातून सहभाग घेतला होता. मॉडेल मानवी क्षमता, उत्पादकता आणि नवनवीनता वाढवू शकते, असे त्यांनी म्हटले होते. मुकेश अंबानी यांनी याच मध्ये 'रिलायन्स इंटेलिजन्स' या एआय क्षेत्रातील महत्त्वाकांक्षा पूर्ण करणाऱ्या उपकंपनीची घोषणा केली होती, याच घोषणेनंतर आता हा संयुक्त उपक्रम औपचारिकरित्या अस्तित्वात आला आहे.

## पुन्हा एकदा मिस्त्री विरुद्ध टाटा वाद पेटला!

**नवी दिल्ली : दि.२७** प्रतिनिधी



गेल्या वर्षी ऑक्टोबर २०२४ मध्ये रतन टाटांचे निधन झाले आणि तेव्हापासून टाटा समूहातील सुस्थिती विस्कळीत झाली आहे. टाटा ट्रस्ट मधील मतभेद आता समोर आले असून सर दोराबजी टाटा ट्रस्ट आणि सर रतन टाटा ट्रस्टचे विश्वस्त मेहली मिस्त्री यांचा कार्यकाळ २८ ऑक्टोबर रोजी संपत असताना तिन्ही विश्वस्तांनी अद्याप त्यांच्या पुनर्नियुक्तीला मान्यता दिलेली नाही.टाटा समूह आपल्या १५७ वर्षांच्या इतिहासातील सर्वात मोठ्या वादाचा सामना करत आहे. या वादात संवेदनशील मानले जाणारे नोएल टाटा आपल्या निर्णयावर ठाम असल्याचे दिसून येत आहेत. टाटा ट्रस्टचे अध्यक्ष नोएल टाटा , उपाध्यक्ष वेणू श्रीनिवासन आणि विश्वस्त विजय सिंह यांनी मेहली मिस्त्री यांच्या विश्वस्तपदी पुनर्नियुक्तीला पाठिंबा न देण्याचा निर्णय घेतला असून येत्या काही तासांत मेहली मिस्त्रींचा टाटा ट्रस्टचे विश्वस्त म्हणून पहिला कार्यकाळ संपुष्टात येईल. परिणामी टाटा समूहाचा वाद पुन्हा एकदा न्यायालयाच्या दारी पोहोचण्याची भीती आहे. टाटा सन्स ही देशातील सर्वात मोठ्या औद्योगिक घराणं, टाटा ग्रुपची होल्डिंग कंपनी असून या कंपनीत टाटा ट्रस्टचा बहुसंख्य हिस्सा आहे.

# पोलिस कर्तव्य मेळाव्यात नागपूर पोलिस 'अव्वल'

## स्पर्धकांनी ६ सुवर्ण, ५ रौप्य, ४ कास्य पदकांसह मानाचे ३ चषकही जिंकले

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**नागपूर, दि. २७ : विसाव्या महाराष्ट्र राज्य पोलिस कर्तव्य मेळाव्यात नागपूर शहर पोलिस दल राज्यात अव्वल ठरले आहे यातील सहभागी स्पर्धकांनी ६ सुवर्ण, ५ रौप्य, ४ कास्य पदकांसह मानाचे ३ चषकही जिंकले आहेत. पोलिस आयुक्त डॉ. रवींद्र कुमार सिंगल यांच्या प्रेरणादायी मार्गदर्शनाखाली नागपूर शहर पोलिसांनी ही अत्यंत उल्लेखनिय कामगिरी केली आहे उत्कृष्ट कामगिरी करून पदके मिळविणे ही प्रत्येक संघासाठी सन्मानाची बाब मानली जाते.**



महाराष्ट्र राज्य गुप्तवार्ता प्रबोधिनी व राज्य राखीव पोलिस बल गट क्रमांक एक आणि दोन यांच्या वतीने आयोजित स्पर्धेत नागपूर शहर पोलिस आयुक्तालयाच्या संघात २७ स्पर्धकांचा समावेश होता. यात पाच अधिकारी, २२ महिला अंमलदार तसेच रेवन आणि मॅक्स हे दोन प्रशिक्षित श्वान सहभागी होते. कर्तव्य मेळाव्याचा मुख्य उद्देश म्हणजे अधिकारी व अंमलदार यांच्या व्यावसायिक कौशल्याचा विकास करणे, त्यांच्या कामगिरीला वाव देणे आणि सेवाभाव दृढ करणे हा आहे. स्पर्धेत राज्यातील १६ आयुक्तालये, परिक्षेत्रे तसेच विविध अकार्यकारी शाखांचा सहभाग होता. स्पर्धेत एकूण सहा प्रकारच्या स्पर्धांचा समावेश होता यात नागपूर आयुक्तालयाने एकूण १५ पदके (६ सुवर्ण, ५ रौप्य, ४ कास्य) पटकावून महाराष्ट्र राज्यात 'अव्वल' क्रमांक मिळवला असून, तीन मानाचे चषक प्राप्त केले. या अभिमानास्पद यशाचा गौरव करण्यासाठी पोलिस आयुक्त डॉ. रवींद्र कुमार सिंगल यांच्या हस्ते विशेष सत्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले.

कार्यक्रमात प्रशिक्षकांचाही विशेष सत्कार करण्यात आला. यात फॉरेन्सिक एक्स्पर्ट डॉ. आशिष बढीये व डॉ. नीती कपूर, डॉ. अनिंद्या मुखर्जी प्राध्यापक व विभागप्रमुख, गव्हर्नमेंट मेडिकल कॉलेज नागपूर, डॉ. मंदार साने व डॉ. हंसी बन्सल एम्स नागपूर, श्रीकांत अर्धापूरकर कम्प्युटर अवेअरनेस, सहाय्यक पोलिस निरीक्षक प्रवीण मून फिंगरप्रिंट एक्स्पर्ट सीआयडी, अमोल सहारे, बळीराम रेवतकर व दीपक बुलबुले फोटोग्राफी व व्हिडिओग्राफी यांचा समावेश आहे

सहपोलिस आयुक्त नवीनचंद्र रेड्डी, पोलिस आयुक्त वसंत परदेशी, डॉ. शिवाजी राठोड, राजेंद्र दाभाडे तसेच सर्व उपायुक्त आणि सर्व सहाय्यक पोलिस आयुक्त मान्यवर उपस्थित होते. सूत्रसंचालन जनसंपर्क अधिकारी सहाय्यक पोलिस निरीक्षक अमोल दोंड यांनी केले. पोलिस निरीक्षक ललिता तोडासे यांनी उपस्थितांचे आभार मानले.

पोलिस आयुक्त डॉ. रवींद्र कुमार सिंगल यांनी स्पर्धक, प्रशिक्षक, समिती सदस्य आणि अधिकारी-अंमलदारांचे अभिनंदन केले. महाराष्ट्र राज्यात अवल क्रमांक पटकावणे हे संपूर्ण नागपूर शहर पोलिस दलासाठी अभिमानास्पद यश आहे. या यशाचा पाया प्रत्येक स्पर्धक, प्रशिक्षक आणि समिती सदस्यांच्या प्रामाणिक परिश्रमात आहे. मागील वेळी ९ पदके मिळवली होती. यंदा ती वाढून १५ झाली आहेत. हे आपल्या दलाच्या कौशल्यवृद्धीचे द्योतक आहे. पुढील वर्षांतही याच उत्साहाने आणि जिद्दीने अधिक पदके जिंकून नागपूर पोलिस दलाचे नाव राज्यात अग्रस्थानी ठेवूया, असा विश्वास आयुक्त डॉ. रवींद्र कुमार सिंगल यांनी व्यक्त केला

### पदक विजेते

- पोलिस निरीक्षक प्रशांत ठवरे- ४ पदके
- पोलिस हवालदार पलाश वाघमारे -२ सुवर्ण
- पोलिस अंमलदार प्रतीक्षा नागपुरे -२ सुवर्ण
- पोलिस अंमलदार कृणाल उके -१ सुवर्ण
- पोलिस उपनिरीक्षक अपूर्वा बोरकर -२ रौप्य
- पोलिस हवालदार प्रदीप शिरसे -१ रौप्य
- पोलिस हवालदार रसिका घायवट-१ कास्य
- सहाय्यक पोलिस निरीक्षक अश्विनी काळे -२ कास्य

## थोडक्यात

### छट पुजासाठी विशेष सोय

**नागपूर :** उत्तर भारतीयांचा धार्मिक उत्सव छठ पूजाला विशेष महत्त्व असून, यानिमित्त नागपूर महानगरपालिकेतर्फे अंबाझरी तलाव आणि फुटाळा तलाव, पोलिस लाईन टाकळी, गोरेवाडा येथे सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. मनपाच्या घनकचरा व्यवस्थापन विभागाचे उपायुक्त राजेश भगत यांनी सोमवारी फुटाळा तलाव येथे उपलब्ध करून देण्यात आलेल्या विविध सुविधांची पाहणी केली. मुख्य स्वच्छता अधिकारी डॉ. महल्ले यांच्यासह अन्य अधिकारी-कर्मचारी उपस्थित होते. उत्तर भारतीयांचा धार्मिक उत्सव छठ पूजा नागपुरात हर्षोल्हासात साजरा केला जातो. भाविकांसाठी अंबाझरी तलाव आणि फुटाळा तलाव, पोलिस लाईन टाकळी, गोरेवाडा येथे सुविधा उपलब्ध करून दिली गेली आहे. प्रामुख्याने अंबाझरी तलाव येथे छठ पूजानिमित्त परिसराची साफसफाईवर विशेष लक्ष आहे. भाविकांना तलावापर्यंत येण्यासाठी मार्ग सुशोभित करून सुरक्षेसाठी कठडे लावण्यात आले आहेत. याशिवाय विद्युत व्यवस्था, पेयजल व्यवस्था केली आहे. सुरक्षेच्या दृष्टीने पूजा स्थळी उभे राहण्यासाठी स्टँड उभारण्यात आले असून, सुरक्षा व्यवस्था तसेच तलावाच्या काठावर कपडे बदलण्याची तात्पुरत्या स्वरुपात खोल्या तयार करण्यात आल्या आहेत. याशिवाय परिसराची स्वच्छता करण्यासाठी स्वच्छता कर्मचाऱ्यांची नियुक्ती केली आहे. पर्यावरण संरक्षणाच्यादृष्टीने निर्माल्य तलावात टाकू नये, यासाठी सहकार्य करण्याचे आवाहन मनपाद्वारे करण्यात आले आहे.


### 'ग्रीन उद्योजकता' कार्यशाळा उद्या

**नागपूर :** विदर्भ इंडस्ट्रीज असोसिएशन (व्हीआयए) च्या ॲग्रो रुरल डेव्हलपमेंट आणि फूड प्रोसेसिंग फोरमतर्फे 'ग्रीन उद्योजकता: पान शेती, मायक्रोग्रीन्स आणि नैसर्गिक शेती' या विषयावर कार्यशाळेचे आयोजन २९ ऑक्टोबर रोजी दुपारी अडीच वाजता उद्योगभवन येथे करण्यात आले आहे.
प्रमुख वक्ते अरुण वझे, डॉ. योगेश पावशे, संजय सिन्हा शाश्वत शेती, मायक्रोग्रीन्स आणि नैसर्गिक शेतीविषयी मार्गदर्शन करतील. शेतकरी, कृषी उद्योजक आणि स्टार्ट-अप्स यांना हरित व नफ्याची शेती स्वीकारण्यासाठी प्रोत्साहित करणे हा या उपक्रमाचा उद्देश आहे.

### २ नोव्हेंबरला भावसार मेळावा

**नागपूर:** भावसार क्षत्रिय समाजाच्या शताब्दी वर्षानिमित्त अखिल भारतीय उपवधू-वर परिचय मेळावा २ नोव्हेंबर रोजी कविवर्य सुरेश भट सभागृह येथे आयोजित करण्यात आला आहे. ऑल इंडिया भावसार क्षत्रिय महासभा, भावसार कल्याणम् ट्रस्ट आणि नागपूर भावसार क्षत्रिय समाज पंचकमेटी यांच्या संयुक्त विद्यमाने मेळाव्याचे आयोजन केले आहे.
केंद्रीय मंत्री नितीन गडकरी, पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे आमदार कृष्णा खोपडे, आमदार प्रवीण दटके, गिरीश वायचळ, देवराव फुलझेले आदी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहतील. कर्नाटक, आंध्र प्रदेश, तेलंगणा, मध्य प्रदेश, गुजरात, छत्तीसगड आदी राज्यांमधील वधू-वर आणि पालक सहभागी होणार आहेत. पालकांना त्यांच्या मुला-मुलींसाठी योग्य जोडीदार निवडण्यात मदत व्हावी म्हणून सर्व उपवधू-वरांची माहिती आणि संपर्क क्रमांकासह अनुरूप स्मरणिका प्रसिद्ध करण्यात येणार आहे.

### निर्मळता कधी...



**नागपूर : नागनदी नागपूर शहराचे वैभव यंदाच्या पावसाळ्यात सरासरीपेक्षा अधिक पाऊस कोसळला. कोसळला तसा वाहून गेला नागनदी मात्र अद्यापही घाण आणि काळेकुट्ट पाणी वाहून नेत आहे. आपल्या वाट्याला निर्मळ पाणी कधी येईल,अशी आर्त हाक ती देत नसेल कशावरून...! आज रविवारी अशोक चौक परिसरात हे चित्र दिसून आले.**

### नागुला चतुर्थी उत्सव साजरा

**नागपूर, दि. २७ :** बेलिशॉप मोतीबाग रेल्वे कॉलनी येथील प्राचीन शिव मंदिरात दीपावली उत्सवाच्या चौथ्या दिवशी दक्षिण भारतीय तेलुगू समाजाने पारंपरिक पद्धतीने नागुला चतुर्थी उत्सव उत्साहात साजरा केला. त्या ठिकाणी सकाळी लवकर महिलावर्ग पारंपरिक वेशभूषेत कुटुंबासह सहभागी होते. हा उत्सव बेलिशॉप मोतीबाग रेल्वे कॉलनीतील प्राचीन शिव मंदिराच्या आवारात पार पडला. असे मानले जाते की या मंदिरात नागदेवताचा वास अनेक वर्षांपासून आहे आणि ठराविक काळाने नागदेवता येथे दर्शन देतात अशी श्रद्धा आहे. नागदेवताचे स्थान शिवमंदिराच्या परिसरात असल्यामुळे भाविकांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते. आयोजनासाठी प्रकाश (गुंडुराव), पी. सत्याराव, डॉ. प्रवीण डबली, रामकृष्ण पटनायक, पी. विजय तसेच मंदिर समितीचे सदस्य आणि तेलुगू समाजातील श्रद्धाळूंनी सहकार्य केले.

# एकाच वेळी नव्या पाच पोलिस चौक्या कार्यरत

## पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळेंच्या हस्ते उद्घाटन

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**नागपूर, दि. २७ :** पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या हस्ते एकाच वेळी नव्या पाच पोलिस चौक्यांचे उद्घाटन करण्यात आले पोलिस आयुक्त कार्यालय येथे दूरदृष्य प्रणालीद्वारे नव्या चौक्यांचा शुभारंभ पार पडला. शहराच्या वाढत्या विस्ताराला लक्षात घेऊन सुरक्षितता व सुरक्षा नियोजनाच्या दृष्टीने काही भागांसाठी पोलिस चौक्यांची आवश्यकता होती.



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नागपूर शहराच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने दिलेले निर्देश लक्षात घेऊन शहरातील पाच ठिकाणी चौक्यांची उपलब्धता करण्यात आली आहे. यामुळे निश्चितच नागपूर शहरातील वाहतूक सुरळीत होण्यासह अपघाताचे प्रमाण कमी होईल, असा विश्वास पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी व्यक्त केला.

पोलिस आयुक्त रवींद्रकुमार सिंगल, सहपोलिस आयुक्त नवीनचंद्र रेड्डी, अपर पोलिस आयुक्त राजेंद्र दाभाडे, शिवाजी राठोड, पोलिस उपायुक्त लोहित मतानी, दीपक अग्रवाल व वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. गणेश नगर कोराडी, कापसी, जामठा, गोंडखैरी, उमरगाव याठिकाणी पोलिस चौकी साकारण्यात आल्या आहेत. पोलीस विभागाच्या यु-टर्न ऑपरेशनमुळे वाहतुक सुरक्षित होणार असून अपघाताचे प्रमाण कमी होणार आहे. नागपूर शहर आता आंतराष्ट्रीय शहर म्हणून नावारुपास आले आहे. सुरक्षित नागपूरसाठी युवकांचा सहभाग आवश्यक असून,त्यासाठी पोलिस विभागाने युवकांना सोबत घेऊन सुरक्षित नागपूर उपक्रमाला लोकसहभागाची जोड द्यावी, असे आवाहन पालकमंत्री बावनकुळे यांनी केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक वाहतूक पोलिस उपायुक्त लोहित मतानी यांनी केले. यू- टर्न ऑपरेशनमुळे कायदा व सुव्यवस्था सुरळीत होण्यास मोठा हातभार लागणार असून, नागरिकांसाठी वाहतूक सोयीची होईल, असे त्यांनी सांगितले.

# ई-रिक्षाला धडक लागली, वादातून झाली एकाची हत्या

## काही क्षणाचा संताप एकाचा जीव घेऊन गेला

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**नागपूर, दि. २७ :** ई-रिक्षाला धडक दिल्याने उद्भवलेल्या वादातून कुख्यात गुंडाने साथीदारांच्या मदतीने कारचालकाची निर्घृण हत्या केली. यात गुंडही जखमी झाला. ही थरारक घटना कपिलनगर पोलिस ठाण्याच्या हद्दीतील म्हाडा कॉलनी परिसरात घडली.

राजेश विश्वास ओरेकर (नारी वस्ती), असे मृताचे नाव आहे. पोलिसांनी कुख्यात हर्षल कुथे,त्याचा भाऊ गौरव, तब्बा, लक्की, राभा व अन्य तिघांविरूद्ध खुनासह विविध कलमान्वये गुन्हा दाखल केला. हर्षल व गौरवला अटक केली असून, एका सतरा वर्षीय अल्पवयीन मुलाला ताब्यात घेतले आहे. माहितीनुसार, शनिवारी राजेश हा त्याच्या कारने मित्र पिंटू सुरेश राजपूत, अण्णा सहारे (म्हाडा कॉलनी) आणि संजय आदी मनसर येथून आले. रात्री १० वाजताच्या सुमारास संजय व अण्णा या दोघांना म्हाडा क्वॉर्टरमध्ये पोहोचविले. यानंतर राजेश व पिंटू घरी जात होते. याचदरम्यान राजेशचे कारवरील नियंत्रण सुटल्याने रस्त्यावर उभ्या ई-रिक्षाला धडक बसली. आवाज येताच ई-रिक्षा मालक व त्यात्या पत्नीने पिंटू व राजेशसोबत वाद सुरू केला. नुकसान भरपाई देण्याचे आश्वासन यावेळी राजेशने दिले मात्र, ई-रिक्षा मालकाने मोबाईलवर संपर्क साधला. काही मिनिटांत हर्षल, गौरव व त्याचे साथीदार आले. त्यांनी राजेश व पिंटूला मारहाण सुरू केली. झटापटीत हर्षलही जखमी झाला. राजेश व पिंटूने त्यांच्या तावडीतून सुटका केली. दोघेही वेगवेगळ्या दिशेने पळ काढला;परंतु हर्षल व त्याच्या साथीदारांनी पाठलाग करून राजेशला पकडले. चाकूने त्याच्या शरीरावर वार केले. राजेश रक्ताच्या थारोळ्यात जमिनीवर कोसळला. यानंतर हर्षल हा सहका०यांसह पसार झाला.

### कागद गोदामाला भीषण आग

**नागपूर, दि. २७ :** नागपूर, पावनगाव परिसरातील कागद गोदामाला रात्री अचानक भीषण आग लागली. घटनेची माहिती मिळताच मनपा अग्निशमन विभागाचे पथक घटनास्थळी पोहोचून आग विझविण्यात यश मिळविले. शनिवारी रात्री आठ वाजताच्या सुमारास गोदामात आग लागली. यावेळी रस्त्याने जात असलेल्या प्रियांशू कनोजिया नावाच्या व्यक्तीने मनपा अग्निशमन विभागाला घटनेची माहिती दिली. तत्काळ कळमणा, वाठोडा आणि सुगतनगर अग्निशमन केंद्रांतून चार बंब घटनास्थळी पोहोचले. चारही बाजूंनी पाण्याचा मारा करीत जवळपास दोन तासांच्या प्रयत्नांनंतर आगीवर नियंत्रण मिळविण्यात यश आले. सुदैवाने घटनेत कोणतीही जीवितहानी किंवा दुखापत झाली नाही. शॉर्ट सर्किटमुळे आग लागल्याचा अंदाज व्यक्त होत आहे.

# अमृत दुर्गोत्सवासाठी नोंदणी १० नोव्हेंबरपर्यंत

## किल्ल्यांच्या प्रतिकृतींचा होणार गौरव

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**नागपूर, दि. २७ :** दुर्गप्रेमींनी १२ किल्ल्यांच्या प्रतिकृती साकारल्या असतील, अशा दुर्गप्रेमींना अमृतमार्फत गौरविण्यात येणार आहे.

दिवाळी सणाचे औचित्य साधून घरोघरी विविध किल्ल्यांच्या प्रतिकृती महाराष्ट्रातील असंख्य दुर्गप्रेमी साकारतात. यात युनेस्कोने आपल्या जागतिक वारसा स्थळांच्या यादीत समावेश केलेल्या छत्रपती शिवाजी महाराजांच्या १२ दुर्गांना मानवंदना देण्यासाठी अमृतच्या माध्यमातून दुर्गोत्सव हा उपक्रम हाती घेण्यात आला आहे. हा उपक्रम लोकोत्सव म्हणून साजरा केला जात आहे.

'अमृत महाराष्ट्र'आयोजित या उपक्रमात महाराष्ट्रातील १२ ऐतिहासिक किल्ल्यांची (दुर्ग) प्रतिकृती साकारणा०या दुर्गप्रेमींनी केलेली दुर्ग अथवा गडाची प्रतिकृती आपल्या सेल्फीसह अधिकृत संकेतस्थळावर अपलोड करावी रजिस्ट्रेशन व फोटो अपलोड करण्याची अंतिम तारीख १० नोव्हेंबर असून, सदर प्रक्रिया अत्यंत सोपी आहे. रायगड, सिंधुदुर्ग, प्रतापगड, साल्हेर, सुवर्णदुर्ग, पन्हाळा, लोहगड, राजगड, जिंजी आणि विजयदुर्ग, शिवनेरी, खांदेरी या किल्ल्यांचा समावेश आहे. यापैकी कोणत्याही गडदुर्गाची प्रतिकृती सेल्फीद्वारे अपलोड करायची आहे. यात आपले स्वत:चे नाव व जिल्हा नमुद करावयाचा आहे. यातील सहभागीतांना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या स्वाक्षरीचे अभिनंदन पत्र दिले जाणार आहे. अधिक माहितीसाठी अमृतच्या जिल्हा कार्यालयाच्या ७३८७३४९६५५, ९०९६३१५१६५. ९१४६१५५२३१, ७९७२७९७४३२ क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

विशेष मोहीम ५.०... १.४३ कोटींचा महसूल प्राप्त,जैव शौचालयांची स्थापना

# वेकोलितर्फे सुधारित मानकांची पूर्तता

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**नागपूर, दि. २७ :** कोळसा मंत्रालयाच्या अखत्यारीतील कोल इंडिया लिमिटेडची उपकंपनी असलेल्या वेस्टर्न कोलफिल्ड्स लिमिटेडने २ ते ३१ ऑक्टोबर या कालावधीसाठीच्या स्वच्छता आणि कार्यक्षमतेविषयक विशेष मोहीमेअंतर्गत उल्लेखनिय यश संपादन केले आहे. या अंतर्गत या आस्थापनेने नियोजनबद्धता, नवोन्मेष आणि सर्वसमावेशक उपक्रमांच्या माध्यमातून स्वच्छता आणि कार्यक्षमतेसंबंधी १०० उद्दिष्टे साध्य केली आहेत.

वेकोलिकडून एकूण २५७ ठिकाणांची स्वच्छता करण्यात आली असून, २२३ मेट्रिक टन भंगाराची शास्त्रीय पद्धतीने विल्हेवाट लावण्यात आली याअंतर्गत पुनर्निर्मिती आणि पुनर्वापराद्वारे १.४३ कोटी रुपये महसूलही प्राप्त केला.वेस्टर्न कोलफिल्ड्स लिमिटेडने आपल्या कार्यक्षेत्रांमध्ये सर्वोत्तम पद्धतींचा अवलंब करत आस्थापनेच्या



संख्यात्मक पातळीवरच्या यशासोबतच, सर्जनशीलता, टिकाऊपणा आणि सर्वसमावेशकता प्रती असलेल्या वचनबद्धतेचेही दर्शन घडले. टाकाऊ लोखंडी आणि पोलादी सामानाचा वापर करून ई-कचरा संकलन केंद्रे तयार करण्यात आली होती. यामुळे अशा वस्तूंच्या जबाबदारपूर्ण पुनर्वापराला आणि चक्रीय अर्थव्यवस्थेशी संबंधितीत सर्वांनाही प्रोत्साहन मिळाले.यासोबतच कर्मचा०यांच्या मुलांसाठी ई कच०यापासून कलाकृती निर्मितीची कार्यशाळेचेही आयोजन करण्यात आले. वेकोलिसंबंधित अनेक परिसरात जैव शौचालयेही स्थापित केली आहेत. यामुळे स्वच्छता आणि आरोग्यविषयक सुधारित मानकांची अंमलबजावणी सुनिश्चित झाली आहे. वेस्टर्न कोलफिल्ड्स लिमिटेडच्या अखत्यारितील कार्यक्षेत्रा अंतर्गत 'सफाई मित्र' शिबिरांचेही आयोजन पार पडले. शिबीरांअंतर्गत १२५० हून अधिक कंत्राटी कामगारांना आणि साफसफाई कर्मचा०यांची आरोग्य तपासणी करण्यात आली. तसेच, त्यांना सुरक्षा संचाचे वाटपही केले गेले. याशिवाय माजरी येथील एकोना खाण क्षेत्रात महिलांद्वारे चालवल्या जाणा०या मनुष्यबळ कक्षाची स्थापनाही करण्यात आली.

### यशस्वी संगम

**वेस्टर्न कोलफिल्ड्स लिमिटेडने विशेष मोहीम ५.० अंतर्गत राबवलेल्या उपक्रमांतून स्वच्छता, सर्जनशीलता आणि सामुदायिक कल्याणाचा यशस्वी संगम साधला गेला. ही संस्था आपली पालक यंत्रणा असलेल्या कोळसा मंत्रालयाच्या स्वच्छ आणि अधिक उत्तरदायी भविष्याच्या दृष्टिकोनात महत्त्वपूर्ण योगदान देत आली असून, शाश्वत कार्यपद्धती, सर्वसमावेशकता आणि नवोन्मेषाच्या आधारे कचऱ्यांचे साधनसंपत्तीत रुपांतर करण्यासाठी वचनबद्ध आहे.**

# रोजगार मेळाव्यात ११३ उमेदवारांना नियुक्तीपत्र वितरित

## केंद्रीय मंत्री नितीन गडकरींची उपस्थिती

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**नागपूर, दि. २७ :** भारतीय टपाल विभागाच्या वतीने रोजगार मेळाव्यात ११३ उमेदवारांना नियुक्तीपत्र वितरित करण्यात आले यावेळी केंद्रीय मंत्री नितीन गडकरींची प्रमुख उपस्थिती होती.



भारतीय टपाल विभागाच्या वतीने नागपूरच्या राष्ट्रीय अग्निशमन महाविद्यालय राजनगर येथे आयोजित रोजगार मेळाव्यात केंद्रीय मंत्री रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांच्या हस्ते टपाल विभागात नियुक्त झालेल्या २५ उमेदवारांना प्रतिनिधी स्वरुपात नियुक्तीपत्र वितरित करण्यात आले. कार्यक्रमात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या भाषणाचे थेट प्रक्षेपण दाखवण्यात आले. नागपुरात आयोजित कार्यक्रमात ११३ जणांना नियुक्तीपत्र वाटप करण्यात आले. संबंधित उमेदवारांचा ग्रामीण डाक सेवा, टपाल विभाग याठिकाणी प्रवेश होणार आहे.

## प्रभातचे दोन रायफल शूटर राज्यस्तरावर..!

**अकोला :** प्रभात किड्स स्कूलच्या दोन रायफल शुटरनी विभाग स्तरीय स्पर्धेत उत्कृष्ट यश संपादन केल्याने त्यांची राज्यस्तरीय रायफल शुटींग स्पर्धेसाठी निवड झाली आहे. क्रीडा व युवक सेवा संचालनालय, पुणे अंतर्गत जिल्हा क्रीडा परिषद, जिल्हा क्रीडा संकुल व जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने विभाग स्तरीय रायफल शुटींग स्पर्धेचे आयोजन स्थानिक क्रीडा संकुल, अकोला येथे दि. १७ ते १९ ऑक्टोबर दरम्यान करण्यात आले होते. या विभाग स्तरीय रायफल शुटींग स्पर्धेत १४ वर्ष वयोगटातील मुलींमध्ये ओपन साईट प्रकारात पियुषा मानेवाघ हिने व्दितीय क्रमांक प्राप्त केला तसेच १४ वर्ष वयोगटातील मुलांमध्ये ओपन साईट प्रकारात अंश तारकस याने तृतीय क्रमांक पटकविला. या दोघांनीही आपल्या खेळामध्ये चमकदार कामगिरी केल्याने या खेळाडूंची राज्यस्तरावर निवड झाली आहे.

### महत्त्वाचे

## सोन्याचे दागिने चोरले!

**अकोला:** शहरातील नवीन बसस्थानकावर गर्दीचा फायदा घेत अज्ञात चोरट्याने एका महिलेला लक्ष्य करत तिच्या पर्समधील सोन्याचे दागिने चोरून नेल्याची घटना आज सकाळी उघडकीस आली आहे. या प्रकरणी सिव्हिल लाईन पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून तपास सुरू आहे. सविस्तर माहिती अशी की, फिर्यादी सौ. दिपाली गजानन काळे (वय ३३ वर्षे, व्यवसाय घरकाम, रा. कांदिवली ईस्ट, हनुमान नगर, मुंबई, मूळ रा. वृंदावन नगर, अकोला) या आज ग्राम कुटासा येथे जाण्यासाठी नवीन बसस्थानकावर आल्या होत्या. दरम्यान, त्या बसस्थानकावरील फलाट क्रमांक ९ वर बसची वाट पाहत होत्या. सकाळी अंदाजे १०:३० वाजता, त्यांनी आपली लेडीज पर्स उघडून त्यातील छोटी पर्स तपासली असता सोन्याचे दागिने सुरक्षित असल्याचे दिसून आले. थोड्याच वेळाने, ११:१५ वाजता, अकोला-अकोट जाणारी एस.टी. बस आल्यानंतर त्या पती व मुलांसह बसमध्ये चढल्या. गर्दीचा फायदा घेत, बसमध्ये चढताना कोणीतरी अज्ञात चोरट्याने त्यांच्या पर्समधील छोटी पर्स चलाखीने चोरून नेली. फिर्यादी बसमधून बसल्यानंतर, अकोट फाइल येथील रेल्वे पुलाजवळ पोहोचल्यावर त्यांनी पर्स उघडून पाहिले असता छोटी पर्स बेपत्ता असल्याचे लक्षात आले. त्यामध्ये सोन्याचा नेकलेस (१० ग्रॅम) किंमत ₹४०,०००, मोठी पोत व पेंडॉल (५ ग्रॅम) किंमत ₹२०,०००, छोटी पोत मणी व डोरले (३ ग्रॅम) किंमत ₹१२,०००, सोन्याची लहान अंगठी (३ ग्रॅम) किंमत ₹९,०००, असा एकूण ८१ हजार रुपयांचा मुद्देमाल चोरीला गेला आहे.

# सकल आदिवासी एकता महासंघाचा जनआक्रोश मोर्चा

### एसटी आरक्षणाला धक्का लागल्यास उद्रेकाचा इशारा




**दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी**

**अकोला, दि. २७ :** अनुसूचित जमातीमध्ये अन्य कोणत्याही जातीला समाविष्ट करून घेतल्यास आणि आरक्षणाला धक्का लागल्यास उद्रेक होईल, असा इशारा देत सोमवारी सकल आदीवासी एकता महासंघाने जनआक्रोश मोर्चा काढला. आदिवासी बंधू-भगिनींना एकत्र येत सरकारला इशारा दिला. तसेच महासंघाने आपल्या विविध मागण्यांचे निवेदन जिल्हाधिकाऱ्यांना सादर केले.

मराठा समाजाला ओबीसीतून आरक्षण द्यावे यासह अन्य मागण्यासाठी मुंबई येथील आझाद मैदानावर मराठ्यांनी आंदोलन सुरू केले होते मनोज जरांगे यांनी उपोषण सुरू केले होते. हैदराबाद गॅझेटियर लागू करण्याचा शासन निर्णय जारी झाल्यानंतर आंदोलन मागे घेण्याची घोषणा करण्यात आली. नंतर ओबीसी नेत्यांमध्ये प्रतिक्रिया उमटल्या. दरम्यान आता सकल आदिवासी एकता महासंघातर्फे जिल्हाधिकारी यांना समाजाच्या विविध आरक्षण संदर्भातील मागण्यांचे निवेदन देण्यात आले.

यावेळी सकल आदीवासी एकता महासंघाने रिक्त जागांबाबत आग्रह धरला. अनुसूचित जमातीच्या अधिसंख्य झालेल्या जागा १२ हजार ५०० आणि अनुसूचित जमाती आयोगासमोर सादर केलेल्या माहिती नुसार शासनातील अनुसूचित जमातीच्या ३१ ऑगस्ट २०२१ पर्यंत रिक्त असलेल्या ५५ हजार ६८७ सर्व जागा जात पडताळणी समित्याकडे प्रलंबित असलेली सेवांची १५ ते २० हजार प्रकरणे असे एकूण ८५००० रिक्त जागा तात्काळ भरण्यात याव्या. पद भरतीचा कृती आराखडा जाहीर करावा.

आदिवासी विद्यार्थ्यांचे एमपीएससी आणि सार्वजनिक आरोग्य विभागातील १५४१ गट अ, ब, क, ड या संवर्गाची रिक्त पदे तात्काळ भरण्याची मागणी महासंघाने केली. शासकीय व निमशासकीय पद भरतीमध्ये अनुसूचित जमाती प्रवर्गासाठी जात वैधता प्रमाणपत्र बंधनकारक करावे. धनगर व बंजारा, वंजारी, वडार, गोपाल व इतर भटक्या जातींची आदिवासी जमातीत घुसखोरी करू नये. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली असलेल्या सर्व आमदारांची आदिवासी सल्लागार परिषदेची बैठक नियमित घेण्यात यावी. अनुसूचित जमाती कायद्यामधील (जात पडताळणी कायदा २०००) सुधारणा तात्काळ करण्यात यावी. पडताळणी समित्यांना आधी दिलेल्या वैधता प्रमाणपत्राची पुर्नतपासणी अधिकार प्रदान करण्यात यावे. शासन निर्णय २५ फेब्रुवारी २०२२ मध्ये अनुसूचित जमातीचे बिंदु दोनवरून आठवर आल्याने आदिवासींवर अन्याय झाला असून, बिंदू नियमावली मध्ये दुरूस्ती करण्यात यावी. आदिवासी विद्यार्थ्यांना पंडीत दिनदयाल उपाध्याय योजना, तालुका व ग्रामीणला सुरू करण्यात यावी. शासकीय नोकर भरती वेळेस जात वैधता प्रमाणपत्र बंधनकारक करून सन २०२३ सरळ सेवा पद भरतीमधील प्रतिक्षा यादीतील मूळ आदिवासी विद्यार्थ्यांना घ्यावे. जात पडताळणी समित्याकडे प्रलंबित असलेले सर्व सशर्त वैधता प्रकरणे आणि नियमित प्रलंबित प्रकरणे विशेष मोहिमेद्वारे तात्काळ निकाली काढण्यात यावे. आरोग्य क्षेत्रातील बोगस गैरआदिवासी लोकांची घुसखोरी थांबवून वैधता प्रमाणपत्र रद्द होणाऱ्या प्रत्येक बोगस विद्याला दंड लावुन गुन्हा दाखल करावा. त्यांच्या डिग्री रद्द कराव्या व त्या जागी मुळ आदिवासी मुलांचे प्रवेश करण्यात यावेत आदी मागण्यांचा समावेश आहे.

### एसआयटीतर्फे चौकशी करा

छत्रपती संभाजी नगर येथे मुस्लीम धर्मियांना पारधी टाकणकार समितीचे बोगस जात वैधता प्रमाणपत्र जात वैधता समितीमार्फत देण्यात आल्याचे महासंघाचे म्हणणे आहे. ते प्रमाणपत्र रद्द करण्यात यावे व एसआयटीतर्फे चौकशी स्थापन करून योग्य ती कार्यवाही करण्यात यावी, अशीही मागणी महासंघाने केली आहे.

# दारूच्या नशेत संतुलन सुटले, चारचाकीच्या चाकाखाली सापडला युवक

**दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी**

**अकोला, दि. २७ :** बार्शिटाकळी येथे सोमवारी पहाटे एक धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. सुरज वाईन बारच्या समोरील मोकळ्या जागेत एका अनोळखी इसमाचे प्रेत आढळल्याने परिसरात एकच खळबळ उडाली. पोलिसांनी तत्काळ घटनास्थळी धाव घेतली असता मृत इसमाची ओळख अफसर खाँ रशीद खाँ (३३) रा. बार्शिटाकळी अशी पटली.

दिनांक २७ ऑक्टोबर रोजी सकाळी सुमारे ६ वाजता बार्शिटाकळी पोलिसांना माहिती मिळाली की, सुरज वाईन बारसमोर एका व्यक्तीचा मृतदेह पडलेला आहे. पोलिसांनी घटनास्थळी पोहोचून पाहणी केली असता अफसर खाँ हे काळ्या रंगाचे कपडे परिधान केलेले मृत अवस्थेत आढळले. यानंतर पोलिसांनी तात्काळ सीसीटीव्ही फुटेज तपासले असता, दिनांक २६ ऑक्टोबर रोजी रात्री सुमारे १० वाजून १५ मिनिटांनी अफसर खाँ हे सुरज वाईन बारमधून दारूच्या नशेत बाहेर येताना दिसले. त्याच वेळी बारचे मालक संतोष शंकरराव काळदाते हे त्यांच्या चारचाकी वाहनाने घरी जाण्यासाठी निघाले होते. फुटेजमध्ये दिसते की, नशेत असलेले अफसर खाँ हे बारसमोर उभ्या असलेल्या चारचाकी वाहनाच्या डाव्या बाजूने चालत असताना अचानक तोल जाऊन खाली पडले.

त्याच क्षणी गाडी वळवताना वाहन त्यांच्या अंगावरून गेले. चालकाच्या डाव्या बाजूस असल्याने काळदाते यांना हा प्रकार दिसला नाही आणि त्यांची गाडी पुढे गेल्याने अफसर खाँ यांचा जागीच मृत्यू झाला. सोमवारी सकाळी हा धक्कादायक प्रकार जनतेसमोर आला आहे. घटनास्थळी फॉरेन्सिक पथकाला पाचारण करण्यात आले असून बार मालक संतोष काळदाते यांची चारचाकी गाडी पोलिसांनी जप्त केली आहे. या प्रकरणी बार्शिटाकळी पोलीस ठाण्यात कलम १०६, २८१, २३९ भारतीय न्याय संहिता २०२३ अंतर्गत गुन्हा नोंदविण्यात आला असून पुढील तपास बार्शिटाकळी पोलीस करीत आहेत.

### खून झाल्याची अफवा

सुरज बारमध्ये खून झाल्याची अफवा सोमवारी सकाळपासून जिल्ह्याभरात पसरली होती समाज माध्यमांवरही या संदर्भात उहापोह करण्यात आला होता. मात्र पोलीस तपासात घडलेला प्रकार उजेडात आला आहे.

### माहिती लपविण्याचा आरोप

या घटनेनंतरही बारमध्ये काम करणाऱ्या दिपक बाळकृष्ण होंगरे याने तातडीने पोलिसांना माहिती न दिल्याचे समोर आले आहे. यामुळे पोलिसांनी त्याच्यावर निष्काळजीपणाचा ठपका ठेवला आहे.

## ३ नोव्हेंबरला लोकशाही दिन

**अकोला :** जिल्हास्तरीय लोकशाही दिन व दिव्यांग लोकशाही दिन दि. ३ नोव्हेंबरला सकाळी ११ वा. जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित करण्यात आला आहे. सर्व संबंधित, तसेच अधिकारी व कर्मचा-यांनी उपस्थित राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे. यापूवच्या प्रलंबित तक्रारींचा अनुपालन अहवाल लोकशाहीदिनापूव सादर करण्याचे निर्देश संबंधित यंत्रणांना देण्यात आले आहेत. दर महिन्याच्या पहिल्या सोमवारी जिल्हास्तरीय लोकशाही दिन व दिव्यांग लोकशाही दिनाचे आयोजन करण्यात येते.

## मतदार नोंदणीचा अर्ज आता ऑनलाईन

### शिक्षक मतदारसंघ

**दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी**

**अकोला, दि. २७ :** शिक्षक मतदार संघासाठी १ नोव्हेंबर २०२५ अर्हता दिनांकावर आधारीत अमरावती विभाग शिक्षक मतदार मतदारसंघाच्या मतदारयाद्या नव्याने तयार करण्याचा नोंदणी कार्यक्रम सुरू आहे. मतदार नोंदणीसाठी अर्जाची सुविधा ऑनलाईन उपलब्ध असून, सर्व संबंधितांनी नोंदणी करून घ्यावी असे आवाहन जिल्हाधिकारी वर्षा मीना यांनी केले आहे.

भारत निवडणूक आयोगाने दिनांक १ नोव्हेंबर २०२५ या अर्हता दिनांकावर आधारीत अमरावती विभागातील शिक्षक मतदार मतदारसंघात नव्याने मतदारयाद्या तयार करण्याचा कार्यक्रम घोषित केला आहे. मतदार यादी कार्यक्रमानूसार नमुना क्रमांक-१९ व्दारे अर्ज स्वीकारण्याचा अंतिम दिनांक ०६ नोव्हेंबर २०२५ असा आहे.

शिक्षक मतदार संघासाठी नमुना क्रमांक-१९ मधील अर्ज भरण्याची सूविधा आता ऑनलाईन उपलब्ध असून संकेतस्थळावर लॉगीन करुन पात्र शिक्षकांना आवश्यक त्या पुरावा कागदपत्रांसह दिनांक ०६ नोव्हेंबर, २०२५ रोजी पर्यत ऑनलाईन अर्ज सादर करता येईल.

## गोवंश वाहतूक प्रकरणात आरोपी खुर्शिद जाटचा जामीन अर्ज फेटाळला

**दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी**

**अकोला, दि. २७ :** २७ गोवंश (गाय व बैल) निर्दयपणे कत्तलीकरीता वाहनात भरून नेताना पोलिसांनी पकडल्याच्या प्रकरणात, आरोपी खुर्शिद ईमरान जाट (२८) रा. साहरणपूर, उत्तरप्रदेश) याचा जमानत अर्ज अकोट सत्र न्यायालयाने फेटाळला आहे.

ही कारवाई अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायाधीश बी. एम. पाटील यांच्या न्यायालयात झाली. अकोट ग्रामीण पोलिस ठाण्यातील अप. क्र. ४३७/२०२४ अंतर्गत कलम १०९, २८१, ३(५) बीएनएस, महाराष्ट्र पशू संरक्षण अधिनियम, प्राण्यांवर क्रूरतेने वागणे अधिनियम कलम ११(१)(ड), महा. पोलीस अधिनियम कलम ११९, तसेच मोटार वाहन अधिनियम कलम १८३, १८४, १७७ अन्वये आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला होता. आरोपी सध्या ३ ऑक्टोबर २०२४ पासून अकोला कारागृहात न्यायालयीन कोठडीत आहे. २ ऑक्टोबर २०२४ रोजी अकोट ग्रामीण पोलिसांना गोवंश कत्तलीकरीता वाहतूक होत असल्याची गुप्त माहिती मिळाली. सहायक पोलिस अधीक्षक अनमोल मित्तल यांच्या आदेशानुसार पोलीस पथक पोपटखेड रोडवर गस्त घालत असताना आयशर ट्रक (क्र. एचआर ५८ सी ३४३१) भरधाव वेगाने येताना दिसला. पोलिसांनी वाहन थांबवण्याचा इशारा केला असता, चालक खुर्शिद जाट याने ट्रक थेट पोलिसांच्या अंगावर घालून जीवघेणा प्रयत्न केला. तरीही पोलिसांनी शौर्य दाखवत वाहनाचा पाठलाग करून ट्रक थांबवला. त्यानंतर पंचासमक्ष तपासणी केली असता, ट्रकमध्ये २७ गोवंश निर्दयतेने दोरीने बांधलेल्या अवस्थेत आढळून आले. त्यापैकी ३ गायी व २ बैलांचा मृत्यू झाला होता, तर उर्वरित २२ गोवंश अत्यंत अशक्त व उपाशी स्थितीत आढळले. ट्रक व जनावरे मिळून सुमारे २० लाख १७ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

# ठोस पुराव्या अभावी आरोपींची निर्दोष मुक्तता

**दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी**

### सौरभ सुळे खून प्रकरण

**अकोला, दि. २७ :** शहरातील जठारपेठ परिसरात चार वर्षांपूव घडलेल्या तरुणाच्या खुनाच्या प्रकरणात, ठोस आणि सबळ पुरावे सादर करण्यात अपयश आल्याने अकोला जिल्हा व सत्र न्यायालयाने तिन्ही आरोपींना निर्दोष मुक्त केले आहे.

घटनेचा तपशील असा की, दिनांक ३ एप्रिल २०२१ रोजी फिर्यादी सुळे यांनी रामदासपेठ पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली होती. त्यांचा मुलगा सौरभ सुळे हा सकाळी कटिंगसाठी घराबाहेर पडला होता. मात्र संध्याकाळपर्यंत तो घरी परत न आल्याने परिसरातील शेजाऱ्यांनी कळवले की, सौरभ फडके हॉस्पिटलजवळील रस्त्यावर पडलेला असून तो हालचाल करत नाही. फिर्यादी घटनास्थळी पोहोचले असता, त्यांचा मुलगा सौरभ हा बेशुद्ध अवस्थेत जमिनीवर पडलेला आढळला. उपस्थित नागरिकांनी त्याचा मृत्यू झाल्याचे सांगितले. तात्काळ पोलीस निरीक्षक विलास पाटील (रामदासपेठ पोलिस स्टेशन) यांनी घटनास्थळाचा पंचनामा करून तपास सुरू केला. तपासादरम्यान पोलिसांनी सुनील वाडेकर, उमेश सुखदेवे व अमोल वाघमारे या तिघांना अटक केली. चौकशीत आरोपींनी दारूच्या नशेत पैशांच्या वादातून सौरभची हत्या केल्याचे कबूल केले होते. प्रकरणातील तपास पूर्ण करून पोलिसांनी दोषारोपपत्र अकोला जिल्हा सत्र न्यायालयात दाखल केले. न्यायालयात या प्रकरणातील नऊ साक्षीदारांचे जबाब नोंदवण्यात आले. त्यापैकी तिघांनी आरोपी व मृतक सौरभ यांच्यात जठारपेठ परिसरात वाद झाल्याचे नमूद केले होते. मात्र उलटतपासणीत साक्षीदारांच्या बयाणांमध्ये मोठी तफावत दिसून आली. तसेच घटनास्थळावरील किंवा परिसरातील सीसीटीव्ही फुटेज न्यायालयात पुराव्यादाखल सादर करण्यात आले नाही.

फिर्यादीचेही साक्षी बयान आरोपींविरुद्ध ठोस पुरावा म्हणून ग्राह्य धरता आले नाही. त्यामुळे सरकार पक्षाकडून आरोपींविरुद्ध संशयाच्या पलीकडे जाणारा पुरावा सादर करण्यात अपयश आले. परिणामी विद्यमान प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश कचरे यांनी तिन्ही आरोपींना निर्दोष मुक्त करण्याचा निर्णय दिला. सदर प्रकरणात आरोपींच्या वतीने ॲड. आशिष मोहनराव देशमुख, ॲड. शेषराव गव्हाळे व ॲड. अक्षय वाघमारे यांनी प्रभावीपणे काम पाहिले.

## जीएमसीत लवकरच एमआरआय यंत्र

**दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी**

**अकोला, दि. २७ :** जिल्हा व परिसरातील रुग्णांसाठी दिलासादायक बातमी आहे. शासकीय वैद्यकीय महाविद्यालय (जीएमसी) परिसरात लवकरच अत्याधुनिक एमआरआय मशीन बसविण्यात येणार आहे. ही सुविधा पब्लिकप्रायव्हेट पार्टनरशिप (पीपी) तत्त्वावर उभारण्यात येत असून, रुग्णालय प्रशासनाने यासाठी सुमारे ३००० चौ.फुट जागा उपलब्ध करून दिली असल्याची माहिती मिळाली आहे

जीएमसीचे डीन डॉ. सोनुने यांनी दिलेल्या माहितीनुसार, या नवीन एमआरआय केंद्राचे संपूर्ण संचालन, देखभाल आणि मनुष्यबळ पुरवठा हे कॉन्ट्रॅक्टरकडूनच करण्यात येणार आहे. त्यामुळे रुग्णालय प्रशासनावर कोणताही अतिरिक्त आर्थिक भार पडणार नाही. या यंत्रासाठी लागणारा खर्च आणि उपकरणांची जबाबदारी निवडलेल्या खाजगी भागीदाराकडे असेल. सध्या अकोल्यातील सुपर स्पेशालिटी हॉस्पिटलमध्ये दररोज सुमारे ४० रुग्णांना एमआरआय तपासणीची गरज असते. मात्र उपलब्ध सुविधेमुळे केवळ ७ ते ८ तपासण्याच दररोज होऊ शकतात. त्यामुळे उर्वरित रुग्णांना खाजगी केंद्रांकडे वळावे लागते आणि त्यामुळे त्यांच्यावर आर्थिक भार वाढतो. नवीन यंत्र कार्यान्वित झाल्यानंतर तपासणी प्रक्रियेत गती येईल, प्रतीक्षा वेळ कमी होईल आणि तातडीच्या निदानासाठी मोठी मदत मिळेल. डॉ. सोनुने म्हणाले, अत्याधुनिक एमआरआय यंत्रामुळे रुग्णांच्या तपासण्या अधिक वेगवान व अचूक होतील. ही सुविधा पीपी तत्त्वावर उभारली जात असून, शासनाच्या मार्गदर्शनाखाली रुग्णसेवा अधिक प्रभावी करण्याचा आमचा प्रयत्न आहे. रुग्णालयातील ही नवीन सुविधा सुरू झाल्यानंतर ग्रामीण भागातील रुग्णांनाही मोठा दिलासा मिळेल. जिल्ह्यातील शासकीय आरोग्य व्यवस्थेत तंत्रज्ञानाधारित सुविधा वाढवण्याच्या दृष्टीने हा उपक्रम मोलाचा ठरेल, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे.

### युवा महोत्सव — डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठात तीन दिवसीय आयोजन

# कृषीवलांच्या बहारदार सादरीकरणाने दुमदुमले कृषी विद्यापीठ!

**दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी**




**अकोला, दि. २७ :** डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला येथे आयोजित तीन दिवसीय अंतर-महाविद्यालयीन युवा महोत्सवाच्या पहिल्याच दिवशी कृषीवलांच्या बहारदार कलासादरीकरणाने संपूर्ण विद्यापीठ परिसर दुमदुमून गेला. या महोत्सवात संपूर्ण विदर्भातील तब्बल २२ कृषी महाविद्यालयांतील विद्यार्थी-विद्यार्थिनींनी सहभाग नोंदविला आहे.

कृषी शिक्षणक्रमात शैक्षणिक गुणवत्तेसह विद्यार्थ्यांच्या आंतरिक आणि सामाजिक कलागुणांना वाव मिळावा, या उद्देशाने विद्यापीठाच्या विद्यार्थी कल्याण विभागाच्या वतीने दरवर्षी युवा महोत्सवाचे आयोजन केले जाते. यंदाच्या महोत्सवात एकूण ५ मुख्य कलाप्रकारांतील २९ उपकलाप्रकारांचे सादरीकरण करण्यात येणार आहे. यात नृत्य, गायन, नाटक, चित्रकला आणि वाङ्मयीन कलाप्रकारांचा समावेश असून प्रत्येक विभागात विद्यार्थ्यांची स्पर्धा रंगतदार झाली आहे.

पहिल्या दिवशी वादविवाद स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा, चित्रकला आणि गीतगायन या प्रकारांचे सादरीकरण पार पडले. विद्यार्थ्यांनी आपल्या विचारशक्ती, सर्जनशीलता आणि कला कौशल्याने परीक्षकांना मंत्रमुग्ध केले. युवा महोत्सवाचा उद्घाटन सोहळा कृषी महाविद्यालय अकोला येथील डॉ. के. आर. ठाकरे सभागृहात पार पडला. या समारंभाचे अध्यक्षस्थान कृषी महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. संजय भोयर यांनी भूषविले, तर मुख्य अतिथी म्हणून डॉ. ययाती तायडे, सहयोगी अधिष्ठाता, पदव्युत्तर शिक्षण संस्था उपस्थित होते. याप्रसंगी विद्यार्थी कल्याण अधिकारी डॉ. संदीप हाडोळे, सहयोगी अधिष्ठाता (शिक्षण) डॉ. शेषराव चव्हाण, वनविद्या महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. शैलेश हरणे, जिमखाना उपाध्यक्ष डॉ. सुधीर दलाल आणि प्रा. राजेंद्र वाळके हे मान्यवर विचारमंचावर उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सुत्रसंचालन डॉ. प्रेरणा चिकटे आणि डॉ. योगिता सानप यांनी तर आभार प्रदर्शन डॉ. अतुल वराडे, सहयोगी प्राध्यापक यांनी केले. महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, कर्मचारी आणि विद्यार्थी यांनी उत्साहाने सहभाग नोंदवत कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी योगदान दिले. या युवा महोत्सवामुळे विद्यार्थ्यांना आपले लपलेले कलागुण सादर करण्याची संधी मिळाली असून, पुढील दोन दिवसांमध्ये नाट्य, गटगायन, लोकनृत्य आणि मिमिक्री यांसारख्या रंगतदार सादरीकरणांनी संपूर्ण विद्यापीठाचा परिसर रंगणार आहे.

## बाजार वसुलीच्या निविदांना प्रतिसाद नाही

**अकोला:** महापालिकेला दैनंदिन बाजार वसुलीतून वर्षाकाठी अपेक्षित असलेल्या दोन कोटी रुपयांच्या महसुलावर पाणी सोडावे लागण्याची चिन्हे आहेत. प्रशासनाने बाजार वसुलीसाठी प्रसिद्ध केलेल्या निविदांना कंत्राटदारांनी ठेंगा दाखवला आहे. निविदा भरण्याची अंतिम मुदत १८ ऑक्टोबर असतानाही, एकही निविदा प्राप्त न झाल्याने महापालिका प्रशासन आता फेरनिविदा काढण्याच्या तयारीत आहे.

बाजार वसूलीचे हे काम यापूर्वी ठेका पद्धतीने स्वाती कंपनीकडे होते, मात्र ३१ डिसेंबर रोजी त्यांचा ठेका रद्द करण्यात आला. तेव्हापासून महापालिकेचे कर्मचारी हे काम पाहत आहेत. शहराचे क्षेत्रफळ १२४ चौरस किलोमीटर असताना केवळ ६ कर्मचारी वसुलीसाठी असल्याने महसूल अत्यंत अल्प मिळत आहे.

पूर्वी बाजार वसुलीचे शुल्क १० ते १५ रुपये होते. यात वाढ करण्याचा निर्णय प्रशासनाने घेतला आणि त्यासाठी समितीही गठीत केली. समितीने शुल्कात दुप्पट वाढ करण्याचा निर्णय घेतला. मात्र, आठ महिने निर्णय प्रलंबित राहिल्याने महापालिकेचे आर्थिक नुकसान झाले. अखेर प्रशासनाने निविदा प्रसिद्ध केल्या आणि दैनंदिन बाजार शुल्कात वाढ केल्यामुळे निविदेच्या अपेक्षित रकमेतही वाढ करण्यात आली. मात्र, दोन कोटी रुपयांची ही मोठी रक्कम पाहून कंत्राटदारांनी या निविदांकडे पूर्णपणे पाठ फिरवल्याचे स्पष्ट झाले आहे.




# डांबरीकरण केलेल्या रस्त्याची झाली चाळणी

## सुकळी ते पिंपळखुटा रस्त्यावर मोठमोठे खड्डे

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**सावरगाव, दि. २७ :** पातूर तालुक्यातील सुकळी ते पिंपळखुटा या रस्त्याचे प्रधानमंत्री ग्रामीण सडक योजनेंतर्गत अडीच वर्षांपूर्वी डांबरीकरण झाले होते. मात्र, अल्पावधीतच रस्त्याची दुरवस्था झाली असून, ठिकठिकाणी मोठमोठे खड्डे पडल्याने वाहनचालक आणि नागरिकांना जीवघेणा प्रवास करावा लागत आहे.

जवळपास दहा किलोमीटर अंतराच्या या रस्त्यासाठी शासनाने तब्बल सहा कोटी २४ लाख रुपये मंजूर केले होते. एवढा मोठा निधी खर्च होऊनही रस्त्याची चाळणी झाली असल्याने निकृष्ट कामाचा संशय बळावला आहे. या रस्त्यावरून दररोज शाळकरी मुले, शेतकरी आणि प्रवासी वाहने ये-जा करतात. खड्ड्यांमुळे अपघातांचा धोका मोठ्या प्रमाणावर वाढला असून, किरकोळ अपघातही घडले आहेत. रस्ता उखडल्यानंतर संबंधित ठेकेदाराने चार महिन्यांपूर्वी, म्हणजे जून महिन्यात रस्त्याची केवळ डागडुजी केली होती. मात्र, ही डागडुजीही तकलादू ठरली असून, अवघ्या चार महिन्यांतच रस्ता पुन्हा जैसे थे अवस्थेत आला आहे. कोट्यवधी रुपये खर्च करूनही रस्ता खराब झाल्याने कामाच्या दर्जावर आणि सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कार्यक्षमतेवर नागरिकांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. अडीच वर्षांतच रस्ता उखडल्यामुळे अधिकाऱ्यांच्या कारभारावर आणि कामाच्या तपासणीवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.



रस्त्याच्या दर्जाबाबत नागरिकांमध्ये तीव्र संताप आहे. तात्काळ या रस्त्याची गुणवत्ता तपासावी आणि नव्याने डांबरीकरण करावे, अशी मागणी जोर धरू लागली आहे. प्रशासनाने त्वरित या गंभीर समस्येकडे लक्ष देऊन रस्त्याची दुरुस्ती न केल्यास तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा स्थानिक नागरिकांनी दिला आहे.

## महत्त्वाचे

### आज २७ ऑक्टोबरला १४ विशेष गाड्या

**अकोला :** दिवाळी आणि छठ पूजा या सणांच्या पार्श्वभूमीवर प्रवाशांची गर्दी लक्षात घेऊन मध्य रेल्वेने आज २७ ऑक्टोबर २०२५ रोजी एकूण २३ विशेष गाड्या चालवण्याची घोषणा केली आहे, ज्यापैकी १४ विशेष गाड्या भुसावळ विभागातून धावणार आहेत. भुसावळ विभागाचे विभागीय रेल्वे व्यवस्थापक पुनीत अग्रवाल यांनी ही माहिती दिली. भुसावळ विभागातून सुटणाऱ्या गाड्यांमध्ये छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस येथून गाजीपूर सिटी (०७.३५ वा.) आणि आसनसोल (११.०५ वा.) साठी विशेष गाड्यांचा समावेश आहे. तसेच लोकमान्य टिळक टर्मिनस आणि पुणे/हडपसर येथून दानापूर, गोरखपूर, नागपूर आणि रीवासाठी विशेष गाड्या धावणार आहेत. यामध्ये शयनयान, वातानुकूलित आणि अनारक्षित श्रेणीतील डबे असतील. प्रवाशांनी या विशेष सेवांचा लाभ घ्यावा आणि वैध तिकिटासह प्रवास करावा, असे आवाहन मध्य रेल्वेने केले आहे.

### संत साध्वी कालंका माता पुण्यतिथी साजरी



**तेल्हारा :** तालुक्यातील दानापूर येथील अवलिया संत साध्वी कालंका माता मंदिर येथे मातेचा २४ वा पुण्यतिथी महोत्सव मोठ्या उत्साहात आणि भक्तिमय वातावरणात साजरा करण्यात आला. भाऊबीजेसाठी आलेल्या लेकीबाईंची या महोत्सवाला मोठ्या संख्येने उपस्थिती होती. पंचक्रोशीतील हजारो भाविक भक्तांनी यावेळी महाप्रसादाचा लाभ घेतला.सालाबादप्रमाणे, पांडव पंचमीला, दि. २६ ऑक्टोबर रोजी पुण्यतिथी उत्सवानिमित्त भंडारा महाप्रसाद व श्री क्षेत्र वारी हनुमान येथील महंत कृष्णानंदजी भारती महाराज यांचे प्रवचन आयोजित करण्यात आले होते.शनिवार, २५ ऑक्टोबर रोजी मातेच्या मूर्तीला जलाभिषेक करून तीर्थस्थापना करण्यात आली. सायंकाळी ५ वाजता अचानक आलेल्या मुसळधार पावसातही हरिनामाच्या गजरात मातेच्या चरण पादुकांची पालखी मिरवणूक काढण्यात आली.

### धनुर्विद्यामध्ये पूजाची राज्यस्तरीय निवड!



**बाळापूर:** जय बजरंग व्यायाम शाळा, वाडेगावची विद्यार्थिनी पूजा अनिल राजगुरू हिने विभागीय स्तरावर धनुर्विद्यामध्ये उत्कृष्ट प्रदर्शन करून राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड मिळवली आहे. अत्यंत हलाखीच्या परिस्थितीतून येत असतानाही पूजाने आपल्या शालेय शिक्षणाकडे आणि क्रीडा कौशल्याकडे समान लक्ष देत हे यश संपादन केले आहे.

पूजाच्या या कर्तृत्वामुळे वाडेगावचे आणि तिच्या कुटुंबाचे नाव लौकिक झाले आहे. राज्यस्तरीय निवड झाल्याबद्दल संपूर्ण जिल्ह्यातून तसेच महाराष्ट्रातून फोनद्वारे तिच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. पूजा राजगुरूने आपल्या यशाचे श्रेय देताना सांगितले की, ''माझे गुरु मोहन भारतरकर हेच माझ्या या यशाचे खरे मानकरी आहेत.'' गुरुंच्या मार्गदर्शनाखाली तिने मिळवलेली ही संधी तिच्या ध्येयपूर्तीसाठी निश्चितच मोलाची ठरणार आहे. पूजाच्या या धडपडीला आणि यशाचे सर्वत्र कौतुक होतं आहे.

## एल.एल.बी. प्रश्नपत्रिका वितरणात गोंधळ



दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**पातूर, दि. २७ :** संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठांतर्गत आज, २७ ऑक्टोबर २०२५ रोजी एल.एल.बी. (३ वर्षीय अभ्यासक्रम) सत्र-२ मधील कॉन्ट्रॅक्ट-२ या विषयाचा पेपर होता. मात्र, परीक्षा केंद्रांवर विद्यार्थ्यांना या विषयाऐवजी चुकीची प्रश्नपत्रिका देण्यात आल्याने मोठा गोंधळ निर्माण झाला. या घोळामुळे विद्यार्थ्यांचा वेळ वाया गेला असून त्यांना नाहक त्रासाला सामोरे जावे लागले. रिपब्लिकन बहुजन विद्यार्थी परिषदेचे अकोला जिल्हाध्यक्ष ॲड. आकाश हिवराळे यांनी या गंभीर प्रकाराबद्दल परीक्षा नियंत्रक डॉ. नितीन कोळी यांना निवेदन दिले. डॉ. कोळी यांनी विद्यार्थ्यांचे नुकसान होणार नाही आणि त्यांची पुन्हा परीक्षा घेतली जाईल, असे आश्वासन दिले.परिषदेने विद्यार्थ्यांना झालेल्या त्रासापोटी विशेष सूट देऊन परीक्षा घेण्याची मागणी निवेदनाद्वारे केली आहे. प्रश्नपत्रिका वितरणातील या चुकीमुळे परीक्षा विभागाच्या कारभारावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

## रखडलेले घरकुल योजनेचे अनुदान त्वरित वितरीत करण्याची मागणी

### अन्यथा जन आंदोलनाचा इशारा

**बाळापूर :** तालुक्यातील वाडेगाव येथील घरकुल योजनेचे रखडलेले अनुदान त्वरित वितरीत करावे, अशी मागणी शेतकरी सेनेच्या वतीने गटविकास अधिकारी नाना पजई यांना निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.ग्रामपंचायतीच्या ठरावानुसार आणि आमदार नितीन देशमुख यांनी आयोजित केलेल्या सभेत, गटविकास अधिकारी (पंचायत समिती, बाळापूर) यांनी घरकुल लाभार्थ्यांना १६ ऑक्टोबर २०२५ पर्यंत पूर्ण हप्ता अदा करण्याचे आश्वासन दिले होते. मात्र, हे आश्वासन पूर्ण न झाल्याने लाभार्थ्यांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे.या संदर्भात शेतकरी सेना जिल्हाप्रमुख दीपक रा. मसने यांनी वाडेगावच्या जनतेला सोबत घेऊन गटविकास अधिकाऱ्यांची भेट घेतली. त्यांनी अधिकाऱ्यांना त्वरित हप्ते अदा करण्यासंदर्भात निवेदन दिले. जर घरकुल योजनेचे अनुदान त्वरित वितरीत केले नाही, तर जन आंदोलन छेडण्याचा इशाराही यावेळी देण्यात आला. याप्रसंगी , वाडेगाव शहर प्रमुख चेतन करंजकर,, ग्रामपंचायत सदस्य, संदीप ठोंबरे पांडुरंग लोखंडे, सुश्रुत भुस्कुटे यांच्यासह अनेक ग्रामस्थ उपस्थित होते.

## स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीसंदर्भात राकाँ (शप) आढावा बैठक संपन्न



दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**अकोट, दि. २७ :** राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (शरदचंद्र पवार) अकोट तालुका कार्यकारिणीची आढावा बैठक रविवार, दि. २६ ऑक्टोबर रोजी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या आगामी निवडणुकांच्या तयारी संदर्भात संपन्न झाली.

या बैठकीला जिल्हाध्यक्ष संग्रामभैय्या गावंडे, अकोट विधानसभा अध्यक्ष नानासाहेब हिंगणकर, माजी सभापती शंकरराव चौधरी, जिल्हाप्रमुख (बुथ कमिटी) कैलास गोंडचर आणि शहराध्यक्ष नवनित लखोटीया यांची प्रमुख उपस्थिती होती.बैठकीत नगरपरिषद जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकांसंदर्भात सविस्तर चर्चा करण्यात आली. यावेळी इच्छुक उमेदवारांशीही संवाद साधण्यात आला. यावेळी विविध विषयांवर चर्चा झाली, तसेच जिल्हाध्यक्षांच्या हस्ते तालुक्यातील नवीन नियुक्त्यांची पत्रे देण्यात आली. कार्यक्रमाचे आयोजन तालुकाध्यक्ष श्रियश चौधरी यांनी केले, सूत्रसंचालन कैलास गोंडचर यांनी तर आभार प्रदर्शन नवनित लखोटीया यांनी केले.

> ❑ आघाडी झाली तर सोबत, अन्यथा स्वबळावर निवडणूक लढण्याची तयारी तातडीने सुरू करावी.
>
> **- संग्रामभैय्या गावंडे**
> जिल्हाध्यक्ष

## मुंडगाव प्राथमिक आरोग्य केंद्रातील रुग्णवाहिका चालवितो सफाई कामगार!

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**मुंडगाव, दि. २७ :** अकोट तालुक्यातील मुंडगाव येथील प्राथमिक आरोग्य केंद्राला आमदार प्रकाश भारसाकडे यांनी उपलब्ध करून दिलेली १०२ क्रमांकाची रुग्णवाहिका चालकाअभावी सफाई कामगार चालवत असल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे.




रुग्णवाहिकेवरील नियमित चालक तोमर यांची बदली झाल्यावर, तात्पुरत्या चालकाने कमी पगारापोटी काम सोडले. त्यानंतर जिल्हा आरोग्य अधिकारी किंवा शासनाने नवीन चालक नियुक्त न केल्याने हा गंभीर प्रकार सुरू आहे. सफाई कामगार ही रुग्णवाहिका चालवत असल्याने गरोदर मातांच्या जीवितास धोका निर्माण झाला आहे. या घटनेबद्दल नारी शक्ती एकता संघर्ष फाऊंडेशनने तीव्र आक्षेप घेतला आहे. संस्थेच्या अध्यक्षा संगीता प्रभे यांनी आरोग्यमंत्र्यांकडे लेखी तक्रार दाखल करण्याची आणि वेळ पडल्यास जिल्हा परिषद, अकोला येथील जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. गाढवे यांच्या कार्यालयावर आंदोलन छेडण्याची घोषणा केली आहे. या प्रकरणी जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. गाढवे यांनी मी कोणताही लेखी किंवा तोंडी आदेश दिला नाही असे स्पष्ट केले, तर तालुका आरोग्य अधिकारी डॉ. चव्हाण यांनी हा तेथील आरोग्य अधिकाऱ्याचा प्रश्न असल्याचे सांगून जबाबदारी झटकली. १०२ रुग्णवाहिका चालवण्याचा अधिकार सफाई कामगाराला कोणी दिला? त्याच्या नावाने प्रति ट्रिप ३०० रुपये मानधन कसे काढले गेले? याची चौकशी करून दोषी अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याची मागणी फाऊंडेशनने केली आहे.

## जीवाची बाजी लावणारे फक्त शेतकरी संघटनेतच – इंद्रजीत भालेराव



दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**मूर्तिजापूर, दि. २७ :** शेतकरी संघटनेच्या निःस्वार्थ कार्यकर्त्यांचा गौरव केला. जीवाची बाजी लावणारे फक्त शेतकरी संघटनेतच आहेत, भिक नको, हवे घामाचे दाम हे जोशींनी बिंबवलेले अर्थशास्त्र कार्यकर्त्यांमुळेच सार्थ ठरले, असे मत .इंद्रजीत भालेराव त्यांनी व्यक्त केले. ज्येष्ठ शेतकरी नेते युगात्मा शरद जोशी यांच्या जीवन आणि कार्यावर आधारित एक होते शरद जोशी आणि असंख्य वेडेपीर... या पुस्तकाचा प्रकाशन सोहळा मूर्तिजापूर येथे उत्साहात पार पडला. लेखक विजय लोडम यांनी लिहिलेल्या या पुस्तकाला महाराष्ट्रातील शेतकऱ्यांनी मोठा प्रतिसाद दिला आहे.

राज्य कृषी मूल्य आयोगाचे अध्यक्ष पाशा पटेल यांनी न्यू नॉर्मल संकल्पनेकडे लक्ष वेधून हवामान बदलामुळे शेती टिकवण्यासाठी शेतकऱ्यांनी बांबू लागवडीकडे वळण्याचे आवाहन केले.आमदार हरीश पिंपळे, माजी आमदार वामनराव चटप, शेतकरी नेते प्रकाश पोहरे आणि साहित्यिक प्रा. डॉ. श्रीकांत तिडके यांनीही आपले विचार मांडले. चटप यांनी खापरवाडा हे मंत्र्यांना गावबंदी करणारे पहिले गाव असल्याची आठवण करून दिली. लेखक विजय लोडम यांनी आपल्या भावूक मनोगतात, हे पुस्तक शेतकरी संघटनेचे आहे, असे सांगून, कार्यकर्त्यांनी जुने वाद विसरून पुन्हा संघटनेच्या सोनेरी दिवसांसाठी एकत्र यावे, असे आवाहन केले.राष्ट्रीय नेते ललित बहाळे यांनी कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान भूषवले. महाराष्ट्रभरातील शेतकरी नेते आणि कार्यकर्त्यांच्या मोठ्या उपस्थितीत या प्रेरणादायी सोहळ्याचा समारोप झाला.

## वाशिम जिल्ह्यात रब्बी हंगामात गव्हाचा पेरा वाढण्याची शक्यता

**वाशिम :** यंदा जिल्ह्यात प्रकल्पांमध्ये पुरेसा जलसाठा उपलब्ध असल्याने रब्बी हंगामातील पेरणी क्षेत्र वाढण्याचा अंदाज कृषी विभागाने वर्तवला आहे. सध्या जिल्ह्यात पेरणीची लगबग सुरू झाली असून, विशेषतः गव्हाचा पेरा वाढण्याची शक्यता आहे. नैसर्गिक आपत्तीमुळे खरीप हंगाम निराशाजनक ठरल्याने, शेतकरी आता नव्या उमेदीने रब्बी हंगामाच्या तयारीला लागले आहेत. सोयाबीन सोंगणीनंतर शेतीची मशागत करून जमीन पेरणीसाठी सज्ज करण्यात आली आहे. दिवाळीनंतर गहू पेरणीला सुरुवात झाली आहे. यंदा मुबलक पाणी उपलब्ध असल्यामुळे पेरणी क्षेत्रात वाढ अपेक्षित आहे. मात्र, एकाचवेळी मागणी वाढल्याने पेरणीसाठी ट्रॅक्टर वेळेवर उपलब्ध होत नसल्याच्या प्रतिक्रिया शेतकऱ्यांमधून उमटत आहेत. शेतकऱ्यांकडून तातडीने मदत निधीची मागणी शेतकरी पॅकेजमध्ये रब्बी हंगामातील पेरणीसाठी हेक्टरी १० हजार रुपये मदत निधीचा समावेश आहे. बियाणे, खते खरेदी, ट्रॅक्टरचा पेरणी खर्च, मजुरी आदींसाठी शेतकऱ्यांना या मदत निधीची नितांत आवश्यकता आहे. रब्बी पेरणीला सुरुवात झाल्याने हा १० हजार रुपयांचा मदत निधी तातडीने जमा करण्याची मागणी शेतकऱ्यांमधून होत आहे.


## अकोट शहरात श्री नरसिंग महाराज यात्रा महोत्सवाचा ६ नोव्हेंबरपासून

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**अकोट, दि. २७ :** शहराचे आराध्य दैवत श्री नरसिंग महाराजांच्या वार्षिक यात्रा महोत्सवाचा प्रारंभ यावर्षी गुरुवार, ६ नोव्हेंबर २०२५ पासून होणार असून, हा महोत्सव सोमवार, १५ डिसेंबर २०२५ पर्यंत चालणार आहे. नरसिंग महाराज मंदिर संस्थानच्या वतीने या काळात विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

या महोत्सवादरम्यान मंदिरात दररोज भजन, प्रवचन, हरिपाठ, भारुड, नाम संकीर्तन आदी कार्यक्रम आयोजित केले आहेत.

६/नोव्हेंबर (कार्तिक वद्य १): श्री तीर्थ स्थापना (सकाळी ९ वाजता). ७/नोव्हेंबर (कार्तिक वद्य ३): श्री संत मियासाहेब यांची तखत स्थापना (सकाळी




९ वाजता) आणि कार्तिक मास काकडा आरती समाप्ती. ८नोव्हेंबर (कार्तिक वद्य ४): श्री नरसिंग महाराजांची पालखी गुरुपुजेसाठी उमरा (ता. अकोट) येथे दुपारी १२ वाजता निघेल. ह.भ.प. अनंतराव देशमुख (कुटासा) यांचा सहभाग असेल.

पालखी संध्याकाळी ६ वाजता मिरवणुकीने मंदिरात परत येईल. ९/नोव्हेंबर (कार्तिक वद्य ५): श्री नरसिंग महाराज यात्रा (विविध धार्मिक कार्यक्रम).१०नोव्हेंबर (कार्तिक वद्य ६): पालखी मिरवणूक (सकाळी ९ ते दुपारी ४), त्यानंतर गोपाळकाला (दहीहंडी) आणि महाप्रसाद.१३/नोव्हेंबर (कार्तिक वद्य ८): श्री हरिनाम सप्ताहाची समाप्ती आणि ह.भ.प. प्रभाकर बुवा सरोदे (अकोट) यांचे काल्याचे कीर्तन (सकाळी ११ वाजता).१६/नोव्हेंबर (कार्तिक वद्य १२): महाराजांच्या समाधीस रुद्राभिषेक व गोतांबील.हा यात्रा महोत्सव कार्तिक वद्य ५ नंतर पुढील पाच बुधवार व रविवारपर्यंत सुरू राहील. परिसरातील भाविकांनी दर्शनाचा व प्रसादाचा लाभ घ्यावा, असे आवाहन संस्थानच्या वतीने करण्यात आले आहे.

## प्रदूषण | आरोग्य आणि पर्यावरणाचा प्रश्न गंभीर

# मूर्तिजापूर शहरात प्लास्टिक पिशव्यांचा सुळसुळाट

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**मूर्तिजापूर, दि. २७ :** प्लास्टिक पिशव्यांवरील बंदी असूनही मूर्तीजापूर शहरात त्यांचा सर्रास वापर सुरू असून, त्यामुळे परिसरातील आरोग्य आणि पर्यावरणासाठी एक गंभीर संकट उभे राहिले आहे. शहरातील रस्त्यांवर, नाल्यात आणि मोकळ्या जागेत दररोज हजारो प्लास्टिक पिशव्यांचा कचरा जमा होत आहे.



प्रदूषण आणि दुर्गंधी शहरातील नागरिक, भाज्या, खाद्यपदार्थ किंवा इतर वस्तू प्लास्टिक पिशव्यांतून फेकून देतात. हा कचरा रस्त्यावर आणि नाल्यात पडून राहिल्याने दुर्गंधी पसरते आणि गटारे तुंबतात, ज्यामुळे शहरात अस्वच्छतेचे साम्राज्य निर्माण झाले आहे.

आरोग्यावर परिणाम, प्लास्टिक कचऱ्यामुळे डासांचा प्रादुर्भाव वाढतो, परिणामी शहरात डेंग्यू, मलेरिया आणि इतर संसर्गजन्य आजार वाढण्याचा धोका आहे. पशुधनाला धोका मोकाट जनावरे या प्लास्टिक पिशव्यांतील खाद्यपदार्थांच्या लोभाने त्या खातात, ज्यामुळे त्यांच्या जीवाला धोका निर्माण होतो. माती किंवा नाल्यात टाकलेल्या प्लास्टिक पिशव्या विघटित होण्यासाठी कित्येक वर्षे लागतात, ज्यामुळे भूमी आणि जल प्रदूषण होत आहे. शहरातील किराणा, भाजीपाला आणि इतर लहान-मोठे व्यावसायिक सर्रासपणे ग्राहकांना प्लास्टिक पिशव्या देत आहेत. शासनाने बंदी घातली असली तरी दुकानदार आणि ग्राहक दोघेही नियमांचे उल्लंघन करत आहेत. अनेक दुकानदार कापडी पिशव्या वापरण्याऐवजी ग्राहकांना प्लास्टिक पिशव्या घेण्यास प्रवृत्त करतात.

> **या गंभीर परिस्थितीतही नगरपरिषद प्रशासनाकडून कोणत्याही दुकानदारावर किंवा व्यापाऱ्यावर कोणतीही कारवाई होताना दिसत नाही. शहरातील नागरिक आणि व्यावसायिकांनी कर्तव्य बजावणे, धर्म म्हणून पर्यावरणाची काळजी घेणे आणि प्लास्टिक पिशव्यांचा वापर पूर्णपणे थांबवणे ही काळाची गरज आहे, अन्यथा शहरातील परिस्थिती हाताबाहेर जाईल.नगरपरिषद प्रशासनाने तातडीने कठोर भूमिका घेऊन प्लास्टिक पिशव्यांच्या वापरावर नियंत्रण आणावे आणि नियम तोडणाऱ्यांवर दंडात्मक कारवाई करावी.**

## 'अक्षर आनंद वाचन संस्कार चळवळ' कार्यक्रम सम्यक संबोधी वाचनालयात संपन्न



दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**अकोला, दि. २७ :** सम्यक संबोधी सार्वजनिक वाचनालय आणि सम्यक संबोधी संस्था, रणपिसे नगर, अकोला यांच्या संयुक्त विद्यमाने शुक्रवार, दि. २४ ऑक्टोबर २०२५ रोजी सायंकाळी ७:३० वाजता ''अक्षर आनंद वाचन संस्कार चळवळ'' कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते . या कार्यक्रमाचे अध्यक्ष वाचनालयाचे सचिव राहुल ओईंबे होते, तर प्रमुख पाहुणे म्हणून परभणी येथील विनोद शेंडगे उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस धूप, दीप प्रज्वलन करून झाली. यावेळी विनोद शेंडगे यांनी वाचन चळवळीचे महत्त्व या विषयावर मार्गदर्शन केले.याप्रसंगी राहुल ओईंबे, अजय आठवले, अमोल वानखडे, रोहण इंगळे, योगेश इंगळे यांच्यासह वाचक, बालवाचक आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. ग्रंथालयीन कर्मचारी राजेश दांडगे व पंकज खंडारे यांनी सहकार्य केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अजय आठवले यांनी केले.

अजिंक्य भारत

# आपलं वाशिम

अकोला, मंगळवार, दि.२८ आक्टोबर २०२५ www.ajinkyabharat.com



# आता बरस झाले! मातंग समाजाचा फक्त वापर नको

## राजकीय हक्कासाठी एकजूट आवश्यक : संवेदनशील बैठकीत तीव्र सूर

दै. अजिंक्य भारत । प्रतिनिधी



**वाशिम, दि. २७ :** प्रामाणिकपणाची आणि शब्द जपणाऱ्या मातंग समाजाची राजकीय उपेक्षा थांबवण्यासाठी, तसेच स्थानिक स्वराज्य संस्थांच्या आगामी निवडणुकीत आपला हक्क मिळवण्यासाठी, मातंग समाजातील विविध सामाजिक संघटनांच्या प्रमुख पदाधिकाऱ्यांची एक अत्यंत महत्त्वपूर्ण व विचारमंथनाची बैठक २६ ऑक्टोबर रोजी शासकीय विश्रामगृहात संपन्न झाली. मातंग समाजाचे ज्येष्ठ नेते शंकर दाभाडे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या बैठकीचे आयोजन अखिल भारतीय मातंग समाज संघटनेचे कार्याध्यक्ष संजय वैरागडे यांनी केले होते.

या बैठकीत बिगर सातबारा शेतकरी संघटनेचे प्रणेते भाई जगदीश कुमार इंगळे यांनी आपले मनोगत व्यक्त करताना अत्यंत संवेदनशील सूर आळवला. ते म्हणाले की, ''मातंग समाज हा अत्यंत प्रामाणिक आहे आणि दिलेला शब्द प्राणपणाने पाळणारा आहे. मात्र, या प्रामाणिकपणाचा गैरफायदा घेतला जात आहे.'' वाशिम जिल्ह्यातील राजकारणात लोकसंख्येच्या प्रमाणात समाजाचा सक्रिय सहभाग नाही, ज्यामुळे समाजाच्या कार्यकर्त्यांना योग्य तो मान-सन्मान मिळत नाही. त्यामुळे मातंग समाजाच्या सामाजिक कार्यकर्त्यांचे राजकीय पुनर्वसन झालेच पाहिजे, यावर त्यांनी तीव्रतेने भर दिला. या बैठकीत होऊ घातलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत कोणत्या राजकीय पक्षांसोबत जायचे यावर पदाधिकाऱ्यांनी आपली मते मांडली. माजी जिल्हा परिषद सदस्य अनिल कांबळे यांनी सर्वांच्या सहमतीने महत्त्वपूर्ण भूमिका स्पष्ट केली. त्यांनी सांगितले की, मातंग समाजाने एकजुटीने महायुतीसोबत (भारतीय जनता पक्षाच्या) आपली ताकद उभी केली. आमदार शाम खोडे यांना यशस्वी करण्यासाठी मातंग समाजाच्या सर्व पदाधिकाऱ्यांचा सिंहाचा वाटा होता. विधानसभेच्या निवडणुकीत समाज सोबत राहील, असा स्पष्ट शब्द दिला गेला. मात्र, त्या बदल्यात स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीत मातंग समाजाला राजकीय वाटा मिळाला पाहिजे, असा महत्त्वपूर्ण करार आमदार शाम खोडे व राजू पाटील राजे यांच्यासोबत झाला होता. या कराराच्या अंमलबजावणीसाठी मातंग समाजाचे शिष्टमंडळ लवकरच आमदार शाम खोडे व राजू पाटील राजे यांच्याशी चर्चा करेल व त्यानंतरच समाजाच्या राजकीय भविष्याचा निर्णय घेण्यात येईल, असे बैठकीत ठरले.

या कराराच्या अंमलबजावणीवर जोर देताना विनोद जोगदंड यांनी सांगितले की, जर विधानसभेत झालेल्या कराराप्रमाणे मातंग समाजाला राजकीय वाटा मिळाला, तर ती इतर राजकीय पक्षांपेक्षा मातंग समाजासाठी जमेची बाजू आणि आत्मसन्मानाची बाब ठरेल. या महत्त्वपूर्ण बैठकीला मोहनराव दुतोंडे, राम बाजड, रवी कांबळे, भारत अंभोरे, गजानन वैरागडे, पंकज गायकवाड यांच्यासह मातंग समाजाचे अनेक पदाधिकारी उपस्थित होते. समाजाला राजकीय दिशा देण्यासाठी या बैठकीत व्यक्त झालेला संवेदनशील आणि भावनिक सूर महत्त्वपूर्ण मानला जात आहे.

### फक्त वापरून घेण्याचे दिवस संपले!

आतापर्यंत मातंग समाजाला राजकारणात फक्त वापरून घेण्याचे काम झाले आहे. मतदानाच्या वेळी सोबत घेऊन नंतर दुर्लक्ष करणे, ही समाजाची होत असलेली हेळसांड आता थांबलीच पाहिजे.'' कोणत्याही परिस्थितीत मातंग समाजाला राजकारणात माना-सन्मानाचे स्थान मिळावे यासाठी सर्व समाजाने आपली ताकद एकवटून एकजूट होणे ही काळाची सर्वात मोठी गरज आहे. अन्यथा, समाजाची राजकीय उपेक्षा अशीच सुरू राहील, असे भावनिक आवाहन या संवेदनशील बैठकीचे अध्यक्ष शंकर दाभाडे यांनी केले.

---

## महत्त्वाचे

### २९ ऑक्टोबरपासून विविध धार्मिक कार्यक्रमांना प्रारंभ

**मानोरा :** तालुक्यातील गादेगाव येथील सुप्रसिद्ध विठ्ठल रुक्मिणी मंदिरात परमपूज्य विठ्ठल बाबा यांच्या पुण्यतिथीनिमित्त बुधवार, दिनांक २९ ऑक्टोबर २०२५ पासून ते ५ नोव्हेंबर २०२५ पर्यंत संगीतबद्ध भागवत सप्ताह, विश्वजीवन ग्रंथ पारायण आणि अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे. या सप्ताहादरम्यान दररोज दुपारी १२ ते ५ वाजेपर्यंत ह.भ.प. संदीप महाराज पोफळे यांचे सुश्राव्य भागवत वाचन होणार आहे. तसेच, दररोज सायंकाळी भजन-कीर्तनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. सप्ताहाची सांगता बुधवार, दिनांक ५ नोव्हेंबर २०२५ रोजी होणार आहे. या दिवशी सकाळी जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष चंद्रकांत ठाकरे यांच्या हस्ते सपत्नीक अभिषेक आणि पूजा करण्यात येईल. त्यानंतर सकाळी ९ वाजता ह.भ.प. संदीप महाराज पोफळे यांच्या हस्ते काल्याचे कीर्तन होईल.

### दिव्यांग बांधवांसाठी स्वयंरोजगार योजनेचा लाभ घेण्याचे आवाहन

**वाशिम:** जिल्ह्यातील सर्व दिव्यांग बांधवांना कळविण्यात येते की, जिल्हा परिषदेच्या ५ टक्के दिव्यांग सेस निधीतून दिव्यांगांना स्वावलंबी करण्याच्या उद्देशाने ''स्वयंरोजगारासाठी अर्थसहाय्य योजना'' राबविण्यात येत आहे. या योजनेंतर्गत पात्र दिव्यांग व्यक्तींना आर्थिक सहाय्य देण्यात येणार आहे. तरी, इच्छुक दिव्यांग बांधवांनी आवश्यक कागदपत्रांसह आपले अर्ज दिनांक १० नोव्हेंबर २०२५ पर्यंत जिल्हा दिव्यांग सक्षमीकरण विभाग, जिल्हा परिषद, वाशिम येथे सादर करावेत.

### जागतिक आयोडीन न्यूनता विकार प्रतिबंध दिन उत्साहात साजरा

**वाशिम:** शासकीय परिचर्या महाविद्यालय, वाशिम येथे आज जागतिक आयोडीन न्यूनता विकार प्रतिबंध दिन २१ ऑक्टोबर रोजी उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाचे आयोजन जिल्हा रुग्णालय, वाशिम आणि जिल्हा आरोग्य कार्यालय, जिल्हा परिषद, वाशिम यांच्या संयुक्त विद्यमाने करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जिल्हा रुग्णालय, वाशिमचे जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. अनिल कावरखे उपस्थित होते. प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. अविनाश पुरी (अतिरिक्त जिल्हा शल्य चिकित्सक), डॉ. महेशचंद्र चापे (जिल्हा माता व बाल संगोपन अधिकारी), डॉ. अविनाश झरे (वैद्यकीय अधीक्षक, जिल्हा स्त्री रुग्णालय), डॉ. पराग राठोड (निवासी वैद्यकीय अधिकारी, जिल्हा रुग्णालय), डॉ. डोंगरे (मनोचिकित्सक) आणि श्रीमती स्नेहल महाले (प्राचार्य, शासकीय परिचर्या महाविद्यालय, वाशिम) यांची उपस्थिती होती.

### निधन वार्ता

#### नलिनी सराफ



**वाशिम :** येथील गुलाटी लेआऊट मधील रहिवासी श्रीमती नलिनी दादासाहेब सराफ यांचे अल्पशा आजाराने दि.२७ ऑक्टोबर रोजी निधन झाले. मृत्युसमयी त्यांचे वय ७८ वर्ष होते. त्यांच्या पश्चात ३ मुले योगेश, महेश, मंगेश , १ मुलगी, सुना, नातवंडे असा बराच मोठा आप्त परिवार आहे.

---

## पोस्ट ऑफिस ते पुसद नाका मार्गावर वाहतूक कोंडी



दै. अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**वाशिम, दि. २७ :** वाशिम शहरातील पोस्ट ऑफिस कार्यालय ते पुसद नाका या प्रमुख मार्गावर आज, २६ ऑक्टोबर रोजी दुपारी १२ वाजता, मोठी वाहतूक कोंडी झाली. बेशिस्त पार्किंग, रस्त्यावरील अतिक्रमणे आणि वाहतूक नियंत्रणातील त्रुटींमुळे सामान्य नागरिकांचे दैनंदिन जीवन विस्कळीत झाले आहे. या मार्गावर वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्याने वाहतूक पूर्णपणे मंदावली होती.

वाशिम शहराच्या मध्यभागी असलेल्या या महत्त्वाच्या रस्त्यावर दररोज होणारी ही कोंडी शहराच्या नियोजन आणि व्यवस्थापनातील त्रुटी दर्शवते. पोस्ट ऑफिस आणि पुसद नाका या गजबजलेल्या परिसराला जोडणाऱ्या या मार्गावर वाहतूक सुरळीत ठेवण्याची जबाबदारी प्रशासनाने अधिक गांभीर्याने पार पाडणे आवश्यक आहे. या कोंडीमुळे नागरिक तासन्तास अडकून पडतात.

आज दुपारी १२ वाजताची परिस्थिती पाहता, कोंडीमुळे अनेक वाहने जागच्या जागी थांबली होती. या अडचणीमुळे रुग्णवाहिकांना मार्ग काढणे कठीण झाले, तसेच कामावर निघालेले नागरिक आणि शाळकरी मुलांच्या प्रवासात मोठा विलंब झाला. शहराचे नियोजन करणाऱ्या प्रशासनाने या समस्येकडे अधिक सहानुभूतीपूर्वक आणि तातडीने लक्ष देणे गरजेचे आहे, अशी नागरिकांची अपेक्षा आहे.

या वाहतूक कोंडीमुळे नागरिकांचा अमूल्य वेळ वाया जात आहे आणि त्यांना मोठा मनस्ताप सहन करावा लागत आहे. वाहनांच्या रांगांमुळे नागरिकांच्या महत्त्वाच्या कामांना विलंब झाला. ही केवळ वाहतुकीची समस्या नसून, शहरातील शांतता आणि सुव्यवस्थेवर परिणाम करणारी बाब आहे.

शहराच्या विकासासाठी कार्यरत असणाऱ्या प्रशासनाने पोस्ट ऑफिस ते पुसद नाका या मार्गावरील वाहतूक सुरळीत करण्यासाठी तातडीने आणि ठोस पाऊले उचलावीत, जेणेकरून नागरिकांची गैरसोय दूर होईल, अशी आशा वाशिमकर व्यक्त करत आहेत.

---

## वादळी वाऱ्याने इंझोरी जि.प. शाळेच्या वर्गखोल्यांची दैना

### दुरुस्तीच्या प्रस्तावाला मंजुरी मिळूनही कामाचा मुहूर्त निघेना

दै. अजिंक्य भारत । प्रतिनिधी



**इंझोरी, दि. २७ :** येथील जिल्हा परिषद शाळेच्या दोन वर्गखोल्यांच्या टिनपत्रांची मोडतोड झाली असून भिंतीही खचल्या आहेत. या वर्गखोल्यांच्या दुरुस्तीचा प्रस्ताव मुख्याध्यापकांनी तातडीने शिक्षण विभागाकडे सादर केला होता. प्रस्तावाला मंजुरीही मिळाली; मात्र चार महिने उलटूनही दुरुस्तीच्या कामाला अद्याप मुहूर्त मिळालेला नाही.

इंझोरी येथील जिल्हा परिषद शाळेत पहिली ते सातवीपर्यंतच्या शिक्षणाची सुविधा असून, शाळेची एकूण पटसंख्या २६० पेक्षा अधिक आहे. सुसज्ज लायब्ररी, डिजिटल बोर्ड, डिजिटल वर्गखोल्या आणि इतर आधुनिक सुविधांमुळे या शाळेने परिसरातील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीस मोठा हातभार लावला आहे. यंदा १० जून रोजी मानोरा तालुक्यात वादळी वाऱ्यासह झालेल्या जोरदार पावसामुळे शाळेच्या दोन वर्गखोल्यांची मोठी हानी झाली. टिनपत्रे उडून गेली, तर भिंतींची पडझड झाली. परिणामी, त्या दोन वर्गखोल्यांमधील अध्यापन पूर्णपणे ठप्प झाले असून विद्यार्थ्यांना इतर वर्गात बसवून शिकवावे लागत आहे. मुख्याध्यापक ढोरे यांनी या नुकसानीचा अहवाल तयार करून तातडीने शिक्षण विभागाकडे दुरुस्तीचा प्रस्ताव पाठविला. प्रस्तावास मंजुरी मिळूनही चार महिने उलटले तरी प्रत्यक्ष दुरुस्तीचे काम सुरू झालेले नाही. त्यामुळे दोन वर्गातील विद्यार्थी एकाच वर्गखोलीत बसून शिक्षण घेत आहेत, ज्यामुळे अध्यापनात अडथळे निर्माण होत आहेत. या परिस्थितीकडे शिक्षण विभागातील वरिष्ठ अधिकाऱ्यांनी तातडीने लक्ष द्यावे आणि वर्गखोल्यांची दुरुस्ती लवकरात लवकर करावी, अशी मागणी पालकांनी केली आहे.

---

## कर्जबाजारीपणामुळे पारव्याच्या तरुण शेतकऱ्याची आत्महत्या

**मानोरा :** कर्जबाजारीपणामुळे त्रस्त असलेल्या एका तरुण शेतकऱ्याने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची दुर्दैवी घटना मानोरा तालुक्यातील पारवा येथे घडली आहे. मृत शेतकऱ्याकडे बँकेचे कर्ज असल्याची माहिती आहे.

मानोरा तालुका पोलीस स्टेशन अंतर्गत येणाऱ्या पारवा येथील शेतकरी राम वासुदेव जाधव (वय ३२) यांनी दिनांक २६ ऑक्टोबर २०२५ रोजी सकाळी अंदाजे ८:३० वाजताच्या सुमारास आपल्या शेतातील लिंबाच्या झाडाला गळफास घेऊन जीवन संपवले.

मृतक राम जाधव यांच्याकडे केवळ तीन एकर शेती असून, त्यावर बँकेचे कर्ज होते. आर्थिक विवंचनेतून त्यांनी हे टोकाचे पाऊल उचलल्याचे बोलले जात आहे. त्यांच्या पश्चात पत्नी, आई आणि तीन लहान मुली असा परिवार आहे. त्यांच्या अकाली निधनाने जाधव कुटुंबावर दु:खाचा डोंगर कोसळला आहे.

मृतकच्या भावाने दिलेल्या माहितीवरून मानोरा पोलिसांनी आकस्मिक मृत्यूची नोंद केली आहे. पुढील तपास बीट जमादार दीपक राठोड आणि निलेश जयशिंगकार हे करीत आहेत.

---

## दिवाळीपूर्वी मिळणाऱ्या सानुग्रह अनुदानाची परंपरा खंडित!

### तांत्रिक कामगार युनियनची शासनाकडे मागणी

**वाशिम:** महापारेषण, महावितरण आणि महानिर्मिती या तिन्ही वीज कंपन्यांतील तांत्रिक कामगार, अधिकारी आणि अभियंत्यांना पूर्वापारपासून दिवाळीपूर्वी सानुग्रह अनुदान (बोनस) दिले जाते. यंदा मात्र ही परंपरा खंडित झाली असून, तांत्रिक कामगार युनियनने २५ ऑक्टोबर रोजी मुख्यमंत्री आणि ऊर्जामंत्र्यांकडे पत्रव्यवहार करून सानुग्रह अनुदान तातडीने देण्याची मागणी केली आहे.

या संदर्भात केंद्रीय सरचिटणीस प्रभाकर लहाने यांनी सांगितले की, दरवर्षी दिवाळीपूर्वी तांत्रिक कामगारांना ३० हजार रुपये आणि सहायक कर्मचाऱ्यांना २० हजार रुपये सानुग्रह अनुदान दिले जाते. मागील अनेक वर्षांपासून ही परंपरा कायम आहे.

महसूल वाढवण्यात कामगारांचा मोलाचा वाटा महावितरणचा मासिक महसूल १०,६६६ कोटी रुपयांपर्यंत पोहोचवण्यात कामगार, अधिकारी आणि अभियंत्यांनी मोलाची भूमिका बजावली आहे. तसेच, एटी अँड सी व वितरणातील नुकसान लक्षणीयरीत्या कमी करण्यातही यश मिळाले आहे. कंपनीने या वर्षी जागतिक व राष्ट्रीय स्तरावर एकूण ११ मानाचे पुरस्कार प्राप्त केले आहेत. या यशाच्या पार्श्वभूमीवर सानुग्रह अनुदानाचा निर्णय न होणे हे दुर्दैवी असल्याचे युनियनने नमूद केले आहे. मात्र, यंदा दिवाळीचा सण संपूनही या संदर्भात निर्णय न झाल्याने कामगारांमध्ये अस्वस्थता पसरली आहे.

---

## जिल्हाधिकारी कार्यालयात भ्रष्टाचार निर्मूलनाची प्रतिज्ञा

दै. अजिंक्य भारत । प्रतिनिधी




**वाशिम, दि. २७ :** जिल्हाधिकारी कार्यालयातील राजे वाकाटक सभागृहात दक्षता जनजागृती सप्ताहानिमित्त आयोजित कार्यक्रमात भ्रष्टाचार निर्मूलनाची प्रतिज्ञा घेण्यात आली. देशाच्या आर्थिक, सामाजिक आणि राजकीय प्रगतीत भ्रष्टाचार हा मोठा अडथळा असून, सर्व कामे प्रामाणिकपणे करण्याची शपथ यावेळी उपस्थितांनी घेतली.

यावेळी राज्यपाल आचार्य देवव्रत आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संदेशांचे वाचन करण्यात आले. राज्यपाल आचार्य देवव्रत यांनी आपल्या संदेशात नागरिकांचा सक्रिय सहभाग, प्रामाणिक आचरण आणि पारदर्शक प्रशासनाच्या माध्यमातून सामूहिक प्रयत्नांद्वारे विकसित भारत २०४७ कडे वाटचाल सुरू असल्याचे सांगितले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आवाहन केले की, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दिलेल्या भ्रष्टाचारमुक्त भारत संकल्पनेला वास्तवात आणण्यासाठी ही जनजागृती मोहीम महत्त्वपूर्ण आहे. आपण सर्वांनी भ्रष्टाचाराविरोधी भूमिका घेत, प्रामाणिकता आणि पारदर्शक कारभारातून विकसित भारताच्या निर्मितीत योगदान द्यावे.

राज्यात दरवर्षी २७ ऑक्टोबर ते २ नोव्हेंबर या कालावधीत दक्षता जनजागृती सप्ताह आयोजित करण्यात येतो. यावर्षी 'दक्षता: आपली सामायिक जबाबदारी' ही संकल्पना घेऊन हा सप्ताह साजरा केला जाणार आहे. याप्रसंगी निवासी उपजिल्हाधिकारी विश्वनाथ घुगे, सहाय्यक अधीक्षक सुनील घोडे यांच्यासह जिल्हाधिकारी कार्यालयातील विविध विभागाचे अधिकारी-कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचालन गजानन उगले यांनी केले.

---

**बालपणीच्या आठवणी** | **३१ वर्षांनंतरचा स्मृतिरंजन स्नेहमेळावा संपन्न**

## शालेय जीवनातील मधूर आठवणींना उजाळा

दै. अजिंक्य भारत । प्रतिनिधी



**रिसोड, दि. २७ :** येथील श्री शिवाजी विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयाच्या माजी विद्यार्थ्यांनी तब्बल ३१ वर्षांनंतर एकत्र येऊन एक अविस्मरणीय स्नेहमेळावा साजरा केला. दिनांक २६ ऑक्टोबर रोजी रिसोड-मालेगाव मार्गावरील खडकी फाटा येथील गव्हाणे फार्म हाऊस येथे हा आनंद सोहळा मोठ्या उत्साहात पार पडला. जुन्या मित्रांना भेटल्याचा परमानंद प्रत्येकाच्या चेहऱ्यावर झळकत होता आणि शालेय जीवनातील मधुर आठवणींना पुन्हा एकदा उजाळा मिळाला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सेवानिवृत्त शिक्षक वि. बी. देशमुख होते. प्रमुख पाहुण्यांमध्ये प्रा. सरनाईक, भारत माध्यमिक शाळेचे मुख्याध्यापक एम. डी. शिंदे, एन. डी. देशमुख, आर. डी. जाधव आणि विठ्ठलराव नरवाडे यांची सन्माननीय उपस्थिती होती. राम डिडवाणी यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले.

यावेळी शेख वकार, चंद्रशेखर बोंडे, शेख अन्सारोद्दीन, प्रदीप खरात, संजय रवणे, राजकुमार देशमुख या माजी विद्यार्थ्यांनी भावपूर्ण मनोगते व्यक्त केली. महावीर क्षीरसागर यांनी आपल्या सुमधुर गायनाने उपस्थितांची मने जिंकली. मंचावरील मान्यवरांनी इतक्या मोठ्या संख्येने आणि इतक्या वर्षांनी माजी विद्यार्थ्यांचे एकत्र येणे हा एक अमूल्य क्षण असल्याचे मत व्यक्त करून कार्यक्रमाचे कौतुक केले.

या कार्यक्रमात दोन गौरवशाली माजी विद्यार्थ्यांचा विशेष सन्मान करण्यात आला. रिसोड तालुक्यातील नावली येथील जि. प. शाळेचे शिक्षक राम डिडवाणी यांनी ४० हून अधिक विद्यार्थ्यांना तब्बल ३० लाख रुपयांपर्यंतची शिष्यवृत्ती मिळवून देण्यासाठी मोलाचे कार्य केले. तसेच, शेख कौसर यांनी भारत, बांगलादेश, कझाकिस्तान व तुर्कस्तान या देशांमध्ये वेट लिफ्टिंगचे सुवर्णपदक मिळवून भारताचे नाव जागतिक स्तरावर नेले आहे. या गौरवशाली कामगिरीबद्दल दोघांचाही मंचावरील मान्यवरांच्या हस्ते सन्मान करण्यात आला.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन चाफेश्वर गांगवे यांनी केले. ज्ञानेश्वर गव्हाणे यांनी आभार प्रदर्शन केले. भागवत भोसले, श्याम चव्हाण, प्रदीप खरात आदी जुन्या विद्यार्थ्यांनी या कार्यक्रमाचे भव्य आयोजन केले. या सोहळ्यासाठी पल्लवी पाखरे, रिंपल भिसडे, लता चव्हाण, संतोष बुधनेर, केशव भोपाळे, मनोज मेहता, शेख चांद, संतोष शिंगाडे, सुभाष भालेराव, दिलीप मानेकर, मारोती वालके, आसरु दहातोंडे, गणेश आटोले, संतोष घुकसे, शिवाजी सरनाईक, संतोष मोरे, राजू कांबळे, मुकुंद कदम, वसीम खान, शेख कौसर, गोपाल पवार, कडुजी ताजने, विजय वाघ, सुरेश वाळके, सुनील सानप यासह अनेक माजी विद्यार्थी आणि त्यांचे परिवार मोठ्या संख्येने उपस्थित होते.

---

## पोहरादेवीच्या नंगारा भवनात तिकीटावरून वाद

दै. अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**मानोरा, दि. २७ :** पोहरादेवी येथील नंगारा भवन (संग्रहालय) पाहण्यासाठी गेलेल्या एका पर्यटकाला तिकीटावरून वाद झाल्यानंतर तेथील सहा कर्मचाऱ्यांनी मारहाण केल्याची घटना २४ ऑक्टोबर रोजी घडली आहे. याप्रकरणी पोलिसांनी सहा कर्मचाऱ्यांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

याबाबत मिळालेल्या माहितीनुसार, लखन भाऊराव राठोड (रा. वाई लिंगी) हे २४ ऑक्टोबर रोजी पोहरादेवी येथील नंगारा भवन पाहण्यासाठी गेले होते. त्यावेळी तिकीटाच्या दरावरून त्यांचा तेथील कर्मचाऱ्यांशी वाद झाला. या वादातून तेथे उपस्थित असलेल्या सहा कर्मचाऱ्यांनी लखन राठोड आणि त्यांच्या भाच्याला शिवीगाळ करून जीवे मारण्याची धमकी दिली. तसेच, त्यांना काठीने मारहाण करून जखमी केले.

या घटनेनंतर फिर्यादी लखन राठोड यांनी २५ ऑक्टोबर रोजी मानोरा पोलीस स्टेशनमध्ये तक्रार दाखल केली. फिर्यादीच्या जबाबाच्या अहवालावरून आणि वैद्यकीय प्रमाणपत्रावरून पोलिसांनी आरोपी गार्ड दिगंबर देविदास चव्हाण (रा. आसोला) आणि त्याच्या पाच साथीदारांविरुद्ध भा.न्या.सं. नुसार कलम ११८(१), ३५१(२)(३), ३५२, १८९(२), १९१(२), १९० अंतर्गत गुन्हा दाखल केला आहे.

या प्रकरणाचा अधिक तपास पोलीस निरीक्षक नैना पोहेकर यांच्या मार्गदर्शनाखाली जमादार प्रदीप जाधव आणि करण ढंगारे हे करत आहेत.

महत्त्वाचे

## पाशा पटेल यांचे मुर्तिजापूरमध्ये भाजपच्या वतीने स्वागत



**मुर्तिजापूर** : राज्य कृषी मूल्य आयोग, महाराष्ट्र शासनाचे अध्यक्ष पाशा पटेल यांचे मुर्तिजापूर येथे आमदार हरीश पिंपळे यांच्या निवासस्थानी भाजपच्या वतीने आमदार हरीश पिंपळे आणि नूतन पिंपळे यांनी पाशा पटेल यांचे उत्साहात स्वागत करण्यात आले. यावेळी उपस्थित भाजप पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर पाशा पटेल यांच्यासोबत सविस्तर चर्चा केली. तसेच, मतदारसंघातील कृषीविषयक विविध उपक्रमांबद्दल मार्गदर्शन घेतले. ''शासन शेतकऱ्याच्या पाठीशी आहे,'' असे प्रतिपादन करत पाशा पटेल यांनी केले.त्यांनी शेती आणि शेतकऱ्यांच्या प्रगतीसाठी शासनाच्या योजना प्रत्येक शेतकऱ्यांपर्यंत पोहोचविण्याचा निर्धार व्यक्त केला.यावेळी भाजपचे तालुकाध्यक्ष राऊत, शहराध्यक्ष हर्षल साबळे, उपाध्यक्ष कोमल तायडे, गजानन महाराज बहुउद्देशीय संस्थेचे अध्यक्ष रोहन पिंपळे यांच्यासह अनेक कार्यकर्ते आणि पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## माजी विद्यार्थी मेळावा उत्साहात संपन्न



**चतारी** : पातूर तालुक्यातील देशभक्त विद्यालय, तांदळी खुर्द येथे १९९९ ते २००४ या काळात शिक्षण घेतलेल्या माजी विद्यार्थ्यांचा मेळावा शाळेच्या प्रांगणात मोठ्या उत्साहात पार पडला. तीनशे माजी विद्यार्थी, ज्यात त्या वेळच्या दहावीच्या १५० विद्यार्थी-विद्यार्थिनींचाही समावेश होता, या मेळाव्यास उपस्थित होते. यावेळी पुन्हा तेच वर्ग, तेच शिक्षक आणि तेच विद्यार्थी एकत्र आल्याने सर्वांच्या जुन्या आठवणींना उजाळा मिळाला. अनेक विद्यार्थ्यांनी मनोगत व्यक्त केले. या सोहळ्यात ग्रामीण गुरुकुल शिक्षण संस्था अध्यक्ष ॲड. श्रीकांत ताले, शिक्षक आमदार किरण सरनाईक, माजी शिक्षणाधिकारी देवेंद्र अवचार यांसह आजी-माजी शिक्षक आणि परिसरातील अनेकानेक उपस्थित होते. विवेक कापडे आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी या मेळाव्याच्या आयोजनात सक्रिय सहभाग घेतला. सहभोजन आणि वर्गमित्रांसोबतचे छायाचित्रण अशी आठवणींची शिदोरी सोबत घेऊन या कार्यक्रमाची उत्साहात सांगता झाली.

## बारावीच्या विद्यार्थ्यांना अभ्यासाचे नियोजन करणे आवश्यक - प्रा. राऊत

मूर्तिजापूर (प्रतिनिधी): दिशा सायन्स पॉईंट, येथे बारावीच्या विद्यार्थ्यांसाठी करिअर मार्गदर्शन आणि ११ वीच्या विद्यार्थ्यांसाठी स्वागत समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी वैभव राऊत होते, तर संस्थेचे संचालक प्रा. पवन राऊत यांनी प्रमुख करिअर मार्गदर्शक म्हणून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. प्रा. भारती राऊत यांच्या प्रास्ताविकाने कार्यक्रमाची सुरुवात झाली. त्यानंतर बोलताना प्रा. पवन राऊत यांनी बारावीच्या विद्यार्थ्यांना अभ्यासाचे नियोजन, वेळेचे व्यवस्थापन, परीक्षा रणनीती आणि बारावीनंतरचे करिअर मार्ग याविषयी सविस्तर माहिती दिली. , ''बारावी हा विद्यार्थ्यांच्या आयुष्यातील टर्निंग पॉईंट आहे. या टप्प्यावर अभ्यासाला महत्त्व दिल्यास आई-वडिलांच्या इच्छा पूर्ण करता येतात आणि आयुष्य सुखकर होते.

# जोपर्यंत अतिक्रमण हटत नाही, तोपर्यंत टपरी हटणार नाही

## ग्रामपंचायत गेटवरच खोका ठेवून प्रवेशमार्ग सील

दै. अजिंक्य भारत । प्रतिनिधी



**शिरपूर जैन (जि. वाशिम), दि. २७** : गावात फोफावलेल्या आणि बेसुमार वाढलेल्या अतिक्रमणासमोर मान टाकणाऱ्या ग्रामपंचायत प्रशासनाच्या निष्क्रियतेविरुद्ध शिरपूरचा स्थानिक युवक मंगेश गायकवाड याने आरपारचा लढा पुकारला आहे. प्रशासनाच्या सुस्त आणि दिरंगाईच्या कारभारावर कडवट संताप व्यक्त करत, गायकवाड यांनी थेट ग्रामपंचायत कार्यालयाच्या मुख्य प्रवेशद्वारावरच आपली लोखंडी टिनशेडची टपरी (खोका) उभी केली आणि कार्यालयाचा प्रवेशमार्ग पूर्णपणे सील केला आहे. या खोका आंदोलनाने केवळ प्रशासनाची नाही, तर संपूर्ण जिल्ह्याची झोप उडवली आहे!

प्रकरणाचे गांभीर्य अधिक आहे. गायकवाड यांनी गावातील अतिक्रमणाच्या गंभीर मुद्द्यावर ४ ऑगस्ट २०२५ रोजी विभागीय आयुक्त, अमरावती यांच्याकडे कायदेशीर तक्रार दाखल केली होती. या तक्रारीनंतर जिल्हाधिकारी यांनी तात्काळ कारवाईचे आदेश देत, अतिक्रमण हटवून संबंधित ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांवर शिस्तभंगाची कारवाई करण्याची जबाबदारी गटविकास अधिकाऱ्यांवर सोपवली होती.

शासनाकडून स्पष्ट आणि निर्णायक आदेश मिळूनही शिरपूर ग्रामपंचायतीने त्यांना सपशेल वाटाण्याच्या अक्षता लावल्या. प्रशासकीय यंत्रणेने अतिक्रमणधारकांना उघडपणे पाठीशी घालत, हे प्रकरण जाणीवपूर्वक थंड बस्त्यात दाबून टाकले. प्रशासनाच्या याच बेफिकीर वृत्तीमुळे मंगेश गायकवाड यांचा संयम संपला. त्यांनी २७ ऑक्टोबर २०२५ रोजी टोकाचे पाऊल उचलत, भ्रष्ट कारभाराचे प्रतीक असलेल्या ग्रामपंचायत कार्यालयाच्या प्रवेशद्वारावरच खोका उभा करून आपला संतप्त एल्गार सुरू केला. या आरपारच्या आंदोलनामुळे ग्रामस्थ दिसाळ प्रशासनावर तीव्र संताप व्यक्त करत असून, अनेक नागरिकांनी गायकवाड यांच्या भूमिकेला सक्रिय पाठिंबा दिला आहे. आता या आंदोलनाच्या तडाख्यानंतर ग्रामपंचायत प्रशासन केवळ बघ्याची भूमिका घेते, की प्रशासकीय आदेशांचे पालन करत धडाकेबाज कारवाई करते, याकडे केवळ शिरपूरचेच नव्हे, तर संपूर्ण तालुक्याचे लक्ष लागून राहिले आहे.

### सर्व अतिक्रमणमुक्त होईपर्यंत आंदोलन मागे नाही!

गायकवाड यांनी आपली भूमिका अधिक ठामपणे मांडताना सांगितले, ''ग्रामपंचायतीच्या लाचार दुर्लक्षामुळे गावातील अतिक्रमण राक्षसासारखे वाढले आहे. शासनाच्या आदेशालाही हे जुमानत नाहीत. प्रशासनाला जनतेच्या प्रश्नांची आणि कर्तव्याची जाणीव व्हावी, यासाठी हे अत्यंत आवश्यक पाऊल उचलले आहे. ''जोपर्यंत शिरपूर गावातील प्रत्येक अतिक्रमण पूर्णपणे भुईसपाट होत नाही आणि ग्रामपंचायत कार्यालय स्वतः अतिक्रमणमुक्त होत नाही, तोपर्यंत माझ्या टपरीचा (खोक्याचा) अडथळा प्रवेशद्वारातून हटणार नाही!'' असा निर्णायक आणि लढाऊ इशारा गायकवाड यांनी दिला आहे.

## सोयाबीन उत्पादनात प्रचंड घट; कृषी विभागाने कारणे स्पष्ट करावीत

दै. अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**हिरपूर, दि. २७** : यंदाच्या खरीप हंगामात सोयाबीन उत्पादनात तालुक्यात मोठी घट झाल्याने शेतकरी वर्गात तीव्र नाराजी पसरली आहे. मागील वर्षी एकरी चार ते पाच क्विंटल उत्पादन घेणाऱ्या शेतकऱ्यांचे उत्पादन यंदा जेमतेम एक ते दोन क्विंटलपर्यंत खाली आले आहे. यामुळे झालेले मोठे नुकसान पाहता, सोयाबीन उत्पादन घटण्यामागील खरी कारणे कृषी विभागाने पारदर्शकपणे स्पष्ट करावीत, अशी मागणी शेतकरी वर्गातून जोर धरू लागली आहे.

**शेतकऱ्यांची मागणी**

हवामानातील अनिश्चितता, अतिपाऊस आणि नंतर थांबून थांबून झालेल्या पावसामुळे पिकांची मरगळ, वाढलेला कीड-रोग प्रादुर्भाव तसेच बियाण्याची निकृष्ट गुणवत्ता ही उत्पादनातील घटीमागील प्रमुख कारणे असल्याचे शेतकऱ्यांचे म्हणणे आहे. शेतकरी सुरेश डवंगे यांनी आपली व्यथा मांडताना सांगितले की, ''तीन एकर शेतीत केवळ दोन क्विंटल उत्पादन झाले. एवढा खर्च करूनही उत्पन्न अपुरे ठरले. मन खचले असून, रब्बीसाठी भांडवल उभे करायचे की कर्ज फेडायचे, हा प्रश्न निर्माण झाला आहे.'' उत्पादन घटल्याने शेतकऱ्यांचे आर्थिक नियोजन पूर्णपणे कोलमडले आहे. बाजारात सोयाबीनचा भाव २८०० ते ४२०० रुपयांदरम्यान मिळत असला तरी कमी उत्पादनामुळे उत्पन्न तोकडे पडत आहे. त्यामुळे, शासनाने आणि कृषी विभागाने या उत्पादन घटीची सखोल चौकशी करून, नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना तत्काळ आर्थिक मदत द्यावी, अशी आग्रही मागणी शेतकरी करत आहेत.

## श्री शंकर विद्यालयात २५ वर्षांनंतर माजी विद्यार्थ्यांचा स्नेह मिलन सोहळा!



दै. अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**दहिगाव गावंडे, दि. २७** : श्री शंकर विद्यालयाच्या प्रांगणात तब्बल २५ वर्षांनंतर माजी विद्यार्थ्यांचा स्नेह मिलन सोहळा उत्साहात, भावनांच्या कल्लोळात आणि आनंदमय वातावरणात पार पडला. ''वेळ गेली, चेहरे बदलले... पण शाळेवरील आपुलकी आजही तितकीच उजळून दिसते!'' या भावनेचा अनुभव यावेळी सर्व विद्यार्थी आणि शिक्षकांनी घेतला.

माजी विद्यार्थ्यांनी शाळेला थंड शीतल जलसेवा मशीन भेट दिली. दहावीची जुनी वर्गखोली सजवून पुन्हा एकदा विद्यार्थ्यांची हजेरी घेण्यात आली. जुन्या आठवणींना उजाळा मिळाल्यावर, मैदानावर खो-खो, संगीत खुर्ची यांसारख्या खेळांनी बालपणाला नवसंजीवनी दिली. माजी मुख्याध्यापक प्रमोद राजंदेकर यांनी ''घडलेली मुले हीच खरी संपत्ती आहे'' असे भावनिक मनोगत व्यक्त केले.कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी गायत्री इंगळे, राहुल पंडीत, ओमप्रकाश शेंडे यांच्यासह अनेक माजी विद्यार्थ्यांनी योगदान दिले. हा स्नेह मिलन सोहळा म्हणजे २५ वर्षांपूर्वीच्या गोड आठवणींचा पुनरुज्जीवन सोहळा ठरला. विनायक भुईभार यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या कार्यक्रमाला संस्थेचे अध्यक्ष राजेश भुईभार, सचिव संजय इंगळे आणि माजी मुख्याध्यापक रामेश्वर वक्ते, नंदकिशोर ठाकरे, प्रमोद राजंदेकर यांच्यासह अनेक माजी व विद्यमान शिक्षक उपस्थित होते.

## घराची भिंत कोसळल्याने ८ वर्षीय बालक दगावला

दै. अजिंक्य भारत । प्रतिनिधी



**बाळापूर, दि. २७** : तालुक्यात गेल्या दोन दिवसांपासून पडत असलेल्या अवकाळी पावसामुळे रविवार, दि. २६ ऑक्टोबर रोजी हातरूण गावात एक हृदयद्रावक घटना घडली. घराची भिंत कोसळल्याने शेख हसनैन शेख बिस्मिल्लाह कुरेशी या ८ वर्षीय निष्पाप बालकाचा दुर्दैवी मृत्यू झाला. या घटनेमुळे संपूर्ण गावावर शोककळा पसरली असून जनमानसाचे मन सुन्न झाले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, रविवारी दुपारी १२:३० ते १:०० वाजण्याच्या सुमारास हातरूण गावात जोरदार वाऱ्यासह मुसळधार पाऊस झाला. याच दरम्यान, गावातील मधुकर नारायण गावंडे यांच्या घराची भिंत अचानक कोसळली. याचवेळी जिल्हा परिषद प्राथमिक उर्दू शाळेत तिसऱ्या वर्गात शिकणारा शेख हसनैन घराच्या जवळून जात असताना, कोसळणाऱ्या भिंतीची धडक त्याला बसली आणि भिंत पूर्णपणे त्याच्या अंगावर कोसळली. भिंतीच्या ढिगाऱ्याखाली अडकलेल्या हसनैनला तातडीने गावकरी आणि परिसरातील लोकांनी बाहेर काढले. गंभीर जखमी अवस्थेत त्याला त्वरित गावातील एका खासगी रुग्णालयात नेण्यात आले. परंतु प्रकृती चिंताजनक असल्याने पुढील उपचारासाठी त्याला तातडीने अकोला जिल्हा सरकारी रुग्णालयात हलविण्यात आले. मात्र, डॉक्टरांनी तपासणीनंतर त्याला मृत घोषित केले. या हृदयद्रावक घटनेमुळे शेख बिस्मिल्ला यांच्या कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. शासनाने या निष्पाप बालकाच्या कुटुंबीयांना तत्काळ आर्थिक मदत करावी, अशी मागणी गावकरी आणि नागरिकांकडून होत आहे.

## निराधारांसोबत साजरी झाली 'खरी दिवाळी'

### आधार निराधार केंद्रात' साडीचोळी, ब्लँकेट आणि फराळाचे वाटप



दै. अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**मुर्तिजापूर, दि. २७** : दिवाळी म्हणजे केवळ दिव्यांचा नव्हे, तर आनंद वाटण्याचा सण ही भावना कृतीत उतरवत जनसेवक बाबु देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली जगदंब प्रतिष्ठान (अंबागेट, बुधवारा, अमरावती) यांनी बडनेरा येथील आधार निराधार केंद्रात निराधार महिला आणि पुरुषांसोबत दिवाळीचा आनंद साजरा केला.

या सामाजिक आणि स्तुत्य उपक्रमातून संस्थेतील निराधारांना दिवाळीचा फराळ, महिलांना साडीचोळी आणि पुरुषांना ब्लँकेटचे वाटप करण्यात आले. या वस्तू वाटपाने निराधार केंद्रात आनंदाचे आणि उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते. या कार्यक्रमाला विदर्भ अध्यक्ष व कुस्तीगीर प्रशिक्षक पै. समीर देशमुख, गोविंद प्रभू संस्थानचे पंकज दिनेश धस्कट, समाजसेवक सचिन वाटकर, तसेच आधार केंद्राच्या संचालिका ज्योती राठोड आणि राजीव बसवनाथे यांची प्रमुख उपस्थिती लाभली. जनसेवक बाबूभाऊ देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली जगदंब प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष गौरव बेलूरकर, उपाध्यक्ष समीर देशमुख, तसेच अन्य सदस्यांनी या सामाजिक उपक्रमाचे अत्यंत सुयोग्य आणि उत्साहाने नियोजन केले.कार्यक्रमाच्या शेवटी सर्व मान्यवरांचा यथोचित सत्कार करण्यात आला. उपस्थितांनी जगदंब प्रतिष्ठानच्या समाजाभिमुख कार्याचे मनापासून कौतुक केले आणि ''खरी दिवाळी म्हणजे आनंदाचे वाटप'' हा संदेश समाजात दिला.

## एनसीसी कॅम्पमधील यशस्वी सहभागाने वाढवला महाविद्यालयाचा लौकिक

**पातूर**: स्थानिक श्रीमती सुमित्राबाई अंधारे कृषी महाविद्यालय, शिर्ला अंधारे येथील एनसीसी विद्यार्थ्यांनी विविध राष्ट्रीय कॅम्पमध्ये यशस्वी सहभाग घेऊन महाविद्यालयाचा लौकिक देशभरात वाढवला आहे. संस्थापक अध्यक्ष श्रीकृष्ण अंधारे आणि डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठाच्या कार्यकारी परिषद सदस्या श्रीमती हेमलता अंधारे यांनी या विद्यार्थ्यांच्या शिस्त, परिश्रम आणि नेतृत्वाचे कौतुक केले.एल.सी.पी.एल. अखिलेश बोथे: ऑल इंडिया थल सैनिक कॅम्प, दिल्ली (सुवर्ण पदक प्राप्त).जे.यू.ओ. अथर्व नानोटे: ॲडव्हान्स लीडरशीप कॅम्प, नाशिक.सी.क्यू.एस. अभिषेक राऊत: आर्मी अटॅचमेंट कॅम्प, पुणे. कॅडेट ऋषिकेश चतरकर: आर्मी अटॅचमेंट कॅम्प, कामठी. कॅडेट रोहन इंगळे: एक भारत श्रेष्ठ भारत कॅम्प, अहमदनगर. या कॅडेट्सचा महाविद्यालयात भव्य स्वागत समारंभ आयोजित करण्यात आला. प्राचार्य डॉ. राम खरडे आणि शिक्षण अधिकारी प्रा. रोहित कनोजे यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. ''आपल्या शिस्तीच्या बळावर महाविद्यालयाने यशाच्या शिखरावर चढावे,'' असे प्रा. कनोजे यांनी विद्यार्थ्यांना प्रेरित केले. विद्यार्थ्यांचे हे यश महाविद्यालयासाठी अभिमानास्पद आहे.

## सेंट आन्स हायस्कूलमध्ये माजी विद्यार्थ्यांचा स्नेहमेळावा

दै. अजिंक्य भारत । प्रतिनिधी



**मुर्तिजापूर, दि. २७** : सेंट आन्स हायस्कूलमध्ये दिनांक २६ ऑक्टोबर २०२५ रोजी मागील १५ वर्षांतील माजी विद्यार्थ्यांचा स्नेहमेळावा उत्साहात आणि भावनिक वातावरणात पार पडला. 'शाळा म्हणजे आयुष्यभर जपून ठेवण्यासारखी भावना' ही अनुभूती यावेळी सर्वांनी घेतली.

मुख्याध्यापिका सिस्टर सुचिता आणि फादर जोश यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित या कार्यक्रमाला मुंबई, पुणे, नागपूर तसेच जर्मनीसारख्या ठिकाणांहून विद्यार्थी उपस्थित राहिले. शाळेच्या वर्गखोल्या आणि मैदान पुन्हा एकदा त्यांच्या हास्य-गप्पांनी गजबजले. कार्यक्रमाची सुरुवात प्रार्थना गीताने झाली. विद्यार्थ्यांनी शाळेतील अविस्मरणीय आठवणी भावनिक शब्दांत मांडल्या. काहींच्या डोळ्यांत आनंदश्रू तर काहींच्या चेहऱ्यावर हास्य होते. नितेश अग्रवाल, पीयूष भोजगडिया यांच्यासह अन्य माजी विद्यार्थ्यांनी आयोजनाची धुरा सांभाळली. मंच संचालन पूजा ठाकुर यांनी केले, तर आभार प्रदर्शन साक्षी उमक यांनी केले. कार्यक्रमाच्या शेवटी, सर्व माजी विद्यार्थ्यांनी जुन्या वर्गखोल्यांना भेट देऊन बेंचेसला हात लावला आणि बालपणीच्या आठवणींना उजाळा दिला. हा स्नेहमेळावा म्हणजे भावनांचा उत्सव आणि नात्यांचा पुनर्जन्म ठरला.

धक्कादायक | बांबू वृक्ष संगोपनाच्या देयकात घोळ

# पातूर परिसरात शासनाला लाखो रुपयांचा गंडा!

दै. अजिंक्य भारत । प्रतिनिधी



**सावरगाव, दि. २७** : पातुर पंचायत समिती अंतर्गत चांगेफळ आणि शिरपूर परिसरात रोजगार हमी योजनेखालील बांबू वृक्ष लागवडीच्या संगोपन देयकांमध्ये मोठा गैरव्यवहार झाल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. प्रत्यक्ष बांधावर बांबूची लागवड अत्यंत कमी असताना, कागदोपत्री मात्र शेकडोंच्या संख्येने झाडे दाखवून लाखो रुपयांची देयके हडप करून शासनाची फसवणूक केली जात आहे.

या गैरप्रकाराकडे पातुर पंचायत समितीतील रोजगार हमी योजनेच्या (रोहियो) संबंधित अधिकाऱ्यांचे दुर्लक्ष होत नसून, उलटपक्षी त्यांचे पाठबळ मिळत असल्याचा गंभीर आरोप स्थानिक नागरिकांनी केला आहे.

यंदा पावसाळा सुरू झाल्यावर शेतकऱ्यांनी बांधावर बांबूची लागवड केली, परंतु आता संगोपनाच्या नावाखाली बोगस आकडेवारी दाखवून मजुरांच्या नावावर देयके काढून शासनाच्या तिजोरीला चुना लावला जात आहे. संबंधित अधिकाऱ्यांच्या लाचखोरीमुळे वृक्ष लागवडीच्या संगोपनात कोट्यवधी रुपयांचा गंडा घालण्याचे प्रकार सुरू आहेत. वारंवार तक्रारी करूनही कारवाई होत नाही, त्यामुळे रोहियोच्या उपजिल्हाधिकाऱ्यांनी लक्ष देणे आवश्यक आहे.''संबंधित वरिष्ठ अधिकाऱ्यांनी या घोळात सामील असलेल्यांवर तातडीने कठोर कारवाई करून, हडप केलेली देयके वसूल करावीत, अशी मागणी जोर धरू लागली आहे.

❑ चांगेफळ-शिरपूर परिसरातील बांबू वृक्ष लागवडीची मोका पाहणी (ऑन-साईट तपासणी) करून चौकशी केली जाईल. शेतकऱ्यांच्या बांधावर जेवढे बांबू वृक्ष आढळून येतील, तेवढ्याच झाडांच्या संगोपनाचे देयक मजुरांना अदा केले जाईल.''

**- आर. बी. चौधरी,**
तांत्रिक सहाय्यक पातुर पंचायत समिती

❑ पातुर प. स.अंतर्गत अनेक ठिकाणी वृक्ष लागवडीच्या संगोपणावर संबंधित अधिकाऱ्यांच्या लाचखोरीमुळे शासनाला कोट्यावधी रुपयांचा गंडा लावण्याचा प्रकार सुरू आहे. याबाबत वारंवार तक्रारी करूनही संबंधित अधिकाऱ्याकडून ठोस कारवाई केली जात नाही, रोहियोच्या उपजिल्हाधिकाऱ्यानी दखल घेण्याची गरज आहे.

**- दिलीप परनाटे,**
जिल्हाध्यक्ष शिवसंग्राम

## माजी विद्यार्थ्यांचा स्नेहसंमेलन सोहळा



दै. अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**अडगांव बु., दि. २७** : येथील जिल्हा परिषद विद्यालयातील सन २००३ ते २००५ च्या दहावी-बारावीच्या माजी विद्यार्थी व विद्यार्थिनींनी नुकताच एक स्नेहसंमेलन सोहळा आयोजित केला होता. आयुष्यातील धावपळ विसरून, शालेय जीवनातील आठवणींना उजाळा देण्यासाठी हे सर्वजण २५ वर्षांनंतर पुन्हा एकत्र आले.

या बॅचचे विद्यार्थी आज आर्मी, पोलीस, शिक्षक, एम.एस.ई.बी., शेती आणि व्यापार अशा विविध क्षेत्रांमध्ये कार्यरत आहेत. त्यांनी आपल्या जीवनसाथीसह या सोहळ्याला आवर्जून हजेरी लावली.

यावेळी एस. बी. गणविर, आर. जे. जाधव, साबळे, थेटे, खवले, लहरिया, अनिता देशमुख, सुरेश दातकर आणि दोघेही मेहरे यांच्यासह मार्गदर्शक पोलीस पाटील हितेश हागे यांचा शाल-श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला. विलास सपकाळ, प्रविण भोपळे, अमोल मेतकर यांच्यासह अनेक माजी विद्यार्थ्यांनी सोहळ्याचे आयोजन केले. २००३-२००५ प्रमाणे पुन्हा वर्ग भरवण्यात आले, जिथे शिक्षकांनी जीवनातील संकटांना सामोरे जाण्याबद्दल मार्गदर्शन केले. हा स्नेहसंमेलन सोहळा सर्व माजी विद्यार्थी आणि शिक्षकांसाठी अविस्मरणीय ठरला.

अजिंक्य भारत

# आपलं बुलडाणा

बुलडाणा, मंगळवार, दि.२८ ऑक्टोबर २०२५ www.ajinkyabharat.com



**महत्त्वाचे**

## पुल न बांधल्यास निवडणुकांवर बहिष्कार

**खामगाव :** तालुक्यातील संभापूर येथील ग्रामस्थांनी आज २७ ऑक्टोबर २५ रोजी उपविभागीय अधिकारी (महसूल) तथा निवडणुक अधिकारी यांना निवेदन दिले. त्यामध्ये अशा आशयाचे नमुद केले आहे की, मागील १५ वर्षांपासून शासन दरबारी तसेच लोकप्रतिनिधी यांच्याकडे संभापूर गट ग्रामपंचायत अंतर्गत मौजे लासूरा जहाँगिर येथे मस नदीवर नविन पुल बांधण्यात यावा यासाठी पाठपुरावा करण्यात येत आहे. लासूरा जहाँगिर येथे मस नदीवर पुल नसल्यामुळे ग्रामस्थांना पावसाळ्यात नदीत जास्त पाणी असल्यामुळे गावाबाहेर जाणे येणे कठीण होत आहे. त्यामुळे नदीवर त्वरीत पुल बांधावा अन्यथा आगामी निवडणुकांवर बहिष्कार टाकण्यात येईल, असा इशारा संभापूर येथील ग्रामस्थांनी निवेदनात दिला आहे. निवेदनावर गजानन गावंडे, चिंतामण शेगोकार, कोमल शेगोकार, दिपक शेगोकार, निखिल शेलारकर आदींच्या सह्या आहेत.

## कारची कारला धडक; गुन्हा दाखल

**खामगाव :** फैल भागातील रहिवासी महादेव खामगाव स्थानिक चांदमारी बळीराम गायकवाड (३८) हे २५ ऑक्टोबर २५ रोजी रात्री ११ वाजताच्या सुमारास कार क्र. एमएच-५६-ए-०४५४ ने शर्मा टर्निंग जवळून जात असताना कार क्र. एमएच-२७-बीझेड-६०६० चा चालक रोशन शांताराम वानखडे (वय २६, रा.शामल नगर) याने आपल्या ताब्यातील कार भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवून म हादेव गायकवाड यांच्या कारला धडक दिली.

यामध्ये कारचे अंदाजे २० हजार रूपयांचे नुकसान झाले आहे. तर रोशन वानखडे हा मद्यपान करून कार चालवित असल्याचे तपासात समोर आले. या प्रकरणी महादेव गायकवाड यांनी शहर पोस्टेला फिर्याद दिली. फिर्यादीवरून पोस्टें मध्ये उपरोक्त आरोपीविरुध्द कलम २८५, ३२४ (४) भान्यासं, सहकलम १२५ मोवाका ५९८८ नुसार गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास पोहेकों संतोष इटममल्लू करीत आहे.

## वृध्दाची गळफास घेऊन आत्महत्या

**खामगाव :** नांदुरा तालुक्यातील खुदावंतपुर येथील रहिवाशी प्रल्हाद भास्कर कंडारकर (६०) यांनी आजाराला कंटाळुन घरातील स्लॅबच्या लोखंडी हुकाला नायलॉनची दोरी अडकवून गळफास घेऊन आत्महत्या केली. ही घटना काल २६ ऑक्टोबर २५ रोजी सायंकाळी ७.५५ वाजता उघडकीस आली. याप्रकरणी गजानन भास्कर कंडारकर यांनी नांदुरा पोस्टेला फिर्याद दिली. फिर्यादीवरून पोस्टेमध्ये भान्यासं कलम १९४ नुसार मर्ग दाखल केला असुन पुढील तपास पोहेका वानखडे करीत आहेत.

**कृषी उत्पन्न बाजार समिती, खामगाव बाजार भाव**

| वान | भाव . |
|---|---|
| ज्वारी | - २००० - १८०० |
| गहू | - २४५० - २४२५ |
| तुर | - ६८०० - ५९०० |
| हरभरा | - ५४५० - ५६२५ |
| सोयाबीन | -४०५० - ३६७५ |
| उडीद | - ५८५० - ५०२५ |
| तीळ | - ८५०० - ८५०० |
| मुग | - ५००० - ५५५० |

# कलाकार श्याम राजपूत यांच्या हस्ते विधवांना शिलाई कापड वाटप

### शोले चित्रपटाप्रमाणे लहाने यांचे कार्यही सुपरहिट होईल!

अजिक्य भारत / प्रतिनिधी



**बुलडाणा दि. २७:** शोले चित्रपटातील ठाकूर घरातील विधवा बहुचे लग्न लावू शकत नाही. विधवा बहू आणि ठाकूरचा अभिनय आणि एकूणच शोले चित्रपट हिट झाला. तसेच प्रत्यक्षात विधवा विवाह सोहळे घडवून आणणारे प्रा.लहाने सरांचे कार्य उद्या नक्कीच सुपरहिट होणार असल्याचे गौरवोदगार टीव्ही कलाकार शाम राजपूत यांनी आज २७ ऑक्टोबर रोजी बुलढाण्यात काढले. माणस फाउंडेशन च्या वतीने विधवा महिलांना शिलाई मशीन साठी लागणाऱ्या कापडाच वितरणात शिवसाई '' फिजिक्स वाला ''या ठिकाणी त्यांच्या हस्ते करण्यात आले.

कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी मानस फाउंडेशनचे अध्यक्ष प्रा. डी एस लहाने होते तर प्रमुख अतिथी म्हणून टीव्ही कलाकार शाम राजपूत, प्राचार्य शाहिना पठाण, प्राचार्य अण्णासाहेब मळसणे, पत्रकार गणेश निकम केळवदकर, कलावंत अर्चना जाधव, प्रतिभा भुतेकर यांची प्रमुख उपस्थिती लाभली. पुढे बोलताना राजपूत म्हणाले, बुलढाणा शहर छोटे असेल पण विचारणे फार पुढारलेले आहे. विधवांसाठी कार्य येथे केले जाते. त्यांच्या जीवनात आनंद आणण्याचा प्रयत्न सुरू आहे हे कार्य मोठे आहे. जीवन उद्ध्वस्त कधीच नसते, त्याला पर्याय असतात. उपलब्ध होणारे पर्याय निवडून आपण जीवनातील आनंद टिपला पाहिजे असे ते म्हणाले. प्रा. डी एस लहाने यांनी कार्यक्रमाच्या आयोजना मागची भूमिका मांडली. माणस फाउंडेशनच्या कार्याचा आढावा त्यांनी यावेळी घेतला व उपस्थित पाहुण्यांचे स्वागत केले. पाहुण्यांचा परिचय कलावंत अर्चना जाधव यांनी करून दिला. संचलन प्राचार्य शाहिणा पठाण यांनी तर आभार प्रदर्शन पत्रकार संदीप वानखेडे यांनी मानले. कार्यक्रमास पत्रकार राजेंद्र काळे, सामाजिक कार्यकर्ते सुनील सपकाळ, ॲड. जयसिंग राजे देशमुख, माजी पोस्ट अधिकारी पी एल गोसावी,पत्रकार कैलास राऊत, पत्रकार रवींद्र गणेशे, ॲड. संदीप जाधव, पत्रकार सुरेखा सावळे, प्रज्ञाताई लांजेवार, अनिता कापरे, ज्योती पाटील, मनीषा वारे, राहुल हिवाळे, पंजाबराव गवई, गजानन मुळे, जगदेवराव जाधव, दिनकर पांडे, किरण पाटील यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवरांची मोठी उपस्थिती लाभली.

कार्यक्रमासाठी प्राचार्य मोहरकर, दाभाडकर यांनी परिश्रम घेतले. एमपीएससी मध्ये सहाय्यक समाज कल्याण आयुक्त वर्ग एक पदी निवड झालेला बुलढाण्यातील विद्यार्थी गौरव भुतेकर याचा मान्यवरांनी शाल व श्रीफळ देऊन सन्मान केला. तसेच अमरावती येथे झालेल्या मॅरेथॉन स्पर्धेत बुलढाण्याच्या अनिता कापरे विजेता ठरल्या याबद्दल त्यांचा व उपक्रमशील पत्रकार संदीप वानखेडे यांचा सन्मान श्याम राजपूत यांच्या हस्ते करण्यात आला.

# आकाश चव्हाण हत्येप्रकरणी तीन आरोपींवर गुन्हा दाखल

### आरोपीमध्ये दोन नाबालिकांचा समावेश

अजिक्य भारत/ प्रतिनिधी

**अंढेरा दि.२७ :** अंढेरा येथील बाजार गल्लीत दि.२५ आक्टोबर रोजी सायंकाळी पावणे सहाच्या सुमारास असोला येथील आकाश उत्तम चव्हाण या २२ वर्षीय युवकाची अंढेरा येथील एका १६ वर्षीय नाबालिकाने धारदार शस्त्राने पोटात सपासप वार करुन हत्या केली. यामध्ये आकाश उत्तम चव्हाण याचा जागीच मृत्यू झाला होता. घटना घडताच पोलिसांनी अंढेरा येथील दोन्ही नाबालिक तसेच सरंबा येथील हर्षल नंदकिशोर गिते यांना घटनेच्या रात्रीच अटक करण्यात आली होती. घटनेमधील आरोपींमध्ये दोन नाबालिकांचा समावेश आहे. मृतकाचे वडील उत्तम तोळीराम चव्हाण यांनी अंढेरा पोलिस स्टेशन ला दिलेल्या तक्रारीमध्ये म्हटले आहे की, दिनांक २५आक्टोबर ला दुपारी चार वाजता मुलगा आकाश त्यांचे मित्र राहूल वाघ आणि मंगेश इंगळे यांचे सोबत अंढेरा येथे गेला होता. सायंकाळी साडे सहाच्या सुमारास अंढेरा येथील बाजार गल्लीत मंगेश इंगळे आकाश उत्तम चव्हाण आणि राहुल वाघ असे उभे असतांना तेथे अंढेरा येथील दोन नाबालिक आणि सरंबा येथील हर्षल नंदकिशोर गिते असे तिघेजण आले त्यांनी आकाश सोबत कोणत्यातरी कारणावरुन जुन्या वादातून वाद केला आणि आकाश सोबत झटापट करुन एका नाबिलिकाने त्याचे पोटात चाकूने जबर वार करुन त्याला जखमी केले आणि ते पळुन घटनास्थळावरून पसार झाले. यामध्ये आकाश चव्हाण याला त्याच्या सहकारी यांनी आकाश यांचे पोटातून रक्त निघत असल्याने त्याला उचलून अगोदर भगवान बाब हास्पीटल येथे आणि तेथन तात्काळ सरकारी दवाखाना देऊळगाव मही येथे घेवून आलो आहे. परंतू तोपर्यंत आकाश मरण पावला होता. यामध्ये उत्तम चव्हाण यांनी दिलेल्या फिर्यादीवरून अंढेरा पोलिसांनी वरील तीनही आरोपींवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.घटनेचा पुढील तपास जिल्हा पोलीस अधीक्षक निलेश तांबे यांच्या मार्गदर्शनाखाली ठाणेदार रुपेश शक्करगे करीत आहे.

**आरोपी राहुल चव्हाणला २८ आक्टोबर पर्यंत पोलिस कोठडी**

वाशिम जिल्ह्यातील रुई (गोस्ता) येथील रहिवासी राहुल शेषराव चव्हाण (३३) या तरुणाने कौटुंबिक वादातून आपल्या अडीच ते तीन वर्षाच्या जुळ्या मुलींचा चाकूने गळा चिरून अमानुषपणे खून केल्याची धक्कादायक घटना २५ ऑक्टोबर रोजी अंढेरा परिसरात उघडकीस आली. प्रणाली आणि प्रतीक्षा अशी मृत जुळ्या निष्पाप मुलींची नावे असून आरोपी राहुल चव्हाण याला दि.२६आक्टोबर २०२५ रोजी चिखली न्यायालयात हजर केले असता न्यायालयाने दि.२८ आक्टोबर पर्यंत पोलिस कोठडी सुनावण्यात आली आहे.यावेळी सुरेश जारवाल यांनी आरोपीला न्यायालयात हजर केले. घटनेचा पुढील तपास उपविभागीय पोलिस अधिकारी संतोष खाडे करीत आहे.

## आठ दिवसांत मागण्या न मानल्यास तहसीलसमोर बेमुदत मुक्काम आंदोलन

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी



**नांदुरा दि.२७ :** चालू वर्षीच्या अतिवृष्टीमुळे शेतीचे मोठे नुकसान झाल्याने शेतकरी आर्थिक संकटात सापडले आहेत. या पार्श्वभूमीवर क्रांतिकारी शेतकरी संघटना, नांदुरा यांच्या वतीने आज माननीय तहसीलदार साहेब आणि कृषी अधिकारी यांना रक्तलिखित निवेदन देण्यात आले. या निवेदनातून शेतकऱ्यांच्या हक्कांच्या विविध मागण्या मांडण्यात आल्या आहेत.

संघटनेने सादर केलेल्या निवेदनात चालू वर्षीच्या अतिवृष्टी अनुदानाची तात्काळ घोषणा करून १८,५०० रुपये प्रति हेक्टरपर्यंत मदत द्यावी, तसेच १०० टक्के पीकविमा रक्कम तत्काळ वितरित करावी, अशी मागणी करण्यात आली आहे. यासोबतच राशन वंचित बांधवांना अनुदान द्यावे, तसेच मागील वर्षीची पडझड व पिकविम्याची थकबाकी रक्कमही तत्काळ देण्यात यावी, अशी मागणीही संघटनेकडून करण्यात आली आहे. तसेच मागील वर्षातील सरसकट कर्जमाफीची अंमलबजावणी न झाल्याबद्दल नाराजी व्यक्त करत, राज्य सरकारने शेतकऱ्यांच्या प्रश्नांकडे गांभीर्याने पाहावे, असा इशारा निवेदनातून देण्यात आला आहे. संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी स्पष्ट केले की, या मागण्या पुढील आठ दिवसांत मान्य न झाल्यास, क्रांतिकारी शेतकरी संघटनेतर्फे लोकशाही मार्गाने तहसीलसमोर बेमुदत ''बिस्तर-बिशाव'' मुक्काम आंदोलन करण्यात येईल. शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर तात्काळ तोडगा निघावा आणि प्रशासनाने ठोस निर्णय घ्यावा, अशी मागणी यावेळी उपस्थित शेतकऱ्यांनी केली.

## १५ वर्षानंतर माजी विद्यार्थी व शिक्षक गेट टुगेदर संपन्न

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी



**मंगरूळ नवघरे दि. २७ :** आपली शाळा सर्व भौतीक सुविधांसह सर्वांगसुंदर बनविण्यासाठी शाळेच्या सर्व माजी विद्यार्थ्यांनी पुढाकार घ्यावा व यथाशक्ती मदतीचा हात देऊन जिल्हा परिषदेच्या शाळा वाचविण्यासाठी आपल्या पाल्यांना जिल्हा परिषद शाळेतच शिकवावे आणि गावचा विकास साधावा व आपल्या गुरुजनांना हीच बाब गुरुदक्षिणा म्हणून समर्पित करावी असे भावनिक आवाहन गेट टुगेदर कार्यक्रमाचे प्रमुख मार्गदर्शक प्राचार्य वसंतराव गाडेकर गुरुजी यांनी उपस्थित माजी विद्यार्थ्यांना केले आहे.

याबाबत असे की , जिल्हा परिषद हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय मंगरूळ नवघरे येथे सन २००९-१० मध्ये दहावी शिकणाऱ्या माजी विद्यार्थ्यांचा स्नेहमिलन( गेट-टुगेदर ) कार्यक्रम शनिवारी २५ ऑक्टोंबर रोजी महाविद्यालयाचे प्राचार्य वसंतराव गाडेकर गुरुजी यांचे मार्गदर्शनानुसार शाळेचे माजी प्राचार्य डी.टी. फोलाने सर यांच्या अध्यक्षतेखाली पार पडला. त्यावेळी ते बोलत होते.

या स्नेहमिलन कार्यक्रमला शाळेची माजी विद्यार्थीनी तथा बुलडाणा जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्षा सौ.मनिषा पवार ह्या प्रामुख्याने उपस्थित होत्या. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित असलेल्या शाळेच्या आजी - माजी शिक्षकांचा माजी विद्यार्थ्यांकडून कृतज्ञातापूर्वक सत्कार करण्यात आला. यामध्ये प्रामुख्याने गणेशपूरचे मुख्याध्यापक रमेश वाघ सर, जी . एस . वायाळ सर , जी . एम . वाघ सर , पी . टी . डुकरे सर , चिखलीचे मुख्याध्यापक एस .यु . मोरे सर , एच . ई . डोंगरे सर , डी . एस . खरात सर , एल . एच . सरोदे सर , एस . जी . पाटील सर , विजय मिसाळ सर , एस . जी .लोखंडे सर, ए पी .वानखेडे सर , एस .एस .रिंढे सर, परमेश्वर सुर्वे सर , गजानन गोसावी सर, रमेश धोंडगे सर , पी आर वानखेडे सर, आर . ई .शेळके सर, दत्तात्राय वांजोळ सर , रामेश्वर तोंडे सर , व अलका थेटे (माजी कर्मचारी ) यांची प्रमुख उपस्थिती लाभली.

## लग्नाचे आमिष दाखवून लग्नास नकार देणाऱ्या प्रियकरासह दोघांवर गुन्हा दाखल

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी

**नांदुरा दि. २७ :** लग्नाचे आमिष दाखवून प्रेम संबंधातुन शरीर सुख उपभोगणाऱ्या प्रिय करा कडून युवतीला गर्भधारणा होऊन सहा महिने झाले.त्यामुळे लग्नास नकार देणाऱ्या प्रियकरासह दोघावर दिनांक २६ ऑक्टोबरला गुन्हा दाखल करण्यात आला. याबाबत पीडित महिलेने पोलीस स्टेशनला तक्रार दिली.

त्या पिडीत महिलेने दिलेल्या माहितीनुसार प्रियकरासोबत फोनवर बोलने होत असे. त्यातुनच प्रेम संबंध निर्माण झाले. त्यानंतर सदर युवतीला शेगाव येथील गोपाल गेस्ट हाऊसवर दिनांक ३ मे २०२५ ते ७ मे २०२५ या कालावधीत चार ते पाच वेळा घेऊन गेला व शारीरिक संबंध स्थापित केले.इतर वेळीही शारीरिक संबंध प्रस्थापित केले.त्याामुळे आलेल्या शारीरिक संबंधातून सहा महिन्याची गर्भवती झाली. याबाबत फिर्यादीने मोहन गणेश राखोंडे यांना झालेल्या घटनेबाबत मिहिती दिली.त्याावेळी त्यांने तुझ्याकडुन जे होईल ते कर असा दम दिला. पीडित महिलेने दिलेल्या तक्रारीवरून संदीप गणेश राखोंडे व मोहन गणेश राखोंडे दोघेही राहणार सिंधी कॉलनी,माळीपुरा नांदुरा यांच्या विरुद्ध पोलिसांनी गुन्हा दाखल केला. पोलिसांनी आरोपी विरुद्ध भारतीय न्याय संहिता ६४(१),६४(२)(एम) ६९ कलमाखाली गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## मारहाण प्रकरणी दोषी पोलीस कर्मचारी यांच्यावर कारवाई करा;निवेदन सादर

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी




**डोणगाव २७ :** डोणगाव येथून जवळच असलेल्या ग्राम बेलगाव येथील रवी परसराम ठाकरे यांना झालेल्या अमानुष मारहाणीप्रकरणी दोषी पोलीस कर्मचारी यांच्यावर कारवाई करावी असे निवेदन डोणगाव पोलीस स्टेशन ला दी. २५ ऑक्टोंबर ला आदिवासी व विविध सामाजिक संघटना च्या वतीने देण्यात आले सदर निवेदनात, रवी परसराम ठाकरे यांनी ऊस तोडीच्या कामासाठी घेतलेल्या इसार रकमेच्या प्रकरणी झालेल्या गैरसमजातुन रंगराव पाटील यांच्या सांगण्यावरून डोणगाव पोलीस स्टेशन मध्ये रवी ठाकरे याला बोलवून पोलीस कर्मचारीवर्गाने न्यायालय याची कोणतीही परवानगी न घेता व न कळविता चार ते पाच पोलीस कर्मचारी यांनी रवी ठाकरे यांना मारहाण केली आहे. यामुळे त्याची मानसिकता बिघडली आहे तरी आपण याकडे लक्ष देऊन दोषी कर्मचारी वर्गाला योग्य ती कार्यवाही करावी अन्यथा खालील संघटनांच्या वतीने तिव्र आंदोलन करण्यात येईल याची नोंद घ्यावी. असे नमूद असून सदर निवेदनावर आदिवासी अस्मिता संघटना पदाधिकारी.

राष्ट्रीय आदिवासी एकता परिषद बिरसा क्रांती दल भारतीय आदिवासी पॅंथर संघटना गरीब ग्रेड संघटना आदी संघटनेच्या पदाधिकारी यांच्या सह्या आहे.

## बुलडाणा मनसेच्यावतीने वैभव भुतेकर यांचा सत्कार

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी



**बुलडाणा दि. २७ :** जिल्ह्यातील पाडळी येथील भूमिपुत्र वैभव बबनराव भुतेकर यांची महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत सहाय्यक आयुक्त, समाजकल्याण (वर्ग-१) पदी निवड झाली आहे. वैभवने अथक परिश्रम, जिद्द, चिकाटीच्या भरोवश्यावर राज्यातून दुसरा क्रमांक फटकावला असून त्याच्या यशाने जिल्ह्याची मान उंचावली, असे प्रतिपादन बुलढाणा मनसेचे तालुकाध्यक्ष अमोल रिंढे पाटील यांनी केले.

सोमवार २७ ऑक्टोबर रोजी बुलढाणा मनसेच्या वतीने अमोल रिंढे पाटील यांच्या जनसंपर्क कार्यालयात वैभव भुतेकर यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी अमोल रिंढे पाटील बोलत होते. पुढे बोलतांना ते म्हणाले की, यापूर्वीही वैभव भुतेकर यांनी शिक्षक, लिपिक अशा पदांवर कार्यरत असताना, जिद्द न सोडता त्यांनी हे मोठे यश संपादन केले आहे. गावातील आणि जिल्ह्यातील तरुणांसाठी ही खूप मोठी प्रेरणा असून त्यांचा आदर्श स्पर्धा परिक्षा क्षेत्रातील विद्यार्थांनी घ्यावा. यावेळी बाळाभाऊ पाटील, पंढरी पवार ,आकाश पवार, मनसेचे युवा नेते प्रतीक पवार, ऋषिकेश पाटील,स्वप्निल रिंढे, कृष्णा रिंढे यांची उपस्थीती होती.

## शेलगाव देशमुख येथे चोरी; पेटीसह पन्नास हजाराचा माल लंपास

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी

**डोणगाव २७ :** डोणगाव पोलीस स्टेशन अंतर्गत येत असलेल्या ग्राम शेलगाव देशमुख येथे अज्ञात चोरटय़ाने घराचे कुलूप तोडून घरात ठेवलेली लोंखडी पेटी व त्या ठेवलेले ५०,००० हजार रुपये चोरून नेल्याची घटना २५ आक्टोबरला उघडकीस आली.

पोलीस सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार शेलगाव देशमुख येथील फिर्यादी ग.भा. निर्मला रामभाउ नवले ह्या दि. १८ आक्टोबरते २५ आक्टोबरला दिवाळी निमित्त त्यांची मुलगी यांचेकडे मेहकरला घराला कुलुप लावुन गेल्या असता चोरट्याने घराचे कुलुप तोंडुन घरात प्रवेश करुन घरात ठेवलेली लोंखडी पेटी व त्या ठेवलेले ५०,०००/रुपये असे पेटीसह कोणीतरी अज्ञात इसमांनी चोरुन नेले आहे. फिर्यादी तरी कारवाई व्हावी. अशा फिर्यादी ग. भा.निर्मेला रामभाऊ नवले यांच्या तक्रारीवरून डोणगाव पोलीस स्टेशन ला अज्ञात चोरटय़ा विरोधात कलम ३०५ () ३३१ (४) नुसार गुन्हा दाखल करण्यात आला असून बुलढाणा येथून फॉरेन्सिक टीम व डॉग स्काट बोलावण्यात आले आहे पुढील तपास पोहेका संजय धिके याच्याकडे देण्यात आला आहे.

## डॉ. संपदा मुंडे आत्महत्येप्रकरणी उच्चस्तरीय चौकशी व्हावी - जयश्री शेळके

### शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) महिला आघाडीच्यावतीने मुख्यमंत्री यांना निवेदन

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी



**बुलडाणा दि. २७ :** फलटण (जि. सातारा) येथील उपजिल्हा रुग्णालयातील महिला वैद्यकीय अधिकारी डॉ. संपदा मुंडे यांनी आत्महत्या केल्याची घटना संपूर्ण राज्याला हादरवणारी आहे. त्यांच्या मृत्यूपूर्वी स्वतःच्या तळहातावर लिहिलेल्या मजकुरातून पोलीस निरीक्षक गोपाल बदने यांच्याकडून बलात्कार तसेच प्रशांत बनकर व इतरांकडून मानसिक व शारीरिक छळ झाल्याचे गंभीर आरोप समोर आले आहेत. या आत्महत्या प्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी करण्यात यावी अशी मागणी बुलढाणा जिल्हा शिवसेना महिला आघाडीच्या वतीने जिल्हा पोलीस अधीक्षक यांच्या मार्फत मुख्यमंत्री यांच्याकडे निवेदनाद्वारे करण्यात आली आहे. या संदर्भात डॉ. मुंडे यांनी तत्कालीन पोलीस अधिक्षक अनिल महाडीक आणि उपविभागीय पोलीस अधिकारी राहुल धस यांच्याकडे वारंवार तक्रार केली असूनही त्याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करण्यात आले, ही बाब अत्यांत गंभीर आहे. पोलीस यंत्रणेतील अधिकाऱ्यांवरच असे आरोप होणे हे कायदा सुव्यवस्थेच्या आणि राज्य प्रशासनाच्या प्रतिमेच्या दृष्टीने चिंताजनक आहे. याशिवाय, आरोपींना संरक्षण देण्यासाठी सत्ताधारी पक्षाशी संबंधित माजी खासदार रणजीत नाईक-निंबालकर तसेच त्याांचे स्वीय सहाय्यक राजेंद्र शिंदे आणि रोहित नागतिळे स्थानिक प्रशासनावर अनुचित प्रभाव टाकत असल्याचेही समोर आले आहे. अशा प्रकारचा राजकीय हस्तक्षेप हा संविधान आणि कायद्याच्या शासनाच्या तत्वांना विरोधी आहे. डॉ. मुंडे यांनी आपल्या सेवाकालात वैद्यकीय प्रामाणिकतेने काम करताना काही प्रकरणांमध्ये पोलीस दबाव नाकारला होता, त्यामुळेच त्यांच्या छळाची तीव्रता वाढली. त्यांनी या संदर्भात लेखी तक्रारी केल्या होत्याा व माहिती अधिकाराखाली अर्जही दाखल केला होता. मात्र योग्यवेळी कारवाई न झाल्याने अखेरीस त्याांनी आत्महत्या करून जीवन संपविले. या प्रकरणात पोलिसांकडून निष्क्रियता, शवविच्छेदनात झालेला विलंब आणि प्राथमिक तपासातील त्रुटी या बाबी चौकशीच्या पारदर्शकतेवर प्रश्नचिन्ह निर्माण करतात. तसेच, मृत व्यक्तीचे चरित्रहनन करण्याचा प्रयत्न काही समाजमाध्यमांतून सुरू आहे, ही बाबही अत्यंत निंदनीय आहे. या सर्व घटनांवरून, संपूर्ण प्रकरणाची स्वतंत्र आणि उच्चस्तरीय चौकशी होणे अत्यावश्यक आहे. दोषींवर कठोर कारवाई करण्यात यावी आणि अशा प्रकारच्या घटना पुन्हा घडू नयेत यासाठी प्रशासकीय सुधारणा तातडीने राबवाव्यात, अशी मागणी बुलढाणा जिल्हा शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) महिला आघाडीच्या वतीने राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना सादर केलेल्या निवेदनाद्वारे केली आहे. यावेळी महिला आघाडी जिल्हाप्रमुख चंदाताई बढे, महिला आघाडी जिल्हाप्रमुख विजया खडसान, उपजिल्हाप्रमुख प्रतिक्षा पिंपळे, रता शेळके, अनिता गायकवाड, सुनिता गाकवाड, स्मिता वराडे, शितल सुरडकर, सपना इंगळे, वंदना मेढे, श्रध्दा आराख, कविता भागीले, यांच्यासह अनेक महिला उपस्थित होत्या.

## महत्त्वाचे

### शेतकऱ्याची गळफास घेऊन आत्महत्या

**नांदुरा :** खुदावंतपूर येथे लिव्हरच्या आजाराला कंटाळून ६० वर्षीय वृद्ध शेतकऱ्याने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना दिनांक २६ ऑक्टोबरला रात्री ७.१५ वाजता घडली. याबाबत गजानन भास्कर कंडारकर राहणार नांदुरा खुर्द यांनी पोलीस स्टेशनला माहिती दिली. त्यांचे मोठे बंधू प्रल्हाद भास्कर कंडारकर वय ६० वर्ष हे मागील काही दिवसापासून लिव्हरच्या बिमारीने आजारी होते. त्यामुळे आजाराला कंटाळून त्यांनी घरातील स्लॅबला असलेल्या लोखंडी अँगलच्या हुक मध्ये नायलॉन दोरी अडकवून गळफास घेऊन आत्महत्या केली. फिर्यादीने दिलेल्या माहितीवरून पोलिसांनी भारतीय नागरिक सुरक्षा संहिता १९४ कलमाखाली गुन्हा दाखल केला असून पुढील तपास पोहेकॉ भीमराव वानखडे करीत आहे.

### उमेदवारी अर्ज पाठविण्याचे आवाहन

**खामगाव :** होऊ घातलेल्या नगर परिषद सार्वत्रिक निवडणुक २०२५/२६ च्या अनुषंगाने खामगाव शहर राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या वतीने खामगाव शहरातील सर्व प्रभागातील आरक्षणानुसार प्रभागातील इच्छुक उमेदवारांचे अर्ज दिनांक २८/१०/२०२५ रोजी मागविण्यात येत आहेत.यासाठी मा. आ. नानाभाऊ कोकरे, यांच्या अध्यक्षतेखाली एक महत्वपूर्ण बैठक दुपारी १२ वाजता शासकीय विश्रामगृह खामगाव येथे पार पडणार आहे तरी सर्व खामगाव शहरातील सर्व इच्छुक उमेदवारांनी तसेच पदाधिकारी यांनी बैठकीला योग्य माहितीसह उपस्थित रहावे अशा आवाहन माजी नगराध्यक्ष गणेश माने, विधानसभा अध्यक्ष धोंडीरामजी खंडारे, शहराध्यक्ष विकास चव्हाण यांनी केले आहे.

### नितीन गायकवाड यांचा खून मित्रांनी केला

**शेगाव :** येथील आठवडी बाजारातील मटन मार्केट मध्ये २५ ऑक्टोबर २५ रोजी दुपारी ५ वाजताच्या सुमारास मित्रांनीच मित्राचा चाकुचे वार करून खून केल्याची घटना घडली. मृतकाचे नाव नितीन उर्फ गोलु नामदेव गायकवाड (वय ३५, रा. मिलींद नगर नागझरी रोड शेगाव) असे आहे, तो मजुरीचे काम करीत होता या प्रकरणी अशोक नामदेव गायकवाड यांनी शेगाव शहर पोस्टेला फिर्याद दिली त्यामध्ये नमुद केले आहे की, त्याचा मित्र मो. शाहीद उर्फ बावल्या व इतर मित्रांनी नितीन हा दुसऱ्या मुलांसोबत राहतो याचा राग मनात धरला होता व आरोपी मो. शाहिद व त्याच्या मित्रांनी संधी साधुन नितीन वर चाकुने यार केले. त्याचा घटनास्थळीच मृत्यू झाला. याप्रकरणी पोलिसांनी शेख आसिफ शेख युनुस, चांद खा मियान खा, मो. जावेद उर्फ मोदी व मो शाहिद उर्फ बावल्या या चौघांना अटक केली असुन शाहरूख उर्फ टिन टप्पर हा फरार आहे. पुढील तपास एसडीपीओ प्रदिप पाटील करीत आहेत.

### हर्ष आयटीआयच्या विद्यार्थ्याची रेल्वेमध्ये निवड

**खामगाव :** विठ्ठल बहुउद्देशिय सेवाभावी संस्थाद्वारा संचालित हर्ष औद्योगिक प्रशिक्षण संस्था सुटाळा बु. चा वेल्डर ट्रेडचा विद्यार्थी आशुतोष राजेंद्र कोळी याची आरआरबी/चेन्नई द्वारे पे मॅट्रिक्स लेव्हल २ तखख पीसी मध्ये पेरांबूर येथील लोको वर्क्स येथे तंत्रज्ञ पदावर निवड झाली आहे. याबद्दल संस्थाध्यक्ष जनार्दन हेंड पाटील, सचिव हर्षद हेंड पाटील, चेतन हेड पाटील, प्राचार्य अंकित जयस्वाल व कर्मचारी वृंदांनी आशुतोष राजेंद्र कोळी याचे अभिनंदन केले व भावी वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

## महाविकास आघाडीच्या संकल्प मेळाव्यात फुंकले निवडणुकीचे रणशिंग

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी



**मलकापूर दि. २७ :** स्थानिक स्वराज्य संस्थांच्या आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर मलकापूर तालुका महाविकास आघाडी तर्फे आयोजित ''संकल्प मेळावा'' मोठ्या उत्साहात पार पडला. मलकापूर नगरीतील भातृमंडळ सभागृहात झालेल्या या मेळाव्यास मलकापूर तालुक्यातील महाविकास आघाडीचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

संकल्प मेळाव्याची सुरुवात सरस्वती माता, महाराष्ट्राचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज, लोह पुरुष सरदार वल्लभभाई पटेल यांच्या प्रतिमेचे पूजन तसेच दिपप्रज्वलन संकल्प मेळाव्याचे अध्यक्ष उबाठा जिल्हा संपर्क प्रमुख प्रा. नरुभाऊ खेडेकर यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी व्यासपीठावर उबाठाचे जिल्हा संपर्क प्रमुख मा. प्रा. नरूभाऊ खेडेकर, भाराकाँचे प्रदेश सचिव अँड. हरिशभाऊ रावळ, जेष्ठ नेते मा. अँड. साहेबराव मोरे, राकाँ. शरद पवार गटाचे प्रदेश सचिव मा. अनिल झोपे, जिल्हा प्रमुख मा. गजानन वाघ, जिल्हा सहसंपर्क प्रमुख मा. वसंतराव भोजने, किसान कांग्रेस जिल्हाध्यक्ष ह.भ.प. संभाजी महाराज शिर्के, महिला काँग्रेस जिल्हाध्यक्षा सौ. मंगलाताई पाटील, तथा प्रा. रुपालीताई पाटील आदी नेते उपस्थित होते. आपले अन्नदाते शेतकरी-कास्तकारांना वाचवण्याची आहे. 'मविआ' चे दूत म्हणून गावागावात जा आणि आपल्या कामाचा प्रचार करा. वज्रमूठ शब्दात नको, ती प्रत्यक्षात हवी. उमेदवारी मिळाली नाही तरी चालेल. पण सत्ताधाऱ्यांना झोपवू याची शपथ घ्या, असे प्रा. नरुभाऊ यांनी उपस्थित कार्यकर्त्यांना आव्हान केले. आघाडीत बिघाडीचे करण्याचे राजकारण होता कामा नये. जागा कुणाच्याही वाट्यास येवो एकदिलाने प्रचार करा. लोकसभेत तथा विधानसभेत आपल्या पराभवाचा वचपा स्थानिक स्वराज संस्थेची निवडणूक जिंकूनच काढावा लागेल या शब्दात प्रा. नरूभाऊ खेडेकर यांनी 'मविआ' नेत्यांना कानपिचक्या दिल्या. अॅड. साहेबरावजी मोरे यांनी आपल्या भाषणात मविआचे नेते, पदाधिकारी व कार्यकर्त्यांना निवडणुकांना सतर्कपणे सामोरे जाण्याचा सल्ला दिला. ''फक्त आपल्यापुरता विचार करण्याचे दिवस राहिलेले नाही, असं मला वाटत''. संपूर्ण शेतकरी, कास्तकार वर्ग, व्यापारी तसेच भाजप सोडून सर्व पक्ष्यावरचे संकट पूर्णपणे गेलेलं नाही, असं अँड मोरे म्हणाले. त्यानंतर त्यांनी आगामी स्थानिक स्वराज्य निवडणुकांसाठी मविआने एकजुटीने लढा देण्याचा आणि मलकापूर तालुक्यात पुन्हा सत्ता मिळवण्याचा संकल्प सर्व कार्यकर्त्यांनी एकमुखाने व्यक्त करावा असे आव्हान केले. सभेत बोलताना महाविकास आघाडीतील नेत्यांनी थापाड्या महायुती सरकारच्या कारभारावर टीका करताना, जनतेच्या मूलभूत प्रश्नांकडे शासनाचे दुर्लक्ष होत असल्याचे सांगितले. ''विकास, शिक्षण, रोजगार आणि शेतकरी हिताचे प्रश्न हेच आपले खरे अजेंडे असतील,'' असे नेत्यांनी स्पष्ट केले. या मेळाव्यात स्थानिक पातळीवर जनतेशी थेट संवाद साधण्यासाठी विविध उपक्रम राबविण्याचा निर्णय घेण्यात आला. तसेच, तरुण कार्यकर्त्यांना संघटनात्मक जबाबदाऱ्या देऊन पक्ष बळकटीकरणावर भर देण्यात येईल, असेही यावेळी सूत्रसंचालन करते नगरसेवक सुहास चवरे यांनी जाहीर केले. मेळाव्याच्या शेवटी '' घोषणाबाजी आणि जल्लोषाच्या वातावरणात ''महाविकास आघाडीचा विजय असो'' अशा घोषणा देत मेळाव्याची सांगता करण्यात आली. यावेळी सोपानराव शेलकर, किसन पाटील, बंडू चौधरी, अँड. दिलीप बगाडे, गजु सोनोने, . एस. पी. संबारे सर, गजानन ठोसर, हरिदास गणबास, गजानन कुऱ्हाडे सर, अनिल मुंधोकार, राजू जवरे, ज्ञानदेव तायडे, ईश्वरसिंग राजपूत, विलास खर्चे, दिलीप गोळीवाले, निलेशजी बोरसे, दिपक बोरसे, मधुभाऊ तायडे, राजुभाऊ नेवे, राजेंद्र काजळे, गजानन पाटील, गणेश सुशीर, अक्षय रायपूरे, आदींची उपस्थिती होती.

## ब्राह्मण समाज स्नेह मिलन तथा विप्र फाउंडेशन कार्यकारिणीचा शपथविधी

अजिंक्य भारते/ प्रतिनिधी

**मलकापूर दि. २७ :**आपल्या संस्कृतीचे जतन दिवाळी पर्व निमित्त समाज बंधू-भगिनी एकत्रित यावे एकमेकांच्या भेटी, शुभेच्छा, परिचय या उद्देशाने प्रति वर्ष विप्र चॅरिटेबल ट्रस्ट मलकापूर द्वारे दीपावली स्नेह मिलन कार्यक्रम आयोजन केल्या जाते या वर्षी मलकापूर येथील सुमतीनाथ भवन येथे दीपावली स्नेह- मिलन तथा ब्राह्मण समाज तथा हिंदू धर्म संस्कृती हित जोपासणारे संघटन उन्नत समाज समर्थ राष्ट्र या ब्रीद मंत्र वर कार्य करणारे संघटन मलकापूर कार्यकारणीची घोषणा करण्यात आली.

कार्यक्रमाची सुरवात प्रमुख विशेष अतिथि दामोदरजी पांडे, विप्रो फाउंडेशन राष्ट्रीय कार्यकारिणी सदस्य खामगांव, शैलेश शर्मा विप्र फाउंडेशन जिल्हा अध्यक्ष बुलढाणा, राजेश राजोरे जिल्हा मार्गदर्शक, सुरेशकुमार शर्मा जिल्हा मार्गदर्शक, मोहन शर्मा राजस्थानी विप्र समाज चॅरिटेबल ट्रस्ट अध्यक्ष द्वारा भारत माता, भगवान परशुराम, गौतम ऋषी प्रतिमा पूजन, दीप प्रज्वल करून झाली, सर्व मान्यवरांचे शाल श्रीफळ पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले कार्यक्रमाचे प्रमुख वक्ता राजेश राजोरे यांनी उपस्थित समाज बांधवांना उन्नत समाज संपन्न राष्ट्र या विषयावर संबोधित केले , शैलेश शर्मा यांनी विप्र फाउंडेशन कार्य या विषयावर प्रबोधन केले कार्यक्रम चे सूत्रसंचालन विशाल जदवे , प्रास्ताविक परिचय अजय शर्मा, आभार प्रदर्शन जिल्हा मार्गदर्शक सुरेश शर्मा यांनी केले उपरांत विप्र फाउंडेशन मलकापूर अध्यक्ष पदी मनीष पंडित, राधेश्याम जी शर्मा उपाध्यक्ष, दामोदर शर्मा उपाध्यक्ष, राजेंद्र ओझा उपाध्यक्ष, विशाल दवे सचिव, सुयोग शर्मा सहसचिव, हेमंत शर्मा कोषाध्यक्ष, परमानंद व्यास, सहकोशाध्यक्ष, अशोक व्यास संघटक मंत्री, राजेंद्र पांडे संघटन मंत्री, राधेश्याम चौबे स्वास्थ मंत्री, सुरज प्रसाद शुक्ला शिक्षा मंत्री, महेश इंदोरिया क्रीडा सांस्कृतिक मंत्री, चेतन शर्मा क्रीडा सांस्कृतिक सहमंत्री, सागर शर्मा सूचना आणि प्रसार मंत्री, राजेश शर्मा सदस्य, दिनेश जोशी सदस्य, महेश बावला सदस्य, सुनील व्यास सदस्य, पवन शर्मा सदस्य, तर मार्गदर्शक म्हणून कमलकिशोर शर्मा, मदन तिवारी ,रामचंद्र टीकनायक, मोहन शर्मा यांच्या घोषणा करण्यात आल्या तर युवा प्रकोष्ठ अध्यक्ष रवी शर्मा, योगेश शर्मा उपाध्यक्ष, आनंद पुरोहित, उपाध्यक्ष, विशाल पंडित सचिव, गोविंद शर्मा सहसचिव, योगेश टीकनायक कोषाध्यक्ष, सुशील शर्मा सहकोशाध्यक्ष, अमित चौबे संघटन मंत्री, हेमंत शर्मा संघटन मंत्री, शिवम शर्मा ग्रामीण संपर्क मंत्री, जगदीश शर्मा प्रसारण मंत्री, तेजस शर्मा सूचना आणि संपर्क मंत्री, पवन शर्मा सूचना आणि संपर्क सहमंत्री,अजय शर्मा सांस्कृतिक मंत्री गोपाल व्यास सांस्कृतिक सहमंत्री, गिरीश शर्मा क्रीडामंत्री, नैतिक शुक्ला क्रीडा सहमंत्री, कमल शर्मा स्वास्थ्यमंत्री, अजय शर्मा स्वास्थ सहमंत्री, अभिषेक शर्मा विधी संपर्क मंत्री, धीरज थानवी विदेश मंत्री, धीरज शर्मा शिक्षा मंत्री, ऋषिकेश मिश्रा सदस्य, गणेश शर्मा सदस्य, व्यंकटेश शर्मा सदस्य, चिराग उपाध्याय सदस्य, पार्थ दवे सदस्य, रुपेश शुक्ला सदस्य, आशिष बावला सदस्य, चेतन पंडित सदस्य ,गौतम दवे सदस्य, विजय राजपुरोहित सदस्य तर मार्गदर्शक म्हणून विशाल शर्मा, राहुल शर्मा यांची घोषणा तर राष्ट्रीय कार्यकारिणी सदस्य दामोदर पांडे, जिल्हा अध्यक्ष शैलेश शर्मा यांच्या उपस्थितीत सामजिक कार्य आणि दायित्व निर्वाहन शपथविधी घेतली.

## न.प.मध्ये दिव्यांग बांधव अपक्ष म्हणून उमेदवारी दाखल करणार?

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी



**खामगाव दि. २७:** ग्रामपंचायत सरपंच, सदस्य पदाची निवडणूक असो की लोकसभा निवडणूक लढवून खासदार बनण्याची निवडणूक असो कोणत्याही निवडणूकीत देशभरातील कोणत्याही दिव्यांग व्यक्तीला उमेदवारी दिली जात नाही. त्या मागे कारणही तसेच आहे. भरपूर फिरावे लागते, जनसंपर्क ठेवावा लागतो, जनतेची कामे करण्याकरीता घराबाहेर पडावे लागते आणि अनेक दिव्यांगांना ते शक्य होत नाही म्हणून त्यांना कोणत्याही निवडणूकीत कोणत्याच पक्षाचे वतीने उमेदवारी दिली जात नाही. आणि यामुळेच देशभरातील दिव्यांगांचे प्रश्न सोडविण्याकरीता सुदृढ व्यक्तींना त्यांना हातपाय जोडावे लागतात, कोणीही त्यांच्या समस्या, तक्रारी सोडविण्यात सहकार्य करीत नाही किंबहुना त्यांना तुच्छ, हिन अशी वागणूक दिली जाते. त्यांच्या दिव्यंगत्वावरून त्यांना हिणविले जाते. परंतु दिव्यांग व्यक्ती म्हणजे केवळ पाय नसलेला आणि चालता येत नाही ही संकल्पना नाही तर जवळपास २१ प्रकारचे दिव्यंगत्व आहे आणि या प्रकारात केवळ जे पायाने अधु आहेत त्यांच्या समोरच चालण्याची समस्या आहे. ज्यांचा हात अधु आहे, अंध आहेत, मुक आहेत असेही अनेक दिव्यांग बांधव आहेत जे निवडणूक लढवू शकतात.

भारताच्या इतिहासात आजपर्यंत एकाच गावात प्रत्येक वॉर्डत दिव्यांग व्यक्ती निवडणूकीला उभे आहेत असे कधीही झाले नाही पण यंदा ते खामगांवात होणार आहे. आज रोजी देशातील अनेक शासकीय निम शासकीय कार्यालयामध्ये आयएएस पासून ते इतर श्रेणीमध्ये दिव्यांग आरक्षण असल्यामुळे कार्यरत आहेत परंतु राजकीय पक्ष कडून निवडणुकी मध्ये दिव्यांग आरक्षण करिता चकार शब्दही फुटेना फक्त निवडणुकी दरम्यान स्वीकृत सदस्याचे आमिष देऊन त्यांची बोलवण करीत असतात याची अनेक उदाहरणे आपल्या समोर आहे विराट मल्टीपर्पज फाऊंडेशन हि दिव्यांगांकरीता कार्यरत असलेली संस्था असून सा. दिव्यांग शक्ती हे दिव्यांगांचे हक्काचे व्यासपीठ आहे. त्या माध्यमातून विराट मल्टीपर्पज फाऊंडेशन चे संस्थापक अध्यक्ष मनोज नगरनाईक हे येत्या खामगांव नगर परिषदेच्या निवडणूकीत सर्व प्रभागातून अपक्ष म्हणून दिव्यांग व्यक्तींना उमेदवारी देवून त्यांच्यातील आत्मविश्वास जागृत करणार आहेत. आजपर्यंत अगदी बोटावर मोजण्या एवढे दिव्यांग लोकप्रतिनिधी म्हणून निवडून आले आहेत. पण दिव्यांग देखील काहीतरी करू शकतात आणि ते सुध्दा समाजातील एक घटकच आहेत, त्यांनाही निवडणूकीत उभे राहण्याचा अधिकार आहे ही भावना लक्षात घेवून संपुर्ण देशातील पहिलाच प्रयोग खामगांवात होणार आहे. एकही दिव्यांग बांधव निवडून आला नाही तरीही चालेल पण त्यांची दिव्यांग शक्ती या निवडणुकीतून दिसून येईल. तरी खामगांव नगर परिषद निवडणूकीत ज्या दिव्यांग बांधवांना उमेदवारी अर्ज दाखल करायचा आहे त्यांनी मनोज नगरनाईक, संस्थापक अध्यक्ष विराट मल्टीपर्पज फाऊंडेशन तथा मुख्य संपादक सा. दिव्यांग शक्ती यांच्या सोबत संपर्क करावा असे आवाहन करण्यात आले आहे.

## भाऊबीजेला यमुना नदीतील भाऊ बहिणीच्या स्नानाला महत्व

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी



**खामगाव दि. २७ :** सनातन धर्मात भाऊबीजच्या दिवशी मथुरा येथील यमुना नदीत भाऊ बहिणीच्या सोबत स्नानाला व नंतर नदीच्या काठावर भाऊबीज साजरी करण्याला यमदेव व देवी यमुना यांच्या पौराणिक कथेशी जोडले जाते, व अनंत काळापासून याला धार्मिक व अध्यात्मिक असे अनन्य महत्व आहे, देवी यमुना यांचे भाऊ यमदेव आहे, पौराणिक कथेनुसार एक वेळा यमुनाजिने त्यांना आपल्या घरी येण्याकरिता आग्रह केला, बहिणीच्या आग्रहाला मान देऊन यमदेव हे कार्तिक महिन्याच्या, शुक्ल पक्षातील द्वितीयेला, म्हणजे भाऊबीजला त्यांच्या घरी गेले असता, यमुना जिने त्यांना आदर सत्काराने सन्मान करून त्यांना टिळा लावला, व त्यांच्या दीर्घायुष्यासाठी प्रार्थना केली, आपल्या बहिणीच्या आपुलकीने ते खूप खुश झाले व त्यांनी देवी यमुनेला अशे वरदान दिले की,जे भाऊ बहीण भाऊबीज च्या या पावन पर्वावर यमुनेच्या पवित्र जलात स्नान करतील ते अकाल मृत्यूच्या भयापासून मुक्त होतील व मोक्षाला प्राप्त होतील तसेच,भाऊ बहिणीच्या नात्यातली आपुलकी वाढून ते नाते आयुष्यभर टिकून राहतील. याच पावनपर्वाचे औचित्य साधीत समाजसेवी रवि जोशी हे आपल्या ४ भगिनी व मुला- मुली सोबत दि.२३ ऑक्टोंबर रोजी मथुरे येथील यमुना नदीच्या पावन जलात आस्थाची डुबकी घेतली व माता यमुनेचे विधिवत पूजन करीत, भाऊबीज साजरी केली.

## मलकापूर शहराचा कोणी वाली राहिला का?- अॅड. साहेबराव मोरे

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी



**मलकापूर दि.२७ :** मलकापूर शहर आज विकासाच्या अनेक प्रश्नांनी ग्रस्त असून, नागरिकांमध्ये नाराजीचे वातावरण आहे. शहरातील रस्त्यांची दुर्दशा, नाल्यांची अस्वच्छता, अतिक्रमणांचे साम्राज्य, पिण्याच्या पाण्याची टंचाई आणि कचरा व्यवस्थापनातील ढिसाळपणा या सर्व मुद्द्यांवरून शहरातील जबाबदार नागरिक अॅड. साहेबराव मोरे यांनी शासन, प्रशासन आणि राजकीय नेत्यांना थेट प्रश्न केला आहे. प्रामाणिक करदात्याची खंत ''मी कर भरतो, पण शहराला न्याय नाही'' एड. मोरे यांनी सांगितले की, ''मी मलकापूरचा रहिवासी असून, माझ्या घराचा नगरपालिकेचा कर प्रामाणिकपणे अनेक वर्षे भरत आहे. परंतु इतक्या वर्षांपासून कोणत्याही नगराध्यक्षांनी किंवा प्रशासनाने या ऐतिहासिक शहराचा विचार विकासाच्या दृष्टीने केला नाही. शहराचा चेहरा जसाच्या तसा राहिला, फक्त घोषणांमधून आणि पोस्टरांमधूनच विकास दिसतो.''

मोरे यांनी शहरातील समस्यांचा पाढा वाचताना सांगितले की, ''शहरातील रस्त्यांची अवस्था अत्यंत वाईट आहे. नाल्यांची साफसफाई वेळेवर होत नाही, सर्वत्र कचऱ्याचे ढीग दिसतात. प्रमुख रस्त्यांवर अतिक्रमण वाढले आहे आणि स्वच्छ पिण्याच्या पाण्याचा प्रश्न कायम आहे. या सर्व समस्या अनेक वर्षांपासून आहेत, पण प्रशासनाने डोळेझाक केली आहे.'' ''सत्तेतून पैसा, पैशातून सत्ता'' मोरे यांची टीका आगामी नगरपालिका निवडणुका जवळ येत असल्याच्या पार्श्वभूमीवर मोरे म्हणाले,

''निवडणुका आल्यानंतर प्रत्येक पक्ष आपले उमेदवार पुढे करतो. लाखो रुपये खर्च करून सत्तेत येतात आणि नंतर त्या सत्तेतून पुन्हा पैसा मिळवण्याची स्पर्धा सुरू होते. याच चक्रात विकास हा फक्त कागदावरच राहतो. जनता निवडून देते, पण जनतेचा विश्वास वारंवार तुटतो.''

## महावितरणला जागे करा; अन्यथा शिवसेना रस्त्यावर उतरेल!

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी



**शेगाव दि. २७ :** तालुक्यातील ग्रामीण महावितरणच्या निष्काळजी, भोंगळ आणि गैरजबाबदार कारभारामुळे अखेर जनतेचा व शिवसेनेचा संताप उसळला आहे. नागरिकांना आणि शेतकऱ्यांना होत असलेल्या अन्यायाविरुद्ध शिवसेना तालुका प्रमुख रामा पाटील थारकर यांच्या नेतृत्वाखाली तीव्र आंदोलन करण्यात आले.

रीडिंग न घेता अवाजवी वीजबिले पाठवणे, मिटरचे कोटेशन भरूनही मिटर न देणे, गावांमधील स्ट्रीट लाईट दिवसा सुरू ठेवून रात्री बंद ठेवणे, तसेच शेतातील पंपांना वारंवार येणाऱ्या विजेच्या अडचणींमुळे मोटार जळून शेतकऱ्यांचे होणारे नुकसान या सर्व समस्यांकडे महावितरण अधिकारी पूर्णपणे उदासीन आहेत, असा गंभीर आरोप आंदोलनकर्त्यांनी केला. याचबरोबर, योग्य देखभाल न झाल्याने काही ठिकाणी तुटलेल्या लाईनमुळे शॉक लागून मृत्यू झाल्याचीही दुर्दैवी प्रकरणे घडली, तरीसुद्धा संबंधित ठिकाणांची दुरुस्ती आजवर करण्यात आलेली नाही, असेही निदर्शनास आणून देण्यात आले.शेतकऱ्यांना आणि ग्राहकांना प्रचंड त्रास होत असतानाही कनिष्ठ अभियंता चवरे वारंवार तक्रारींकडे दुर्लक्ष करत असल्याचे सांगण्यात आले. शेगाव ग्रामीण विभागात दोन कनिष्ठ अभियंते असूनही अनेक गावांचे काम ठप्प आहे, हे महावितरणच्या अकार्यक्षमतेचे ज्वलंत उदाहरण असल्याचे शिवसेनेचे मत आहे. निवेदन देण्यासाठी गेलेल्या शिवसेना शिष्टमंडळास कार्यालयात अधिकारी अनुपस्थित आढळले. निषेध म्हणून अधिकाऱ्यांच्या खुर्चीला हार घालून शिवसैनिकांनी संतप्त रोष व्यक्त केला. ''महावितरण ठेकेदारीत गेलंय म्हणून जबाबदारी टाळणं आम्ही सहन करणार नाही, जनतेचा संयम आता संपला आहे!'' अशा घोषणा देत शिवसैनिकांनी परिसर दणाणून टाकला.शिवसेना तालुका प्रमुख रामा पाटील थारकर यांनी स्पष्ट इशारा दिला. ''वरिष्ठ अभियंता मोहता साहेबांनी या सर्व समस्यांकडे तातडीने लक्ष द्यावे. ग्रामीण भागातील वीज ग्राहक आणि शेतकऱ्यांचा छळ तात्काळ थांबवावा. अन्यथा शिवसेना रस्त्यावर उतरेल, रस्ता रोको, ठिय्या आंदोलन आणि धडक मोर्चा काढण्यात येईल. त्याची संपूर्ण जबाबदारी महावितरण प्रशासनावर राहील.''या तडाखेबंद आंदोलनावेळी शिवसेना उपजिल्हा प्रमुख राजू पाटील मिरगे, तालुका प्रमुख रामा पाटील थारकर, संतोष घाटोळ, पवन बारिंगे, मोहन लांजुळकर, भूषण भांबेरे, प्रफुल डोंगरे, विजय विभुते, ज्ञानेश्वर डांगे, ज्ञानेश्वर दळी, मंगेश गायकी, भागवत उन्हाळे, राजेश रहाटे, तुषार वानखेडे, राहुल हिवराळे, मंगेश हिवराळे, प्रज्वल जवरे आदी शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. लोकहित आणि शेतकऱ्यांच्या न्याय्य मागण्यांसाठी चाललेला हा लढा महावितरण प्रशासनाच्या बेफिकीर कारभाराला दिलेले ठोस प्रत्युत्तर असल्याचे स्पष्टपणे दिसून आले.''कारवाई न झाल्यास शिवसेना रस्त्यावर उतरेल आणि मग जबाबदारी महावितरणचीच!'' अशा शब्दांत आंदोलनकर्त्यांनी प्रशासनाला अंतिम इशारा दिला.

## मोरखेड ग्रामसेवकास निलंबित करा: शिवसेनेची मागणी

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी



**मलकापूर दि. २७:** तालुक्यातील मोरखेड येथील ग्रामपंचायत कर्मचारी विजय नामदेव बंड यांना कामगार न्यायालयाने आदेशीत केल्याप्रमाणे कामावर रुजू करून त्यांची थकीत रक्कम त्यांना ३० दिवसाच्या आत देण्याचा आदेश कामगार न्यायालयाने दि. १९ ऑगस्ट २५ रोजी दिला मात्र त्या न्यायालयाचे आदेशाला न जुमानता ग्रामसेवक सुधीर विनायक ढोले यांनी कामगार न्यायालयाची अवहेलना केली असून त्या ग्राम सेवकास पाच दिवसात निलंबित करून कारवाई करण्याची मागणी शिवसेना (उबाठा) उपजिल्हाप्रमुख गजानन ठोसर सह शिवसेना पदाधिकाऱ्यांनी आज गटविकास अधिकारी नारखेडे यांच्याकडे एका निवेदनाद्वारे केली आहे. निवेदनात नमूद केले आहे की विजय नामदेव बंड यांना न्यायालयाने कामावर रुजू करून घेण्याचे आदेश दिले व थकीत रक्कम देण्याची आदेशीत असताना थकीत रक्कम न मिळाल्याने आर्थिक विवंचनेपायी बंड यांच्या मुलीचे इंजिनिअरिंग कॉलेजच्या शिक्षणाची दुसऱ्या वर्षांची फीस भरु न शकल्याने तिला शिक्षणापासून वंचित राहावे लागले तसेच बंड परिवाराची दिवाळी ही अंधारात गेली असल्याची माहिती त्यांनी शिवसेना उपजिल्हाप्रमुख गजानन ठोसर सह शिवसेना पदाधिकाऱ्यांना दिली होती त्या अनुषंगाने आज दि. २७ ऑक्टोबर २५ रोजी एका निवेदनाद्वारे ग्राम सेवक सुधीर विनायकराव ढोले याच्यावर तात्काळ निलंबनाची कारवाई करावी तसेच मोरखेड येथुन बदली झाली असून ही ढोले पदभार देण्यास टाळाटाळ करुन ग्रामपंचायत मध्ये ग्रामस्थांना नाहक वेठीस धरत असून त्या ठिकाणी पर्यायी ग्रामसेवकाची तात्काळ नियुक्ती करुन पदभार देण्यात यावा अन्यथा लोकशाही मार्गाने शुक्रवार दि. ३१ ऑक्टोंबर २५ रोजी पंचायत समिती कार्यालयासमोर आमरण उपोषण करण्याचा इशारा शिवसेना पदाधिकाऱ्यांनी दिला आहे या निवेदनावर शिवसेना उपजिल्हाप्रमुख गजानन ठोसर, विधानसभा संघटक राजेशसिंह राजपूत, शिवसेना शहर प्रमुख हरिदास गणबास, उपशहरप्रमुख शकील जमादार, माजी नगरसेवक पांडुरंग चिम, अल्पसंख्यांक सेना उपजिल्हाप्रमुख सै. वसीम सै. रहीम, वाहतूक सेना शहरप्रमुख इम्रान लकी, किसान सेना उपतालुकाप्रमुख गजानन मेहेंगे, विभाग प्रमुख सत्तार शाह,दिलीप निकम,शे. मोहसीन शे. छोटू, जावेद खान सह आदींच्या सह्या नमूद आहेत.

अजिंक्य भारत
# आपलं अमरावती
अमरावती, मंगळवार २८ ऑक्टोबर २०२५

## थोडक्यात

### महिलेसह नातेवाईकांना कुऱ्हाडीने मारहाण

अमरावती : दोन दिवसांपूर्वी झालेल्या भांडणाबाबत समजावण्यास गेलेल्या महिलेसह तिच्या नातेवाईकांच्या डोक्यात कुऱ्हाडीने वार करीत जखमी केले. या संदर्भात अर्जुन रमेश तांबे (२६) यांच्या तक्रारीवरून बडनेरा पोलिसांनी संजय अंबादास शिंदे (३५) यांच्यावरुद्धि गुन्हा नोंदवला.

### बांधकामावरून केबल वायर लंपास

अमरावती : भिंतीवरून उडी घेत तिघांनी बांधकाम सुरू असलेल्या ठिकाणावरून सुमारे ३० हजारांचा इलेक्ट्रिक वायर चोरून नेला. ही घटना धोतीवाला कोर्ट परिसरात घडली. तेथे कार्यरत असलेले सुरक्षा रक्षक किशोर गोवर्धन वाघमारे (६१) यांच्या तक्रारीवरून गाडगे नगर पोलिसांनी तीन अज्ञातांविरुद्ध गुन्हा नोंदवला.

### पैशांच्या वादावरून मारहाण

अमरावती : प्लॉटच्या एका सौद्यात घाटा झाला. केवळ साडेतीन लाख रुपयांसाठी सहा जणांनी मिळून ब्रोकरच्या नातेवाईकांना रस्त्यावर पडलेल्या सेंट्रिंगच्या बल्ल्या व विटांनी मारहाण करीत जखमी केले. नागपुरी गेट पोलिसांनी प्रॉपर्टी ब्रोकर अब्दुल रफीक अब्दुल हमीद (५०) यांच्या तक्रारीवरून सहा जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला.

### जावायासह वडिलांना मारहाण

अमरावती : दीड वर्षांपूर्वी लग्न झालेल्या जावयासह त्याच्या वडिलांना सासरच्यांनी शिवीगाळ करीत मारहाण केली. ही घटना इरफान नगर येथे घडली. जखमी जावई शेख तौसिफ शेख फईम (२७) याच्या तक्रारीवरून नागपुरी गेट पोलिसांनी सासरच्या चौघांविरुद्ध गुन्हा दाखल केला.

### कौटुंबिक वादातून तिघांवर चाकू हल्ला

अमरावती : कौटुंबिक वादातून तिघांनी एका महिलेसह अन्य दोघे अशा तिघांवर चाकू हल्ला करीत जखमी केले. ही घटना माळीपुरा येथे घडली. विजय रामदास घोरे (३४) व अन्य एक यांच्या परस्परविरोधी तक्रारीवरून खोलापुरी गेट पोलिसांनी एकूण पाच जणांविरुद्ध गुन्हा नोंदवला.

### सोनाराची ८७ हजारांनी फसवणूक

**अमरावती** : सराफा गल्लीत एका सोनाराकडून अज्ञाताने अंदाजे साडेसहा ग्रॅमची सोन्याची अंगठी घेतली. त्याचे ऑनलाईन पेमेंट करण्याच्या नावाखाली ८७ हजार ९०४ रुपयांनी आर्थिक फसवणूक केली. सराफा किशोर चंद्रकांत गुरव (41) यांच्या तक्रारीवरून खोलापुरी गेट पोलिसांनी अज्ञाताविरुद्ध गुन्हा नोंदवला.

### वाहतूकीस अडथळा केल्याने कारवाई

अमरावती : आनंद नगर चौकात रहदारीच्या मार्गावर ऑटो उभा करणाऱ्या दोन चालकांवर कारवाई करण्यात आली. या प्रकरणी खोलापुरी गेट पोलिसांनी ऑटोचा (एमएच ४०-ई १४०२) चालक अनिस खान महमूद खान (३२) व दुसरा ऑटो चालक पिंटू वामनराव पार्डीकर (३७) यांच्यावर गुन्हा दाखल केला.

### जुगार खेळणाऱ्या चौघांवर गुन्हे दाखल

अमरावती : फ्रेजरपुरा पोलिसात जुगार खेळणाऱ्या चौघांवर कारवाई करीत गुन्हे नोंदवण्यात आले. त्यांच्या ताब्यातून पोलिसांनरी २ हजार२८० रुपयांचे साहित्य जप्त केले.

---

**कर्जमाफी घेतल्याशिवाय माघार नाही**

# बच्चू कडूंचा एल्गार मोर्चा नागपूरकडे रवाना

**मुख्यमंत्र्यांशी चर्चा करायाची की नाही शेतकरी ठरवणार, महिला शेतकऱ्यांचाही समावेश**



बच्चू कडू म्हणाले, पोकळ बैठका घेऊन काहीही होणार नाही. बैठकीत निर्णय होत असेल, तरच आम्ही सहभागी होऊ. मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री आणि सरकारच्या विविध 38 विभागांचे सचिव या बैठकीला उपस्थित राहणार असल्याचे आपल्याला आलेल्या पत्रात नमूद आहे. पण, मागण्यांसदर्भात निर्णय होणे महत्वाचे आहे. आमची नागपूरात आठ दिवसही आंदोलन करण्याची तयारी आहे. आम्ही तिथेच तंबू ठोकू. मागे हटणार नाही. आम्हाला लेखी स्वरूपात मागण्यांची पूर्तता हवी आहे. तसे शासन निर्णय काढावे लागतील. या आंदोलनासाठी सर्वांनी मेहनत घेतली आहे. केवळ बैठक घेऊन, आम्ही बघू, करू, असे सरकार म्हणत असेल, तर आम्हाला ते मान्य नाही.

प्रतिनिधी / अजिंक्य भारत

**अमरावती, दि.२७ :** प्रहार संघटनेचे अध्यक्ष बच्चू कडू यांनी उद्या २८ ऑक्टोबरला नागपूर येथे महाएल्गार आंदोलनाची तयारी केली आहे. शेकडो ट्रॅक्टर घेऊन मोर्चेकरी नागपूरच्या दिशेने रवाना झाले आहेत. दरम्यान, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी बच्चू कडू यांना चर्चेसाठी आमंत्रित केले आहे. या बैठकीला जायचे की नाही, हे आज सायंकाळी वर्धा येथे कार्यकर्त्यांच्या बैठकीत ठरवू, असे बच्चू कडूंनी प्रसार माध्यमांशी बोलताना सांगितले.

बच्चू कडू म्हणाले, महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांचा फोन आला होता. त्यांनी मुख्यमंत्र्यांसोबत चर्चा घडवून आणण्याचा प्रस्ताव ठेवला आहे. यासंदर्भात आपली शेतकरी नेते राजू शेट्टी आणि इतर प्रमुख नेत्यांशी चर्चा झाली आहे. वर्धा येथे कार्यकर्त्यांसोबत एक बैठक होणार आहे. यात मुख्यमंत्र्यांच्या बैठकीला जायचे की नाही, याविषयी निर्णय घेतला जाईल.

मागच्या बैठकीसारखे होता कामा नये, अशी आमची अपेक्षा आहे. निर्णय झाल्याशिवाय आंदोलन कुठेही थांबणार नाही. शेतकऱ्यांची कर्जमाफी, शेतमालाला हमीभावावर वीस टक्के बोनस, हमीभावाने खरेदी केंद्र सुरू करा, दिव्यांगांचे मानधन वाढवावे, मेंढपाळ, मच्छिमारांचे प्रश्न आहेत. या मागण्या मान्य झाल्याशिवाय मागे हटायचे नाही, अशी आमची भूमिका आहे.

बच्चू कडू म्हणाले, सर्व जिल्ह्यांमधून शेतकरी, शेतमजूर, दिव्यांग, मेंढपाळ, मच्छिमार बांधव लाखोंच्या संख्येने या आंदोलनात सहभागी होणार असून नागपुरात महाएल्गार सभा होणार आहे. आंदोलनाच्या तयारीसाठी आम्ही १५१ सभा घेतल्या. प्रचंड प्रतिसाद मिळत आहे. लोक स्वत: वर्गणी करून आंदोलनात येत आहेत. हे आंदोलन किती दिवस चालेल, हे सांगता येणार नाही, पण ही आरपारची लढाई राहणार आहे. आता माघार घेणे शक्य नाही.

शेतकऱ्यांच्या प्रलंबित मागण्यांसाठी सुरू असलेल्या बच्चू कडू यांच्या आंदोलनाला आता काँग्रेसचा पाठिंबा मिळाला आहे. काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी आंदोलनाला पाठिंबा जाहीर केल्याबद्दल बच्चू कडू यांनी फोनवरून त्यांचे आभार मानले.

काँग्रेस पक्षाचे मन:पूर्वक आभार; त्यांच्या पाठिंब्यामुळे शेतकऱ्यांचा आत्मविश्वास अधिक दृढझाला आहे. आम्ही कुठल्याही पक्षाचे नाही, आम्ही शेतकरी आहोत आणि ही भावना संपूर्ण महाराष्ट्रात पोहोचली पाहिजे, असे बच्चू कडू यांनी स्पष्ट केले.त्यांनी पुढे काँग्रेस कार्यकर्त्यांना आवाहन केले की, मोर्चामध्ये मोठ्या संख्येने सहभागी व्हा आणि शेतकऱ्यांच्या लढाईला बळ द्या. कडू म्हणाले, राष्ट्रनिर्माण करायचं असेल, तर आधी शेतकरी निर्माण झाला पाहिजे. अजित नवले, राजू शेट्टी, महादेव जानकर, रविकांत तुपकर, विजय जाऊंद्या यांचं योगदान मी मान्य करतो. ही फक्त आंदोलन नाही, तर शेतकऱ्यांसाठीची अखेरची आणि निकरीची लढाई आहे.

---

# चुकीच्या हॉकर्स झोनविरोधात पथ विक्रेत्यांचा मनपावर मोर्चा



प्रतिनिधी / अजिंक्य भारत

**अमरावती, दि.२७ :** अमरावती महानगरपालिकेच्या हद्दीत नुकतेच घोषित करण्यात आलेले २९ नवीन हॉकर्स झोन पूर्णपणे चुकीचे असून ते रद्द करण्यात यावेत, अशी मागणी शहरातील पथ विक्रेत्यांनी केली आहे. या संदर्भात गणेश मारोडकर (जिल्हाध्यक्ष), दीपक लोखंडे (जिल्हा उपाध्यक्ष) आणि सुरज चढार (जिल्हा उपाध्यक्ष) यांच्या नेतृत्वाखालील पथ विक्रेता प्रतिनिधींनी मा. आयुक्त तथा अध्यक्ष, पथ विक्रेता समिती, अमरावती महानगरपालिका यांना निवेदन दिले. पथ विक्रेत्यांनी सांगितले की, २०१७ मधील पथ विक्रेता योजना उच्च न्यायालयाने रद्दबातल ठरवली आहे, त्यामुळे त्या आधारे तयार करण्यात आलेले झोन अमान्य आहेत. समितीच्या सहमतीने सादर केलेल्या योजनेलाच शासनमान्यता द्यावी व त्यानुसार शहरातील अस्तित्वात असलेल्या आणि आवश्यक ठिकाणी झोन तयार करावेत, अशी त्यांची मागणी आहे.

तसेच ९ ऑक्टोबर २०२५ रोजी झालेल्या फेरीवाला समितीच्या बैठकीत सर्व सदस्यांनी २९ झोनना विरोध दर्शविला असूनही महानगरपालिकेने हे झोन जाहीर केल्याने विक्रेत्यांच्या अधिकारांचे हनन झाले असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. पथ विक्रेत्यांनी इशारा दिला आहे की, जर हे अन्यायकारक झोन रद्द केले नाहीत, तर हजारो हॉकर्स व्यावसायिक महानगर पालिकेसमोर मोठे आंदोलन करणार असल्याचे सांगितले.

---

# पिस्तुलसह आरोपी अटकेत

प्रतिनिधी / अजिंक्य भारत

**अमरावती, दि.२७ :** ग्रामीण गुन्हे शाखेच्या पथकाने एमआयडीसी रोडवरील एमएसईबी कार्यालयाजवळ एका तरुणाला पिस्तूल, मॅगझिन आणि धारदार चाकूसह अटक केली.

आरोपीचे नाव अंकित किशोर घाटे (२९, जुनी तहसील जवळ) असे आहे. मिळालेल्या माहितीनुसार, एलसीबीचे पथक शनिवारी पोलिस स्टेशन परिसरात गस्त घालत असताना त्यांना माहिती मिळाली की अंकित नावाचा तरुण अंजनगाव सुर्जी रोडवर गुन्हा करण्याच्या उद्देशाने शस्त्रासह फिरत आहे. माहिती मिळताच पोलिस पथकाने तात्काळ घटनास्थळी पोहोचून अंकितला अटक केली. झडती दरम्यान पोलिसांनी अंकितकडून १०,००० रुपयांचे पिस्तूल, मॅगझिन आणि धारदार चाकू जप्त केला. दर्यापूर पोलिस ठाण्यात शस्त्रास्त्र कायद्याच्या कलमांखाली अंकितविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला.

---

# चारित्र्य तपासणी अनिवार्य; प्रमाणपत्राशिवाय कंत्राटी भरती बंद

**महापालिका आयुक्तांनी जारी केले आदेश**

प्रतिनिधी / अजिंक्य भारत

**अमरावती, दि.२७:** रिक्त पदांमुळे महापालिकेच्या वेगवेगळ्या कार्यालयांत कंत्राटी कर्मचारी मोठ्या संख्येने असून, त्यातही महत्त्वाची बाब म्हणजे राजकीय कार्यकर्तेच कर्मचारी बनले आहेत. त्यामुळे बेलगाम होत चाललेले हे कर्मचारी आता विभागप्रमुखांसाठीही, डोकेदुखी ठरले असल्याचे चित्र आहे. आतापर्यंत कार्यकर्ते कर्मचारी म्हणून रूजू होत होते. आता मात्र कंत्राटी कर्मचारी उघडपणे राजकीय पक्षांमध्ये प्रवेश घेत असल्याचे दिसून येत आहे. अग्निशमन विभागात नुकताच असा प्रकार घडलेला आहे. अगदी गुन्हेगारी प्रवृत्तीचेही कर्मचारी महापालिकेत कार्यरत असल्याची धक्कादायक माहिती मिळताच मनपा आयुक्त सौम्या शर्मा यांनी चारित्य प्रमाणपत्राशिवाय कर्मचाऱ्यांची भरती करू नये, असे आदेश जारी केले आहेत.



अग्निशमन विभागासह उद्यान विभागातील सात ते आठ कंत्राटी कर्मचाऱ्यांनी एका राजकीय पक्षात प्रवेश घेतल्याची तक्रारआयुक्त सौम्या शर्मा यांच्याकडे प्राप्त झाली होती. त्यामुळे आयुक्तांच्या आदेशानंतर दोन दिवसांपूर्वीच त्या कर्मचाऱ्यांना कार्यमुक्त करण्यात आले. शिवाय आता प्रत्येक कंत्राटी कर्मचाऱ्याला चारित्य प्रमाणपत्रसादर करावे लागणार आहे;

अग्निशमन उपकेंद्रातील एका कर्मचाऱ्याचा गत सप्टेंबर महिन्यात झालेल्या व्यापाऱ्याच्या अपहरण प्रकरणात सहभाग असल्याचे उघड झाले होते. त्यामुळे त्याला अटकही करण्यात आली.

गंभीर बाब म्हणजे त्याला अटक झाली असतानाही तो कर्तव्यावर कार्यरत असल्याचे दाखविण्यात आले. याशिवाय बांधकाम विभाग, स्वच्छता विभाग, झोन कार्यालयांतही राजकीय कार्यकर्ते कंत्राटी कर्मचारी म्हणून कार्यरत आहे.

---

**दिवाळीचा किराणा पाठविल्याने यशोमती ठाकूर संतापल्या**

# चिल्लर धंदे सोडा...अवकातीत राहा...नाही तर..

प्रतिनिधी / अजिंक्य भारत

**अमरावती, दि.२७ :** दिवाळी हा उत्साहाचा सण...नात्यात गोडवा निर्माण करणारा... नाते घट्ट करण्याचा सण... एकमेकांना शुभेच्छा देण्याचा सण... एकमेकांच्या शुभचिंतनाचा त्यौहार...पण,या आनंदमयी उत्साहात...एक मिठाचा खडा पडला,अन् कटुता निर्माण झाली. माजी मंत्री यशोमती ठाकुर यांना दिवाळीचा किराणा पाठवून स्वस्त प्रसिद्धीचा शो करण्याचा प्रयत्न केल्याने वातावरण तापलंय.त्याला यशोमतींनी फस्ट वॉर्निंग...देत उत्तर दिलयं...तुम्हाला जर खरंच समाजासाठी काही करायचं असेल, तर किराणा पाठवण्याचा दिखावा न करता शेतकऱ्यांना मदत करा! अशा शब्दात उत्तर देत माजी मंत्री



ॲड.यशोमती ठाकुर यांनी तीव्र संताप व्यक्त केला. ''शेतकरी आत्महत्या करत आहेत, शेती कोरडी पडली आहे आणि लोक संकटात आहेत. अशा वेळी आम्ही शेतकऱ्यांच्या दुःखात सहभागी होऊन काळी दिवाळी साजरी केली. तुम्हाला जर खरंच समाजासाठी काही करायचं असेल, तर किराणा पाठवण्याचा दिखावा न करता शेतकऱ्यांना मदत करा!

आणि जर पुन्हा असा कुचेष्टापूर्ण प्रकार करण्याची हिंमत दाखवली, तर त्याचं सडेतोड उत्तर दिलं जाईल.''

हे जे चित्र विचित्र लोक आहेत,कधी नवरा कुठे तर कधी बायको कुठे...कधी सत्ते मध्ये ,कधी आमच्या सपोर्टने तर कधी कुणाच्या सपोर्टने काय -काय राजकारण करत असतात. त्यांनी हा... सोयाबीन, बिस्कीट, शाळेत वाटप होणारे साहित्य, तेल, साखर, शेंगदाने,बेसण,डाळ... किराणा पाठविला......परत जर असं केलं ना...चांगल उत्तर देणार... माझ्या बापजाद्यांनी कधी बारदाना चोरला नाही. मी प्रतिष्ठित घराण्यातील मुलगी आहे आणि प्रतिष्ठित व्यक्तीची बायको आहे. मी असे तुमच्या सारखे चिल्लर धंदे करीत नाही...जर तुम्ही जर असे चिल्लर धंदे करीत असाल तर त्याचं उत्तर आम्हाला देता येतं.शेतकऱ्यांची दिवाळी काळी गेली आहे. अरे........तुम्हाला जर या प्रकारे आमचा अपमान करायचा असेल ,त्याला काय अर्थ उरतो काय? तुम्हा जे काही किराणा द्यायचा असेल ,शेतकऱ्यांचे पैसे द्यायचे आहेत,ते द्यानं तुम्ही...या काय लावल्या भानगडी...ये भैय्या आणि भाभी...अवकातीत राहायचंय....मी पडली,निवडून आली,मंत्री झाली...माझ्या स्वभावात काही फरक पडत नाही.मी सरड्या सारखा रंगही बदलत नाही.

---

### जादूटोण्याचा संशयावरून महिलेची बदनामी

**अमरावती :** परिसरातील महिला जादुटोणा करते या संशयातून तीन महिलांसह दोघांनी तिला जादूटोणा केल्यास तुला बघून घेवू अशी धमकी देत तिची समाजामध्ये नाहक बदनामी केली. त्यामुळे व्यथित झालेल्या ५५ वषाय महिलेने परतवाडा पोलिसात तक्रार दिली. दोन पुरुषांसह तीन महिलांविरुद्ध गुन्हे दाखल करण्यात आले सविस्तर वृत्तानुसार, फिर्यादी ही गुन्हा दाखल झालेले चंदूर बसंत इंगळे(५०), दिनेश बसंत इंगळे(५२) व तिन महिला यांच्या परिचयाची आहे. घटनेच्या वेळी तिने नेहमीप्रमाणे घरात पूजाअर्चा करीत देव्हाऱ्यात धूप अगरबत्ती लावली. त्याचा दरवळ परिसरात पसरला. त्या वेळी गुन्हा दाखल झालेल्या पाच जणांनी तिला एवढ्या रात्री कशाचा धूप लावून करणी करीत आहे, अमावस्या व पौर्णिमेला आमच्या घराकडे त्याचे साहित्य फेकते, असे म्हणत तिच्यासोबत वाद घातला.

---

**रविवारी सकाळी ९.१५ होणार टेकऑफ, आठवड्यातून चार दिवस राहणार फेरी**

# बेलोरा विमानतळावरून विमान उड्डाण वेळेत बदल

प्रतिनिधी / अजिंक्य भारत

**अमरावती, दि.२७ :** अलायन्स एअरलाइन्सच्या अमरावती-मुंबई विमानसेवेसाठी रविवार, २६ ऑक्टोबरपासून, बेलोरा विमानतळावरून नवीन वेळापत्रक लागू करण्यात आले आहे. रविवारला सकाळी ९:१५ वाजता मुंबईला बेलोरा विमानतळावरून फ्लाईट झेपावले. ही सेवा आता सोमवार, बुधवार, शुक्रवार आणि रविवार अशी आठवड्यातून चार दिवस सुरु राहणार आहे.




बेलोरा विमानतळावरून मुंबईला सकाळच्या विमानसेवेची उपलब्धता अमरावतीच्या नागरिकांना आनंददायी ठरली आहे हे उल्लेखनीय आहे. सकाळची विमानसेवा सुरु झाल्यामुळे अनेकांचे काम सोपे झाले आहे, अशी प्रतिक्रिया नागरिकांनी व्यक्त केली आहे. ते म्हणतात की ते आता आठवड्यातून चार दिवस सहजपणे मुंबईला प्रवास करू शकतात. व्यवसायिकांचे म्हणणे आहे की रात्री उशिरापर्यंत त्यांच्या दुकानात काम केल्यानंतर, ते दुसऱ्या दिवशी सकाळी ९:१५ वाजता मुंबईला जाणारी विमानसेवा पकडू शकतात आणि दिवसाचे काम संपवल्यानंतर, ते रात्री ट्रेनने अमरावतीला परत येऊ शकतात.



ही सुविधा सुरू झाल्यामुळे मुंबईला वारंवार कार्यालयीन कामासाठी प्रवास करणाऱ्यांनाही दिलासा मिळाला आहे. पूर्वी दुपारच्या विमान उड्डाणांमुळे त्यांचा एक दिवस वाया जात होता आणि मुंबईत राहण्यासाठी हॉटेलचा खर्च येत होता. तथापि, आता नवीन वेळापत्रकामुळे त्यांना या खर्चातून मुक्तता मिळाली आहे.

बेलोरा विमानतळ हे महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनी (एमएडीसी) अंतर्गत तिसरे व्यावसायिक विमानतळ आहे. विमानतळ ३८९ हेक्टरवर बांधले गेले आहे येथील धावपट्टी १,८५० मीटर लांब आणि ४५ मीटर रुंद आहे. या विमानतळावर रात्रीच्या विमान उड्डाणाची सुविधा देण्याचे काम सुरू आहे. सध्या अलायन्स एअरची एटीआर ७२ विमान बेलोरा विमानतळावरून मुंबईला उपलब्ध आहे.

अमरावती-मुंबई विमानसेवा वेळापत्रकात रविवार, २६ ऑक्टोबरपासून बदल करण्यात आला आहे. मुंबईला जाणारी विमानसेवा आता आठवड्यातून चार दिवस उपलब्ध असतील. अलायन्स एअरच्या अधिकृत वेबसाइटवर नवीन वेळापत्रक प्रसिद्ध करण्यात आले आहे आणि त्यानुसार विमानसेवा उड्डाण आणि लँडिंग करेल. ही सेवा आता आठवड्यातून चार दिवस, सोमवार, बुधवार, शुक्रवार आणि रविवार उपलब्ध असेल.

उल्लेखनीय असे की, उड्डाणांचे वेळापत्रक बदलून सकाळी ९:१५ करण्यात आले आहे, फ्लाईट फुल्ल झाली आहे. रविवारी दुपारी ३ वाजता विमानाचे बुकिंग स्टेटस तपासले गेले तेव्हा फक्त एक सीट रिकामी होती आणि फ्लेक्सी-फेअर दरानुसार भाडे ५,१९८ होते.

### नवीन वेळापत्रक

**मुंबई ते अमरावती:** सकाळी ७:०५ वाजता टेकऑफ, सकाळी ८:५० वाजता लँडिंग

**अमरावती ते मुंबई:** सकाळी ९:१५ वाजता टेकऑफ, सकाळी ११:०० वाजता मुंबईत लँडिंग वेळापत्रक बदलल्याच्या पहिल्या दिवसापासून मुंबईला जाणाऱ्या तिकिटांची संख्या वाढली आहे.

## थोडक्यात

### मजुरीच्या पैशावरून मारहाण

वरूड : मजुरीचे पैसे मागण्याकरीता गेलेल्या इसमालातु पैसे मागायला कसा आला असे म्हणून दारूच्या नशेत दोघांनी त्याच्या कानावर वीट मारली तसेच जीव मारण्याची धमकी दिली. वाडेगाव खरड येथे ही घटना घडली. अरूण ढोले असे जखमीचे नाव आहे. वरूड पोलीस ठाण्यात तक्रारीवरून दिवाकर घाटोळे, प्रविण घाटोळे यांच्याविरूध गुन्हा दाखल करण्यात आला. या घटनेचा पुढील तपास वरुड पोलीस करीत आहे.

### ट्रॅक्टरच्या धडकेत दुचाकीस्वार जखमी

**चांदूर बाजार** : भरधाव टिप्परने दुचाकीला धडक दिली. त्यात दुचाकीस्वाराच्या पायाला फॅक्चर झाला. ही घटना ब्राह्मणवाडा ते दिलालपूर मार्गावर घडली. शकीर अहेमद शेख रसूल असे जखमीचे नाव आहे. त्या प्रकरणी त्याचा नातेवाईक तौसिफ अहेमद शकील अहेमद (२५, रा. चांदूर बाजार) याने चांदूर बाजार पोलिसात तक्रार दिली. पोलिसांनी टिप्पर चालकाविरुद्ध गुन्हा नोंदवला.

### शेतातून १० कट्टे सोयाबीन लंपास

दर्यापूर : शेतात काढणी झालेल्या ५७ पैकी ४७ कट्टे सोयाबीन शेतकऱ्याने घरी नेले. उर्वरित १० कट्टे सोयाबीन शेतातील झोपडीत ठेवले. अज्ञाताने ते चोरून नेले. त्याची अंदाजे किंमत १५ हजार रुपये आहे. ही घटना लेहगाव शेत शिवारात घडली. शेतकरी पंजाबराव गुलाबराव नागे (५६, रा. लेहगाव) यांच्या तक्रारीवरून दर्यापूर पोलिसांनी अज्ञाताविरुद्ध गुन्हा नोंदवला.

### अल्पवयीन मुलीला अज्ञाताने पळविले

वरुड : आजीसोबत रात्री झोपलेली १५ वर्षीय नात सकाळी दिसली नाही. तिचा शोध घेवूनही ती सापडली नाही. तिला अज्ञाताने पळवून नेले असावे, असा संशय नातेवाईकांनी व्यक्त केला. वरुड पोलिसांनी तक्रारीच्या अनुषंगाने अज्ञाताविरुद्ध गुन्हा दाखल केला. या घटनेचा पुढील तपास वरुड पोलीस ठाण्याचे ठाणेदार यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस करीत आहे.

### सलोना येथे युवकाला मारहाण

चिखलदरा : घरची गुरे घेवून शेतात चरायला घेवून जाणाऱ्या युवकाला एका परिचित युवकाने मागे वळून का पाहिले म्हणून शिवीगाळ करीत मारहाण केली. ही घटना सलोना येथे घडली. अनिल रामू धिकार (२७) याच्या तक्रारीवरून चिखलदरा पोलिसांनी सुरेंद्र रमेश गायन (३०) याच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला. या घटनेचा पुढील तपास चिखलदरा पोलीस करीत आहे.

### शेतीच्या वादातून मुलाची वडिलांना मारहाण

दर्यापूर : वडिलांच्या नावे असलेली शेती आपल्या नावे करून द्यावी, यासाठी मुलाने वृद्ध वडिलांसोबत वाद घालत त्यांना काठीने मारहाण केली. त्यात ते जखमी झाले. ही घटना शिंगणवाडी येथे घडली. जखमी वडील गणेश रामदास कळसकर (६०) यांच्या तक्रारीवरून दर्यापूर पोलिसांनी मुलाविरुद्ध गुन्हा नोंदवला. या घटनेचा पुढील तपास दर्यापूर पोलीस ठाण्याचे ठाणेदार यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस करीत आहे.

# १.६८ लाख शेतकऱ्यांना नुकसान भरपाईची प्रतीक्षा

**६० टक्के शेतात फिरविले रोटावेटर | अतिवृष्टीग्रस्तांना न्याय कधी मिळणार ?**



प्रतिनिधी / अजिंक्य भारत

**अमरावती, दि. २७ :** जिल्ह्यात अतिवृष्टीमुळे १ लाख २३ हजार हेक्टरवरील पिकांचे नुकसान झाले. १ लाख ६८ हजार शेतकरी अतिवृष्टीमुळे बाधित झाले. शेतकऱ्यांना नुकसान भरपाई म्हणून कोट्यवधीचे पॅकेज सरकारने घोषित केले. दिवाळीपूर्वीच शेतकऱ्यांच्या खात्यात रक्कम वळती करु, असे आश्वासन खुद्द पालकमंत्र्यांनी दिले. दिवाळी संपली परंतु शासनाची मदत अद्यापपर्यंत प्राप्त झालेली नाही. विशेष म्हणजे जिल्ह्यातील ६० टक्के शेतकऱ्यांनी लागवड खर्च निघत नसल्याने रोटावेटर फिरविले. नुकसान भरपाईची वाट बघता बघता दिवाळी निघून गेली. शासनाने विश्वासघात केल्याचा आरोप आता शेतकऱ्यांकडून केला जात आहे. जिल्ह्यात अतिवृष्टी व परतीच्या पावसाने शेतीचे वाटोळे केले. शेतकऱ्यांना तातडीने नुकसान भरपाई देण्यात यावी, याकरिता संघटना व विरोधक रस्त्यावर उतरले आणि शासनाने जिल्ह्याकरिता नुकसान भरपाई घोषित केली. शेतकऱ्यांची आर्थिक स्थिती बघता सातबारा कोरा करण्याची मागणी जोर धरू लागली असताना तुर्तास आथिक मदत देऊ नंतर कर्जमाफी करु, असे आश्वासन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले. जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी देखील जिल्ह्याला दोन टप्यात १०८ कोटी ७२ लाख तर दूसऱ्या टप्यात ३४ कोटी नुकसान भरपाईची मदत घोषित केली. दिवाळीपूर्वी शेतकऱ्यांच्या खात्यात नुकसान भरपाईची रक्कम जमा करणार, असे आश्वासन दिले. दिवाळी संपली मात्र नुकसान भरपाई मिळालीच नाही.

त्यामुळे पुन्हा एकदा शेतकऱ्यांमध्ये शासनाप्रति रोष दिसू लागला आहे. सोयाबीन हे शेतकऱ्यांचे नगदी पीक मानले जाते. मात्र दिवाळीत शेतकऱ्यांच्या या पिकाने फटका खाल्ला परिणामत: शेतकऱ्यांना हातात आलेले सोयाबीन कवडीमोल भावात विकावे लागले.

### पाच एकरातील सोयाबीन, संत्रा नष्ट

अतिवृष्टीमुळे सोयाबीन आणि संत्रा पिकाला सर्वाधिक फटका बसला आहे. शासनाने पंचनामे तर केले मात्र नुकसान भरपाईची रक्कम अद्यापपर्यंत मि ळाली नाही. पाच एकरातील संत्रा आणि सोयाबीन नष्ट झाले. दिवाळीत मदत मिळणार होती, पण मिळाली नाही. आता मदत नको कर्जमाफीच करा, कारण शेतकऱ्यांची आर्थिक स्थिती फार बिकट आहे.

**– अनिल मंगळे, भंडारज, अंजनगाव सुर्जी**

### दोन एकरातील पेरुचे नुकसान

अतिवृष्टीमुळे २ एकरातील पेरुचे पूर्णत: नुकसान झाले. अतिवृष्टीचे पंचनामे करण्यात आले मात्र अद्यापर्यंत नुकसान भरपाई मिळाली नाही. हुमना अळीनेसुध्दा पाच एकरातील पिक नष्ट केले. १०० टक्के नुकसानीचा अहवाल आहे. तरीसुध्दा शासनाने मदत दिलेली नाही. दिवाळीपूर्वी मदत देण्याची घोषणा हवेतच विरली.

**– उमेश महिंगे, शेतकरी**

### सोयाबीनची पूर्ण माती

११ एकरमध्ये सोयाबीन पेरले मात्र सुरुवातीपासून सोयाबीनची माती झाली. अतिवृष्टीमुळे शेतातील टक्के सोयाबीन नष्ट झाले. ५० टक्के सोयाबीन सोंगणीच्या वे पाऊस आल्याने खराब झाले. शासनाने पंचनामे केले, दिवाळी पूर्वी मदत देणार म्हणून आश्वासन दिले. अजूनही शासनाची मदत मिळाली नाही. बळीराजाला न्याय द्यायचा असेल तर सातबाराच कोरा करावा लागेल.

**– विलासराव तेलखडे, चिंचखेड, भातकुली**

### मदत 18 हजार, लागवड खर्च 70 हजार

शासनाकडून देण्यात येत असलेली मदत तुटपूंजी आहे. जी मदत घोषित झाली ती अजूनही मिळाल नाही. एका हेक्टरला ७०हजार रुपये लागवड खर्च आलेल् आहे. मदत घोषित केली १८ हजार प्रति हेक्टर. म्हणून ५ टक्के शेतकऱ्यांनी रोटावेटर फिरविले. कारण सोयाबीन काढणीचा खर्च २ हजार रुपये एकर आहे. नुकसान भरपाई नको, आता शासनाने कर्जमाफीच करायला हवी.

**– संजय चोरे, धामणगांव चोरे**

## सुकलेल्या निंबाच्या झाडांना भीषण आग



प्रतिनिधी / अजिंक्य भारत

**चांदूर बाजार, दि. २७ :** आटोक्यात आणली आहे ही आग इतकी भीषण होती की वलगाव चांदूर बाजार महामार्गाने प्रवास करणाऱ्या अनेक दुचाकी चालकांना व चारचाकी चालकांना आगीचा फटका बसला आहे निंबाच्या झाडाला लागलेल्या आगीमुळे वलगाव चांदूरबाजार महामार्गावर असलेल्या नया अकोला गावाजवळ एक तास वाहतूक देखील खोळंबली होती

अशातच वलगाव चांदूरबाजार महामार्गावर मोठ्या प्रमाणात सुकलेली निंबाची झाडे आहे आता मात्र ही सुकलेली निंबाची झाडे वाहन चालकांसाठी धोकादायक ठरत आहे सुकलेल्या निंबाच्या झाडांना अज्ञात व्यक्ती आग लावत आहे व झाड खाली पडल्यानंतर त्या झाडाचे इंधन बाजारात विकण्यासाठी नेत आहे.

अमरावती जिल्ह्यातील वलगाव चांदूरबाजार महामार्गावर असलेल्या नया अकोला गावातील महामार्गाच्या बाजूला असलेल्या निंबाच्या झाडांना अज्ञात व्यक्तीने दिनांक एकोणवीस ऑक्टोंबर रविवार रोजी दुपारी तीनच्या सुमारास अज्ञात व्यक्तीने निंबाच्या झाडांना आग लावली आहे ही सर्व घटना वलगाव चांदूरबाजार महामार्गाने प्रवास करणाऱ्या प्रवाशांना माहित पडतात त्यांनी लगेच अमरावती येथील अग्निशामक दलाला माहिती दिली.

अग्निशामक दलाच्या जवानांना घटना माहित पडतात घटनेचं गांभीर्य लक्षात घेता तात्काळ आपल्या ताफ्यासह घटनास्थळी पोहोचले व निंबाच्या झाडांना लागलेल्या आगीवर पाण्याचा मोठा मारा करून हि आग संबंधित विभागाचे अधिकारी लक्ष देतील का ? व चांदूरबाजार महामार्गावर असलेले सुकलेले निंबाचे झाडे तोडतील का हे पाहणं देखील महत्त्वाचं महत्त्वाचं ठरणार आहे अग्निशामक दलाच्या जवानांनी वेळीच घटनास्थळी पोहोचून ही आग आटोक्यात आणली आहे व ही आग कोणी लावली याचा शोध अग्निशामक दलाचे जवान घेत आहे.

## प्रदेश एनएसयुआयच्या उपाध्यक्षपदी संकेत कुलट

### अमरावती एनएसयुआयच्या जिल्हाध्यक्षपदी सर्वेश खांडे

प्रतिनिधी / अजिंक्य भारत



**अमरावती, दि.२७ :** भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या शास्त्रोक्त आणि प्रेरणादायी नेतृत्वाखाली नॅशनल स्टुडंट्स युनियन ऑफ इंडिया च्या महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्षपदी संकेत कुलट व अमरावती एनएसयुआयच्या जिल्हाध्यक्षपदी सर्वेश खांडे यांची नियुक्ती झाली आहे. ही नियुक्ती भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचे अध्यक्ष मा.मल्लिकार्जुनजी खरगे,राष्ट्रीय नेत्या सोनिया गांधी,काँग्रेसचे दूरदृष्टी नेते राहुल गांधी, एनएसयुआयचे राष्ट्रीय प्रभारी कन्हैया कुमार आणि एनएसयुआयचे राष्ट्रीय अध्यक्ष वरुण चौधरीजी यांच्या मान्यतेने तसेच राष्ट्रीय सचिव व प्रभारी महाराष्ट्र अक्षय यादव क्रांतिवीर आणि राष्ट्रीय सचिव व प्रभारी महाराष्ट्र राज्य कांता ग्वालाजी यांच्या सहमतीने करण्यात आली आहे.

याशिवाय, महाराष्ट्र प्रदेश एनएसयुआयचे अध्यक्ष सागर साळुंखे,अमरावती जिल्ह्याचे खा. बळवंत वानखडे, माजी पालकमंत्री यशोमती ठाकूर,माजी पालकमंत्री डॉ.सुनील देशमुख,अमरावती शहर काँग्रेस कमिटी अध्यक्ष बबलु शेखावत,अमरावती ग्रामीण जिल्हा काँग्रेस अध्यक्ष बबलु देशमुख,माजी महापौर विलास इंगोले, माजी महापौर मिलिंद चिमोटे,महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटी प्रवक्ते दिलीप एडतकर आणि प्रदेश उपाध्यक्ष भैय्या पवार यांच्या संमतीने ही निवड झाली आहे.संकेत कुलट यांच्या या नियुक्तीमुळे महाराष्ट्रातील विद्यार्थी चळवळीला व अमरावती जिल्ह्यातील सर्वेश खांडे यांच्या नियुक्तीमुळे नवे बळ मिळणार आहे.विद्यार्थी चळवळ ही नेहमीच तरुणाईच्या जोशाने आणि उत्साहाने बहरलेली असते.संकेत कुलट व सर्वेश खांडे यांच्यासारखे धडाडीचे आणि समर्पित नेते या चळवळीत सामील होणे,ही विद्यार्थ्यांच्या हक्कांसाठी,शिक्षण सुधारणेसाठी आणि सामाजिक न्यायासाठी लढणारी एक मोठी ताकद आहे.संकेत कुलट व सर्वेश खांडे यांची ही निवड केवळ एक जबाबदारीच नाही,तर नव्या पिढीला प्रेरणा देणारी आणि विद्यार्थी चळवळीला नवे वळण देणारी संधी आहे.

## राणा गणपतेश्वर बाबांचा पुण्यतिथी सोहळा

### 3 नोव्हेंबरपासून विविध कार्यक्रमांचे आयोजन

प्रतिनिधी / अजिंक्य भारत

**चांदूर रेल्वे, दि.२७ :** ओम राणा गणपतेश्वर बहुऊदेशिय सेवा संस्था,इंदिरा नगर चांदूर रेल्वे द्वारा ओम परब्रम्ह श्री राणा गणपतेश्वर मंदिरात राणा गणपतेश्वर बाबांचा २४ वा पुण्यतिथी सोहळा दरवर्षी प्रमाणे याही वर्षी उत्साहाने आयोजित करण्यात येत आहे.

पुण्यतिथी सोहळा निमित्य ३ नोव्हेंबर ते ४ नोव्हेंबर पर्यंत संस्थानाने विविध कार्यक्रमाचे आयोजन केलेले आहे. कार्यक्रमांमध्ये स्वच्छता अभियान ,ग्रामगिता प्रवचन ,समुदायिक प्रार्थना व ध्यान तसेच भक्तिमय संगीत व भजनंनाजली अशा अनेक कार्यक्रमाचा समावेश आहे. ३ नोव्हेंबर रोजी रात्री ११:४५ ला वैकुंठ चतुर्दशी च्या दिवशी बाबांच्या समाधीचे महाद्वार उघडून विधिवत पूजा अर्चा करून बाबांच्या मूर्तीचा अभिषेक केला जाईल. हा भक्तिमय सोहळा अनेक भक्तांच्या उपस्थितीत संपन्न होणार आहे.

४ नोव्हेंबर रोजी सकाळी ७:३० वाजता बाबांच्या पालखीचे परिसरातून भ्रमन होईल व सकाळी ११ वाजता सोनी मराठी फेम ' कोण बनणार महाराष्ट्राचा लाडका कीर्तनकार या कार्यक्रमात नामलौकिक प्राप्त ह.भ.प. पंकज महाराज पोहकार यांच्या मधुर वाणीतून काल्याचे कीर्तन होईल व त्यानंतर दुपारी १:३० वाजता महाप्रसादाला सुरूवात होईल.

परसरातील सर्व भाविकांनी ह्या सर्व कार्यक्रमाचा लाभ घ्यावा असे आवाहन संस्थानचे अध्यक्ष शशिकांत वाल्दे, रवी वाल्दे ,कचरू अंभीरे, सचिव सचिन गुल्हाने , सहसचिव रोशन वझे ,आणि कोषाध्यक्ष प्रिया वाल्दे व भक्तपरिवारातील सर्व सदस्यांनी केले आहे.

## श्वानाच्या हल्ल्यात बालिका गंभीर जखमी !

**भोकरबर्डीमधील घटना**

प्रतिनिधी / अजिंक्य भारत



**धारणी, दि.२७ :** जिल्ह्यातील धारणी तालुका स्थित भोकरबर्डी गावात चार वर्षीय बालिका तनिषा राजकुमार धांडे हिला भटक्या वानाने जबर चावा घेतल्याने ती गंभीर जखमी झाली.

गुरुवारी रात्री घडलेल्या या भीषण घटनेमुळे परिसरात भीतीचे वातावरण पसरले आहे. तनिषावर श्वानाने हल्ला करून तिच्या चेहऱ्यावर आणि विशेषत: डाव्या डोळ्यावर चावा घेतला यात तिचा डोळा बेकामी झाल्याची भीषण माहिती डॉक्टरांनी दिली आहे.

जखमी तनिषाला तात्काळ धारणी उपजिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले मात्र, प्रकृती गंभीर असल्याने तिला अमरावती जिल्हा सामान्य रुग्णालयात हलविण्यात आले. तिथे तिच्यावर प्राथमिक उपचार करण्यात आले, पण प्रकृती गंभीर असल्याने अखेर तिला नागपूर शासकीय रुग्णालयात रेफर करण्यात आले. सध्या तिच्यावर तिथे औषधोपचार सुरू आहेत. या घटनेची माहिती मिळताच धारणी पोलिसांनी नोंद घेतली असून तपास सुरू केला आहे

जिल्ह्यात श्वानदंशाच्या घटना झपाट्याने वाढत आहेत. शहर असो वा ग्रामीण भाग भटक्या श्वानांच्या वाढत्या संख्येमुळे नागरिकांच्या जीवाला धोका निर्माण झाला आहे. प्रशासनाच्या वाननियंत्रण उपाययोजनांवर मोठा प्रश्नचिन्ह उभा राहिला आहे अमरावतीसह ग्रामीण भागात श्वान नियंत्रण मोहीमा कागदावरच मर्यादित राहिल्या आहेत.

## बडनेरातील युवतीची गळफास लावून आत्महत्या

प्रतिनिधी / अजिंक्य भारत

**बडनेरा, दि.२७ :** बडनेराच्या नव्या अवस्थेतील लखंडगंज परिसरात राहणाऱ्या रणदीप कौर सेवा सिंग रियाड वय २७ या युवतीने रविवारी सकाळी बआत्महत्या केल्याची घटना समोर आली सदर प्रकरणी पोलिसांनी आकस्मिक मृत्यूची नोंद घेतली आहे सकाळी तिचा भाऊ उठल्यानंतर बहिणीला उठवण्यासाठी दरवाजा फोटो आला असता अतुल आवाज न आल्याने त्याने बाजूच्या घरवाल्याला बोलावून दरवाजा तोडला असता आत मध्ये रणदीप कौर हे पंख्याला गळफास लटकलेल्या अवस्थेत होती तिने तिच्या ओढणीने गळफास लावल्याचे पोलिसांकडून समजले मृतदेह जिल्हा सामान्य रुग्णालय सेवाविच्छेदनासाठी पाठवण्यात आला आहे मृतक ही एका खाजगी शाळेमध्ये शिक्षिका म्हणून कार्यरत होती. गेल्या एक महिन्यापासून शाळेवर जाणे बंद केले होते. मृतक मुलीचे आई-वडील मुंबईला मुलीसाठी मुलगा बघण्यासाठी गेले आहे त्यामुळे नागरिकांनी पोलीसाची संपर्क साधून पोलिसांना बोलावण्यात आले . पोलिसांना तेथे कोणत्याच प्रकारची चिठ्ठी वगैरे काहीच मिळाले नाही. त्यामुळे आत्महत्या कोणत्या कारणाने केली आहे याचा तपास पोलीस करीत आहे.

## प्रवासादरम्यान लांबवले महिलेचे दागिने

प्रतिनिधी / अजिंक्य भारत

**तिवसा :** अकोला येथून तिवसा येथे बहिणीकडे आलेल्या महिलेच्या बॅगेतून ३५ ग्रॅमचे दागिने, व रोख दीड लाख रुपये असा एकूण १ लाख ५३ हजार ५०० रुपयांचा ऐवज चोरून नेला. महिलेच्या तक्रारीवरून तिवसा पोलिसांनी अज्ञाताविरुद्ध गुन्हा दाखल केला. या घटनेचा पुढील तपास तिवसा पोलीस करीत आहे.

# सुधारित पंचनामे पूर्ण,आकडा वाढला

**अमरावतीसह पाच जिल्ह्यांना विशेष बाब म्हणून मिळणार अतिरिक्त मदत**

प्रतिनिधी / अजिंक्य भारत



**अमरावती, दि २७ :** राज्यात सप्टेंबरमध्ये ३४ झालेल्या अतिवृष्टीचे नुकसान मोजण्यासाठी तब्बल १७ दिवसांचा कालावधी लागला आहे. महसूल, कृषी व ग्रामविकास विभागाने केलेल्या पंचनाम्यानुसार जिल्ह्यांपैकी वर्धा, यवतमाळ, अमरावती, अहिल्यानगर, धुळे व नाशिक या सहा जिल्ह्यांमध्ये राज्य सरकारने जाहीर केलेल्या निकषांपूर्वीच पंचनामे पूर्ण करण्यात आले होते.

सहा त्यामुळे या जिल्ह्यांमध्ये नव्याने पंचनामे पूर्ण करताना विशेष बाब म्हणून दोन हेक्टरची मर्यादा तीन हेक्टरवर करण्यात आली.त्यानुसार सुमारे ७ लाख २ हजार १९ हेक्टरचे क्षेत्र वाढले आहे. राज्यात गुरुवार अखेर ६१ लाख ११ हजार २२३ हेक्टरवरील पिकांचे नुकसान झाल्याचे सांगण्यात आले होते. आता त्यात या 7 लाख 2 हजार 19 हेक्टरचे क्षेत्र अंतर्भूत करण्यात आल्यानंतर एकूण नुकसानीचे क्षेत्र ६८ लाख १३ हजार 242 हेक्टर इतके झाले आहे. या नुकसानीमुळे भरपाई ७०,०९८ कोटी ६८ लाख २१ हजारराज्यात मराठवाडा आणि विदर्भातील अनेक जिल्ह्यात अतिवृष्टीने पीकांचे नुकसान झाले. त्यातील सहा जिल्ह्यांमध्ये मदतीचे निकष जाहीर करण्यापूर्वीच पंचनामे झाले होते. त्यामुळे या सहा जिल्ह्यांसाठी सरकारने नव्याने पंचनामे पूर्ण करताना विशेष बाब म्हणून २ हेक्टरची मर्यादा ३ हेक्टरपर्यंत केली आहे. राज्यातील ८३ लाख १२ हजार ९७० शेतकऱ्यांना तडाखा बसला आहे.

या पंचनाम्यांनुसार राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद निधी अंतर्गत शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्यासाठी राज्य सरकारकडे ७ हजार ९८ कोटी ६८ लाख २१ हजार रुपयांची मागणी करण्यात आली आहे. आता राज्याचा मदत व पुनर्वसन विभाग यासंदर्भात शासन निर्णय जारी करून शेतकऱ्यांना मदत थेट खात्यावर जमा करणार आहे.

### सुधारित आकडेवारी

एकूण बाधित क्षेत्र – ६८,१३,२४२

एकूण बाधित जिल्हे – ३४

एकूण बाधित शेतकरी – ८३,१२,९७०

## महत्वाचे



### पूरग्रस्तांसाठी २१ हजारांची मदत, मुख्यमंत्री सहायता निधीला योगदान

**यवतमाळ :** यवतमाळातील विसावा ज्येष्ठ नागरिक मंडळाने पूरग्रस्तांसाठी मदतीचा हात पुढे केला आहे. अतिवृष्टीमुळे नुकसान झालेल्या नागरिकांना आधार देण्यासाठी, मंडळाने २१ हजार रुपयांचा निधी मुख्यमंत्र  सहायता निधीसाठी जमा केला. निवासी उपजिल्हाधिकाऱ्यांकडे हा निधी नुकताच सुपूर्द करण्यात आला असून, ज्येष्ठांच्या या सामाजिक बांधिलकीचे कौतुक होत आहे. राज्यात अतिवृष्टीमुळे निर्माण झालेल्या पूरपरिस्थितीने अनेक भागात मोठे नुकसान झाले आहे. शेती उद्ध्वस्त झाली असून, जनावरांचा मृत्यू झाला आहे, तर अनेकांच्या घरातील अन्नधान्याचेही नुकसान झाले. या संकटग्रस्त नागरिकांना मदत करण्यासाठी, दारव्हा मार्गावरील विसावा ज्येष्ठ नागरिक मंडळाने खारीचा वाटा उचलण्याचा निर्णय घेतला. मंडळाचे अध्यक्ष प्रदीप हिवसे, सचिव रघुनाथ इंजेवार, कोषाध्यक्ष मधुकर चौधरी, उपाध्यक्ष रवींद्र बल्लाळ यांच्यासह कानोबा कुमरे, दिलीप जिरकर, रमेश होनाडे, चिंतामणी निमजे, बी. पी. जाधव, पुरुषोत्तम शेलोकार, सुभाष झलके यांनी पुढाकार घेऊन हा निधी गोळा केला. जमा झालेली २१ हजार रुपयांची रक्कम निवासी उपजिल्हाधिकाऱ्यांकडे सुपूर्द करण्यात आली असून, ती मुख्यमंत्री सहायता निधीत जमा होणार आहे. ज्येष्ठांनी दाखवलेल्या या संवेदनशीलतेचे सर्वत्र कौतुक होत आहे.



### वैभव गायकी यांना राज्यस्तरीय समाजभूषण पुरस्कार

**आर्णी :** पिंपळनेर येथील युवा नेतृत्व वैभव गायकी यांना 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर राज्यस्तरीय समाजभूषण पुरस्कार' प्रदान करण्यात आला. डॉ. बाबासाहेब आंबेडकर साहित्यिक विचार मंचतर्फे आर्णी येथे आयोजित सोहळ्यात हा सन्मान देण्यात आला. सामाजिक, शैक्षणिक व कृषी क्षेत्रातील योगदानाबद्दल त्यांना गौरविण्यात आले. आर्णी येथील महालक्ष्मी लॉन येथे २५ ऑक्टोबर रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर साहित्यिक विचार मंच, महाराष्ट्र रत्नागिरीतर्फे राज्यस्तरीय समाजभूषण पुरस्कार सोहळा पार पडला. यात पिंपळनेर येथील वैभव गायकी यांना त्यांच्या सामाजिक, शैक्षणिक व कृषी क्षेत्रातील योगदानाबद्दल सन्मानित करण्यात आले. त्यांना यापूर्वी राज्यस्तरीय आदर्श युवा आयडॉल पुरस्कार व सोशल वर्कर शिखर आयकॉन अवॉर्डनेही गौरविण्यात आले आहे. विचार मंचचे अध्यक्ष मनोज जाधव, संपादिका भावना खोब्रागडे, उपाध्यक्ष संध्या खरतडे, सुमन मनोहर, सचिव संगीता कालिंदे, मनीष वाईकर आदी मान्यवरांच्या हस्ते गायकी यांना सन्मानचिन्ह व सन्मानपत्र देऊन गौरवण्यात आले. यावेळी मान्यवरांनी गायकी यांचे कौतुक केले व पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. हा सोहळा मोठ्या थाटात संपन्न झाला.



### दारव्हा येथे दिव्यांग क्रिकेट निवड चाचणी संपन्न

**दारव्हा :** नागपूर येथे १ आणि २ नोव्हेंबर रोजी होणाऱ्या राज्यस्तरीय 'नामदेव बलगर ट्रॉफी' दिव्यांग क्रिकेट स्पर्धेसाठी, यवतमाळ जिल्ह्याचा संघ निवडण्याकरिता दारव्हा येथे निवड चाचणी घेण्यात आली. या चाचणीत जिल्ह्यातील अनेक दिव्यांग खेळाडूंनी उत्साहात सहभाग नोंदवला. या निवड चाचणी दरम्यान, खेळाडूंनी गोलंदाजी, फलंदाजी आणि क्षेत्ररक्षणात आपले कौशल्य दाखवले. ग्रामीण भागातील खेळाडूंना संधी मिळावी, या उद्देशाने यवतमाळ दिव्यांग क्रिकेट असोसिएशनने हे आयोजन केले होते. यावेळी असोसिएशनचे अध्यक्ष संजय राठोड, सचिव गिरीजानंद कळंबे, सहसचिव रोहित राठोड, सदस्य ज्ञानेश्वर राठोड, राष्ट्रीय खेळाडू सय्यद मुजाहिद, राहुल लहाडके, जुने शेख, विपुल कळंबे, ऋषिकेश चव्हाण, प्रवीण राठोड, संतोष राठोड, शेख शहजाद, गोपाल राठोड आदी उपस्थित होते. निवडलेल्या खेळाडूंचा संघ लवकरच जाहीर केला जाणार असून, ते नागपूर येथे जिल्ह्याचे प्रतिनिधित्व करतील.

# खासदारांची आत्महत्याग्रस्त कुटुंबांकडे पाठ

## पाच शेतकऱ्यांच्या मृत्यूनंतरही खा. आष्टीकरांची अनास्था, एकाही आत्महत्याग्रस्त कुटुंबाला भेट नाही

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

✦ विनोद कोपरकर

**महागाव, दि. २७ :** महागाव तालुक्यात एकापाठोपाठ एक पाच शेतकऱ्यांनी मरण कवटाळले, तरी खासदार नागेश पाटील आष्टीकर यांनी एकाही आत्महत्याग्रस्त कुटुंबाला भेट दिली नाही. अतिवृष्टीच्या संकटातही त्यांनी पाठ फिरवल्याने, खासदारांनी तालुका वाऱ्यावर सोडल्याची भावना तीव्र झाली आहे. त्यांच्या या संवेदनहीनतेमुळे शेतकरी वर्गात संतापाची लाट उसळली असून, महागाव तालुक्याचे हे दुर्दैव असल्याची चर्चा आहे.

महागाव तालुक्यात सध्या शेतकरी आत्महत्यांचे सत्र सुरू असून, नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण आहे. मात्र, या गंभीर परिस्थितीत विभागाचे खासदार नागेश पाटील आष्टीकर यांनी संपूर्ण तालुका वाऱ्यावर सोडल्याची विदारक वस्तुस्थिती समोर आली आहे. तालुक्यातील दहिसावळी येथे एकापाठोपाठ झालेल्या दोन शेतकरी आत्महत्यांनी महाराष्ट्र हादरला. दहिसावळी येथील नामदेव बावणे यांनी शिवारात गळफास घेतला, तर विपुल घोरपडे या युवा शेतकऱ्याने विहिरीत उडी घेऊन मरण पत्करले. या घटनेचे गांभीर्य ओळखून राज्याचे माजी गृहमंत्री अनिल देशमुख यांनी तातडीने दहिसावळीला भेट दिली. स्थानिक आमदार आणि इतर नेतेमंडळीही या कुटुंबांच्या सांत्वनासाठी धावून गेली. प्रशासकीय अधिकाऱ्यांचा फौजफाटाही पोहोचला, परंतु स्थानिक खासदार नागेश पाटील आष्टीकर यांनी या आत्महत्यांची साधी दखलही घेतली नाही. ही केवळ दोनच प्रकरणे नाहीत. भांब येथे जयवंत राठोड या शेतकऱ्याने 15 ऑक्टोबर रोजी विष प्राशन करून आत्महत्या केली. ऐन दिवाळीच्या दिवशी साधूनगर येथील वैभव पवार या युवा शेतकरी पुत्राने गळफास घेऊन जगाचा निरोप घेतला. इतकेच नव्हे, तर दुर्गा विसर्जनादरम्यान टेंभी येथील शेतकरी तथा ग्राम रोजगार सहाय्यक गणेश सुकळकर हे पैनगंगेच्या पात्रात वाहून गेले आणि त्यातच त्यांचा मृत्यू झाला. तालुक्यात एकामागोमाग एक पाच शेतकरी मरणाच्या दाढेत अडकले, पण खासदारांपर्यंत या वेदना पोहोचल्याच नाहीत. आत्महत्येशिवाय, अतिवृष्टीचाही महागाव तालुक्याला प्रचंड फटका बसला. हजारो शेतकऱ्यांच्या शेतीचे अक्षरशः वाळवंट झाले, तरीही खासदारांनी जणू हा तालुका वाळीत टाकलेला दिसतो. मुडाणा येथे अर्ध्या तासाची धावती भेट वगळता त्यांनी तालुक्यात कुठेही तोंड दाखवलेले नाही. संपूर्ण राज्यात मोदी लाट असतानाही, या विभागाने महाविकास आघाडीचे उमेदवार म्हणून नागेश पाटील आष्टीकर यांना कौल दिला. मात्र, निवडून येताच त्यांच्या संवेदना बोथट झाल्याचे दिसत आहे. पत्नीच्या निधनामुळे ते काही काळ स्वतःच्या दुःखात होते हे समजू शकते, परंतु त्याआधी आणि त्यानंतरही त्यांनी महागाव तालुक्यातील शेतकऱ्यांप्रती कोणतीही संवेदना न दाखवल्याने, त्यांचे यापूर्वीचे प्रेम 'पुतना मावशीचे' होते, हे सिद्ध होत असल्याची संतप्त प्रतिक्रिया शेतकरी वर्गातून येत आहे.

### पक्ष संघटना वाऱ्यावर

**खासदारांच्या दुर्लक्षामुळे महागाव तालुक्यात शिवसेना (उबाठा) कमकुवत होत आहे. पदाधिकाऱ्यांशी संवादच नसल्याने कार्यकर्ते सैरभैर झाले असून, अनेक जण शिंदे गटात प्रवेश करत आहेत. एकीकडे शेतकरी कर्जात बुडालेला असताना, खासदार नागेश पाटील हे ऑडी क्यू 7, इनोव्हा क्रिस्टा, इंडीव्हर अशा महागड्या गाड्यांमधून मुंबई-दिल्लीच्या वाऱ्या करत असल्याचे लाजी   णे चित्र असल्याने, पक्षातच प्रचंड घसरण होत आहे.**

### फसवे पॅकेज; खासदारांचे मौन

**शासनाने अतिवृष्टीग्रस्तांसाठी 31,628 कोटींची घोषणा केली, पण प्रत्यक्षात ही मदत केवळ 6,175 कोटींचीच असल्याचा आरोप होत आहे. हा निव्वळ दिशाभूल करणारा प्रकार आहे. महागाव तालुक्यातील 25 टक्के शेतकऱ्यांना अद्याप मदत मिळालेली नाही. या फसव्या पॅकेजविरोधात खासदार नागेश पाटील यांनी आवाज उचलण्याची गरज असतानाही, त्यांनी या गंभीर विषयावर पूर्णपणे मौन बाळगल्याने आश्चर्य व्यक्त होत आहे.**

## सेवाभावी संस्थांच्या कार्यशाळेचे नियोजन; जिल्हा, तालुका कार्यकारिणी गठित

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी



**यवतमाळ, दि. २७ :** जिल्ह्यातील सेवाभावी संस्थांच्या कामांना अधिक गती देण्यासाठी आणि त्यांच्यात समन्वय साधण्यासाठी, यवतमाळात ३१ ऑक्टोबर रोजी विशेष कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यशाळेच्या नियोजनासाठी नुकतीच विश्रामगृहात बैठक पार पडली, ज्यात जिल्हा आणि तालुका कार्यकारिणीही गठित करण्यात आली.

डॉ. सुनीता मोडक यांच्या मार्गदर्शनाखाली होणाऱ्या या कार्यशाळेचे नियोजन त्र्यंबक मांढरे यांनी केले. बैठकीत जिल्हाध्यक्षपदी किशोर थोटे, उपाध्यक्ष पद्माकर ठाकरे, सचिव त्र्यंबक मांढरे, कोषाध्यक्ष विनोद नराळे आणि संपर्कप्रमुख प्रिया वासनिक यांची निवड करण्यात आली. तसेच, विभागीय अध्यक्षपदी रूपाली घाडगे, सचिव रवी कुमार गजभिये यांची निवड झाली. अमरावती जिल्हाध्यक्ष म्हणून हरीश मेश्राम यांची निवड करण्यात आली. या कार्यशाळेतून सेवाभावी संस्थांना नवी दिशा मिळेल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला. बैठकीला विविध संस्थांचे अध्यक्ष, सचिव आणि सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## खेतानी परिवाराकडून गोरक्षण संस्थेला ५ लाखांची देणगी

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी



**पांढरकवडा, दि. २७ :** येथील ज्येष्ठ नागरिक अकबर शेठ खेतानी, नूरजहा खेतानी आणि सामाजिक कार्यकर्ते सलीम खेतानी यांनी, गोरक्षण संस्थेला पाच लाख रुपयांची भरीव देणगी देऊन सामाजिक बांधिलकीचा परिचय दिला आहे. संस्थेच्या नवीन इमारत आणि शेड बांधकामासाठी दिलेल्या या मदतीमुळे, खेतानी परिवाराचे सर्वत्र कौतुक होत आहे.

गोरक्षण संस्थेच्या वतीने सुरू असलेल्या बांधकामासाठी ही देणगी देण्यात आली. या उदार देणगीबद्दल गोरक्षण संस्थान आणि श्री दत्त मंदिर देवस्थान यांच्या वतीने अकबरअली खेतानी आणि नूरजहा खेतानी यांचा शाल, श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला. समाजातील दानशूर व्यक्तींच्या मदतीमुळेच अशा संस्थांचे कार्य उभे राहते, अशी भावना यावेळी व्यक्त करण्यात आली. या सत्कार समारंभाला गिरधारी झाजोरिया, सतीश झाजोरिया, राजू सातुरवार, गोपाल बाजोरिया, मुथा यांच्यासह गोरक्षण संस्थेचे पदाधिकारी आणि नागरिक उपस्थित होते. खेतानी परिवाराने दाखवलेल्या या उदारतेमुळे संस्थेच्या कार्याला मोठे बळ मिळाले आहे.

## विजयानंद देवतळे यांना 'समाज भूषण' पुरस्कार

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी



**यवतमाळ, दि. २७ :** यवतमाळ येथील विजयानंद चक्रधर देवतळे यांना त्यांच्या उल्लेखनीय समाजकार्यासाठी 'समाज भूषण' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर साहित्यिक विचार मंचतर्फे २५ ऑक्टोबर रोजी आर्णी येथील महालक्ष्मी लॉन येथे आयोजित राज्यस्तरीय पुरस्कार सोहळ्यात हा सन्मान प्रदान करण्यात आला.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर साहित्यिक विचार मंचचे संस्थापक अध्यक्ष मनोज जाधव आणि संपादिका भावनाताई खोब्रागडे यांच्या हस्ते हा पुरस्कार देवतळे यांना देण्यात आला. देवतळे यांनी माजी सामाजिक न्याय मंत्री अँड शिवाजीराव मोघे यांचे खाजगी सचिव म्हणून ३० वर्षे काम करताना केलेल्या विविध सामाजिक कार्याचा आणि आंबेडकरी विचारांना कृतीत आणल्याचा गौरव यानिमित्ताने करण्यात आला. या समारंभास स्वागत अध्यक्ष म्हणून संध्याताई खरतडे, श्रीमती सुमनताई मनवर, संगीताताई कानंदे, सुनिता कांबळे उपस्थित होत्या. तसेच प्रेमानंद देवतळे, ह. सु. भगत, परसराम खरतडे, मनोहर बहादे, पंकज भवरे यांच्यासह नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## आर्णीकरांची दिवाळी पहाट काव्यमय

### १८ कवींच्या कवितांनी रसिक मंत्रमुग्ध; शेती, समाज, निसर्गासह विविध विषयांवर भाष्य

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी



**आर्णी. दि. २७ :** दिवाळी पहाटेच्या मंगलमय वातावरणात, आर्णी शहरात प्रथमच आयोजित 'काव्य पहाट' या अनोख्या कार्यक्रमाने रसिकांना मंत्रमुग्ध केले. विदर्भ साहित्य संघ, शाखा आर्णी आणि जिजाऊ शिक्षण सहाय्यता समितीच्या संयुक्त विद्यमाने झालेल्या या कार्यक्रमात, १८ कवींनी आपल्या दर्जेदार कविता सादर करत उपस्थितांना अविस्मरणीय दिवाळी पहाट अनुभवायला दिली.

क्रेयान इंग्लिश स्कूलच्या प्रांगणात पार पडलेल्या या दीपोत्सव सोहळ्याची सुरुवात ज्येष्ठ कवींच्या हस्ते दीपप्रज्वलनाने आणि सुरेखा देमापुरे यांच्या स्वागतगीताने झाली. यानंतर, कवींनी शेती आणि शेतकऱ्यांच्या व्यथा, सामाजिक विषमता, महिला सक्षमीकरण, निसर्ग, प्रेम आणि दिवाळी फराळ अशा विविध विषयांवर आधारित आपल्या कविता सादर केल्या. काही कवींनी विनोदी शैलीतून सामाजिक रूढी-परंपरांवर भाष्य करत रसिकांची भरभरून दाद मिळवली. या काव्य पहाटेत प्रसिद्ध कवी 'बिब्बाकार' विजय ढाले, लोककलावंत मामा मरगडे, एक्याण्णव वर्षीय ज्येष्ठ कवी ह. सू. भगत, वनमाला भालेराव, गिरीधर कुबडे, अजय चंदेल, प्रतिभा गेडाम, अर्चना लिंगावर, सुमन मनवर, सुनील सुखदेवे, सुमेध मुंडे, गौतम तामघाडगे, कांचन चिंचे, हिराताई धुर्वे, निवृत्ती पिस्तूलकर आणि तुळशीदास मोरकर यांनी आपल्या कवितांनी मैफिल रंगवली. अमरदीप भरगंडे यांच्या ओघवत्या सूत्रसंचालनाने कार्यक्रमाला अधिकच उंची प्राप्त झाली. कार्यक्रमाचे मुख्य आयोजक प्राचार्य डॉ. निवृत्ती पिस्तूलकर यांनी प्रास्ताविकात, "लोप पावत चाललेल्या साहित्य संस्कृतीला नवसंजीवनी देणे आणि नवोदित कवींना व्यासपीठ उपलब्ध करून देणे, हाच यामागचा उद्देश आहे," असे सांगितले. माजी गटशिक्षणाधिकारी किशोर रावते यांनी शुभेच्छा दिल्या, तर अजाबराव बुटले यांनी आभार मानले. कार्यक्रमाला श्रीराम राऊत, श्रीमती बोक्से, गजानन घोडेराव, अरुण डोलारकर, मधुकर ठाकरे, शाम रननवरे, डॉ. अनुज चिंचे, सुशील राऊत यांच्यासह अनेक रसिक श्रोते उपस्थित होते. योगिता अस्वार, संध्या पिस्तुलकर, संगीता रावते, अलका राऊत आणि प्रांजली बुटले यांनी परिश्रम घेतले.

# पंधरा वर्षांनी पुन्हा भरली 'गुरुजीं'ची शाळा

## माजी विद्यार्थ्यांनी जागवल्या सोनेरी आठवणी, अध्यापक विद्यालयाचा स्नेहमिलन मेळावा

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी



**पुसद, दि. २७ :** "माजी विद्यार्थ्यांची आपल्या विद्यालयाप्रती असलेली ही आत्मियता आणि लगाव, हीच आमच्यासाठी खरी अभिमानाची गोष्ट आहे," असे भावोद्गार श्रीराम आसेगावंकर अध्यापक विद्यालयाचे प्राचार्य प्रा. विनायक दूधे यांनी काढले. तब्बल पंधरा वर्षांनी एकत्र आलेल्या २००७-०९ बॅचच्या स्नेहमिलन मेळाव्यात ते बोलत होते.

रविवार, दि. २६ रोजी पुसद येथे हा भावनिक सोहळा पार पडला. पंधरा वर्षांपूर्वी याच विद्यालयातून डी.एड.चे शिक्षण पूर्ण करून गेलेले सुमारे ५० विद्यार्थी-विद्यार्थिनी पुन्हा एकदा आपल्या गुरुजनांच्या भेटीसाठी एकत्र आले होते. कार्यक्रमाची सुरुवात सरस्वती पूजनाने झाली. राजेंद्र पाटील यांनी प्रास्ताविक केले. त्यानंतर सचिन मुसळे, भाग्यश्री कदम, राजेश्वर डाहाळे, मिनल जयस्वाल यांनी मनोगते व्यक्त करताना जुन्या आठवणींना उजाळा दिला, तेव्हा अनेकांच्या डोळ्यांत आनंदाश्रू तरळले. प्राचार्य दूधे यांनी मैत्रीचे नाते जपण्याचा सल्ला दिला, तर प्रा. माधुरी चक्करवार, प्रा. भारती संगेवार, प्रा. रमेश राठोड यांनी विद्यार्थ्यांच्या प्रगतीबद्दल समाधान व्यक्त केले. प्रा. छाया पालकृतवार यांनी कवितेतून शुभेच्छा दिल्या. या अविस्मरणीय भेटीने शिक्षक-विद्यार्थी नात्याचा अनमोल बंध पुन्हा एकदा दृढ झाला. तब्बल दीड दशकानंतर एकत्र येण्याचा हा क्षण सर्वांसाठीच भावनिक होता. कॉलेज जीवनातील गमती-जमती, शिक्षकांनी दिलेले ज्ञान आणि संस्कारांच्या आठवणींनी वातावरण भारावून गेले होते. एकमेकांच्या सुख-दुःखात सहभागी होण्याची आणि भविष्यातही हे स्नेहबंध जपण्याची भावना यावेळी सर्वांनी व्यक्त केली. हा मेळावा केवळ आठवणींचा उजाळा नव्हता, तर तो नव्या नात्यांची सुरुवातही ठरला.

### ज्ञानाच्या वटवृक्षाच्या यशस्वी पारंब्या!

**प्रा. माधुरी चक्करवार म्हणाल्या, "या बॅचचे विद्यार्थी आज विविध क्षेत्रांत यशस्वीपणे कार्यरत आहेत, ही आमच्यासाठी गौरवाची बाब आहे." कोणी शासकीय सेवेत आहे, तर कोणी सामाजिक, राजकीय क्षेत्रात जबाबदाऱ्या सांभाळत आहे. काही यशस्वी उद्योजक बनले आहेत, तर काही प्रगतिशील शेतकरी म्हणून नावलौकिक मिळवत आहेत. या विद्यार्थ्यांच्या प्रगतीमुळे समाधान लाभल्याचे समाधान अध्यापकांनी व्यक्त केले.**

## आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबांना मदतीचा हात द्या - किसान कृतज्ञता कोषचे आवाहन



दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**आर्णी, दि. २७ :** आत्महत्याग्रस्त आणि आपत्तीग्रस्त शेतकरी कुटुंबांना आर्थिक आधार देण्यासाठी, 'किसान कृतज्ञता कोष'च्या माध्यमातून मदतीचा हात पुढे करण्याचे आवाहन, किसान ब्रिगेडचे प्रदेशाध्यक्ष पुरुषोत्तम गावंडे पाटील यांनी केले आहे. त्यांनी स्वतः दरवर्षी एक लाख रुपये देण्याचा संकल्प केला असून, समाजातील सक्षम घटकांनीही या कार्यात योगदान द्यावे, असे ते म्हणाले.

गेल्या तीन वर्षांपासून गावंडे यांनी हा उपक्रम सुरू केला आहे. नोंदणीकृत असलेल्या या कोशातून आतापर्यंत अनेक पीडित कुटुंबांना मदत देण्यात आली आहे. यंदा दिवाळीपूर्वी आर्णी आणि दिग्रस तालुक्यातील पाच आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबांना त्यांच्या घरी जाऊन धनादेशाद्वारे मदत देण्यात आली. 'शेतकरी कुटुंबांना आधार देणे हे आपले सामाजिक उत्तरदायित्व आहे,' असे सांगत, गावंडे यांनी पत्रकार परिषदेत अधिकाधिक लोकांनी या कार्यात सहभागी व्हावे, असे आवाहन केले. यावेळी कोशाचे सचिव यादवराव ठाकरे, प्रशांत गावंडे, शाम ठाकरे आदी उपस्थित होते.

## महत्वाचे

### ट्रकच्या अपघातात वृद्ध जागीच ठार

**यवतमाळ:** नागपूर रोडवरील हुंडाई शोरूमसमोर रविवारी सायंकाळी एका भरधाव ट्रकने सायकलस्वाराला चिरडल्याने ७५ वर्षीय वृद्धाचा जागीच मृत्यू झाला. नारायण काळू मडावी (रा. धानोरा, ह.मु. विको कंपनीजवळ) असे मृत वृद्धाचे नाव आहे. ते सायंकाळी पाचच्या सुमारास सायकलने विको कंपनीकडे जात असताना, कर्नाटक पासिंगच्या ट्रकने (क्र. केए ३३ बी ८५९२) त्यांना मागून जोरदार धडक दिली. या भीषण अपघातात ते गंभीर जखमी होऊन मरण पावले. घटनेची माहिती मिळताच शहर पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. मृतदेह उत्तरीय तपासणीसाठी शासकीय रुग्णालयात पाठवण्यात आला. याप्रकरणी मृतकाचा मुलगा गुरुदेव नारायण मडावी (वय ३३) यांच्या तक्रारीवरून यवतमाळ शहर पोलिसांनी ट्रक चालकाविरुद्ध गुन्हा नोंदविला.

### दारव्हा तालुक्यातील वाईन बार फोडला

**दारव्हा:** तालुक्यातील बोरी (बु.) येथील 'सुप्रभा वाईन बार' अज्ञात चोरट्यांनी फोडून सुमारे ६० हजार रुपयांचा मुद्देमाल लंपास केला. ही घटना शनिवारी रात्री अकरा ते रविवार सकाळी पावणे सात वाजण्याच्या दरम्यान घडली. चोरट्यांनी बारच्या दरवाजाचे कुलूप आणि कोंडा तोडून आत प्रवेश केला. त्यानंतर काउंटरमागील रॅकमध्ये ठेवलेल्या विविध कंपन्यांच्या ५०,४२७ रुपये किमतीच्या इंग्रजी दारूच्या बाटल्या तसेच १०,००० रुपये किमतीचा ४३ इंची एलईडी टीव्ह चोरून नेला. सकाळी बार उघडायला आले असता चोरीचा प्रकार उघडकीस आला. याप्रकरणी धीरज सुरेश जयस्वाल (वय ४०) यांच्या तक्रारीवरून दारव्हा पोलिसांनी अज्ञात चोरट्यांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

### अपघातात धाबा कामगार जखमी

**पांढरकवडा:** तालुक्यातील मंगी बसस्थानकाजवळ एका धाब्यावर मदतनीस म्हणून काम करणाऱ्या ५० वर्षीय व्यक्तीला अज्ञात वाहनाने जोरदार धडक दिल्याने ते गंभीर जखमी झाले. अजय अहात्रे असे जखमीचे नाव आहे. शनिवारी सकाळी साडेआठच्या सुमारास ते रस्ता ओलांडत असताना, एका भरधाव आणि निष्काळजीपणे चालवलेल्या अज्ञात वाहनाने त्यांना चिरडले आणि वाहनचालक घटनास्थळावरून पसार झाला. जखमी अजय यांना तातडीने उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. याप्रकरणी धाबा मालक हरजीतसिंग रणजीत सिंग (वय ५०, रा. कोंधारा) यांनी दिलेल्या तक्रारीवरून, पांढरकवडा पोलिसांनी अज्ञात वाहन चालकाविरुद्ध दाखल केला आहे.

पालक चिंताग्रस्त...

# लोणबेहळ येथील युवक ड्रग्जच्या विळख्यात

## 'एमडी ड्रग्ज'च्या नशेत तरुण पिढी; आर्णी पोलिसांचे 'अर्थ'पूर्ण दुर्लक्ष होत असल्याचा गंभीर आरोप

**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**

**यवतमाळ, दि.२७ :** आर्णी तालुक्यातील लोणबेहळ गावातील तरुण पिढीला 'एमडी ड्रग्ज'चा विळखा पडला आहे. १७ ते २५ वयोगटातील मुले, विशेषतः शाळकरी विद्यार्थी या जीवघेण्या व्यसनाच्या आहारी जात असल्याने संपूर्ण गाव भयभीत झाले असून पालकवर्ग चिंताग्रस्त झाले आहेत. धक्कादायक बाब म्हणजे, या गंभीर प्रकाराकडे आर्णी पोलीस 'अर्थ'पूर्ण संबंधातून जाणीवपूर्वक दुर्लक्ष करत असल्याचा गंभीर आरोप येथील संतप्त पालकांनी 'दैनिक अजिंक्य भारत'शी बोलताना केला आहे. या प्रकरणी जिल्हा पोलिस अधीक्षकांनी स्वतः लक्ष घालून हा काळाबाजार बंद करावा, अशी आर्त मागणी पालकांनी केली आहे.

आर्णीपासून १५ किमी अंतरावर नागपू -तुळजापूर महामार्गावर लोणबेहेळ हे गाव वसलेले आहे. या गावाची लोकसंख्या सुमारे अडीच हजारांच्या घरात आहे. महामार्गालगचे गाव असल्याने येथे अनेक हॉटेल्स, बार आणि पानठेले आहेत. परिसरातील गावांसाठी ही एक छोटी बाजारपेठच (गुजरी) बनली आहे. मात्र, याच मोक्याच्या जागेचा फायदा घेत गेल्या काही महिन्यांपासून गावात एक नवीन आणि भयंकर संकट उभे राहिले आहे. 'फंटा'गोळी आणि 'एमडी'चा कहर याबाबत नाव न सांगण्याच्या अटीवर काही पीडित पालकांनी 'अजिंक्य भारत'ला ही गंभीर माहिती दिली. त्यांच्या म्हणण्यानुसार, आजपर्यंत गावातील किमान १५ ते २० विद्यार्थी भांग आणि 'एमडी ड्रग्ज'च्या पूर्णपणे आहारी गेले आहेत. नशेसाठी 'फंटा' नावाची एक विशिष्ट गोळी हे तरुण घेत असल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे. काही दिवसांपूर्वीच, एका विद्यार्थ्याला या नशेचा 'ओव्हरडोस'झाल्याने त्याची प्रकृती बिघडली होती. त्याला तातडीने लोणबेहेळ येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात दाखल करावे लागले. त्यानंतर त्याला समुपदेशनासाठी बाहेरगावी पाठविण्यात आले. या घटनेनंतर गावातील पालकांमध्ये प्रचंड भीतीचे वातावरण पसरले आहे. हा सर्व अवैध प्रकार सुरू असतानाही पोलिसांकडून अद्याप कोणतीही ठोस कारवाई झालेली नाही, असे पालकांनी स्पष्ट केले. उलट, पोलिसांच्याच 'आशीर्वादाने'गावातील एका विशिष्ट पानठेल्यावरून 'फंटा' गोळी आणि 'एमडी ड्रग्ज'ची विक्री राजरोसपणे सुरू आहे. या संपूर्ण रॅकेटची माहिती पोलिसांना असूनही, ते या गंभीर प्रकरणाकडे सोयीस्कर दुर्लक्ष करत असल्याचा संतापजनक आरोप पालकांनी केला आहे. 'जिल्हा पोलिस अधीक्षकांनी या गंभीर समस्येकडे तातडीने लक्ष द्यावे, अन्यथा आमची पुढची पिढीच बरबाद होईल,' अशी भीती पालकांनी व्यक्त केली आहे. हे ड्रग्ज विकणाऱ्यांचा पोलिसांनी तत्काळ बंदोबस्त करावा, अशी जोरदार मागणी पालकांनी केली.



**'ड्रगमाफियांच्या धाकाने अनेक पालक उघडपणे बोलायला तयार नाहीत. ज्यांची मुले या व्यसनाच्या आहारी गेली आहेत, त्या पालकांनी आता आपापल्या मुलांवर कठोर नियंत्रण ठेवणे सुरू केले आहे. मुलांनी हे व्यसन सोडावे म्हणून त्यांच्यावर खासगीत उपचार केले जात आहेत. मुलांचे समुपदेशन केले जात आहे, पण जोपर्यंत हे ड्रग्ज विकणारे मोकाट आहेत, तोपर्यंत आमची मुले सुरक्षित नाहीत.'**
**-एका पीडित पालकाची व्यथा.**

### नशेसाठी 'फंटा' गोळीचा वापर

**'फंटा'नावाची गोळी ही प्रत्यक्षात भांगेची असल्याचे सांगितले जाते. या गोळीचे सेवन करून तरुण नशा करतात. या गोळीत भांग असल्याने त्यावर पाणी प्यायल्यास नशा चढते. जर त्यावर दूध प्यायले तर ही नशा अधिक तीव्र होते. त्यानंतर नशा आणखी वाढावी म्हणून 'एमडी ड्रग्ज' हे पावडर स्वरूपात जिभेवर टाकले जाते. अशा पद्धतीने अधिक नशा करण्यासाठी या 'फंटा' गोळीचा आणि 'एमडी ड्रग्ज' पावडरचा उपयोग केला जात असल्याची माहिती लोणबेहळ येथील एका तरूणाने 'दैनिक अजिंक्य भारत'शी बोलताना दिली.**

### कुठे मिळते ड्रग्ज आणि 'फंटा'?

**लोणबेहेळ हे गाव महामार्गावर असल्याने याठिकाणी अनेक पानठेले आहेत. त्यातीलच एका विशिष्ट पानठेल्यावर 'फंटा'ही गोळी उपलब्ध करून दिली जाते. तसेच, गावातीलच दोन ड्रग्जमाफिया तरुण या मुलांना कारमधून 'एम.डी. ड्रग्ज'उपलब्ध करून देत असल्याची माहिती पालकांनी दिली. याशिवाय, गावापासून जवळ असलेल्या एका 'बेड्या'वरूनही (वस्ती) नशेसाठी या वस्तू उपलब्ध करून दिल्या जात असल्याचे पालकांचे म्हणणे आहे. याबाबत सविस्तर माहिती देण्यासाठी लवकरच गावातील एक शिष्टमंडळ जिल्हा पोलिस अधीक्षकांना भेटणार असल्याची माहितीही सूत्रांनी दिली आहे.**

# उपमुख्यमंत्री अजित पवार गुरुवारी जिल्ह्यात

## राष्ट्रवादीत 'महाभरती'; 'शेतकरी नुकसानी'चा आढावा घेणार

**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**

**यवतमाळ, दि.२७ :** राज्याचे उपमुख्यमंत्री ना. अजित पवार येत्या गुरुवारी (दि. ३०) यवतमाळ दौऱ्यावर येत असून त्यांच्या उपस्थितीत स्थानिक समता मैदानावर पक्षप्रवेश सोहळा होणार आहे. यात काँग्रेस व सहकार क्षेत्रातील प्रवीण देशमुख आणि अशोकराव घारफळकर यांच्यासह ३००हून अधिक नेते-कार्यकर्ते राष्ट्रवादीत (अजित पवार गट) प्रवेश करतील.

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे (अजित पवार गट) प्रदेश उपाध्यक्ष वसंतराव घुईखेडकर यांनी सोमवारी (दि. २७) यवतमाळ येथे आयोजित पत्रकार परिषदेत या दौऱ्याची माहिती दिली. उपमुख्यमंत्री अजित पवार गुरुवारी (दि. ३०) यवतमाळात येत असून, त्यांच्या उपस्थितीत समता मैदानावर भव्य कार्यकर्ता मेळावा व पक्षप्रवेश सोहळा आयोजित करण्यात आला आहे. दरम्यान वणी ते उमरखेडपर्यंतच्या



विविध तालुक्यांमधील ३०० पेक्षा अधिक कार्यकर्ते, पदाधिकारी आणि नेते राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये जाहीर प्रवेश करतील. विशेषतः, सहकार क्षेत्रातील मोठे व्यक्तिमत्त्व असलेले प्रवीण देशमुख आणि अशोकराव घारफळकर हेदेखील काँग्रेसमधील अनेक सहकाऱ्यांसह याच दिवशी राष्ट्रवादीत प्रवेश करणार असल्याची माहिती घुईखेडकर यांनी दिली. या प्रमुख नेत्यांनी यापूर्वीच पक्षप्रवेशासंदर्भात चर्चा केली आहे. या दौऱ्यात अजित पवार केवळ पक्षीय कार्यक्रमापुरते मर्यादित राहणार नाहीत. ते प्रथम जिल्हाधिकारी कार्यालयात जिल्ह्यातील शेतकरी नुकसानीचा सविस्तर आढावा घेतील. अतिवृष्टी आणि इतर संकटांमुळे झालेल्या नुकसानीवर ते जिल्हाधिकाऱ्यांशी सखोल चर्चा करतील. या प्रशासकीय बैठकीनंतर समता मैदानावर कार्यकर्ता मेळावा होईल आणि त्यानंतर पक्षप्रवेशाची प्रक्रिया पार पडेल. या पत्रकार परिषदेला वसंतराव घुईखेडकर यांच्यासोबत विवेक देशमुख, नानाभाऊ गाडबैले, क्रांती धोटे, योगेश धानोरकर, विराज घुईखेडकर, कैलास राऊत, अबोली देशमुख यांच्यासह इतर मान्यवर उपस्थित होते.

# जैवखनन प्रकल्पाच्या टेंडर प्रक्रियेत भ्रष्टाचार

## शहर काँग्रेसचा एल्गार; आजपासून अन्नत्यागासह आमरण उपोषण

**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**

**यवतमाळ, दि. २७ :** यवतमाळ नगरपरिषदे या कोट्यवधी रुपयांच्या जैवखनन प्रकल्पाच्या टेंडर प्रक्रियेत मोठा भ्रष्टाचार आणि अपारदर्शकता झाल्याचा गंभीर आरोप करीत, शहर काँग्रेस कमिटीने आज मंगळवारपासून (दि. २८) अन्नत्यागासह आमरण उपोषणाचा एल्गार पुकारला आहे. ही वादग्रस्त टेंडर प्रक्रिया तात्काळ रद्द करावी, या मागणीसाठी हे आंदोलन केले जात आहे.



मंगळवार, २८ ऑक्टोबर रोजी सकाळी १० वाजता नगरपरिषद कार्यालयासमोर या आमरण उपोषणाला सुरुवात होणार आहे. शहर काँग्रेसचे अध्यक्ष प्रा. डॉ. बबलू उर्फ अनिल देशमुख, सोशल मीडिया काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष कृष्णा पुसनाके आणि शेतकरी चळवळीचे नेते कॉम्रेड सचिन मनवर हे उपोषणाला बसणार आहेत. शहर काँग्रेसने यापूर्वी जिल्हाधिकाऱ्यांकडे या प्रकरणाची सविस्तर तक्रार करून चौकशीची मागणी केली होती. जिल्हाधिकाऱ्यांनी मुख्याधिकाऱ्यांकडे पत्रव्यवहारही केला होता. मात्र, महिना उलटूनही कोणतीही ठोस कारवाई न झाल्याने, अखेर काँग्रेसने आंदोलनाचा मार्ग स्वीकारला आहे. या आंदोलनाद्वारे काँग्रेसने प्रमुख मागण्या केल्या आहेत. विद्यमान जैवखनन टेंडर प्रक्रिया तात्काळ रद्द करावी, नवीन नगरपरिषद मंडळ स्थापन झाल्यानंतरच पारदर्शक पद्धतीने नवीन प्रक्रिया राबवावी, प्रकल्पाच्या सर्व अटी, पात्रता निकष आणि आर्थिक बाबी जनतेसमोर जाहीर कराव्यात आणि जनसुनावणी घेऊन नागरिकांचा सहभाग निश्चित करावा. प्रा. डॉ. बबलू देशमुख म्हणाले, या टेंडर प्रक्रियेत आर्थिक गैरव्यवहार आणि स्वार्थी हितसंबंधांचा वास येत आहे. प्रशासनाने दुर्लक्ष केल्याने, जनते या हक्कांसाठी आम्ही अन्नत्याग आंदोलनाचा निर्णय घेतला आहे. मागण्या पूर्ण होईपर्यंत हे आंदोलन सुरूच राहील. उपोषणकर्ते कृष्णा पुसनाके आणि कॉम्रेड सचिन मनवर यांनीही, प्रशासन पारदर्शक भूमिका घेत नाही, तोपर्यंत आंदोलन मागे घेणार नसल्याचा निर्धार व्यक्त केला आहे.

# अतिवृष्टीग्रस्तांना १२६ कोटी रुपयांचे वितरण

**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**

**यवतमाळ, दि. २७ :** जिल्ह्यात अतिवृष्टीमुळे झालेल्या पीक नुकसानीपोटी मदतीचे वितरण गतीने सुरू असून, तांत्रिक त्रुटींमुळे मदत न मिळालेल्या शेतकऱ्यांनी तात्काळ तलाठी किंवा कृषी सहाय्यकांशी संपर्क साधावा, असे आवाहन जिल्हा प्रशासनाने केले आहे. सप्टेंबरमधील अतिवृष्टीमुळे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना १२६.०९ कोटी रुपये १.१५ लाख शेतकऱ्यांच्या खात्यात जमा करण्यात आले आहेत. बँक खात्याची माहिती किंवा वारसांचे संमतीपत्र सादर न केल्यामुळे अनेक शेतकऱ्यांचे वाटप प्रलंबित आहे.

जून ते ऑगस्ट दरम्यानच्या अतिवृष्टीमुळे २.१३ लाख शेतकरी बाधित झाले होते, ज्यासाठी १८३.६७ कोटी रुपये मंजूर झाले. यापैकी ११५.८० कोटी रुपये १.४५ लाख शेतकऱ्यांच्या खात्यात जमा झाले आहेत. सप्टेंबरमधील नुकसानीमुळे २.५८ लाख शेतकरी बाधित झाले असून, २६२.०८ कोटी रुपये मंजूर झाले आहेत. यातील १२६.०९ कोटी रुपये १.१५ लाख शेतकऱ्यांच्या खात्यात जमा करण्यात आले आहेत. उर्वरित शेतकऱ्यांनी आवश्यक कागदपत्रे तातडीने सादर करून मदतीचा लाभ घ्यावा, असे प्रशासनाने म्हटले आहे. ई-पंचनामा पोर्टलवर माहिती अपलोड करण्याचे काम सुरू आहे.

# पळशीतील पूरग्रस्त मदतीपासून वंचित

## ग्रामसेवकाचा अडेलतट्टूपणा; बीडीओंकडे तक्रार, पंचनामेच केले नाहीत

**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**

**उमरखेड, दि. २७ :** ऑगस्ट महिन्यात आलेल्या महापुरामुळे उद्ध्वस्त झालेल्या पळशी (जुनी) येथील ग्रामस्थांना, ग्रामसेवकाच्या अडेलतट्टपणामुळे शासकीय मदतीपासून वंचित राहावे लागत असल्याचा गंभीर आरोप होत आहे. ग्रामसेवक धम्मपाल अडागळे यांनी नुकसानीचे पंचनामेच केले नसल्याने, संतप्त ग्रामस्थांनी गटविकास अधिकाऱ्यांकडे धाव घेतली आहे.



ऑगस्टमध्ये इसापूर धरणाचे पाणी आणि अतिवृष्टीमुळे पळशी गावात पू आला होता. एनडीआरएफच्या मदतीने नागरिकांना सुरक्षित स्थळी हलवावे लागले होते. या पुरात अनेकांचे संसारोपयोगी साहित्य आणि धान्य वाहून गेले. मात्र, 'गावाचे पुनर्वसन झाल्याने मदत मिळणार नाही,' असे तहसीलदारांनी सांगितल्याचे कारण देत, ग्रामसेवकाने पंचनामे केले नाहीत, असा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. प्रशासनाने या प्रकरणाची सखोल चौकशी करून, दोषी ग्रामसेवकावर कारवाई करावी, अशी मागणी करण्यात आली आहे. गटविकास अधिकारी किरण कोळपे यांनी तातडीने चौकशीचे आदेश दिले आहेत.

# बनावट प्रमाणपत्र सादर करून मिळविली नोकरी?

## दीपक जाधव यांचा उपोषणाचा इशारा

**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**

**दिग्रस, दि. २७ :** दिग्रस नगर परिषदेतील एका लिपिकाने बनावट दिव्यांग प्रमाणपत्र सादर करून नोकरी मिळविल्याचा गंभीर आरोप करीत, त्याच्या प्रमाणपत्रांची फेरपडताळणी करण्याची मागणी 'अपंग जनता दला'ने केली आहे. २८ ऑक्टोबरपर्यंत ही पडताळणी न झाल्यास, २९ ऑक्टोबरपासून नगर परिषद कार्यालयासमोर आमरण उपोषण करण्याचा इशारा संघटनेचे जिल्हाध्यक्ष दीपक जाधव यांनी दिला आहे.



याप्रकरणी २४ ऑक्टोबर रोजी जिल्हाधिकाऱ्यांकडे तक्रार दाखल करण्यात आली आहे. जाधव यांच्या मते, संबंधित लिपिकाने बोगस प्रमाणपत्र वापरून नोकरी बळकाविली आहे. दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम २०१६ नुसार ४० टक्क्यांपेक्षा कमी अपंगत्व असल्यास लाभ मिळत नाही, तरीही प्रशासन कर्मचाऱ्याला पाठीशी घालत आहे. मागील वर्षी २२ ऑगस्ट २०२४ रोजी निवेदन देऊनही कारवाई झाली नाही. त्यामुळे आता उपोषणाचा मार्ग स्वीकारावा लागत असून, काही अनिष्ट घडल्यास प्रशासन जबाबदार राहील, असा इशारा देण्यात आला आहे. 'खऱ्या लाभार्थ्यांवर अन्याय होऊ देणार नाही,' असा निर्धार जाधव यांनी व्यक्त केला.

# संघटित युवाशक्तीला योग्य मार्गाची गरज; चिकाटीने ध्येय गाठा

## न्यायाधीश संतोष गरड यांचे आवाहन; आर्णी युथ फाउंडेशनच्या स्थापना दिनाचा कार्यक्रम उत्साहात, मान्यवरांची मांदियाळी

**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**

आर्णी, दि.२७ : 'आर्णी युथ फाउंडेशनचा उद्देश अतिशय उत्तम आहे. या माध्यमातून युवकांची शक्ती एकत्र येत आहे, मात्र या संघटित शक्तीला विधायक कार्यासाठी योग्य दिशा मिळणे अत्यंत गरजेचे आहे,' असे स्पष्ट प्रतिपादन मुंबई सत्र न्यायालयाचे न्यायाधीश संतोष गरड यांनी केले. 'तरुणांनी आपले ध्येय गाठण्यासाठी चिकाटी आणि कठोर परिश्रम केले पाहिजेत. केवळ अभ्यासक्रमच नव्हे, तर अवांतर पुस्तके वाचण्यासाठीही वेळ काढला पाहिजे,' असा मोलाचा सल्लाही त्यांनी युवकांना दिला.




यवतमाळ रोडवरील स्वस्तिक जिनिंग अँड प्रेसिंग इंडस्ट्रीज येथे 'आर्णी युथ डेव्हलपमेंट फाउंडेशन'च्या पहिल्या स्थापना दिनाचा दिमाखदार सोहळा आयोजित करण्यात आला होता. या समारंभात अध्यक्षस्थानावरून न्यायाधीश गरड बोलत होते. आपल्या भाषणात त्यांनी जुन्या आठवणींना उजाळा दिला. ते म्हणाले, 'आमच्या काळात जे मार्गदर्शन उपलब्ध नव्हते, ते आज या फाउंडेशनच्या रूपाने तुम्हाला मिळत आहे. या व्यासपीठाच्या माध्यमातून आपल्या आर्णी शहरासाठी काहीतरी भरीव करण्याची संधी तुम्हा-आम्हाला उपलब्ध होत आहे, ही निश्चितच आनंदाची बाब आहे. आम्ही तेव्हा थोरमोठ्यांचे आशीर्वाद आणि संस्कार घेत घडलो; आता तुम्हीही या फाउंडेशनच्या माध्यमातून योग्य मार्गदर्शन मिळवून आपले उज्ज्वल भविष्य घडवा.' या कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून विविध क्षेत्रातील मान्यवरांची मांदियाळी लाभली होती. यात पाटबंधारे विभागाचे सचिव राजेश कातपल्लीवार, अप्पर जिल्हाधिकारी नरेंद्र फुलझेले, अप्पर जिल्हाधिकारी बंकेश पवार, साहाय्यक विक्रीकर आयुक्त प्रज्ञा गेडे, प्रसिद्ध शल्यचिकित्सक डॉ. विजय कवलकर, जगदंबा शिक्षण संस्थेचे सचिव शीतल वातिले, मुख्याधिकारी दादाराव डोल्हारकर, नवनियुक्त न्यायाधीश कृष्णाजी गावंडे, यवतमाळ बार कौन्सिलचे अध्यक्ष संजय जैन, भंडाराचे मुख्याधिकारी पियुष डोंगरे, आर्णी युथ फाउंडेशन कोअर समितीचे अध्यक्ष गोपाल कोठारी, ज्योती कॅन्सर रिलीफचे सतीश मुसकुंदे आणि आर्णी वकील संघाचे उपाध्यक्ष ॲड. प्रमोद चौधरी यांचा प्रामुख्याने समावेश होता. या मान्यवरांनीही उपस्थितांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमाच्या सुरुवातीला अर्हम कोठारी यांनी अभ्यासपूर्ण प्रास्ताविक सादर केले. यात त्यांनी 'युथ फाऊंडेशन'ची स्थापना, कार्यपद्धती, ध्येय आणि भविष्यातील उद्देश सविस्तरपणे नमूद केले. फाउंडेशनचे अध्यक्ष गोपाल कोठारी आणि आर्किटेक्ट सचिन कोठारी यांनीही आपले विचार व्यक्त करत युवकांना प्रेरित केले. कार्यक्रमाचे संचालन कैलास राऊत यांनी केले, तर उपस्थितांचे आभार अमोल मांगुळकर यांनी मानले. या कार्यक्रमालाला आर्णी शहरातील तरुण आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

नॅचरल शुगर ॲण्ड अलाईड इंडस्ट्रीज लि.
युनिट नं. 2 गुंज सवना ता. महागाव जि. यवतमाळ
फोन नं. 7588877541, 7588877601

सस्नेह निमंत्रण

आपणांस कळविण्यास आनंद होतो की, आपल्या नॅचरल शुगर ॲण्ड अलाईड इंडस्ट्रीज लि. युनिट नं. 2 चा सन 2025 चा

10 वा गळीत हंगाम शुभारंभ

सौ. व श्री. नानाराव मारोती जाधव
रा. पिंपळखुटा ता. पुसद जि. यवतमाळ
(मागील गळीत हंगामामध्ये सर्वाधिक ऊस पुरवठा करणारे ऊस उत्पादक शेतकरी व त्यांच्या सुविद्य पत्नी)

यांचे शुभहस्ते

मा. कृषीरत्न श्री. बी. बी. ठोंबरे
चेअरमन व कार्यकारी संचालक,
नॅचरल उद्योग समुह यांचे अध्यक्षतेखाली

मंगळवार दि. 28/10/2025 रोजी, दुपारी ठिक 3.00 वाजता कारखाना स्थळी आयोजित केला आहे.
कृपया सदर कार्यक्रमास आपली उपस्थिती प्रार्थनीय आहे.

विनित
जनरल मॅनेजर | सह. कार्यकारी संचालक | संचालक मंडळ